## निमिष सोनार

# वलय



ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

# वलय

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

वलय (कादंबरी)

लेखक : निमिष सोनार

पत्ता: Nimish N. Sonar,

Flat No-102, Shreeram Park Society, Sr No- 90A/1/1C, Anand Park,

Behind Amba Nagari Building, Dhanori, Pune - 411015

फोन नंबर:  8805042502

ब्लॉग:  https://vachanastu.blogspot.in/

http://artimidis.blogspot.in/

https://nimishtics.blogspot.in/

https://www.facebook.com/vachanastu/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २७ फ़ेब्रुवारी २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावना

निमिष सोनार यांचे कौतुक करावे तेवढे कमी. IT कंपनीत मोठ्या हुद्द्यावर काम करत, घर सांभाळत, वेळ काढून ते आपली लेखन जिज्ञासा जोपासतात. आणि आपल्या सारख्या वाचकांना तृप्त करतात; हीसुद्धा एक प्रकारची समाज सेवाच आहे. त्याबद्दल त्यांचे आणि विशेषतः त्यांच्या कुटुंबियांचे आभार!

मराठी साहित्याच्या दुनियेत अतिशय वेगळया प्रकारचे आणि आधुनिक प्रकारचे साहित्य आणणारे जे काही नवोदित लेखक आहेत त्यांत निमिष सोनार ह्यांचे नाव अग्रेसर आहे ह्यांत शंकाच नाही. त्यांनी यापूर्वी जलजीवा (काल्पनिक कथा), आग्या वेताळ (गूढकथा), शिकारी साखळी (भयकथा), अपूर्ण स्वप्न, शापित श्वास (विज्ञान कथा) अशा अनेक उत्तमोत्तम कादंबऱ्या नि कथा लिहिल्या आहेत. भयकथा, विज्ञान कथा, पल्प फिक्शन, रम्यकथा अश्या अनेक साहित्य प्रकारांत त्यांनी विमुक्त संचार केला आहे आणि मराठी साहित्यावर आपली अशी एक विशेष छाप पाडली आहे.

मराठी संकेतस्थळांवर त्यांचे लिखाण उपलब्ध आहे. तसेच त्यांच्या ब्लॉग वर नियमितपणे ते विविध विषयांवर लिहितात.

२०१६ साली आम्ही BookStruck पुरस्कार जाहीर केले. त्यात निमिष सोनार यांच्या "जलजीवा" या कादंबरीला "सर्वोत्कृष्ट fantasy पुरस्कार" मिळाला. तसेच त्यांना "बेस्ट प्रोमिसिंग ऑथर" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावरून त्यांच्या लेखनाला खरंच दुजोरा मिळाला. पुरस्काराच्या निमित्ताने मला त्यांचे कार्य

जवळून पाहायला मिळाले आणि त्यांना मिळालेले पुरस्कार सार्थ आहेत याची जाणीव झाली

२००९ साली राजकुमार हिरानी यांचा '3 Idiots' खूप गाजला. हा चित्रपट चेतन भगत यांच्या "Five Point Someone" ह्या कादंबरीवर आधारित होता. लेखकाचे नाव चित्रपटाच्या opening credit मध्ये न दाखवता, closing credit मध्ये दाखविल्यामुळे मीडिया मध्ये बराच वाद झाला होता. काही वेळेस मूळ लेखकाला श्रेय दिले जात नाही. अशीच कहाणी आहे 'वलय' मधील मुख्य नायक राजेशची. त्याला लिखाणाची; संवादमय लिखाणाची खूप आवड. शाळेत असताना एक नाटक लिहिले आणि त्याच्या शिक्षकांनी आपाल्या नावाने ते खपविले. एवढेच नाही तर चक्क पारितोषिकही मिळविले. राजेशकडे पुरावा नव्हता. त्यामुळे नाईलाजास्तव त्याने ही चोरी विसरून जायचे ठरविले. पण नियतीमध्ये काहीतरी वेगळेच होते...

आपण टीव्हीवर चंदेरी दुनियेचा झगमगाट नेहमी विस्मयाने बघतो. ही कादंबरी त्यामागचं "वलय" नि त्यातील भयानक वास्तव डोळयासमोर उभं करतं. बाहेरून आपल्याला दिसते ती नट नटींची झगमगीत दुनिया. अशा दुनियेत आपले स्थान, किंबहुना वलय निर्माण करण्यासाठी आणि टिकविण्यासाठी काय काय करावे लागते आणि कशा परिस्थितीतून जावे लागते, याचे तंतोतंत दृश्य लेखकाने ह्या कादंबरीतून उभे केले आहे.

सोनीचा selfie मुळे झालेल नुकसान आणि फायदा; रागिणीच्या जीवनात घडलेल्या घडामोडी; सुप्रियाचा झालेला अपेक्षाभंग... राजेश आणि त्याला जीवनात भेटणाऱ्या विविध पात्रांची शोध आणि प्रतिशोध यांची ही कहाणी तुम्हाला नक्कीच मंत्रमुग्ध करून सोडेल.

The Dirty Picture ह्या हिंदी सिनेमात विद्या बालन म्हणते "फ़िल्में सिर्फ तीन चीजों की वजह से चलती हैं Entertainment, Entertainment, Entertainment और मैं Entertainment हूँ |". तुमच्या हातात असलेली ही कादंबरी तुमचं मनोरंजन करेल, यात काही शंका नाही!

मनोरंजनाच्या झगमगाटात दिपवून टाकणारे हे "वलय" तुम्हाला नक्कीच आवडेल आणि तुम्ही आपल्या आप्तजनांना नक्कीच शेअर कराल अशी आशा बाळगतो.

सिद्धेश प्रभुगांवकर,

web.bookstruck.com

https://www.facebook.com/bookstruck.in

## लेखक निमिष सोनार यांची ओळख



लहानपणापासून वाचण्याची आणि लिहिण्याची तसेच सिने टीव्ही क्षेत्राबद्दल कमालीची आवड

fantasy वाचनाची खूप अवाद. अद्भुत जग आवडते. पूर्वी लोकमत पेपर सोबत शनिवारी "लोकमत कॉमिक्स" यायचे तसे कॉमिक्स मी स्वत: बनवून छापले जावे अशी इच्छा होती कारण drawing सुद्धा चांगले आहे. पण नंतर drawing साठी वेळ कमी पडू लागला. पण लिहिण्याची आवड कायम आहेच. छंद म्हणून अनेक कॉमिक्स मी draw केले आहेत. (रामायण आणि महाभारतावर) ऐतिहासिक आणि पौराणिक यात्कीरेखांची लहानपणापासून आवड. चाणक्य आणि कृष्ण खूप आवडतात. विविध वर्तमानपत्रांत पूर्वी लेख लिहिलेत (जास्त करून चित्रपटाबद्दल). इंटरनेट आल्यानंतर आणि मराठीत लिहिण्याची सोय झाल्यानंतर मनोगत, मिसळपाव आणि मायबोली तसेच ऐसी अक्षरे या संकेतस्थळांवर सातत्याने विविध विषयांवर लेखन.

तसेच ईसाहित्य वर या आधी प्रकाशित झालेली जलजीवा खूप वाचकप्रिय कादंबरी ठरली. "विश्वरचनेचे अज्ञात भविष्य" ही लघु कादंबरी थोड्या हटके विषयावर आहे तो विशिष्ठ प्रकारच्या वाचकांत लोकप्रिय आहे. सात ते आठ लघु कथा (काही विनोदी तर उर्वरित गूढ कथा) लिहिल्या आहेत. मी व्यंगचित्र सुद्धा काढतो. वाचनाचा खूप छंद आहे.

आवडीचे लेखक: (मराठी) - व. पु. काळे, शिरीष काणेकर, मुकेश माचकर, वि.स. खांडेकर, द्वारकानाथ संझगिरी, जयश्री कुलकर्णी, सुहास शिरवळकर, रणजित देसाई, मीना प्रभू, नायरण धारप, रत्नाकर मतकरी आणि बरेच काही

आवडीचे लेखक: (इंग्रजी) - इ. एल. जेम्स, शोभा डे, तस्लिमा नासरिन, चेतन भगत, सिडनी शेल्डन,देवदत्त पट्टनायक,  सुदीप नगरकर आणि बरेच काही

आवडीचे पुस्तक:  रामायण, महाभारत आणि चाणक्य या संदर्भातील अनेक पुस्तके, पार्टनर - व. पु. काळे , दुनियादारी- सुहास शिरवळकर, ययाती- वि.स. खांडेकर, फरासी प्रेमिक- तस्लिमा नासरिन, चाणक्य - भा. द. खेर, सिडनी शेल्डन ची सगळी पुस्तके (मूळ इंग्रजीतील), दा विन्सी कोड - डॅन ब्राऊन, स्पाउज- शोभा डे, रत्नाकर मतकरी चे सगळे पुस्तकं, Fifty Shades of grey- E. L. James, Tell no one- Harlen Coben, That's the way we met - Sudeep Nagarkar आणि इतर अनेक

मी लिहितो त्यामागची प्रेरणा:

१) माझे संवेदनशील मन जे वातावरणातील विविध लोकांच्या मनातील स्पंदन सतत टिपत असते, त्यांच्या मनात काय चालले असावे याचा मनात मी अंदाज बांधत असतो आणि ते इतरांना कळावे याचा खटाटोप.

२) तसेच प्रत्येक गोष्टीवर माझे स्वत:चे असे काही मत आहेत ते मी कादंबरीच्या किंवा लेखांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करतो. कोणत्याही विषयाची एकाच एक बाजू न बघता त्याला दुसरी आणि कदाचित तिसरीही बाजू असते ज्याकडे सर्वजण कानाडोळा करतात त्याच बाजू मला कादंबरीतील विविध पात्रांच्या माध्यमातून वाचकांसमोर आणायच्या आहेत.

३) जर माझे मत मला व्यक्त करायला मिळाले नाही, किंवा माझ्या विधानांचा मुद्दाम विपर्यास करण्यात आला असे जर मला आढळले तर मी त्यावर लिहितो.

४) वाचकांना एका वेगळ्याच अद्‌भुत आणि अस्तित्वात नसलेल्या fantasy जगात घेऊन जाऊन त्यांचे मनोरंजन करणे

ड्रीम प्रोजेक्ट्स: विविध प्रकारच्या हटके विषयांवर मराठीत कादंबऱ्या आणायच्या आहेत. भविष्यात खालील वेगवेगळया विषयांवर लिहिणे आवडेल/आवडते

१) वेगळया पद्धतीच्या सूड कथा,

२) रहस्य, थरार, विज्ञान काल्पनिका आणि भयकथा

३) ऐतिहासिक काल्पनिका,

४) महाराष्ट्रातील अस्सल नवीन सुपरहिरो,  (हटके विषय)

५) ऑफिस स्पाउज ह्या संकल्पनेवर, (हटके विषय)

६) एकत्र कुटुंब पद्धतीवर सगळ्या अंगाने विचार करणारी कादंबरी, (हटके विषय)

७) भारतातील लोक, लहान मुले, मोठी माणसं, त्यांचे सेक्स लाईफ आणि त्याचा सामाजिक जीवनावर परिणाम, तसेच त्याचे दमन आणि अतिरेक या दोघांचे दुष्परिणाम, (हटके विषय)

८) लाईफ -२४ बाय ७ (आय टी इंडस्ट्री तील कर्मचाऱ्याच्या समस्या), (हटके विषय)

९) ज्येष्ठ आणि तरुण यांच्यातील पिढीच्या अंतरामुळे होणाऱ्या वादावर  सगळ्या बाजूनी प्रकाश टाकणारी कादंबरी (हटके विषय)

१०) आणखी इतर अनेक विषय घोळत आहेत

इत्यादी अनेक विषय मनात घोळत आहेत. फक्त जसा जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे आणि परमेश्वराची इच्छा असली तर नक्की मी हे सगळे ड्रीम प्रोजेक्ट्स पूर्ण करणार!!

# वलय

(कादंबरी)

लेखक: निमिष सोनार

© सर्व हक्क लेखकाकडे

sonar.nimish@gmail.com



टीव्ही आणि चित्रपट

क्षेत्रातील

सर्व

लेखकांना

समर्पीत

# लेखकाचे मनोगत

"वलय" ही कादंबरी मी "1 मे 2016 ते 21 डिसेंबर 2017" या दरम्यान लिहिली आहे. कामाचा व्याप सांभाळून लिहिणे ही काही सोपी गोष्ट नव्हती, पण लिहिण्याची उर्मी स्वस्थ बसू देत नव्हती. माझ्या याआधीच्या "जलजीवा" या सायन्स फिक्शन कादंबरीच्या यशामुळे आणि वाचकांनी त्यावर केलेल्या भरभरून प्रेमामुळे पुन्हा लिहिण्याची प्रेरणा मिळाली. जलजीवा लिहिण्याची प्रेरणा देणारे घटक होते- बर्मुडा ट्रँगल, अथांग समुद्र, पाणी आणि जहाजे यांचे लहानपणापासून असणारे कुतूहल आणि आकर्षण! 2011 साली सहज म्हणून मिसळपाव, मायबोली आणि मनोगत या संकेतस्थळांवर क्रमश: लिहिलेली "जलजीवा" खऱ्या अर्थाने प्रकाशझोतात आली ती bookstruck आणि esahity.com मुळे! त्यानंतर ही google play store वर आणि "प्रतिलिपी" आणि "ऐसी अक्षरे" या संकेतस्थळांवर सुद्धा मोफत उपलब्ध आहे. आजही ही कादंबरी नवनवीन वाचकसंख्या जोडते आहे आणि मला हजारो वाचकांचे फोन किंवा मेसेज येत आहेत. bookstruck तर्फे 2016 साली जलजीवाला "सर्वोत्कृष्ट फँटसी" पुरस्कार मिळाला. जलजीवा व्यतिरिक्त "विश्वरचनेचे अज्ञात भविष्य" ही लघु कादंबरी मी लिहिली आहे आणि मोफत वाचनासाठी उपलब्ध आहे तसेच माझ्या इतर अनेक कथा प्रसिद्ध झाल्या आहेत.

"वलय" लिहिण्यामागची प्रेरणा म्हणजे - टीव्ही आणि चित्रपट क्षेत्राबद्दल लहानपणापासून असणारी आवड आणि आकर्षण! ही कादंबरी लिहितांना मला मोलाची साथ दिली ती माझ्या पत्नीने, कारण ऑफिसमधल्या कामाचा व्याप सांभाळून आणखी मी उरलेला वेळ लेखनात घालवणार म्हणजे कुटुंबाला कमी वेळ! पण तरीही तिने ते सहन केले, तसेच माझ्या कादंबरीची पहिली वाचक तीच! तिने यातील अनेक लॉजिकल चुका माझ्या लक्षात आणून दिल्या. त्याबद्दल तिचे मनापासून आभार!

आणखी मला "गुगल कीप" या ॲप्लिकेशनचे आणि "गुगल मराठी कीबोर्ड" चे मनापासून आभार मानावेसे वाटतात कारण अर्ध्यापेक्षा जास्त कादंबरी ही मी मोबाईलवरच लिहिली आहे, गुगल कीप मध्ये!

# सूचना

कादंबरी वाचायला सुरुवात करण्याआधी –

जगात सर्वात जास्त चित्रपट निर्मिती करणाऱ्या वलयांकित अशा आपल्या भारतीय चित्रपटसृष्टीत तसेच टीव्ही क्षेत्रात स्वत:चे वलय निर्माण करण्यासाठी आणि टिकवण्यासाठी धडपडणाऱ्या काही जणांची ही कहाणी असून ही एक पूर्णपणे काल्पनिक कादंबरी आहे.

काही अपरिहार्य अपवाद वगळता यात उल्लेख असलेली सिनेमांची नावे, सिनेमाशी संबंधित विविध ठिकाणे, कलाकार, चित्रपट, टीव्ही सिरियल्स, नाटके, थिएटर्स, पुस्तके, लेखक वगैरे यांची नावे काल्पनिक आहेत!

तसेच गरजेनुसार योग्य तो परिणाम साधण्यासाठी मी काही ठिकाणी इंग्रजी आणि हिंदी शब्द आणि वाक्ये मुद्दाम वापरली आहेत.

काही ठिकाणी सेक्सशी संबंधीत बोल्ड प्रसंग, माफक प्रमाणात शिव्या किंवा हिंसेचे वर्णन असल्याने एक सावधगिरीचा उपाय म्हणून पंधरा वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वय असलेल्या व्यक्तींनी ही कादंबरी वाचायची किंवा नाही हे पालकांच्या संमतीने ठरवावे किंवा स्वत:च्या जबाबदारीवर कादंबरी वाचावी.

**या कादंबरीचा हेतू फक्त वाचकांचे मनोरंजन करणे हा असून** कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण करणे तसेच कुणाचे समर्थन करणे, कुणावर टीका करणे किंवा वाचकांवर विशिष्ट प्रकारची विचारसरणी लादणे हा नाही. आजच्या इंटरनेटच्या जमान्यातील वाचक सूज्ञ आहेत त्यामुळे जास्त काही सांगण्याची गरज नाही!

यातील काल्पनिक व्यक्ती, स्थळे, प्रसंग, संस्था यांचा खऱ्या जगातील गोष्टींशी संबंध किंवा साधर्म्य आढळल्यास तो एक योगायोग मानावा आणि कादंबरी वाचनाचा आनंद घ्यावा!

**कादंबरी पूर्णपणे वाचून झाल्याशिवाय कादंबरीविषयी जाहीर मतप्रदर्शन करू नये, ही विनंती!**

आपल्या प्रतिक्रिया sonar.nimish@gmail.com या ईमेल आयडी वर पाठवाव्यात.

-निमिष सोनार (लेखक)

# वलय (अनुक्रमणिका)


वलय ........ 1

प्रस्तावना ........ **Error! Bookmark not defined.**

सूचना ........ 4

प्रकरण 1 ........ 9

प्रकरण 2 ........ 13

प्रकरण 3 ........ 18

प्रकरण 4 ........ 22

प्रकरण 5 ........ 25

प्रकरण 6 ........ 28

प्रकरण 7 ........ 32

प्रकरण 9 ........ 40

प्रकरण 10 ........ 42

प्रकरण 11 ........ 45

प्रकरण 12 ........ 46

प्रकरण 13 ........ 50

प्रकरण 14 ........ 54

प्रकरण 15 ........ 58

प्रकरण 16 ........ 64

प्रकरण 17 ....................................................................................................69

प्रकरण 18 ....................................................................................................73

प्रकरण 19 ....................................................................................................81

प्रकरण 20 ....................................................................................................85

प्रकरण 21 ....................................................................................................91

प्रकरण 22 ....................................................................................................95

प्रकरण 23 ....................................................................................................98

प्रकरण 24 ..................................................................................................102

प्रकरण 25 ..................................................................................................106

प्रकरण 26 ..................................................................................................110

प्रकरण 27 ..................................................................................................112

प्रकरण 28 ..................................................................................................115

प्रकरण 29 ..................................................................................................118

प्रकरण 30 ..................................................................................................120

प्रकरण 31 ..................................................................................................127

प्रकरण 32 ..................................................................................................131

प्रकरण 33 ..................................................................................................138

प्रकरण 34 ..................................................................................................148

प्रकरण 35 ..................................................................................................157

प्रकरण 36 ..................................................................................................162

प्रकरण 37 .......................................................................................................174

प्रकरण 38 .......................................................................................................178

प्रकरण 39 .......................................................................................................186

प्रकरण 40 .......................................................................................................190

प्रकरण 41 .......................................................................................................196

प्रकरण 42 .......................................................................................................199

प्रकरण 43 .......................................................................................................204

प्रकरण 44 .......................................................................................................211

प्रकरण 45 .......................................................................................................218

प्रकरण 46 .......................................................................................................223

प्रकरण 47 .......................................................................................................228

प्रकरण 48 .......................................................................................................233

प्रकरण 49 .......................................................................................................243

प्रकरण 50 .......................................................................................................253

प्रकरण 51.......................................................................................................261

प्रकरण 52.......................................................................................................267

# प्रकरण 1

“टिंग टाँग” ... दरवाज्याची बेल वाजते. सून दार उघडते. सासूच्या हातातील बाजाराच्या पिशव्या घेते. सासू सोफ्यावर पंख्याखाली बसून पदराने घाम पुसते. सून स्वयंपाकघरात जाते.

“सूनबाई, झाला नाही का स्वयंपाक अजून?” सोफ्यावरून आवाज स्वयंपाकघराकडे जातो.

पेपर वाचणारे सासरे पेपरातून डोके बाहेर काढून सासूकडे बघतात. पुन्हा पेपरात बघतात.

“हो, सासूबाई. तयार होतोच आहे स्वयंपाक!” स्वयंपाकघरातून आवाज सोफ्याकडे जातो.

“किती वेळा सांगितलं की या वेळेपर्यंत स्वयंपाक झालाच पाहिजे, कळत नाही तुला?” सासू.

“एकदम टाइम टू टाइम सगळं करायला मी काही मशीन नाही सासूबाई!” मिरचीची फोडणी टाकत सून म्हणते. सगळ्यांना ठसका येतो.

“काय म्हणालीस? परत म्हण जरा! बघतेच तुला!”, सोफ्यावरून उठत ठसका देत सासू म्हणते.

“आज तुला धडाच शिकवते!” असे म्हणून सासू त्वेषाने स्वयंपाकघरात जाऊन सुनेला जोरात तीन वेळा थप्पड लगावते. सासूच्या हाताचा धक्का लागून कढई पुन्हा पुन्हा तीन वेळा खाली पडते आणि तेल हवेत येऊन स्थिर होते! थ्रीडी कोनातून हवेतले तेल दाखवत कॅमेरा फिरत जातो.

सासरे उठून उभे राहतात. त्यांच्या चेहे्ऱ्यावर आश्चर्याचे भाव! हे काय झाले? एकदम थप्पड? तीन वेळा ते खुर्ची वरून उठतात. मग त्यांचा चेहरा तीन वेळा ब्लॅक अँड व्हाईट होतो. तेही हवेत स्थिर होतात!!....

हा सीन मोठ्या पडद्यावर बघणारे निर्माते, कलाकार, लेखक, एडिटर वगैरे मंडळींनी टाळया वाजवल्या.

एडिटरने रिमोटने पॉज करून तो सीन तात्पुरता थांबवला.

एडिटर, “छान जमून आलाय हा सीन, नाही का?”

तेथे बसलेला एक कलाकार वैतागून म्हणाला, “एका क्रियेवरची प्रत्येकाची प्रतिक्रिया तीन तीन वेळा दाखवायची खरंच गरज आहे का?”

डायरेक्टर म्हणाला, “अरे मग राजा! ते एकदम आवश्यक आहे! त्याशिवाय टाइमपास कसा होईल रे! ही काय दर आठवड्याला चालणारी सीरियल आहे का? पटापट कथा पुढे सरकायला? डेली सोप आहे हा! डेली सोप! अंगाला जसा डेली आपण सोप लावतो ना तसे. लोकांना रोज व्यसन लागलंय या डेली सोपचं! मग रोज रोज नवीन काय दाखवणार? थोडा टाईमपास हवा ना!”

निर्माता म्हणाला, “बरोबर आहे! चला एडिटर साहेब पुढे बघू द्या! करा पुढचा भाग प्ले!”

एडिटरने प्लेचे बटण दाबले.

“टिंग टाँग” ... पुन्हा बेल वाजते. थप्पड खाल्लेल्या सुनेचा पती ऑफिस मधून घरी येतो. घरात काय ड्रामा झालाय त्याचा अंदाज येऊन तो कुणाला काहीच न बोलता बेडरूम मध्ये निघून जातो. त्याची ब्रीफकेस ठेवतो, फ्रेश होतो, घरचे कपडे घालतो आणि मग बेडरूममध्ये जाऊन वाईन पीत बसतो. सीरियलचा एपिसोड संपतो. टाळ्या! टाळ्या!!

तेथे बसलेला तोच कलाकार पुन्हा दुपटीने वैतागून म्हणाला, “अरे अरे! टाळ्या काय वाजवताय? फॅमिली ड्रामा आहे हा आणि यात वाईन कसली दाखवताय? काय चाललंय काय तुमचं?”

डायरेक्टर म्हणाला, “वा वा! अगदी योग्य तेच दाखवतो आहे आपण! शेवटी पुरुषांना आवडणारं काहीतरी असलं पाहिजे ना यात? थोडेफार पुरुष प्रेक्षक लाभण्यासाठी असे करावे लागते! सासू सुनेच्या सिरीयल मध्ये पुरुष मंडळींचे नाहीतरी काही विशेष काम नसते. मग पुरुषांनी वाईन पीत बसायला काय हरकत आहे? आय मीन छोट्या पडद्यावर!”

तो कलाकार म्हणाला, “तुमचे लॉजिक चुकते आहे. पुरुषांना ऑफिसमधून घरी आल्यानंतर दारू पिण्याव्यतिरिक्त काही दुसरे काम नसते असे वाटले की काय तुम्हाला?”

डायरेक्टर म्हणाला, “ आरे! गप बस ना यार! सोड ना त्या वाईनचा नाद! या सीरियलमध्ये लवकरच तुझी एन्ट्री होणार आहे! त्या सुनेच्या प्रियकराचा रोल करायचा आहे तुला! माहित आहे ना? हा वाईन पिणारा पती लवकरच घरातून पळून जातो असे दाखवायचे आहे!”

“काय? मला तर हे आधी माहिती नव्हते!”, तो कलाकार आश्चर्यचकित होऊन म्हणाला.

“हो! डेली सोपच्या कथेमध्ये मध्ये डेली बदल होत असतात आजकाल! वाचकांच्या सोशल मिडीयावरील प्रतिसादांवरून आणि TRP च्या आधारे! काय समजलास? याला आम्ही म्हणतो डेली ‘सोप’ विथ ‘शांपू’ तडका! ही ही ही ही!”, डायरेक्टर स्वत:च्या जोकवर हसत म्हणाला.

इतर सगळे जबरदस्तीने हसले...

आज सर्वांनी त्या सिरीयलचे एकूण पुढचे सहा एपिसोड बघितले जे अजून टेलीकास्ट व्हायचे होते. गोरेगांवच्या फिल्मसिटी स्टुडिओमध्ये हे सर्व घडत होते आणि सीरियलचे नाव होते - “चार थापडा सासूच्या!”

त्या सिरीयलची कथा थोडक्यात अशी होती - सासू सुनेच्या कटकटीतून मुक्त होण्यासाठी नवरा घरातून पळून जातो खरं आणि एका बाबाच्या आश्रमात आश्रयाला जायचे ठरवून प्रवास करत असतांनाच सुनेच्या कॉलेज जीवनातील एक एकतर्फी प्रेमी त्याचे रस्त्यात अपहरण करतो आणि त्या घरात दूरचा नातेवाईक बनून येतो आणि राहतो. सुनेला नीट आठवत नसते म्हणून ती सुद्धा त्याला तो नातेवाईक समजते. मग तो सांगतो की मी त्याला शोधून आणतो पण मला सुनेची मदत लागेल. मग सुनेला संशय यायला लागतो वगैरे. मुलगा घरात नसल्याने सासू सुनेचे भांडणं बंद पडतात कारण दोघींनी भांडण करून करून ज्याला छळायचे तोच घरातून नाहीसा झाल्याने आता कुणासाठी भांडणार म्हणून सासू सुना गुण्या गोविंदाने राहायला लागलेल्या असतात. मग कथेत सूनेची बहिण अचानक प्रवेश करते आणि त्यामुळे आणखीन एक ट्वीस्ट येते आणि मग अनेक प्रसंगांनंतर गोड शेवट होतो.

□□□□

# प्रकरण 2

आता संध्याकाळ झाली होती. स्टुडीओतील सर्वांनी सर्वांनी एकमेकांना निरोप दिला आणि जायला निघाले. सीरियल मधील सून म्हणजे सुप्रिया सोंगाटे आणि त्या सीरियलचा लेखक तसेच टीव्ही आणि फिल्म्स पत्रकार राजेश पारंबे हे दोघेसुद्धा घरी जायला निघाले.

राजेश टीव्ही सिरियल्ससाठी संपूर्ण ब्रॉड (विस्तारित) कथा लिहायचा. मग प्रत्येक एपिसोड्स साठी कथेनुसार स्वतंत्रपणे पुन्हा स्क्रीप्ट लिहायचा. तसेच तो फ्री लान्स फिल्म जर्नालीस्ट म्हणून सुद्धा काम करत होता. त्याने जर्नालिझमचा डिप्लोमा आणि सिनेमा लेखनासंदर्भात कोर्स केला होता. पण लेखनाची उर्मी आणि कला त्याच्या अंगी उपजतच होती. अगदी लहानपणापासून त्याने स्वतःमधली ही प्रतिभा ओळखली होती, पण एक दोनदा विश्वासघाताचे धक्के पचवून!

त्याचा टीव्ही आणि फिल्म जगतावरचा मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषेत असलेला ब्लॉग ("फिल्मी फायर") वाचणारे लाखो लोक होते. तो ब्लॉगवर जास्त करून फिल्म रिव्ह्यू (चित्रपट परिक्षण) लिहायचा. त्याचा रिव्ह्यू वाचून मगच चित्रपट बघायला जायचे की नाही हे ठरवणारी पब्लिक लाखोंमध्ये होती. त्याला टिव्ही सोबतच बॉलीवूड मध्ये ही लेखन करायची इच्छा होती. जमल्यास हॉलीवूड सुद्धा! मोठी स्वप्नं बघायला काय हरकत आहे असे त्याने मनाशी ठरवले होते. अजून बरीच मजल गाठायची बाकी होती. इतके काम करूनही ही तर अजून एका अर्थाने फक्त सुरुवातच होती. या क्षेत्रातल्या लेखकांसाठी आणि पत्रकारांसाठी काहीतरी भरीव काम आणि मदत करायची हे त्याने ठरवले होते आणि अर्थातच त्याच्या या महत्वाकांक्षेच्या मागे त्याचे एक महत्वाचे व्यक्तिगत कारणही जबाबदार होते!

राजेशने आज सुप्रियाच्या आवडीचा 'लाईट ग्रीन' तर सुप्रियाने राजेशच्या आवडीचा 'व्हाईट' पोशाख केला होता. पांढऱ्याशुभ्र कपड्यांत सुप्रिया राजेशला आवडायची आणि हिरवट कपड्यांत राजेश तिला आवडायचा. राजेश उजव्या हाताच्या मनगटात एक कडे घालायचा आणि उजव्या हातांच्या तर्जनीत डायमंड्सची व्हाईट अंगठी घालायचा. त्याची अंगकाठी साधारण पण आकर्षक होती. जास्त जाड नाही, जास्त बारीक नाही! राजेश बारीक मिशी ठेवत असे. त्याचे केस कुरळे होते.

हसतांना राजेशच्या गालावर नेहमी खळी पडायची. त्याच्या चेहऱ्यावर सतत असणाऱ्या स्मितहास्याची आणि गालावरील खळीची सुप्रिया जणू दिवाणीच झाली होती!

सुप्रियाचा चेहरा गोल होता आणि केस लांब होते. हसली की तिच्यासुद्धा गालावर खळी पडत असे. तिचा चेहरा भारतीय परंपरेनुसार रूढ असलेल्या अर्थाने सुंदर होता आणि शरीर पूर्णपणे प्रमाणबद्ध होते. पण एकूणच तिचे व्यक्तिमत्त्व असे होते की तिला सोज्वळ किंवा घरेलू सून, आज्ञाधारक मुलगी किंवा साडीतली पत्नी अशाच भूमिका सीरियल मध्ये मिळायच्या. सध्या ती हीच एक मराठी सीरियल करत होती. बाकी दोन सिरियल्स संपल्या होत्या. पूर्वी तिने पुण्यात "सनम तू माझा" या नाटकात काम केले होते. ते नाटक चांगले यशस्वी झाले होते. त्यानंतर तिच्या वडिलांनी खुश होऊन तिला कार घेऊन दिली होती. तिचे वडील पुण्यातील प्रसिद्ध ज्वेलरी व्यापारी होते. त्यांनी तिला तिच्या आवडीचे करियर करायला मोकळीक दिलेली होती. मग तिला पुढे मराठी चित्रपटात छोटे रोल्स आणि मग मराठी सिरियल्स मिळाल्या. मुंबईतील प्रसिद्ध “मॅडम अ‍ॅकॅडमी” मध्ये ती रीतसर कोर्सेस सुद्धा करत होतीच आणि आता तिचे हे शेवटचे वर्ष होते.

सुप्रिया राजेशवर प्रेम करत होती. तसे तिने त्याला बोलून दाखवले नव्हते पण तिला मनातून विश्वास होता की राजेशचेही तिच्यावर प्रेम आहेच आणि वेळ आली की ते ती व्यक्त करणार होतीच! राजेशबद्दल तिने घरच्यांना कल्पना दिली होती, पण एक मित्र म्हणून! दोघांना एकमेकांना भेटल्याशिवाय किंवा फोनवर बोलल्याशिवाय करमत नव्हते हे मात्र खरे! त्यापलीकडे ते अजून गेले नव्हते! सध्या तरी ते दोघे करियरवर लक्ष केंद्रित करत होते! सुप्रियाची राजेशशी या सीरियलच्या निमित्ताने ओळख झाली होती आणि नंतर अगदी कमी वेळेत त्याचे एका गाढ मैत्रीत रुपांतर झाले होते! सुप्रिया आणि राजेश बोरिवलीला राहत होते. राजेश एका अपार्टमेंट मध्ये भाड्याच्या रूमवर तर सुप्रिया हॉस्टेलवर!

सुप्रिया, “राजेश तू कसा जाणार घरी? मी सोडू का तुला साटमनगरला?”

राजेश, “नको, मला ड्रॉप केल्यावर तुला पुन्हा बरेच मागे सिद्धिविनायकनगरला यावे लागेल! मी जाईन आपला बसने नाहीतर टॅक्सीने!”

सुप्रिया, "नाही रे. चल. सोडते तुला. चल बस गाडीत!"

पाठीवरची सॅक मागच्या सीटवर टाकत राजेश सुप्रियाच्या बाजूला पुढे बसला. सुप्रियाने गाडी स्टार्ट केली. आता त्यांची गाडी ट्रॅफिक असलेल्या रस्त्यावर आली.

सुप्रिया, "तुला सहन कसं होतं रे हे सगळं? तू पूर्णपणे शांत बसून होतास सगळे एपिसोड बघताना! तू लिहितोस एक आणि ते त्यात बदल करून दाखवतात काहितरी दुसरेच?"

राजेश वैतागून म्हणाला, "नाही सहन होत हे सगळं मला! हे डेली सोप च्या नावाने हे जे चाल्लंय ना, ते नाही सहन होत, सुप्रिया! पण तरीही त्या सीरियलसाठी लेखन करतोय मी! मन मारून! कारण, या इंडस्ट्रीत लेखक म्हणून तसे पहिले तर ही माझी फक्त सुरुवात आहे असे मी मानतो कारण मला आजून बरीच मजल गाठायची आहे! आणि काही वेळेस मला चॉईस नसणार आहे हे मला माहीत आहे. जे मिळेल त्यासाठी लेखन करावं लागणार आहे."

सुप्रिया, "हां. तेही खरंच आहे म्हणा. तुला सांगते आणि मी तरी काय करतेय? तेच करतेय! तेच नेहमीचे सुनेचे रोल! सुरुवातीला तडजोड करावीच लागते या क्षेत्रात. कोण कशाची आणि कशाशी तडजोड करेल हे मात्र सांगता येत नाही. नाही का?"

राजेश, "हां, पण एक नक्की! मी जी महत्त्वाकांक्षा बाळगून आहे, ती मी नक्की पूर्ण करणार. पण अजून वेळ लागेल त्याला हे मला माहिती आहे. येणारा काळच सांगेल ते! त्या महत्वाकांक्षेसाठी मी काहीही करायला तयार आहे!"

बराच वेळ ते बोलत होते. सुप्रियाच्या मनात मात्र काहीतरी वेगळंच चाललं होतं. तो नेमक्या कोणत्या महत्वाकांक्षेबद्दल बोलतोय हे सुप्रियाला नक्की माहित नव्हतं.

ती विचार करत होती, “याच्या मनात मी असेन का? हा माझ्यावर प्रेम करत असेल का?”

साटमनगर आल्यावर सुप्रिया म्हणाली, “आलं तुझं साटम नगर. चल बाय! काळजी घे.”

सॅक पाठीवर घेऊन राजेश कारमधून उतरला. सुप्रियाला थँक्स म्हणून तो जायला निघाला. ती पुन्हा माघारी वळली.

राजेश त्याच्या “गीता अपार्टमेंट” जवळ पोचला आणि त्याने लेटर बॉक्स चेक केला. त्यात काहीही नव्हते! मग लिफ्टचे बटण दाबले. लिफ्ट आली! त्यात ओळखीचे दोन जण होते. त्यांच्याशी ‘हाय हॅलो’ झाले. तो तिसऱ्या मजल्यावर राहत होता. एकटा. भाड्याने! तिसरा मजला आला. तो लिफ्ट मधून बाहेर आला. त्याचा फ्लॅट नं 309 चाबी ने उघडला. आत जाऊन फ्रेश झाला. मग सोफ्यावर बसला. बसल्या बसल्या त्याला थकव्याने झोप लागली!

त्याला रात्री नऊ वाजता जाग आली. त्याने फ्लॅटचा दरवाजा उघडून बाहेर बघितले. जेवणाचा डबा आलेला होता. डबा उचलून तो दार बंद करून आतमध्ये आला. टेबलावर पेपर आंथरून त्यावर त्याने डबा उघडला. भाजणीचे थालीपीठ, दही, रस्सा, कैरीचे लोणचे आणि खिचडी असा त्याचा आवडीचा मेनू त्याने मुद्दाम आज फोन करून बनवायला सांगितला होता. पाण्याची बाटली जवळ ठेवून तो थालीपीठ खाऊ लागला. फक्त रात्रीचा टिफिन त्याने लावला होता. दिवसा इतर ठिकाणी तो जेवण करून घ्यायचा. जेवण सुरू करता करता रिमोटने त्याने टीव्ही सुरु केला.

“बूम” या टीव्ही चॅनेलवर बॉलीवूड न्यूज सुरू होत्या! प्रसिद्ध इंग्रजी लेखक “केतन सहानी” यांची कथा असलेल्या “चार चतुर” या सुपरहिट हिंदी चित्रपटाच्या यशाची पार्टी सुरू होती. मात्र त्यात

डायरेक्टर आणि लेखक यांची वादावादी सुरू झाली कारण, डायरेक्टरने लेखकाच्या कादंबरीवर चित्रपट बनवून सुद्धा त्याचे श्रेय लेखकाला चित्रपटातल्या श्रेयनामावलीत बिलकूल दिले नव्हते. उलट, लेखक म्हणून डायरेक्टरने स्वत:चे नाव दिले होते. दोन तीन वेळा फोनवर दाद न दिल्याने त्या लेखकाने पार्टीतच लोकांसमोर आणि पत्रकारांसमोर डायरेक्टरवर अचानक आरोप करण्याची संधी साधली. त्याच्या कादंबरीवर हा पहिलाच चित्रपट होता. जरी या डायरेक्टरने केतनला प्रथमच ब्रेक दिला होता याचा अर्थ त्याचे लेखनाचे क्रेडिट स्वत:कडे घेण्याची मुभा थोडेच त्याला प्राप्त झाली होती? पण कोणत्याही क्षेत्रातील प्रस्थापितांविरोधात नवोदितांना लढा देतांना खूप त्रास होतोच! राजेशने टीव्ही बंद केला. त्याचा मूड खराब झाला होता.

त्याच्या रुममध्ये त्याचे पुस्तकांचे एक मोठे कपाट होते. त्याला वाचनाची खूप आवड होती. त्या कपाटात राजेशचे लिखाण असलेली एक लाल रंगाची फाईल मुद्दाम सहज दिसेल अशी ठेवलेली होती. त्याकडे बघत तो विचार करू लागला - “या टीव्ही आणि फिल्म इंडस्ट्रीत लेखकांचे शोषण कधी थांबणार? मी यासाठी संघर्ष करणार आहे. नाकी नऊ आणणार मी सगळयांच्या! पण, थांबा लेकांनो! अजून योग्य वेळ आली नाही. एक दिवस माझा येईल आणि सगळया लेखकांचा सुद्धा! माझी गावाकडे जाण्याची वेळ पण लवकरच येईल असे दिसते आहे!”

◇◇◇◇

# प्रकरण 3

सुप्रिया राजेशला ड्रॉप करून सिद्धिविनायकनगरला “लीएरा विमेन्स हॉस्टेल” वर पोह्रोचली. ते एक “सेल्फ कुकिंगची” सोय असलेले वर्किंग विमेन्स होस्टेल होते. तिच्या दोन रूममेट्स होत्या. सोनी बनकर आणि रागिणी राठोड. सुप्रियाने चावीने रूम उघडली. कॉमन किचन, हॉल आणि तीन स्वतंत्र बेडरूम, बाथरूम अशी रचना होती त्यांच्या रूमची! तिने आपली पर्स ड्रेसिंग टेबलवर ठेवली आणि आरशात पाहिले. चेहरा बराच काळवंडलेला वाटत होता. सोनी आली असेल असा विचार करून तिने सोनीच्या बेडरूमवर टकटक  केले. आतून स्त्रीचा एक अवखळ आवाज आला, "कम ऑन इन सूप्री! डोअर इज ओपन!"

सुप्रियाने दरवाजा ढकलला तेव्हा सोनी बनकर तिच्या बेडवर अस्ताव्यस्त पाय फैलावून पहुडलेली होती. तिच्या कानात हेडफोन होता आणि अंगावर फक्त एक बारीक सफेद टी शर्ट आणि पँटी होती. सोनी बोलण्यात, वागण्यात आणि कपडे घालण्यात खूप अघळपघळ आणि मोकळी होती! सोनीचा चेहरा लांबूळका होता. तिची अंगकाठी भरीव आणि गोलसर होती. तिच्या चेहे्ऱ्यावर नेहमी एक बेपर्वाईची आणि उच्छ्रृंखलतेची छटा असायची. डोळे चमकदार आणि बोलके होते. नाक सरळ आणि उठावदार होते.

“सोनी मॅडम, आराम चाल्लाय? जेवणाचं काय ठरवलंय आज रात्रीचं?”

“साकेत सोबत जाणार आहे मी बाहेर जेवायला.”

“वा! मज्जा चाल्लीये मस्त. बॉयफ्रेंड सोबत! अगं, रागिणी आली नाही अजून?”

सोनी हसायला लागली, “ती? आजपर्यंत आलीय का कधी वेळेवर ती परत? भटकत असते ती इकडे तिकडे रात्री बेरात्री! पण आज रात्री कसलीतरी शूटिंग आहे म्हणाली होती ती, त्यामुळे उशिरा घरी येईल ती!”

“शूटिंग आहे तेही खरंच आहे म्हणा! पण एरवी शूटिंग नसली तरी ही पोरगी रात्रीची बाहेर फिरतच असते. काय करत असते देव जाणे! एनिवे! मी राईस बनवते आहे. मग फक्त माझ्या एकटीसाठीच बनवते!”

“बिंदास बनव आणि खा! आपलंच हॉस्टेल आहे. आपलीच रूम आहे. आपलंच राज्य आहे! एंजॉय!”

तेवढ्यात सोनीचा मोबाईल वाजला. ती बोलू लागली, “हां रे साकेत. आ रही हूँ! .. तैय्यार तो होने दे मुझे!...हां बाबा हां, तेरी पसंद का पिंक कलर पहन के आती हूँ … क्या? खाना खाने के बाद पब मे भी चलना है? ठिक है...सेक्सी कपडे पहनके आती हूँ....हां रे! कम कपडे पहनने है, तो तैय्यार होने में ज्यादा समय लगता है! तुम साले जेन्ट्स लोग इस बात को नही समझोगे!”, एक डोळा मिचकावत स्वतःच्या जोकवर ती हसली.

तीच्या बेडरूम मधून बाहेर निघत सुप्रिया मनात म्हणाली, “त्या रागिणीला नावे ठेवते आणि स्वतः सुद्धा हुंदडते ही रात्री बेरात्री! पण ही सोनी भलती डान्स वेडी आहे. नाचण्याचा कोणताच चान्स, कोणतीच संधी ती सोडत नाही. डान्सबद्दल एवढं क्रेझी आजपर्यंत मी कुणाला पाहीलं नाही. ओह गॉड! आता सुद्धा चालली आहे ती पबमध्ये मनसोक्त डान्स करायला!”

फक्त एकदाच ती सोनी बरोबर पब मध्ये गेली होती तेव्हा तिने सोनीचा नाचण्याचा अजब फॉर्म आणि धिंगाणा बघितला होता! तिच्यासारखे खचितच कुणी नाचू शकत असेल! काय ती जबरदस्त एनर्जी होती आणि काय मस्त सॉलिड चार्म तिच्या नाचण्यातून ओसंडून वाहात होता की विचारता सोय नाही! फक्त एकच प्रोब्लेम होता- सोनी थोडीशी अल्लड होती!

सोनी महाराष्ट्रातल्या छोट्या शहरातून मुंबईत आली होती. तिला नृत्याची आणि संगीताची खूप आवड! अगदी स्वतःपेक्षा जास्त ती डान्सवर प्रेम करत असे. तिच्या मते डान्स म्हणजे एक प्रकारचा उत्कट अभिनयच आहे. नृत्य आपले शरीर आणि मन खऱ्या अर्थाने एकत्र आणते. त्यामुळे एखादा अभिनय रस नृत्याद्वारे आपण अधिक परिणामकारक पद्धतीने प्रेक्षकांसमोर पेश करू शकतो. करियरची सुरूवात म्हणून तिने टीव्हीवरच्या अनेक रियालिटी डान्स शो मध्ये भाग घेतला होता. अजून पुढे बरीच मजल गाठायची होती. मेकप करून, कपडे बदलून सुप्रियाला बाय करून सोनी निघून गेली. जेवण झाल्यावर सुप्रिया रूममध्ये एकटीच होती. रात्री दहा वाजता थोडे फिरून आल्यावर ती परत आली. सुप्रिया झोपल्यावर रात्री एक वाजता सोनी परतली.

सकाळी चार वाजता रागिणी राठोड परतली. तीच्या बेडरूममध्ये गेली. मग आंघोळ करुन पाच वाजता झोपली. सकाळी 9 वाजता सुप्रिया आणि सोनी निघून गेल्या तेव्हा रागिणी झोपलेलीच होती. सकाळी साडेअकराला तिला जाग आली. काल रात्री तिचे हॉरर सीरियलचे शूटिंग होते. गोराई बीचवर एका भीतिदायक वाटणाऱ्या एका जागेत डायरेक्टरने शूटिंग ठेवली होती. शूटिंग उशिरा रात्रीपर्यंत चालली होती. सध्या ती दोन हिंदी हॉरर सीरियल्स आणि दोन रियालिटी शोज मध्ये काम करत होती. सध्याचा काळ असा होता की टीव्हीचे प्रेक्षक वाढले होते आणि चित्रपटांसाठी वापरण्यात येणाऱ्या जवळपास सर्व आधुनिक टेक्नॉलॉजी सीरियलसाठी सुद्धा वापरायला सुरुवात झाली होती. सीरियलचे प्रोड्युसर आणि डायरेक्टरसुद्धा सीरियल चित्रपटाइतकीच भव्यदिव्य झाली पाहिजे असे पाहत आणि नंतर त्यातून बक्कळ पैसा कमावत!

सोनी, रागिणी आणि सुप्रिया तिन्ही माटुंगा येथे असलेल्या “मुंबई ॲकॅडमी ऑफ डान्स, ॲक्टींग अँड म्युझिक (MADAM)” येथे शिकत होत्या. जुन्या जमान्यातील प्रसिद्ध सुपरस्टार “स्वर्गीय धर्मेश कपूर” यांनी या कॉलेजची स्थापना केली होती. या कॉलेजला सगळेजण शॉर्ट नावाने MADAM (मॅडम) कॉलेज किंवा "मॅडम ॲकॅडमी" म्हणत असत. तिघींचे या कॉलेजातले हे शेवटचे वर्ष होते. शेवटच्या वर्षी रोज कॉलेजला येणे बंधनकारक नव्हते. मात्र ठराविक दिवशी त्यांना हजर रहावे लागे. हे वर्ष संपले की त्यानंतर मग खऱ्या अर्थाने सुरुवात होणार होती त्यांच्या फिल्मी करियरची! शेवटच्या वर्षी काही असाईनमेंट मिळायच्या त्या आपल्या वेळेनुसार कम्प्लीट केल्या की कोर्सचे सर्टिफिकेट मिळत असे म्हणजे मग कुठेही अभिनय क्षेत्रात करियर करायला मोकळे!

शिकता शिकता पार्ट टाइम जॉब त्यांनी स्वीकारला होता. मुंबई सारख्या शहरात रहायचे म्हणजे अफाट खर्च आलाच! मग मिळेल ते आणि मिळेल तेव्हा पार्ट टाईम काम करण्याशिवाय पर्याय नाही, हे सत्य आहे. मग तो याच क्षेत्रातला छोटा मोठा पार्ट टाईम जॉब असेल तर त्याहून चांगली गोष्ट कोणती? एक मात्र खरे की तिघींना फिल्म इंडस्ट्री मध्ये नाव, पैसा आणि प्रसिद्धी कमावायची होती. या कॉलेजमध्ये मनोरंजन क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या अनेक युवक युवतींसाठी साठी विविध प्रकारचे शॉर्ट आणि फुल टाइम कोर्सेस होते.

अभिनय, नृत्य किंवा कोणतीही कला ही काहींना उपजतच प्राप्त झालेली असते. गरज असते ती फक्त ती कला आपल्यात आहे हे ओळखण्याची आणि "मॅडम ॲकॅडमी" सारख्या संस्था या उपजत कलागुणांना आणखी वाढवण्यासाठी मदत करतात! जंगली प्राण्याला आपण पाळीव बनवतो तसे त्या उपजत कलेला पाळीव बनवण्यासाठी असे कॉलेजेस आणि कोर्सेस कामी येतात. तसेच आज मनोरंजन क्षेत्रात काय चाललंय हे माहित करून घ्यायला असे रीतसर शिक्षण घेतलेले बरे असते पण घेतलेच पाहिजे असे काही नाही. तसेच उपजत अभिनय कलेसोबत जर देखणं आणि उठावदार व्यक्तिमत्व लाभलं असेल तर तो दुग्धशर्करा योगच म्हणायला हवा!

लवकरच “मॅडम ॲकॅडमी” मध्ये एक ऑडिशन होणार होते ज्याची त्या ॲकॅडमी मधील सर्वजण आतुरतेने वाट बघत होते. हॉलीवूड आणि बॉलीवूड यांच्या एकत्र प्रयत्नातून एक भव्यदिव्य चित्रपट तयार होणार होता. त्याची भारतीय पातळीवरील एकमेव भव्य ऑडिशन “मॅडम” मध्ये टप्प्याटप्प्याने होणार होती. त्यांना त्यासाठी जास्त प्रसिद्ध नसलेले पण चांगले जातीचे ॲक्टर हवे होते जे त्यांना भरपूर वेळ देऊ शकतील. हा चित्रपट एक अतिशय अभूतपूर्व आणि मोठा असणार होता ज्याची कथा काय असेल हे अजूनपर्यंत गुप्त ठेवण्यात आले होते. ॲकॅडमी मधले जवळपास सगळेजण त्यासाठी उत्सुक होते. अजून ऑडिशनची तारीख जाहीर झालेली नव्हती.

# प्रकरण 4

एकदा सोनी आणि सुप्रिया रूमवर नव्हते तेव्हा दुपारी एक वाजता गरमागरम "राजमा चावल" खातांना रागिणीला एक फोन आला. नंबर ओळखीचा वाटत नव्हता.

पलीकडून आवाज आला, "जानू, पहचाना मुझे?"

तो आवाज ऐकताच ती एकदम अस्वस्थ झाली. चमचा तसाच ताटात ठेवून ती डायनिंग टेबल वरून उठली आणि अस्वस्थपणे बोलत बोलत बेडरूम मध्ये गेली. जेवतांना त्या कॉलवर बोलणे तिच्यासाठी जवळपास अशक्य होते.

"क क कौन? रा राहुल गुप्ता?" घाबरत रागिणी बोलली.

"अरे वा! ठिक पहचान लिया तूने! लेकीन पहचानने में इतना समय लगा कमिनी तुझे? सहर में जाकर भूल गयी तेरे अशिक को?", तो आवाज उद्धट वाटत होता.

"सबसे बडा कमिना तो तू है नालायक! मेरा नंबर कहाँ से मिला तुझे?" रागिणीही काही कमी नव्हती.

"वो सब छोड और सुन! मुझे पचास हजार रूपिया दे दे, नही तो मै तेरा नंबर तेरे हजबंड को दे दूँगा और तेरे बारे में सबकुछ बता दूँगा!"

रागिणी आता घाबरली. फोन तिच्या मूळ शहरातून म्हणजे दिल्लीहून होता. या माणसाला आता पैसे देण्यावाचून पर्याय नव्हता. नंतर त्याला बघता येईल. आता त्याच्याशी उलझण्याइतका तिच्याकडे वेळ, मानसिकता आणि उत्साह नव्हता. मात्र या माणसाची मजल पैसे मागण्यापर्यंत जाईल असे तिला वाटले नव्हते. पण सध्या त्याला चूप करणे तिला आवश्यक होते. पोलिसांकडे जायचे की नाही तसेच सुप्रिया आणि सोनीला हे सांगायचे की नाही किंवा तिचा मुंबईतील  बॉयफ्रेंड सूरजला याबाबत सांगायचे की नाही हे ती नंतर ठरवणार होती. आता आवश्यक होते या माणसाला पैसे देऊन चूप करणे!

"बता साले हरामी तेरा अकाउंट नंबर!! आधे घंटे मे भेजती हूँ पैसा, लेकीन तेरा सडा हुआ मूँह बंद रखना!" ती ओरडली.

"अब आ गयी छोरी लाईन पे!" तो जिंकल्याच्या आविर्भावात म्हणाला.

फोन ठेवल्यानंतर ती स्वत:वर चिडली. पूर्वी केलेल्या काही चूका आता तिच्यासमोर अडथळे बनून येत होत्या. तिला भूतकाळाची ती आठवण नकोशी होती पण, काही ना काही कारणाने तो भूतकाळ तिच्या वर्तमानकाळात परत परत शिरून भविष्यकाळाच्या गाडीला ब्रेक लावण्याचा प्रयत्न करत होता आणि तिच्या भविष्यकाळातील स्वप्नांना हुलकावणी देण्याचा प्रयत्न करत होता. आता लगेच त्या गोष्टीवर विचार करून दिवस खराब करायची गरज नाही असे तिने ठरवले.  टेबलावरचा राजमा चावल थंड झाला होता. तिने राजमा पुन्हा ओव्हन मध्ये गरम केला, तो पुन्हा भातावर टाकला आणि शांततेने जेवण केले. आज रात्री तिच्या नंतर हॉरर सिरीयलचे शूटिंग होते. आता दुपारी झोप घेणे आवश्यक होते. रागिणीला आपली मुंबईतील मैत्रीण आणि पूर्वीची रुम पार्टनर गौरी हिची आठवण आली, जी सध्या कॅनडात होती आणि तेथेच सेटल झाली होती. तिच्याशी थोडावेळ ती फोनवर बोलली आणि मग बेडवर गेली. तिच्याशी बोलल्यावर तिला हायसे वाटले आणि ताण हलका झाला.

मग रात्रीच्या शुटिंगसाठी तिला मिळालेली स्क्रिप्ट ती वाचत बसली. ती ज्या हॉरर सिरियलमध्ये काम करत होती त्याची थोडक्यात कथा अशी होती – “एका खेडेगावातील मैत्रिणीकडे शहरातील तीन मैत्रिणी येतात आणि त्या चौघी दोन स्कूटीवरून गावापासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या एका जवळच्या छोट्या जंगलात सहलीसाठी जातात. तेथे जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात त्या जेवण बनवणार असतात आणि दिवसभर मजा करणार असतात. सोबत त्या ब्लूटूथ स्पीकर घेऊन आलेल्या असतात. मोबाईलमधली गाणी त्या स्पीकरवर लावली जातात. जवळच एक नदी आणि छोटीशी जुन्या काळातील पडीक गुहा असते. गम्मत म्हणून एक जणी त्या गुहेत शिरते आणि बराच वेळ झाला तरी परत येत नाही म्हणून एकेक करून तिला शोधायला गुहेत शिरतात. शेवटी चौथी एकटीच गुहेच्या बाहेर उरलेली असते. ती सुद्धा हिम्मत करून आतमध्ये जाते आणि?”

या पुढची कथा अजून रागिणीला सुद्धा माहिती नव्हती. आजकाल इन्टरनेटच्या जमान्यात कथांची चोरी होत असल्याने आणि कथाबीज किंवा कथेचा शेवट चोरीला जाण्याच्या घटना वाढत असल्याने एका ठराविक मर्यादेपर्यंतच आणि टप्प्या टप्प्याने कथा कलाकारांना माहित होत होती. हेच सिनेमा बनवतांना सुद्धा पाळले जाऊ लागले होते.

# प्रकरण 5

थोड्या वेळानंतर रागिणीने बेडवर अंग टाकले. कपाळावर हात ठेवून ती छताकडे बघत बसली. स्क्रिप्ट वाचता वाचता बराच वेळ निघून गेला पण आता तिला पुन्हा तो फोन कॉल आठवू लागला. झोपण्याचा प्रयत्न केला तरी झोप काही केल्या येत नव्हती. डोळ्यात गुंगी साठत होती होती पण अनेकविध विचारांनी झोप येत नव्हती.

तिचे कान काचांच्या फुटण्याच्या आवाजाने भरून गेले. रोहनचा भीषण अपघात तिला आठवला. तिचे जीवनातले पहिले प्रेम - रोहन राठी! दिल्लीतल्या मॉडर्न कॉलेजमधले त्या दोघांचे मॉडर्न प्रेम! आणि तिला आठवला तिच्यावर एकतर्फी प्रेम करणारा तिच्या कॉलेजातला राहुल गुप्ता ज्याचा आता फोन आला होता.

रोहन आणि तिने एकत्र पाहिलेली स्वप्ने! तिला कॉलेज जीवनापासूनच ॲक्टींगचे वेड होते. दृष्ट लागेल असे जन्मजात सौंदर्य तिला लाभलेले होते आणि ते तिने तरुणपणी आवडीने जपले आणि टिकवले आणि वाढवले होते. तिचे व्यक्तिमत्व सुद्धा सळसळते आणि उत्साही होते, म्हणून ते सौंदर्य आणखी खुलून दिसायचे. तिचा चेहरा खूपच बोलका होता. मनातील अगदी कोणतीही भावना तिच्या चेहऱ्यावर लगेच दिसून यायची. तिचा चेहेरा लगेच लालसर व्हायचा. त्यात भर म्हणून तिला अभिनय करण्याची आवड होती. कॉलेजात अनेक नाटकांतून तिने भाग घेऊन वाहवा मिळवली होती. कॉलेज संपले की तिला मुंबईला यायचे होते. थोडक्यात तिचे अभिनय क्षेत्रातले भविष्य उज्वल होते हे नक्की! रोहनने तिला तिच्या करियर निवडीची मोकळीक दिली होती. त्याला लंडन मध्ये MBA करून नंतर मॅनेजमेंट मध्ये करियर करायचे होते. तिचे वडिल दिल्लीतल्या उच्चभ्रू वर्तुळात उठबस असणारे श्रीमंत बिझिनेसमॅन आणि रोहन एका प्रायव्हेट कॉलेज मधल्या प्रोफेसरचा मुलगा!

रागिणीच्या घरच्यांचा तिच्या रोहन सोबतच्या संबंधांना विरोध होता. पण, दोघेही हे ठरवून चुकले होते की रोहनने रागिणीच्या घरच्यांचे मन जिंकायचे आणि मग रागिणीने त्यांचे मन वळवायचे. पण बरेचदा आपण ठरवतो एक आणि होते काही दुसरेच! कारण फीलगुड सिनेमांच्या कथांमध्येच फक्त असे घडत असते की एखादा प्रियकर प्रेयसीच्या घरात काही कारणाने प्रवेश मिळवून हळूहळू आपल्या

स्वभावाने सगळ्यांची मने जिंकतो.... पण रागिणीला विश्वास होता की रोहन असे नक्की करेल. खऱ्या जीवनात असे तो करून दाखवेन.. त्यांनी दोघांनी त्या दृष्टीकोनातून तयारी पण सुरु केली. त्यासाठी त्यांनी “मेरा पिया गया परदेस!”, “बहू परदेसी!”, “मेरी दुल्हनिया गयी है सात समुंदर पार!” असे टिपिकल सुपरहीट पिक्चर पण पहिले आणि खऱ्या जीवनाशी तुलना करून ते दोघे हसत राहिले.. असे होईल तसे होईल अशी स्वपने रंगवत राहिले, पण कुणालातरी या त्या दोघांच्या या सर्व प्लानिंगची खबर मिळाली होती हे मात्र नक्की!

त्या रात्री छोट्या रस्त्यावरून हायवेवरील चौकात नेहमीच्या वेगात वळतांना अचानक प्रकट झाल्यासारखा तो ट्रक उजव्या बाजूने त्यांच्या कारसमोर आला. रोहन कार चालवत होता. बरोबर कारच्या पुढे उजव्या बाजूला त्याच्या सीटला ट्रकची जोरदार धडक बसली. जोरकस धडकेने रोहन जागीच ठार झाला. त्या धडकेने कार रस्त्याच्या दुभाजकाला धडकली आणि डाव्या बाजूचा दरवाजा उघडून रागिणी खाली पडली पण तिला थोडेसे खरचटले. तोपर्यंत ट्रक वेगाने निघून गेला. पण जवळच पोलीस गस्त असल्याने ट्रक ड्रायव्हरला पकडण्यात यश आले. ट्रक ड्रायव्हर रामसिंग यादवला पकडून नंतर सोडून देण्यात आले होते कारण त्याने मुद्दाम धडक दिल्याचा किंवा ट्राफीक नियम तोडल्याचा असा कुठलाच प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पुरावा सीसीटिव्ही मध्ये दिसत नव्हता. तो एक अपघात असल्याचेच सिद्ध झाले, घातपात नाही. रागिणीला पुसटसा घातपाताचा संशय आला होता पण तिच्याकडे कोणताही ठाम पुरावा नव्हता.

पण तो ॲक्सिडेंट मात्र तिच्या जीवनाला वेगळ्याच वळणावर घेऊन आला. नंतर ती भयंकर निराश होऊन डिप्रेशनमध्ये गेली... त्यातच तिच्याकडून एक चूक घडली आणि मग क्रमाने अनेक गोष्टी चुकत गेल्या जसे ...

तिला पुढचे आठवणार एवढ्यात सूरजच्या फोनने तिची विचारयात्रा भंग पावली. स्वतःला सावरून आवाजामधला रडवेला अंश गिळून ती नेहमीच्या सहजतेने सूरजला म्हणाली, “हां, सूरज बोल ना. कैसा है तू? कब आया?”

नंतर बराच वेळ ती सूरजशी बोलत होती. सूरज एक महिना ब्राझिलला जाऊन परतला होता. बिझिनेसच्या निमित्ताने त्याच्या अनेक परदेश वाऱ्या नेहमी व्हायच्या. त्यापैकीच ही एक वारी संपवून

तो परतला होता. त्याचेशी बोलताना तिला थोडे हायसे वाटले. या अफाट पसरलेल्या शहरात पैसा कमावण्यासाठी यांत्रिकपणे घड्याळाच्या काट्यांनुसार धावणाऱ्या आणि जगणाऱ्या असंख्य माणसांच्या महापूरात तिला त्याचा नेहमी आधार वाटत होता.

✡✡✡✡

# प्रकरण 6

एके दिवशी “चार थापडा सासूच्या” साठी रात्री तीन वाजेपर्यंत राजेशने लॅपटॉप वर लिखाण केले. जवळपास दहा एपिसोड तीन दिवसांत लिहून झाले होते. एपिसोडिक स्टोरी आणि स्क्रिप्ट अशा दोन्ही गोष्टी त्याने पूर्ण केल्या. रात्री जास्त वेळ जागून त्याने एकदम तीन एपिसोड पूर्ण झाले. लिखाण अगदी एडीट करून तयार होते. इमेलवर ते लिखाण पाठवून अगदी आनंदाने त्याने लॅपटॉप बंद केला. इतक्या घाईत लिहून पूर्ण करण्यामागे त्याचा एक उद्देश होता. त्याला त्याच्या गावी जायचे होते. उद्याच निघायचे होते....

पण सकाळी सात वाजता उठल्यावर अनपेक्षितपणे सुप्रियाचा फोन आला.

“तू आज येणार आहेस स्टुडिओत?”, सुप्रिया विचारू लागली.

“नाही सुप्रिया! मला जरा गावी जावं लागतंय. काम आहे!”, त्याने सुप्रियाला गावी जाण्याबद्दल आधी सांगीतले नव्हते.

“राजेश, मला तुझ्याशी एका महत्वाच्या विषयावर बोलायचं आहे!”, सुप्रिया गंभीर होत म्हणाली.

“महत्वाचा विषय? कोणता?”

“आपल्या दोघांच्या आयुष्याबद्दलचा!”

“सुप्रिया, तुला नेमकं काय म्हणायचं आहे?”

“जरा स्पष्टच सांगते...”

“थांब सुप्रिया! फोनवर नको!”

“मग कुठे?”

“केपलर्स कॅफे मध्ये भेट!”

“किती वाजता?”

“दहाला ये. तिथेच नाश्ता करू!”

केपलर्स कॅफे. एका कोपऱ्यातल्या टेबलावर दोन्ही बसले. दोघांनी व्हेज ग्रिल सँडविच मागवले. सोबत कॅपुचिनो कॉफी.

“राजेश, मी सरळ सरळ मुद्द्यालाच हात घालते. आपण लग्न करायचं का?”

“सुप्रिया, खरं सांगू? मला या प्रश्नाचं उत्तर आत्ता सांगता येणार नाही”

“का सांगता येणार नाही राजेश?”, सुप्रियाला राजेशच्या अशा या पावित्र्याचे आश्चर्य वाटले.

“मला अजून बरीच मजल गाठायची आहे. माझे क्षेत्र अस्थिर आहे. बेभरवशाचं आहे. इन्कम मध्ये सातत्य नाही. मुंबई सारख्या शहरात आपल्याला परवडणार नाही!”

“हे तू बोलतो आहेस राजेश? तू? मी म्हणते की तू एकटाच कशाला घेतोस आपल्या दोघांची जबाबदारी? मी नाही का असणार आहे तुझ्या सोबतीला? माझेही तेच क्षेत्र आहे. मी समजू शकते तुझी सो कॉल्ड अस्थिरता!”

“अगं तू समजूतदार आहेस. पण माझे काय?  मी कदाचित तसा तुझ्याइतका समजूतदार आहे असे मला वाटत नाही. माझी गावाकडे काही महत्वाची कामं आहेत. तसेच पत्रकारिता, स्क्रिप्ट लिखाण यासाठी मी नेहमी फिरत असणार आहे. लेखनासाठी नेहमी वेगवेगळया ठिकाणांना भेट देत राहणार. तुला तर माहीत आहे सगळं!”

“राजेश, मला कल्पना आहे या सगळयांची! पण मला ते सगळं मान्य असेल!”

“हे बघ! प्रॅक्टिकली विचार कर सुप्रिया. तू आणि मी दोघेही या बेभरवशाच्या क्षेत्रात एकत्र येऊन भरवशाचा संसार नाही करू शकत!”

“राजेश, मनापासून ठरवलं तर सगळं काही करू शकतो आपण! आपण दोघेही मेहनत करून आपला संसार यशस्वी करू!”

“मी मानतो की आपण दोघेही महत्वाकांक्षी आहोत, मेहनती आहोत. पण, पुढचा काळ कुणी पाहिलाय?”, असे म्हणतांना राजेशने नजर इकडे तिकडे वळवली.

“मग काय करायचे? मी माझ्या आई बाबांच्या म्हणण्यानुसार लवकरच ॲरेंज मॅरेज करून टाकू का?”, तीचा स्वर थोडा रडवेला वाटत होता पण सावरून तिने स्पष्टच विचारले. पण सोबतच राजेशच्या रोखठोक आणि स्पष्टपणाचे मनातून तिला कौतुकही वाटत होते. तोच स्पष्टपणा तिने त्याच्यावरून वापरून पाहिला.

“हाच तुझा मनमोकळेणा मला भावतो रे, राजेश मला!” ती मनात म्हणाली.

“मला वाटते होय. तू मार्गी लाग. माझ्यासाठी नको थांबूस!” राजेशने तिचा चेहरा दोन्ही हातात धरला आणि सरळ सांगून टाकले.

“राजेश, परत एकदा विचार कर. आपण एक दोन वर्षे थांबूया का?”, तिने त्याचे हात तिच्या चेहऱ्यापासून दूर केले.

“एक दोन वर्षे?”

“मला म्हणायचंय की एकमेकांना ओळखायला आपण आणखी वेळ देऊया का?”

“सुप्रिया, हे बघ! एकमेकांना ओळखायला दोन महिने सुद्धा पुरतात किंवा कधीकधी चार वर्षे सुद्धा पुरत नाहीत. मी तुझे आयुष्य माझ्या महत्वाकांक्षेसाठी धोक्यात घालू इच्छित नाही!” राजेश स्पष्ट म्हणाला.

“महत्वाकांक्षा सगळ्यांनाच असते राजेश! पण म्हणून कुणी त्याला संसारासाठी अडथळा मानत नाही. तू मला आवडतोस राजेश, खूप आवडतोस! तुझ्या मनात कुणी दुसरी तर नाही ना? सांगून टाक! ” ती खूप भावूक झाली.

“नाही सुप्रिया. दुसरी कुणीही नाही!”

“मग असे का करतोयस राजेश तू?”

“हे बघ! तू मला आवडतेस सुप्रिया!! पण जीवनाची साथीदार कशी असावी किंवा असू नये याबद्दल माझ्या मनात तशी काहीच कल्पना, अपेक्षा आणि प्रतिमा मी निर्माण केलेली नाही सुप्रिया! तसा मी अजून विचार केलेला नाही.” त्याचेही डोळे पाणावले.

“ठिक आहे. मान्य आहे! तसे असेल तर आपण एकत्र न आलेलेच बरे!”, प्रॅक्टिकल विचार करून तिने स्वतःला सावरले आणि सांगून टाकले.

ती पुढे म्हणाली, “पण, हे बघ राजेश. आपण एकाच क्षेत्रात आहोत. कामानिमित्त आपली भेट होतच राहाणार. सो लेट्स बी प्रोफेशनल! आपल्या वैयक्तिक गोष्टी कामाच्या आड येऊ द्यायच्या नाहीत. नाहीतर त्यामुळे दोघांचेही नुकसान होईल!” पण असे म्हणताना मनात एकीकडे तिला असंख्य वेदना झाल्या.

“मान्य आहे मला!” तो मनापासून म्हणाला, “आपली मैत्री कायम राहील. यापुढे सुद्धा! आपले प्रोफेशनल संबंध आहे तेच आणि तसेच राहातील!”

“ठिक आहे राजेश. चल निघते मी. उशीर होतोय!” सुप्रिया टेबलावरून उठत म्हणाली.

सुप्रियाने बिल दिले आणि तिच्या कारने निघून गेली. ती हुंदके देत होती. आपले मन आणि हृदयाचे विश्व उलटेपालटे झाल्यासारखे तिला वाटले. राजेश सुद्धा आपल्या मार्गी चालता झाला. राजेशचे डोळे सुद्धा रडून लाल झाले होते.

तो मनात म्हणत होता, “सुप्रिया, असे काही निर्णय मनाविरुद्ध घ्यावे लागतात. तुला काही गोष्टी माहित नाहीत. काही बंधने आहेत माझ्यावर! समजा मी ते तोडेनसुद्धा! तूही आहेसच माझ्या मनात! पण आता काळ आणि वेळ वेगळी आहे सुप्रिया! माझ्या खूप महत्वाकांक्षा आहेत. कोणत्याही थराला जाईन मी त्यासाठी! योग्य वेळ आली की तुलाच काय या क्षेत्रातील सगळयांना समजेलच!!”

¥ ¥ ¥ ¥

# प्रकरण 7

सोनी, सुप्रिया आणी रागिणी रहात असलेले ते वर्किंग विमेन्स हॉस्टेल असल्याने तेथे जायला यायला वेळेची बंधने नव्हती कारण मुंबई सारख्या शहरात आजकाल कामानिमित्त लोक दूर प्रवास करतात आणि आजकाल स्त्रीयासुद्धा पुरूषांच्या बरोबरीने दिवस रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करतात. पण हॉस्टेलवर कुणाला भेटायला बोलवायचं असेल तर मात्र नियम होते.

त्या दिवशी सुप्रिया पुण्याला गेलेली होती आणि रागिणी गेले दोन दिवस सूरजच्या फ्लॅटवर होती.

सोनी बनकर आज रूमवर एकटी होती. पुढचे चार दिवस तिचे कोणतेच शूटींग नव्हते. मग त्यानंतर तिने भाग घेतलेल्या डान्स शोचे ("हिंमत है तो नाच जरा!") फायनल एपिसोड्सचे शूटिंग असणार होते. त्यात तिला अर्थातच विनर बनायचे होते.

आज ती रिलॅक्स होती. तिने हात डोक्यावर ताणून एक मस्त आणि मोठा आळस दिला. जांभई दिली. मग मस्त चहा बनवला आणि पिला.

मनाशी गाणे गुणगुणत आणि नाचण्याच्या आविर्भावात हातपाय हलवत तिने तिचा शॉर्ट स्कर्ट काढून बेडवर टाकला. मग ती तिच्या बाथरूममध्ये गेली. सोबत असलेला मोबाईल बाजूला काचेवर साबणाच्या बाजूला ठेवला. मग टी शर्ट काढून टाकला. आता तिच्या अंगावर फक्त काळया रंगाची जाळीदार ब्रा होती. बाथरूम मधल्या आरशात तिने ब्राच्या आतमधले स्वतःचे दोन भरीव गोल न्याहाळले आणि स्वतःलाच आरशात एक शीळ मारली. थोडा शॉवर चालू केला आणि बंद केला. आता ती बरीच ओली झाली होती. पाण्याचे थेंब तिच्या अर्धनग्न शरीरावर, छातीवर जमा झाले होते.

"सोनी मॅडम, वा! झकास सेक्सी दिसताय तुम्ही आज!" असे म्हणून तिने मोबाईल उचलला आणि एक कमरेवरचा पूर्ण सेल्फी काढला. मग तो तिने फ्रेन्डबुक आणि फोटोग्राम या सोशल साईट्सवर अपलोड केला.

त्या फोटोखाली लिहिले - "गेटिंग रेडी फॉर द फायनल शो! यो !!" मोबाईल ठेवून दिला आणि ब्रा काढून फेकली. मग शॉवर चालू करून गाणे म्हणत ती मनसोक्त आंघोळ करू लागली.

"आता बघाच सोनी मॅडम, सोशल मेडियावरचे तुमचे फॅन किती वाढतील बघा फटाफट!"

तिला सोशल मेडियावर काहीही करून तिच्या फॅन्सची संख्या वाढवायची होती. खूप प्रसिद्धी मिळवायची होती. तिला नृत्यासोबतच प्रसिद्धीच्या वलयाची खूप इच्छा होती.

"पूर्ण जगाने मला ओळखले पाहिजे. पूर्ण जगाने माझा डान्स बघितला पाहिजे. जगाला माझ्या तालावर मला डोलवायचं आणि नाचवायचं आहे. डान्स म्हटलं की पहिल्यांदा सोनीच आठवली पाहिजे लोकांना! माझा डान्स शो शेवटच्या टप्प्यात आहे. कसेही करून मला माझा फॅन बेस वाढवायचा आणि जास्त प्रेक्षकांची वोट्स (मतं) मलाच मिळाली पाहिजेत! आता ज्यांना डान्स मधलं ओ की ठो कळत नाही ते प्रेक्षक काय पाहून मत देणार, हे मला माहीत आहे. कमॉन सोनी! कमॉन!" शॉवर घेता घेता ती स्वत:शी बोलत होती.

आंघोळ संपल्यावर गुणगुणतच ती बाथरूमच्या बाहेर आली. हात पुसल्यानंतर लगेच फ्रेंडबुक, फोटोग्राम चेक केले. फक्त वीस मिनिटांतच तिला चारशे लाईक्स आणि शंभरच्या वर कमेंट्स आल्या होत्या. तिच्या पेजला लाईक करणाऱ्यांची संख्या पाच हजारावरून साडेपाच हजार झाली होती.

"जुग जुग जियो मेरे फ्रेंडबुक भैय्या और फोटोग्राम जिजाजी!", असे म्हणून तिने आनंदाने मोबाईलच्या स्क्रीनची पप्पी घेतली.

दोनच दिवसात सगळीकडे आणि जागोजागी तिचा सेल्फी फॉरवर्ड होऊ लागला. जो कुणी तिचा डान्स शो याआधी बघत नव्हता आणि डान्स शोबद्दल ज्यांना माहितीही नव्हते ते सगळे आता तिचा "तो" फोटो पाहून तिच्यासाठी म्हणून हा डान्स शो बघायचे ठरवू लागले. अजून सेमी फायनलचे एपिसोड्स टेलीकास्ट होत होते. त्या डान्स प्रोग्रामची टीआरपी दोन दिवसात अचानक वाढली. प्रोड्युसरच्या हे लक्षात आले. त्याने तिला अभिनंदनाचा फोनही केला. स्वत: काहीही न करता त्या शोला आपोआप आणि परस्पर मिळालेल्या प्रसिद्धीमुळे तोही सुखावला. त्याला काही संघटनांकडून विरोधाचे, कारवाईचे आणि धमकीचे फोन आले पण तो म्हणाला, “देखो, वो सेल्फी अपलोड करना उसका पर्सनल डिसीजन है, मेरा या इस प्रोग्राम का उससे कोई लेना देना नही है!”

त्याने आधी शुटींग झालेल्या प्रोग्रामच्या सुरुवातीला खाली तशी सुचना सुद्धा द्यायला सुरुवात केली.

सगळीकडे त्या फोटोवरून न्यूज चॅनेलवर अर्ध्या अर्ध्या तासांचे प्रोग्राम तयार होऊन टेलिकास्ट व्हायला लागले.

याबाबत टिव्हीवर आणि सोशल मेडियावर फोटो बघून आणि चर्चा ऐकून बरेच लोक म्हणू लागले, "बॉस, यहीच लडकी जीतना मंगता. हम इसी को वोट करेंगे!"

काही म्हणत होते, “आता अश्लीलतेकडे झुकायला लागलेत डान्स प्रोग्राम. ते आता घरच्यांसोबत बघण्याच्या लायकीचे राहिले नाहीत!”

घराघरांत, नाक्या नाक्यावर, स्कूल कॉलेजांत आणि ऑफिसच्या सहकाऱ्यांमध्ये त्या सेल्फीवरून वेगवेगळया गप्पा रंगू लागल्या. कमेंट्स पास होऊ लागल्यात.

कॉलेजमध्ये –

“अरे यार! काय हिरोईन दिसते ती. नक्की सुभाष भट घेईल हिला त्याच्या नव्या सेक्सी चित्रपटात! त्यात त्याचा फेवरेट हिरो ‘कामरान किसमी’ असेल जो तिचे चित्रपटात असंख्य किस घेईल!”

“अरे तो स्वराज कपूर जिवंत असता ना, तर त्याने हिला घेऊन ‘गंगा का सुंदर समुंदर’ असा मस्त चित्रपटच बनवला असता नं येड्या!”

एका घरात –

“मम्मी मम्मी, मी पण मोठेपणी सोनी बनकर होणार! खूप खूप नाचणार! नाच नाच नाचणार!”

“गप बस! बंद कर तो टिव्ही आणि चल हो घरात, अभ्यास कर! मोठं होऊन सासरी जायचंय तुला! चाल्लीय मोठी सोनी बनकर व्हायला!”

दुसरीकडे एका घरात –

“या असल्या फालतू पोरींच्या फालतू सेल्फीमुळे ज्या मुलींना खरोखर डान्स मध्ये खरोखर काहितरी करून नाव कमवायचं आहे त्या पोरी पण नाहक बदनाम होतात. कसे काय यांचे आई वडील यांना असे करू देतात, देव जाणे!”

“अहो जशी पोरं, तसेच त्यांचे आई वडिल पण! काय बोलून काही फायदा नाही! त्या कलाकार पोरी सोशल मिडीयावर फोटोत स्वत:हून जे जे दाखवतात ना, ते ते आपण आपलं डोळे उघडे ठेऊन पहात राहायचं झालं!! जे ते दाखवतील, ते ते पाहो! हा हा हा हा!!”

एका उच्चभ्रू पार्टीत –

“यार, न्यूडिटी को पता नही इंडिया मे इतना क्यों गलत तरीके से देखते हैं! लडकी को अपनी खुद की बॉडी के साथ क्या क्या करना है, क्या दिखाना है और क्या नहीं, क्या पहनना है और क्या नही ये सब दुसरे लोग कैसे डिसाईड करेंगे?

आज की महिला किसीसे न डरती है न डरेगी. ये तो बस मेल डॉमिनेटेड सोसायटी है. कोई भी लडकी अपनी कपडेवाली सेल्फी अपलोड करें या फिर बिना कपडोवाली ये सिर्फ लडकी खुद डिसाईड करेगी, न की बाकी लोग! बुलशिट मेल सोसायटी!! आय हेट डॉमिनेटींग मेल्स! ऑल मेन आर सेम!!”

प्रकरण 8- {सोनीची आई होस्टेलवर येते}

सोनीला तिसऱ्या दिवशी तिच्या रूमवरच्या इंटरकॉमवर हॉस्टेलच्या ऑफिसमधून फोन आला.

"आपकी मदर आई है. ऑफिस में बैठी है!"

"आई? आत्ता? अशी अचानक कशी आली?" असा विचार करत ती म्हणाली, "ठ ठीक है, भेज दो उनको अंदर!"

"नही, वे अंदर नही आयेंगी. आपही को बाहर बुलाया है!"

सोनी थोडी साशंक विचारांनी बाहेर जायला निघाली.

“आई जवळ फोन आहे पण तिने फोन केला नाही. मला निघतांना किंवा पोचल्यावर कॉल केला नाही? काय झालं असेल? अशी अचानक का आली ही?”

तिच्या रूम मधून बाहेर निघून ती हॉस्टेलच्या कॉरिडॉरमधून चालू लागली.

हॉस्टेलमधल्या बहुतेक मुली मोकळ्या कपड्यांत इकडून तिकडे फोनवर बोलत फिरत होत्या. काही जणी आपल्या लॅपटॉपमध्ये तोंड खुपसून बसल्या होत्या तर काही भर दुपारी झोपल्या होत्या. पायऱ्या उतरून ती हॉस्टेलच्या ऑफिसमध्ये आली. एका बेंचवर आई बसलेली होती. बाजूला एक

मोठी सुटकेस ठेवलेली होती आणि बाजूला आणखी एक बॅग! सोनी दरवाजात दिसताच आई ताडकन उठून उभी राहिली आणि सोनी तिच्या जवळ जाताच तिने सोनीच्या कानाखाली तीन फटाफट लगावून दिल्या.

सोनी त्यातून सावरून काही म्हणणार त्याआधीच तिची आई म्हणाली, "तुझे आमच्याकडे असलेले सगळे उरले सुरले सामान या मोठया सूटकेस मध्ये आहे. जे काय असतील नसतील ते दागिने आहेत. कपडे आणि तुझ्या आवडीच्या वस्तू पण आहेत."

"अगं आई, काय झालं सांगशील तर खरं? तू अचानक गावाकडून इथे न सांगता का आलीस? आपला पप्प्या काका कसा आहे? शेजारच्या सुलीचं काय चाल्लंय आजकाल?"

"जास्त नाटकं करू नगंस! नाच करता करता नाटकं पण करायला लागलीस व्हंय? लई झालं तुझं नाचाचं कवतीक! नाच काय कमी होता की काय सटवे, म्हणून आता स्वताचे नंगे फोटू टाकाया लागलीस त्या फिन्दऱ्या काळकुंद्र्या इंटरनेटवर?"

मग सोनी पण तिच्या गावाकडच्या मूळ भाषेत बोलू लागली.

"आई, आत्ता लक्षात आलं की कुणी दावला असंल तुला त्यो माझा नंगा फोटू? मला माहीत आहे, पप्प्या काकानंच तुला ते दाखवलं असणार, तुझ्या मनात कायबी वंगाळ घातलं असणार!"

"आगं खुसमटे, निदान त्यानं मला दावलं तरी! तव्हा समजलं की आपली दिवटी डान्सच्या नावाखाली काय दिवे लावते आहे ते!"

"आई, लय शाना झालाय तो काका! त्याला विचार की जरा, त्यो काय करतूया दिवसभर मोबाईल वर?"

"जुबान लडवतेस व्हय चिलटे! आज त्यो काका हाय म्हनून तू एवढी मोठी झाली. नाहीतर तुझा बा गेल्यावर आपल्याला काय काय सहन कराया लागलं व्हतं, ठाव हाय ना? आता त्यो दारू पित फिरतो पन आधी त्यानंच आपल्याला सावरलं. आज तुजा बा असता ना, तर तुझे हे असले नंगे फोटो पाहून जिता मेला असता त्यो!" असे म्हणून ती पदर डोळ्याला लावून अश्रू पुसू लागली.

सोनी शांत होती पण वेगवेगळ्या विचारांनी तिचे डोळे सैरभैर फिरत होते. ती मनात विचार करू लागली, "मी महिन्याला पैसे पाठवते ते मात्र कसे गोड लागतात हिला आणि काकाला?"

तिची आई पुढे म्हणाली, “आता बास! तुझा कार्यक्रम आपल्या गावात जे जे लोक पाहात होते त्यांनी तो बघणा सोडलाय! तू आता गावात येऊ नगंस! आलीस तर मी सरपंचाला सांगून बदडून काढायला लावंन तुला! काय समजतीस व्हय स्वताला? यापुढे तुजा आपला आणि गावाचा संबंध संपला! तू, तुझं फिलिम, आनं डान्सचं याड सोडणार नाही, मला ठाव हाय. पण, म्या तुला सोडलं हाय कायमचं!”

“ठीक आहे, फोटोमुळे माझे गावातले हजार वोट गेले तर हरकत नाही, शहरांमधून मला लाखो वोट मिळतील. सांग तुझ्या त्या बुरसटलेल्या विचारांच्या गाववाल्यांना! मला तुमची गरज न्हाय म्हनावं! आनं त्यो काका? त्यो कसला काका गं? माझ्यावर नेहेमी वाईट नजर ठेऊन असतो, त्याला काय बोलत नाय तू? दारु पित फिरतो गावभर! काम थोडं आन् सोंगंच लई हायेत त्याची! मला बी गरज नाय तुमची आन् तुमच्या गावाची!”

“ठीक आहे. पन् लक्षात ठेव पोरी! पस्तावशील तू एक दिवस! लई पस्तावशील. निघते मी आता! हां पण माहिन्याला पैका पाठवायला विसरू नगंस हां!”

“हां हां. जा. जा निघून आनं् बैस सोबतीला घिऊन त्या काकाला गावातल्या हिरीजवळच्या झाडाजवळ! काय त्यो काका आन् काय त्ये गांव! पन एक ध्यानात ठेव! मी तुला पैका देत जाईन! पण तो त्या काकाला द्यायचा नाय, काय? कळलं का? दारूत फुकंल तो सगळा पैसा!”

आई रडत रडत निघून गेली. तिने एक क्षणसुद्धा मागे वळून पाहिले नाही. सोनीला सुद्धा त्याचे काही विशेष वाटले नाही. कारण तिच्या आईने तिच्या वडलांच्या मृत्यूनंतर तिला हळूहळू दूर केले आणि तिच्या काकाला जवळ केले होते.

सुटकेस घेऊन रूममध्ये जाता जाता तिला एका मागून एक असे अनेक जुने दु:खद प्रसंग आठवायला लागले. पण ती मनात म्हणाली, “सोनी मॅडम, सावरा स्वतःला! विसरा ते आता आणि आपल्या डान्स कॉंपिटिशन कडे लक्ष द्या! यु हॅव लॉंग वे टू गो!”

# प्रकरण 9

मुंबईच्या क्वीन्स नेकलेस म्हणजेच मरीन ड्राईव्ह परिसरात अनेक उंच इमारती दिमाखात उभ्या होत्या. त्या परिसरात असणारे बॉलीवूड मधल्या प्रसिद्ध कलाकारांचे बंगले, त्यांचा तेथला वावर आणि परिसरातला समुद्र हे सगळं एकूणच त्या परिसराबद्दल जनसामान्यांच्या मनात नेहमी कुतूहल आणि आकर्षण निर्माण करत होतं. जवळचा फेसाळणारा अरबी समुद्र आणि मुंबईचा देखणा नजारा तेथील अनेक इमारतींच्या खिडकीतून सहज दिसायचा. रोज सायंकाळी ते दृष्य बघणे म्हणजे डोळ्यांना एक पर्वणीच होती.

“स्टार अपार्टमेंट” च्या अकराव्या मजल्यावरच्या फ्लॅटमधील अशाच एका खिडकीतून रागिणी बाहेर बघत होती. तो फ्लॅट सूरजचा होता. त्याने तो नुकताच घेतला होता. स्वत:च्या हिमतीवर! तेथे तो एकटाच रहायचा. सूरजचे आई वडील मुंबईतच दुसरीकडे बंगल्यात राहात होते. गेल्या काही महिन्यांत सूरजने त्याच्या बिझिनेस मध्ये वेगाने प्रगती केली होती. आज सूरज अजून ऑफिसमधून यायचा होता. दोन तीन दिवस झाले रागिणी सूरजच्या फ्लॅटवर रहात होती. तिच्या हॉरर सिरियल्सचे पुढचे शूटिंग काही दिवसानंतर होणार होते. सूरज सोबत आताशा तिची चांगलीच जवळीक वाढली होती. दोन बेडरूमचा प्रशस्त हॉल असलेला तो फ्लॅट होता.

बराच वेळ समुद्राकडे आणि क्वीन्स नेकलेसच्या बाजूला रस्त्यावरून जाणारी वाहने बघून झाल्यानंतर तिने गुलाबी कलरचा खिडकीचा पडदा बंद केला आणि “चॅटस ॲप” वर सूरजला मेसेज केला, “व्हेन आर यू कमिंग होम माय लव्ह?”

सूरज आफलाईन दिसत होता. तिने मोबाईल ठेऊन दिला. सूरज आल्यावर त्याचेसाठी ती “हाफ बेक्ड ऑम्लेट” आणि कॉफी बनवणार होती. तशी तयारीही तिने करून ठेवली होती. मनात राहुलच्या धमकीबद्दल थोडी भिती होतीच पण ते विसरायचे ठरवून तिने टीव्ही लावला.

टीव्हीवर सोनी बनकरच्या सेल्फिबाबत न्यूज चवीने चघळल्या जात होत्या.

गालात हसत रागिणी म्हणाली, “ये लडकी सुधरेगी नहीं. क्या जरुरत थी इसको ऐसा करने की? इतना अच्छा खासा टॅलेंट है बंदी में, फिर भी न जाने क्यों ऐसा करती रहती है ये लडकी!” प्रथम तिच्या मनात सोनीला फोन करण्याचा विचार आला पण तिने तो विचार बदलला.

सध्या ती स्वत:च्या आयुष्याचा जास्त विचार करणार होती. थोडावेळ चॅनेल बदलत बदलत तिने टीव्ही बंद करून टाकला. “चॅटस अॅप” च्या मेसेज विंडो मध्ये टक् टक् झाली आणि तिने मोबाईल चेक केला. आता तो ऑफिस मधून निघाला होता. त्याचा तो मेसेज पाहून तिला आनंद झाला. ती पटकन उठली. बाथरूम मध्ये जाऊन तिने शॉवर ऑन केला. आपण सूरज समोर आज अधिकाधिक आकर्षक कसे दिसू शकू याचाच विचार ती आंघोळ करतांना करत होती.

प्रथमच दोन पूर्ण दिवस ती सूरज सोबत फ्लॅटवर रहायला आली होती. सूरज तिला पहिल्या भेटीपासूनच आवडला होता...

# प्रकरण 10

तिला त्या दोघांची पहिली भेट आठवली...

हॉरर सिरीयल्सचे टीव्हीवरील प्रसिद्ध दिग्दर्शक आणि प्रोड्युसर डी. पी. सिंग यांच्या, रागिणी काम करत असलेल्या "डर का सामना" या सिरीयलचे शंभर एपिसोड्स पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी "द शिप" नावाच्या (जमिनीवरच असलेल्या) एका हॉटेलमध्ये पार्टी आयोजित केली होती. सुप्रिया आणि सोनी या दोघींना रागिणीने पार्टीला बोलावले होते पण शूटिंगच्या डेट्स असल्यामुळे त्या येऊ शकल्या नव्हत्या. त्या पार्टीला सिरियलचे प्रायोजक, कलाकार, तंत्रज्ञ, पत्रकार आणि बॉलीवूडमधील काही कलाकार सुद्धा उपस्थित होते. सुभाष भट सुद्धा त्यात होते.

त्यांचे लक्ष रागिणी कडे होते. रागिणीच्या त्या सिरियलचे काही एपिसोड्स त्यांनी बघितले होते. तिची अॅक्टींग त्यांना आवडली होती. सुभाष भटनी तिला आणि डी. पी. सिंग यांना जवळ बोलावून काही गप्पा मारल्या. त्यांच्या मनात हॉलीवूडच्या तोडीचा हॉरर चित्रपट भारतात बनवायची इच्छा होती. अजून कथा निश्चित झाली नव्हती पण त्यांचा शोध सुरू होता. रागिणीला त्यांनी चित्रपटात घेण्याविषयी तसे स्पष्ट सांगितले नाही पण त्यांनी स्वतः रागिणीला एवढा वेळ देणं हीच एक मोठी बाब सगळेजण मानत होते. मात्र सुभाष भटच्या मनातले हे सगळे प्लान रागिणीला माहिती नव्हते. पार्टीतील काही जणांच्या हातात सॉफ्ट ड्रिंक्स तर काहींच्या हातात हार्ड ड्रिंक्सचे ग्लासेस होते.

थोड्या वेळानंतर पार्टीत डी. पी. सिंग यांचा मुलगा सूरज सिंग हासुद्धा हजर झाला. त्याने त्याचा स्वतंत्र बिझिनेस सुरू केला होता. डी. पी. सिंग यांनी रागिणी आणि इतरांशी त्याची ओळख करुन दिली. सूरज शक्यतो अशा सिरियल्स वगैरेच्या पार्ट्यांना येत नसे. पण आज अपवाद होता. कारण कदाचित सूरजच्या त्या पार्टीला पार्टीला येण्याने रागिणीच्या पुढच्या आयुष्याला त्यामुळे एक वेगळी कलाटणी मिळणार होती का?

रागिणीने घातलेले चमकदार निळे टॉप आणि निळा मिनी स्कर्ट तिला त्यादिवशी खूप शोभून दिसत होता. तर सूरजने करड्या रंगाचा पार्टी वियर शर्ट आणि निळी जीन्स घातली होती. रागिणी शक्यतो निळया रंगाचे कपडे घालायची.

डी. पी. सिंग म्हणाले, "रागिणी, मिट माय सन सूरज! आणि सूरज, धिस इज रागिणी! अवर ग्रेट अॅक्टर अँड सेवींग ग्रेस ऑफ अवर सिरियल!"

हाय हॅलो झाले. शेक हँड झाले. रागीनीचे लक्ष सूरजच्या व्यक्तीमत्वाकडे गेले आणि ती भारावून गेली. सूरजने जिम मध्ये जाऊन बॉडी कमावली होती. त्याने डोक्यावर अगदी कमी केस ठेवले होते. हाफ स्लीव्ह शर्टातून त्याचे हातावरचे आणि मनगटावरचे पिळदार हिरवे स्नायू दिसून येत होते आणि त्याने व्यायाम करून शरीर चांगलेच कमावलेले असेल हे त्यातून अधोरेखित होत होते. त्याचे रुंद खांदे आणि बोलण्यात एका प्रकारची जंटलमनची अदब, स्त्रियांशी आदराने वागण्याची पद्धत यावर रागिणी भाळली. आजच्या पार्टीत तो अगदी आक्रमक आणि प्रभावशाली वाटत होता.

सूरज सुद्धा रागिणीच्या ठळक, उठावदार स्त्रीत्वाकडे आणि एकूणच तिच्या रूपाकडे आणि व्यक्तिमत्वाकडे आकर्षला गेला.

सूरजचे वडील पुढे म्हणाले, "सूरज त्याचा स्वतःचा बिझिनेस करतो आहे. फार कमी वयात त्याने खूप प्रगती केली. तो आणि त्याचे मित्र मिळून भारतात अल्पावधीत एक मोठी फूड चेन सुरू केली. अजून त्यांना बरीच मजल गाठावयाची आहे. पण सो फार आय एम हॅप्पी विथ हिज प्रोग्रेस! देशात आणि परदेशात अनेक ब्रांचेस आहेत आणि एशियन फूड जगाच्या सगळ्या काँटिनेंटमध्ये पोचवायचे आहे त्याला! हॉटेल मॅनेजमेंट मध्ये त्याने करीयर करायचं आधीच ठरवलं होतं आणि त्याप्रमाणे त्याने केलं, देश विदेशात अनेक प्रकारचे कोर्सेस केले, अनेक संशोधन केले, अनुभव घेतला आणि आज हा यशस्वी सूरज आपल्यासमोर उभा आहे!"

सूरजने ही प्रशंसा स्वीकारत रागिणीकडे बघून डोळे मिचकावले.

"नाईस टू हियर धिस सूरज. ग्रेट! अँड बेस्ट लक फॉर युवर फ्यूचर! मे ऑल युवर विशेश कम टू!" रागिणी म्हणाली.

सिंग पुढे म्हणाले, "आणि रागिणी बद्दल काय बोलायचं? जेम आहे, हिरा आहे हिरा! अगदी मनापासून आणि समरसून ती अभिनय करते. बरेच लोक म्हणतात, हॉरर सिरियल्स मधील ॲक्टींग ही खरी ॲक्टींग नाही, पण तिने ते खोटे ठरवले. तिने या सिरियल मध्ये जान आणली जान! हॉरर सिरियल्सला एका ठराविक प्रकारचे प्रेक्षक मिळतात असे मानले जाते पण रागिणीने ते खोटे ठरवले. या सिरीयलला खूप प्रेक्षकवर्ग लाभला आहे! "

तेवढ्यात तेथे त्या सिरियल मधील मुख्य पुरूष पात्र (मेल लिड) प्रतिक श्रीवास्तव आला आणि पुन्हा ओळखपाळख सुरू झाली. पण नंतर सूरज आणि रागिणी एकमेकांशी बराच वेळ बोलत बसले. या दोघांना एकमेकांशी बोलायला आवडायला लागले होते. का कोण जाणे, त्यांच्यात पहिल्या भेटीपासूनच एक सुप्त आकर्षण निर्माण झाले आणि दोघांकडून सारखाच साद आणि प्रतिसाद मिळत होता.

पार्टीत मग म्युझिक, डान्स सुरू झाले. सूरजची सोबत नाचण्याची विनंती रागिणीने मान्य केली...ती पार्टी रागिणी कधीही विसरू शकणार नव्हती, कारण त्यानंतरच तर त्यांनी एकमेकांच्या भेटीगाठी घेणे सुरु केले. डेटिंग सुरु झाले..

# प्रकरण 11

आणि पार्टीतला तो सूरजसोबतचा डान्स आठवतांना रागिणीच्या लक्षात आले की विचाराविचारांत तिला आंघोळीला बराच वेळ झाला होता आणि दारावरची बेल वाजायला लागली होती. सूरज आला होता! सूरज जवळ फ्लॅटची एक चाबी होती. पण रागिणी घरी असल्याने त्याने दोन तीन वेळा बेल वाजवली पण प्रतिसाद आला नाही म्हणून त्याने चाबीने दरवाजा उघडला तेवढयात रागिणीसुद्धा घाईत दरवाजा उघडायला फक्त अंगावर ब्रा आणि कमरेवर टॉवेल गुंडाळूनच बाथरूमच्या बाहेर आली. त्याने फ्लॅटचा दरवाजा बंद केला आणि तिला तिची अर्धवट कपड्यांत बाथरूम बाहेर येण्याची "चूक" लक्षात आली. ती थोडी ओशाळली आणि मग लाजेने लाल झाली.

सूरजची नजर मात्र तिच्यावरून हटत नव्हती. अचानक घरी आल्यावर रागिणीचे अर्ध अनावृत्त सौंदर्य समोर आल्याने तो उत्तेजित झाला. त्याने सूचक नजरेने स्मितहास्य करत तिच्याकडे पाहिले तसे तीसुद्धा काय ते समजली. त्याने कोट काढून फेकला आणि टाय सैल केला. मात्र लाज वाटून रागिणी पटकन माघारी वळून पुन्हा बाथरूमकडे जायला लागली तेवढ्यात तिच्या उघड्या कमरेभोवती सूरजचा हात पडला, तिला त्याने मागे ओढले आणि तिच्या मानेचे मागच्या बाजूने चुंबन घेतले. आता तीही अंगभर मोहोरली आणि मग उत्तेजित झाली. तिने थोडासा खोटा प्रतिकार केला पण मग स्वत:ला त्याच्या पूर्णपणे स्वाधीन केले.

नंतर पुढचा एक तासभर बाथरूम मध्ये शॉवरखाली ती दोन शरिरं एकमेकांना पूर्ण ओळखण्याचा प्रयत्न करत होती. शेवटी एका प्रेमाच्या अत्युच्च क्षणी ती ओळख पटली. ओळख पटेपर्यंत दोघांच्या शरिरात जे वादळ पेटले होते ते आता शमले. आता एकमेकांसमोर कसलीच लाज आणि कसलाच संकोच नव्हता. वस्त्रांसोबत लाज आणि संकोच पण गळून पडलेले होते आणि पाण्याबरोबर वाहून गेले होते...

◸◸◸◸

# प्रकरण 12

संध्याकाळी साडेसात वाजता दोघे बेडवर एकमेकांच्या पायात पाय अडकवून बाहुपाशात बसलेले होते. न बोलता. शांत. निवांत.

“मी कॉफी बनवून आणते!”, रागिणीने शांतता भंग केली.

“थांब. बैस अजून! अशीच मला चिटकून बाहुपाशात बसून रहा! तुला क्षणभरसुद्धा दूर होऊ द्यावेसे वाटत नाही!” सूरज तिला आणखी छातीशी ओढत म्हणाला.

“मिस्टर सूरज सिंग! आता प्रेम बास झालं! थोडं प्रेम उद्यासाठी राहू द्या!”, असे म्हणत तिने जवळ पडलेली ब्रा उचलली आणि घालायला सुरुवात केली.

“ओके रागिणी जी! जशी आपली मर्जी!”, असे म्हणून त्यानेही एकेक कपडे अंगावर चढवायला सुरुवात केली.

तो पुढे म्हणाला, “रागिणी, मला तुला काहीतरी सांगायचे आहे!”

रागिणीने टॉप घातला आणि म्हणाली,” कॉफी पितांना बोलू! ये बैस डायनिंग टेबलवर. मी ऑमलेट आणि कॉफी बनवून आणते.”

डायनिंग टेबलवर ऑमलेट आणि कॉफी घेतांना सूरजने म्हटले-

“तू माझ्याकडे नेहमीकरता फ्लॅटवरच राहायला ये रागिणी!”

तिच्या पूर्वायुष्यातील सगळया घटना त्याला अजून सांगायच्या की नाही याबद्दल तिची द्विधा मनस्थिती होत होती. तसे तिनेही त्याला त्याच्या भूतकाळाबद्दल जास्त विचारले नव्हते आणि आता हा फ्लॅटवर राहायला ये म्हणतो आहे? ती विचारात पडली.

“यावं का याचेसोबत रहायला? सोबत राहून एकमेकांना आणखी काही वर्षे ओळखून मग पुढचा विचार करता येईल. पण हा माझा विचार झाला. त्याच्या मनात नेमके काय आहे? पण मनातले नेमके सगळेच एकदम एकमेकांना आताच एकमेकांना सांगितले पाहीजे का? हळूहळू एकमेकांबद्दल माहिती होण्यात जी मजा आहे ती एकदम सगळे पूर्वायुष्य एकमेकांना भराभर सांगून मोकळे होण्यात नाही! अशाने आयुष्य बेचव होतं! आणि भूतकाळाला महत्व तरी किती द्यायचं? मेंदूत भूतकाळ एक स्मृती म्हणून साठवलेला असतो, बाकी भूतकाळाचे अस्तित्व असते तरी कुठे? जास्तीत जास्त फोटो आणि व्हिडिओद्वारे भूतकाळाचे क्षण आपल्याकडे असतात पण तेही काय असतं? एक मेमेरीच! आता मी जे सुख अनुभवले ते कधी रोहन सोबत अनुभवलेच नव्हते. अनुभवणार होते त्या आधीच रोहनचा अपघात झाला आणि राहूल तर या सुखासाठी माझ्यावर टपूनच बसला होता आणि आता तर तो फोनवरून...!”

नंतर तिला आठवला, सोहमचंद्र, तिचा नवरा! नावालाच नवरा होता तो!! त्याचे सोबत लग्न झाल्यानंतरचे एकेक दिवस आणि एकेक रात्री नरकात असल्यासारखे ती जगली होती. कुठे सोहम सोबत अनुभवलेले ते किळसवाणे आणि तिच्याकडून त्याने फक्त सुख ओरबाडून घेण्याचे ते सेक्सचे क्षण आणि कुठे हा आजचा सूरजने तिला दिलेला हळुवार तरल अत्युच्च सुखाचा अनुभव!! काही तुलनाच होऊ शकणार नाही! सोहमसोबत तिने फक्त आणि फक्त दु:खच अनुभवले होते. पण सूरजने आज ज्या सफाईदारपणे प्रेमाक्रीडा केली त्यावरून तो या खेळात नवखा वाटत नव्हता. कॉलेजमध्ये मैत्रिणींसोबत हसत खिदळत या विषयावर चर्चा केल्याचे तिला आठवत होते, पुरुषाने असे केले तर ओळखायचे की त्याने आधी “अनुभव” घेतलाय आणि तसे केले तर ओळखायचे की तो “हे” प्रथमच करतोय वगैरे वगैरे!! ...पण आताच या सगळया गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता आहे का? राहूलच्या ब्लॅकमेलिंगबद्दल सूरजला आता सांगावे का? असे एक ना अनेक विचार तिच्या मनात चालले होते.

"अरे, हे काय? एका चांगल्या क्षणी मी हा कसला भूतकाळाचा विचार काय बसलेय? आताच हे सगळे आवश्यक आहे का?" रागिणी मनात म्हणाली.

ती अचानक गहन विचारांत गढली आहे हे पाहून सूरजने चुटकी वाजवून तिला विचारले, "मॅडम! मी फक्त विचारले की माझ्याकडे राहायला येतेस का, तेवढ्यावर एवढा मोठा विचार करतेस?"

"अं, हो हो, म्हणजे न न नाही!"

"अगं, काय हो आणि काय नाही?"

ती भानावर येऊन हसली आणि म्हणाली, "नाही यासाठी की मी कोणताच मोठा विचार करत नाही आहे आणि हो यासाठी की मी तयार आहे, तुझ्यासोबत राहायला!" तिने स्वतःच्या नकळत होकार कळवला. आता तिच्या मनात थोड्यावेळापूर्वीचा त्यांचा बाथरूम मधील प्रेम प्रसंग रेंगाळत होता. तिच्या आयुष्यातला पहिला "खरा सुख देणारा" तो सेक्स होता पण मग सूरजचाही हा पहिलाच सेक्स असेल का? तिला पुन्हा असे वाटून गेले पण मग तिने विचारांची दिशा बदलवली.

तिच्या होकारामुळे सूरज खुश दिसला, म्हणाला, "चला बाहेर डिनर करूया! कमऑन गेट रेडी! तू लवकरच शिफ्ट हो इकडे! आता नो मोअर लेडिज होस्टेल. नो मोअर लोकल ट्रेन, नो मोअर बेस्ट बसेस!"

"म्हणजे?"

"म्हणजे मी तुझ्यासाठी एक कार घेतली आहे. खाली उभी आहे! ही त्याची चाबी!" टेबलावरची एक चाबी उचलून तिला देत तो म्हणाला.

तिने आश्चर्याने दोन्ही हात तोंडावर नेले. तिचे डोळे विस्फारले गेले.

"ओह माय गॉड! म्हणजे आपण सोबत राहाण्याबद्दलचा माझा होकार गृहीत धरला होतास तर! यु रिड माय माइंड, नॉटी! पण गाडीची आवश्यकता नव्हती, म्हणजे मी काही काळानंतर घेणारच होते रे! आणि मी समजा सोबत राहायला नाही म्हटलं असतं तर?"

"पण परंतु ची ही वेळ नाही. मी तुझं काहीच ऐकणार नाही, मॅडम! आय नो यु वेल. तू नाही म्हटलं नसतंच. टेक युर कार अँड लेट अस एन्जॉय अवर लाईफ अहेड टुगेदर!" हसत हसत सूरज म्हणाला.

"यु आर सिम्पली ग्रेट सूरज!"

"आठ दिवसांनी कारच्या सगळ्या फॉरमॅलिटिज आणि डॉक्युमेंट्स पूर्ण होतील. तोपर्यंत येथेच राहा. ऑफिसला जातांना मी माटुंग्याला तुला सोडून देत जाईन माझ्या कारने! मग त्यानंतर नव्या कारनेच जा होस्टेलमध्ये तुझा सामान घ्यायला. सरप्राईज दे तुझ्या दोन्ही रूम पार्टनर्सला!"

□□□□

# प्रकरण 13

आठ दिवसांनी कारने रागिणी हॉस्टेलवर गेली. सोनी बाहेरच कट्ट्यावर सिगारेट पित बसली होती.

“ओह माय गॉड सोनी. तू सिगारेट प्यायला लागलीस? सो बॅड!”

सोनी उठून उभी राहिली पण तीने सिगारेट पिणे चालूच ठेवले आणि निराशेने ती म्हणाली, “केव्हा आलीस? खूप वेळ लावलास या वेळेस रागिणी?”

“हो. मी आता सूरज सोबत त्याच्या फ्लॅटवर शिफ्ट होणार आहे. लिव्ह इन रिलेशनशिप! त्याने मला एक कारसुद्धा भेट दिली आहे! बाहेर उभी आहे.” सोनी जवळ कट्ट्यावर बसत रागिणी म्हणाली.

“वाव! ग्रेट. अभिनंदन!” कोरडेपणाने धूर उंच हवेत उडवत सोनी म्हणाली.

“कमऑन सोनी. काय झालं तुला? अशी कोरडी का वागते आहेस? एनिथिंग रॉंग? सुप्रिया आली का परत की अजून पुण्यालाच आहे?”

“सुप्रिया अजून पुण्याहून परत आलेली नाही. जाण्याआधी ती खूप उदास दिसली. तिचा राजेश सोबत ब्रेकप झालाय! रात्रभर तिच्या रूम मधून हुंदक्यांचा आवाज येत होता त्या दिवशी! मी तिला विचारले पण जास्त काही न सांगता तिने राजेश सोबत ब्रेकअप झाल्याचे सांगितले आणि मग म्हणाली मला एकटे सोड! ती बहुतेक आता तिचा सामान घेऊन जाईल असं तिच्या बोलण्यावरून वाटलं. ती पुण्यालाच राहील असं दिसतंय."

“व्हाट? त्या दोघांकडे पाहून वाटत होतं की ती लवकरच लग्न करतील!”

“हो ना. मी तिला कॉल केला पण उचलत नाहीए ती. मेसेजचा रिप्लाय पण करत नाही. एनिवे जे असेल ते असेल. तिच्याकडे फक्त एकच सिरीयल आहे!”

“मग हे तुझ्या नाराजीचं कारण आहे की काय?”

“अगं नाही गं! आणि मी डान्स फिनाले हरले गं! अगदी शेवटचा नंबर आला!”

“अरे हो! तू तर ती सेक्सी सेल्फी अपलोड करुन धमाल उडवून दिली होतीस. मग पुढे काय झाले? तुला अशा चीप पब्लिसिटीची खरं तर गरज नव्हती, तू चांगला नाच करतेस. मग तरीही का फिनाले हरलीस?”

“हां यार! मोठी स्टोरी झाली ती!” सिगरेटचा धूर खालच्या बाजूला सोडत निराशेच्या स्वरात ती म्हणाली.

“अगं सोनी, हरलीस म्हणून सिगार प्यायला लागलीस? सोड ते! फेकून दे! मीही एके काळी ड्रग ॲडिक्ट झाले होते पण मी स्वतःवर नियंत्रण मिळवले! तूही सोड! या सगळ्या नशेबाजीतून कोणतेच डिप्रेशन, कोणतीच निराशा दूर होऊ शकत नाही! मी स्वत: ते अनुभवलं आहे. आपले दु:ख शेअर करायला कुणी हक्काचं माणूस असलं की आपोआप आपला ताण हलका होतो. नशा हा त्यावर उपाय नाही!”

“हट! फुकटचा सल्ला नको आपल्याला! सौ चुहे खाकर बिल्ली मुझे व्हेजिटेरियन खाने का एडव्हाईस दे राही है? नो वे! साला, त्या सेल्फीमुळे सगळं उलटं झालं! त्या मॅडम अकॅडमी कडून पण मला वार्निंग मिळाली. हे बरं की सस्पेंड नाही झाले!!” असे म्हणून जळून संपलेली सिगार तीने डस्टबिन मध्ये टाकली.

"ओह, आणि फिनाले कशी हरलीस?”

“सांगते ऐक! फिनालेच्या शूटींगच्या आदल्या रात्री आम्ही डान्स शो मधील सगळे कंटेस्टंट, डायरेक्टर, असिस्टंट प्रोड्युसर आणि जज अशी सगळी टीम डिनरला गेलो होतो. त्यातला एक जज जेवतांना सारखा माझ्यावर नजर ठेऊन होता. माझ्यावर म्हणण्यापेक्षा सरळ सरळ माझ्या छातीवर नजर ठेऊन होता असे म्हटले तर जास्त योग्य होईल. बहुतेक माझी सेल्फी बघून त्याचं डोकं फिरलं असावं. कारण त्या दिवशी त्याने मला डान्स करतांना माझ्या अगदी तिन्ही डान्स परफॉरमन्सला डोळे झाकून (की उघडे ठेऊन?) पैकीच्या पैकी मार्क दिले होते. माझा पूर्ण परफॉरमन्स होईपर्यंत तो अगदी माझ्या प्रत्येक हालचालीकडे निरखून बघत होता. शरीराच्या प्रत्येक अंगाकडे अगदी लाळघोटेपणाने बघत होता. हे लक्षात यायला लागल्यावर मी खूप नर्व्हस होवून माझ्या डान्सच्या स्टेप्स चुकल्या. पण तरीही त्याने मला पूर्ण मार्क दिले.”

“मग? चांगलं झालं की? काय इश्यू झाला पुढे?”

"मी सहजपणे सेक्ससाठी उपलब्ध आहे असं सेल्फी बघून त्याचं मत झालं असावं, कारण आजकाल या क्षेत्रात काही नव्या मुली पहिला ब्रेक मिळण्यासाठी काहीही करायला तयार होतात. तसं तो सेल्फी अपलोड मी करायला नकोच होता असे आता वाटते! त्या रात्री डिनर नंतर आम्ही सगळेजण हॉटेलच्या स्विमिंग पुलजवळ सहज फिरत असतांना त्याने कुणाला न कळू देता मला चालता चालता एकटं गाठलं! बराच वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा केल्या. नंतर हळू आवाजात माझ्या कानाजवळ येऊन त्याने विचारलं की, आजच्या दिवसासारखं फेवर आणि फुल मार्क उद्या फायनलमध्ये सुद्धा हवे असल्यास आजची पूर्ण रात्र मी त्याच्यासोबत घालवायची! एकच रात्र! पुन्हा परत कधीही तो मला बोलावणार नव्हता! त्याला मी फक्त एकदाच हवी होते, पूर्ण आणि रात्रभर! आणि रात्री जे होईल ते बाकी कुणालाही कळू न देण्याची पूर्ण व्यवस्था आणि काळजी तो घेणार होता. बुल शिट! ऑल मेन आर सेम!"

"मग? तू काय केलेस?"

"थोबाडीत मारली असती गं ... पण सगळी टीम थोड्या अंतरावरच होती! इश्यू झाला असता आणि आमच्या सगळ्या ग्रुपला कळले असते. उगाच नाही नाही ते आरोप, बदनामी झाली असती. मग मला दिसले की त्याने शॉर्ट बर्मुडा पँट घातलेली होती. मग मी कुणाला दिसणार नाही अशा पद्धतीने वेगाने त्याच्या जांघेजवळ नखं टोचून एक जोरदार सडकून चिमटा घेतला आणि त्याच्या कानात पटकन एकच सांगितलं की मी विकाऊ नाही, काय करायचं ते कर साल्या! तो वेदनेने कळवळला पण अगदी हळूच ओरडला आणि हळूहळू कुणाला न समजेल असा त्याने हसत हसत तेथून काढता पाय घेतला. पण आतून तो वेदनेने कळवळत होता."

आता मात्र शांत असलेली रागिणी खळाळून हसायला लागली, "ओह गॉड! सोनी, यु आर अन युनिक आयटम! हॅट्स ऑफ टू यू! हा हा हा! तू एक बहुत बडा नमुना है!"

"हसतेस काय? आणि मग मी फायनल हरले. सेल्फीमुळे मला माझ्या गावातले तर वोट मिळाले नाहीतच पण अनेक शहरांतल्या लोकांचे भरपूर वोट मिळाले होते. फिनालेमध्ये मी अगदी चांगला डान्स केला त्यादिवशी! वाटले की शेवटी माझ्या डान्सची दखल घावीच लागेल सगळयांना आणि मी जिंकेनच! ऑडियन्स पण चीयर करत होती पण त्या जजने माझ्या डान्समध्ये अशा काही ओढून ताणून चुका शोधल्या की कुणालाच काही बोलता आले नाही. त्याच्या चेहऱ्यावर कालच्या घेतलेल्या जोरकस चिमट्याच्या वेदना जाणवत होत्या आणि ते पाहून खरेतर मला हसू आवारात नव्हते. पण त्याचा बदला त्याने चांगलाच घेतला. इतर जज सुद्धा सुरुवातीला संभ्रमात पडले पण त्यांनाही त्याने पटवून सांगितले की माझा डान्स कसा चुकला आणि कुठे चुकला! मला त्याच्या रात्रीच्या वागण्याबद्दल लगेच कंम्प्लेंट करणे शक्य नव्हते कारण माझी ती सेल्फी बघता माझ्यावर

कुणी विश्वास ठेवला नसता आणि मला आणखी वाद वाढवून माझे नुकसान मला करून घ्यायचे नव्हते!"

"ओह्! बडा चालाक निकला ये जज! चल जाने दे अभी! जो हुआ सो हुआ! और वो तेरा टाईमपास लव्हर साकेत, वो क्या कहता है सेल्फी के बारे में? तू फिनाले हार गयी ये पता है भी या नही उसे?"

"पता है! लेकीन वो मुझे कुछ नही बोलता. वो डरता है मुझसे, और प्यार भी करता है. मै उसे ज्यादा बोलने नही देती. उसे मुझपर पुरा विश्वास है! एक तोच तर आहे जो माझा सच्चा बॉयफ्रेंड आहे! तो मला समजून घेतो! तो मला पूर्णपणे समर्पित आहे. छोट्या मोठ्या नोकऱ्या करतो तो. माझ्या पैशांवर अवलंबून आहे, त्यावर चैन करतो तो!"

"बहोत ग्रेट है तू सोनी! तू और तेरा लव्हर साकेत, जोडी नंबर वन! और तेरी माँ क्या बोली? तुझी गावाकडची ती नौटंकी आई? काय म्हणाली ती? तिने पाहिला का तुझा सेल्फीवाला फोटो?"

"अगं तिने तर मला त्या सेल्फीमुळे कायमचे घराबाहेर आणि गावाबाहेर काढले. माझी सुटकेस घरून भरूनच आणली होती तिने! मात्र तिला महिन्याला माझ्याकडून पैसे पाहीजेत! सब लाईफ उलटपलट हो गया मेरा!"

"अरे डोन्ट वरी! पब्लिक की मेमरी शॉर्ट होती है! कुछ समय बाद लोग भूल जायेंगे. तुम भी भूल जाओगी. नया कुछ करो और आगे बढो! ये इंडस्ट्री बहोत बडी है मॅडम! अगर तुममें टॅलेंट है तो काम जरूर मिलेगा. चल समान बांधने में मदद कर मेरी! आज शाम को निकल रही हूँ मै!"

सूरजच्या फ्लॅटवर शिफ्ट झाल्यानंतर आपली कॅनडातील मैत्रीण गौरीला कॉल करून सूरजसोबतचे लिव्ह इन सांगायला रागिणी विसरली नाही. गौरीला हे ऐकून हायसे वाटले.

# प्रकरण 14

गोरेगांवच्या फिल्मसिटी स्टुडिओ मध्ये जिंतेन्द्र करमरकर खूप काळजी अणि चिंता करत बसला होता. त्याचे कशातच मन लागत नव्हते. समोर टेबलावर लॅपटॉप पडला होता त्यावर स्क्रीन सेव्हर चालू झाले होते आणि जितेंद्रच्या मनावर काळजीचे स्क्रीन सेव्हर चालू झाले होते.

त्याच्या काळजीचे कारण असे होते: "चार थापडा सासूच्या" ऐन रंगात आली असतांना आणि पुढील अनेक एपिसोड्सचे लिखाण स्क्रिप्टसह राजेशकडून लिहून तयार असतांना, अचानक सुप्रियाने फक्त एका एसेमेसद्वारे जितेंद्रला कळवले होते की ती त्या सिरियलशी असलेला करार तोडते आहे. ती सिरियल सोडते आहे! मध्येच करार तोडल्यावर लागणारी नुकसान भरपाईसुद्धा ती द्यायला तयार होती. अचानक काय झाले ते कळायला मार्ग नव्हता. कारण ती फोनसुद्धा उचलत नव्हती.

स्क्रिप्ट सुपरवायझर रोशन रोकडे समोर बसला होता. तोही त्याच्याजवळच्या लॅपटॉपवर आणि काही कागदांत डोके आणि डोळे खुपसून बसला होता.

"रोशन! मला काही समजत नाही, काय करायचे पुढे? राजेशला कॉल करावा तर तोही उचलत नाही आहे. पुढील रेडी लिखाण आपल्याला पाठवून गावी जातांना तो गावी खुप बिझी असणार असे मला सांगून गेला होता"

"त्याला कॉल करून फारसा फायदा नाही होणार!" रोशन लॅपटॉप वरून नजर हटवत म्हणाला.

"अरे मित्रा! मग काय करायचे? स्क्रिप्ट तर बदलावी लागणार असं दिसतंय! सिरियल मधल्या सूनेला मरावं लागणार बहुतेक! आपली सिरियल प्राईम टाईम मध्ये प्रसारित होते. लाखो लोक बघतात. लोक ओरडतील आपल्या नावानं. अनेक लोक फक्त सुप्रियासाठी ही सिरियल बघतात. या सुप्रियाचंही काही कळत नाही मला! काही पर्सनल प्रॉब्लेम असणार बहुतेक!"

प्रॉडक्शन कंपनीचा हेड बसला होता. तो अमराठी होता. डी. के. रेड्डी.

रेड्डी म्हणाला, “तुमी त्या कलाकारला कोर्टात खेचला पाहीजे. आपल्याला संकटात टाकलं तिनं! करारानुसार जरी ती करार मोडल्याचे पैसे द्यायला तयार असली तरी, सिरीयल सोडण्याबद्दल किमान एक महिना आधी तिने सांगायला हवं होतं. फक्त वेळेवर एक एसेमेस पाठवला आणि संपलं? किती नॉन सेन्स आणि अनप्रोफेशनल!”

सुप्रियाला वाचवण्यासाठी जितेंद्र म्हणाला, “अं त्याची अजून गरज वाटत नाही, रेड्डी साहेब! सुप्रिया असं काही करेल असं मलापण वाटलं नव्हतं. मला वाटते प्रथम तिच्याशी संपर्क तर होऊ द्या मग बघू! काय वाटतं? आपण थोडं धीरानं घ्यायला हवं असं मला वाटतं ते बरोबर आहे ना सर? आणि रोशन तू काय म्हणतोस?”

रोशनने गप्प बसणे पसंत केले.

रेड्डीने तिरपे तोंड करून नाईलाजाने जितेंद्रशी संमत असल्यासारखे केले आणि म्हणाला, “ठीक आहे जित! पण तुझ्याकडे काय उपाय आहे? या रोशन कडे आहे का एखादी आयडिया? रोशन? तू याआधी दोन हिंदी सिरियल केल्या आहेस, सांग काय करायचं? सिरीयल ऐन रंगात आली असतानाच हे असं घडतंय!”

स्क्रिप्ट सुपरवायझर रोशन बराच वेळ विचार करून म्हणाला, “एक तोडगा आहे माझ्या मनात! सिरियलमध्ये सूनेचा म्हणजे सुप्रियाचा ॲक्सिडेंट होतो, चेहरा खराब होतो असे दाखवून नंतर डॉक्टर तिची प्लास्टिक सर्जरी करतात असे दाखवू. मग तिच्या ऐवजी दुसरी कलाकार घेऊ!”

“इतकं करण्यापेक्षा सरळ सूचना देऊन टाकू- आजपासून सूनेचा रोल नवी अभिनेत्री करणार!”

“नाही. एकदम नवी अभिनेत्री पब्लिक अशी डायरेक्ट आणि सहजासहजी स्वीकारणार नाहीत असं मला वाटतं!”

“मग? तुझ्या म्हणण्याप्रमाणे ॲक्सिडेंटच्या सीनसाठी तरी सुप्रिया आणायची कोठून?”

"मी सांगतो तसे करू. ते खूप सिंपल आहे. दोन जणांच्या बोलण्यात संवाद टाकायचा की सूनेचा ॲक्सिडेंट झाला. मग ते तिला बघायला हॉस्पिटलमध्ये पोहोचले की प्रेक्षकांना तिचा विद्रूप झालेला चेहराच डायरेक्ट दाखवायचा जी सुप्रिया नसेलच. हिंदी सिरियलमध्ये अनेकदा असं केलंय!"

रेड्डी आणि जितेंद्र म्हणाले, "वा! रोशन. क्या आयडीया है! मान गये! स्क्रिप्ट सुपरवाईझ करून करून डोकं भन्नाट चालायला लागलंय तुझं!"

रोशनने दिलेला सल्ला दोघांना पटला. मूळ कथेत अचानक बदल करून सून स्कूटरवरून खाली पडते आणि चेहऱ्यावर आपटते. चेहरा खराब होतो, असे दाखवण्याचे ठरवले गेले. अर्थात सिरीयल मधले दोन पात्र फक्त तसे बोलतील की असे असे झाले. हे तर कथेचे झाले, पण आता शोध सुरू होणार होता नव्या अभिनेत्रीचा!

जितेंद्रचा मूड आता थोडा पॉझिटिव्ह झाला होता. तो म्हणाला, "नवा कलाकार मी निवडणार. माझ्या मनात एक विचार आलाय. आपण अगदी नवीन कलाकाराला घेऊ, जिने अजून कोणत्याच सिरीयल मध्ये काम केले नसेल. आपण ॲड फिल्म मधील एखादी मॉडेल घेऊ. नवा फ्रेश चेहरा जगासमोर आणू. सुप्रियाच्या सिरीयल सोडण्याने जे नुकसान झाले आहे असे आपल्याला वाटते आहे त्याचे आपण संधीत रुपांतर करू!"

रेड्डी, "नवीन मॉडेल? नको जितेंद्र! ती एक रिस्क ठरेल!"

जितेंद्र," नाही ठरणार! माझ्या मनात आहे एक मॉडेल! खरं तर ती माझ्या मनात सुनेच्या बहिणीच्या रोलसाठी होती जी अजून कथेत प्रवेश करणार आहे, पण तिलाच आता आपण सुनेचा रोल देऊया! आणि सुनेच्या बहिणीच्या रोल साठी नंतर बघू काहीतरी!"

रेड्डी, "ठीक आहे. आता करा बाबांनो लवकर काहीतरी आणि आणा रुळावर गाडी सिरीयलची लवकर!"

रोशन पण थोडा विचारात पडला आणि म्हणाला, "जित, सांगून टाक आता कोण ती नेमकी कलाकार? सांग! ताणू नकोस!"

जितेंद्रने लॅपटॉप पासवर्ड टाकून ओपन केला आणि त्यात एक व्हिडिओ प्ले केला आणि सगळ्यांना दाखवला:

एक मुलगी दंतमंजनने रात्री दात घासते. पण घरातली लाईट जाते. आई वडील टॉर्च शोधायला धडपडतात पण त्यांना तो सापडत नाही. अचानक सोळावर सोळा असे बत्तीस दिवे ओळीने चमकतात. ते असतात त्या मुलीचे चमकणारे दात! मग दातांच्या उजेडात टॉर्च सापडते. नंतर लाईट येते आणि ती मुलगी हातात "चमको दंतमंजन" घेते आणि म्हणते –

"रोज सकाळी झोपेतून उठल्यावर आणि रात्री झोपायच्या आधी तुमचे दात चमको दंतमंजन ने घासायचे विसरू नका हं! चम चमा चम, चमको मंजन!" मग घरचे सगळे मंजन हातात घेऊन नाचायला लागतात आणि शेजारपाजारचे लोक खिडकीतून हा डान्स पाहू लागतात..

जितेंद्र म्हणाला, "आता हीच मुलगी म्हणजे वैशाली विचारे आपली सिरीयल पण चमकावणार! मी सगळी चौकशी करून ठेवलीय. फक्त तिच्याशी संपर्क साधून फायनल काय ते ठरवून टाकू! काय सांगता? कशी वाटली आयडीया?"

◻◻◻◻

# प्रकरण 15

सुप्रिया सोबत “कॅपलर्स कॅफे” मध्ये बोलणे झाल्यावर राजेश रूमवर गेला, त्याने तयारी केली आणि स्टेशन वर आला. मुंबईहून “स्वागतपुरी” गावाला जायला सात ते आठ तास लागतात. राजेश ट्रेनमधून गावातल्या स्टेशनवर उतरला तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. मग रिक्षा करून तो घरी पोहोचला. त्याचे एक छोटेसे वडिलोपार्जीत दुमजली घर होते.. त्याचे वडील लहानपणीच वारले होते. मग त्याने आणि आईने मेहनत करून संसाराचा गाडा इथपर्यंत आणला होता.

दरवाज्यावर टकटक करताच त्याच्या आईने दार उघडले.

“आलास? बराच उशीर झाला. गाडी लेट झाली वाटतं”, सुरकुत्यांच्या आडचा तिचा चेहरा आनंदून हसला.

“हो. कंटाळवाणा होता प्रवास!”, राजेश म्हणाला

“हो ना. बैस. पाणी देते”, आई त्याला म्हणाली.

राजेश पलंगावर बसला. छतावर पंखा वेगात फिरत होता. पाणी पिल्यावर मग तो फ्रेश झाला. जेवतांना इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. मग रात्री झोपण्याच्या वेळेस ट्यूब लाईट बंद करून पिवळा डीम लाईट लावण्यात आला. राजेश आणि त्याची आई झोपायला म्हणून आडवे झाले.

आई झोपेच्या अधीन झाली होती. रात्रीचे अकरा वाजले होते आणि राजेश मात्र जोरात फिरणाऱ्या छतावरच्या पंख्याकडे बघत होता. पंखा बिचारा अविरत फिरतच होता. डीम लाईट मुळे त्याची सावली बाजूच्या भिंतीवर पडली होती. त्याला फिरत्या पंख्यावर अधून मधून सुप्रिया ची प्रतिमा दिसत होती. त्याने तिला स्पष्ट नाही संगीतल्यावरचा तिचा निराश चेहरा सारखा पंख्याच्या पात्यांवर उमटत होता. त्याच्या मनात अनेक विचारांचे पाते असलेला पंखा फिरत होता.

"सुप्रियाला नाही म्हणून मी चूक केली का? प्रवासात मला सारखी सुप्रिया का आठवत होती? का मी इतका कठोर झालो? होय, झालो! माझी महत्वाकांक्षा मला प्रिय असल्याने मला सुप्रिया अप्रिय वाटली! आणि ती पूर्ण होण्यासाठी मी काहीही करेन. आणि मी जे करणार आहे त्यात काय चूक आहे? काहीच नाही! आता बऱ्यापैकी मी या इंडस्ट्रीत लेखक म्हणून स्थिरावलो आहे. जरा पैसाही जमा झालाय. आता माझ्या मोहिमेस उद्यापासून सुरूवात करायला हरकत नाही!"

अजून झोप येत नव्हती. ती येईल असे त्याला वाटत नव्हते. "मी कुठे लपलीय शोध?" असे म्हणून झोप लपून बसली होती पण एका क्षणी राजेशने तिच्याशी लपंडाव खेळणे शेवटी सोडून दिले. बेडवर उठून बाजूला ठेवलेल्या तांब्याच्या कळशीतून त्याने पाणी पिले.

मग रात्रीच्या बारा वाजेचा गजर घड्याळाने दिला आणि त्याला तो इयत्ता आठवीत असतानाचा अगदी असाच आवाज असणारा शाळेतल्या घड्याळाचा गजर आठवला....

त्या दिवशी दुपारचे बारा वाजले होते. राजेशने लिहिलेले स्वातंत्र्य लढ्यावर आधारित एक छानसे आणि छोटेसे एक नाटक त्याने श्रीयुत खारकातेकर या आर्ट आणि कल्चरच्या शिक्षकांना दिले. ते शिक्षक आणि राजेश दोघे टीचर्स रुम मध्ये बसले होते. त्याने ते लिखाण त्यांना दिले तेव्हा तिथे इतर कुणी उपस्थित नव्हते.

"राजेश! मला आता लगेच वेळ नाही. पण मी आज रात्री घरी तुझे लिखाण वाचेन!"

राजेश तेथून निघाला आणि वर्गात जाऊन बसला. त्याला या गोष्टीचे खूप अप्रूप वाटत होते की त्याने लिहिलेले नाटक त्याचे शिक्षक वाचणार! तसे त्याने आतापर्यंत छोट्या मोठ्या बाल साहसकथा लिहिल्या होत्या. त्या मित्र मैत्रिणींना त्याने वाचूनही दाखवल्या होत्या. सगळ्यांना त्या कथा आवडायच्या. अगदी हौस म्हणून सहजच लिहिलेल्या कथा इतरांना भयंकर आवडून जायच्या. आता

आठवड्यानंतर होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथमच त्याचे नाटक स्टेजवर साकारणार होते, फक्त खारकाते सरांनी त्याची मान्यता दिली की झाले! या कल्पनेनेच तो एवढा उत्तेजीत झाला की त्याचे समोरच्या गणिताच्या शिक्षकांकडे लक्षच नव्हते. तो त्याच्या नाटकातले संवाद आठवत बसला होता.

"64 चे वर्गमूळ काय? तू सांग राजेश?" राजेश विचारांत गढला आहे बघून शिक्षकांनी विचारले. गणिताच्या त्या शिक्षकांचे नाव होते अंकब्रम्हे सर!!

"चले जाव! चले जाव!" अचानक दचकून त्याच्या तोंडातून अचानक बाहेर पडले आणि सगळा वर्ग हसायला लागला.

"अरे बाळा! काय झालंए तुला? एवढा हुशार मुलगा इतका उदंड कसा काय झाला बरे? तब्येत बरी आहे ना? स्वतः वर्गात लक्ष नाही आणि शिक्षकांना चले जाव म्हणतोस! तूच उठ आणि चले जाव! आणि व्हरांडे में खुद को मुर्गा बनाव!" शिक्षक म्हणाले आणि पूर्ण वर्ग आणखी दुपटीने खळाळून हसला.

"गप्प बसा रे! हसू नका!" शिक्षक गरजले.

भानावर आल्यावर चूक लक्षात आल्याने राजेश ओशाळला आणि म्हणाला, "माफ करा. मला तुम्हाला चले जाव म्हणायचे नव्हते. इंग्रजाना म्हणतो होतो मी: चले जाव.."

सगळा वर्ग आता काहीतरी आणखी गम्मत बघायला मिळेल आणि आणखी मनोरंजन होईल या हेतूने सरसावून बसला.

शिक्षक राजेश जवळ आले, त्याच्या पाठीवर हात ठेवून शांतपणे म्हणाले, "बाळ! दाखव बरे मला, वर्गात कुठे बसले आहेत इंग्रज? माझ्या परवानगी शिवाय ते वर्गात आलेच कसे?"

बाजूची दोन तीन मुले खदखदून हसू लागली. गणिताच्या तासाला अचानक इतिहास सुरु झाल्याने त्याना वेगळीच गम्मत वाटायला लागली.

“गप बसा रे! सोम्या आणि गोम्या! मी बोलतोय ना राजेशसोबत! जरा शांत बसा! हां तर मी काय म्हणत होतो की, इंग्रज कुठे आहेत? मला तर दिसत नाहीएत वर्गात कुठे? की बेंचखाली लपलेत?

“तसं नाही सर! मी लिहिलेल्या नाटकातले संवाद आठवत होतो आणि अचानक त्यातला संवाद माझ्या तोंडून बाहेर पडला. मला माफ करा!”, राजेश काकुळतीने म्हणाला.

“बरं बरं ठीक आहे. तू नेहमी असा वागत नाहीस म्हणून तुझी पहिली चूक माफ!. पण लक्षात ठेव! कोणत्याही गोष्टीत एकाग्रता आवश्यक असते. आपण जे करतो ते अगदी मन लावून करावे. वर्गात असताना तन आणि मन दोघेही वर्गातच असावेत. क्रिकेट खेळत असताना क्रिकेट खेळण्यातच लक्ष हवे. इतरत्र नाही. आलं का लक्षात काय म्हणतोय मी? फक्त तूच नाही सगळया वर्गाने हे लक्षात घेतले तर बरे होईल!”, शिक्षक म्हणाले आणि पुन्हा फळयाजवळ जावून गणित शिकवू लागले.

तर राजेशला असे हे एकंदरीत वेड होते लिहिण्याचे! आपण लिहिलेले कधी कुणी वाचेल आणि त्यावर प्रतिक्रिया देईल याची अगदी आतुरतेने तो वाट बघत बसे. अगदी पाचवीपासूनच त्याला स्वत:च्या लिहिण्याच्या प्रतिभेबद्दल कळून चुकले होते. त्याचे निबंध सुद्धा अफलातून असायचे. कोणत्याही भाषेतला निबंध असो, कुणाला त्यात एकही चूक काढता यायची नाही. पैकीच्या पैकी मार्क दिल्याशिवाय शिक्षकांना दुसरा पर्याय नसे.

त्या दिवशी शाळा सुटल्यावर सगळा स्टाफ आणि विद्यार्थी निघून गेल्यानंतर खारकाते सर त्याला ग्राउंड वर भेटले, म्हणाले, “राजेश! मस्त लिहिले आहेस नाटक! मी सुद्धा याच विषयावर तुझ्या आधी थोडेफार असेच नाटक लिहिले होते, पण तुझे नाटक सुद्धा उत्तम आहे! असाच लिहित रहा! आपण स्वातंत्र्य लढ्यावर आधारित नाटक नक्की सदर करू!!”

आनंदाने राजेश त्यांना निरोप देऊन घरी जायला निघाला.

राजेशचे ते वय कुणा मोठ्या व्यक्तीच्या मनातील डावपेच ओळखण्याचे नक्की नव्हते पण त्याला वाटून गेले की आपल्याकडून पहिल्यांदा जेव्हा नाटक त्यांनी घेतले तेव्हा का बरे त्यांनी असा उल्लेख

केला नाही की ते सुद्धा याच विषयावर लिहित आहेत? पण जास्त खोलात त्याने विचार केला नाही. त्यला त्या सरांवर पूर्ण विश्वास होता.

तो सांस्कृतिक कार्यक्रमाचा दिवस उजाडला. तीन मुख्य पात्रे असलेल्या, मनात देशभक्तीची ज्वाला जिवंत करणाऱ्या अशा उत्तम संवादांनी भरलेल्या त्या नाटकाला खूप प्रशंसा मिळाली. ते नाटक दहावीच्या मुलांनी सादर केले होते. त्याने लिहिलेल्या नाटकासारखेच ते होते पण त्यात थोडा बदल केला गेला होता पण संवाद मात्र त्याने लिहिलेले जसेच्या तसे होते.

मग बक्षीस समारंभात श्रीयुत खारकातेकर या आर्ट आणि कल्चरच्या शिक्षकांना बक्षीस मिळाले, स्वातंत्र्य लढ्यावर ते नाटक लिहिल्याबद्दल! सगळीकडे टाळया पडल्या! आणि राजेशला आश्चर्याचा धक्का बसला. त्या शिक्षकासाठी वाजणारी एकेक टाळी म्हणजे राजेशच्या राजेशच्या डाव्या आणि उजव्या कानावर एकापाठोपाठ एक जोरजोरात बसणाऱ्या थापडा त्याला वाटत होत्या. त्याचा मेंदू सुन्न आणि बधीर झाला. थोड्या वेळाकरता त्याला कसलाच आवाज ऐकू येईनासा झाला.

कार्यक्रम संपल्यानंतर त्याने खारकाते सरांना भेटण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी त्याची नजर चुकवून काढता पाय घेतला.

त्याच्या कथा चोरीबद्दल शिक्षकांविरोधात तो काही करू शकत नव्हता, कारण त्याचेकडे पुरावा नव्हता. कथेची आणखी एक ज्यादा प्रत त्याचेकडे नव्हती आणि स्टेजवर सादरीकरण करतांना नाटकात बरेच बदल केले गेले होते आणि ते खारकाते सरांनी स्वत:च्या नावावर खपवले होते! तसेच त्याने त्याचे लिखाण खारकाते सरांना दिल्याचा कोणताच पुरावा नव्हता! त्याने ते नाटक लिहून खारकातेकरांना दिले होते हे दुसऱ्या कुणालाच माहिती नव्हते आणि कुणी ते पाहिलेही नव्हते. फक्त अंकब्रम्हे शिक्षकांच्या गणिताच्या तासाला त्याने लिहिलेल्या नाटकाबद्दल उल्लेख केला होता!

तो अंकब्रम्हे सरांना भेटला पण त्यांनी त्याचेवर विश्वास ठेवला नाही कारण खारकाते सरांची प्रतिमा सगळया स्टाफ मध्ये चांगली होती.कुणावरही एकदम विश्वास टाकल्याचे नुकसान त्याला कळून

चुकले आणि पण एक समाधान मात्र त्याच्या चेहऱ्यावर होते - त्याच्या नाटकाला सगळीकडून प्रशंसा मिळत होती. म्हणजे त्याचे लेखन चांगले होते.

त्या रात्री त्याला झोप येत नव्हती. आईला या सगळ्यातले काहीही कळत नव्हते. सांगून उपयोगही नव्हता. त्याने मुद्दामहून मित्रांना सांगणे टाळले. सांगून तरी काय होणार होते? इकडच्या कानाची लगेच तिकडे खबर व्हायला वेळ लागला नसता. खारकातेना कळले असते तर त्यांनी स्वत:च्या प्रतिमेचा वापर करत राजेशलाच खोटे ठरवले असते. त्या शिक्षकाच्या गोड भाषेला भुलून त्याने ते नाटक अगदी विश्वासाने त्यांचेकडे सोपवले होते आणि त्याचा विश्वासघात झाला होता. त्या शिक्षकांचे सामाजिक वर्तुळ व प्रभाव बघता त्याने त्या कथा चौर्याबद्दल कुणालाही सांगणे टाळले. पुन्हा त्या शिक्षकांसमोर सुद्धा त्याने कसलीही नाराजी दर्शविली नाही. याचे त्या शिक्षकांनाही आश्चर्य वाटले. तो अध्याय तिथेच संपला!!! नाटकातील राजेशच्या प्रत्येक संवादाला टाळया मिळत होत्या त्यावरून राजेशला कळून चुकले की तो अगदी उत्तम संवाद लेखन करू शकतो!!

# प्रकरण 16

ही घटना राजेश जवळ जवळ विसरून गेला. आर्ट्सला शिकत असतांना राजेशने सहज म्हणून एक छोटी थरारक आणि रहस्यमय कादंबरी लिहिली: “खेळ हा नशिबाचा!”. त्याचे हस्तलिखित त्याने एका मुंबईच्या नवीनच सुरु झालेल्या दिवाळी अंकाला पाठवले (“कथामंथन”). काही दिवसांनी संपादक विभागाचे पत्र त्याला आले. कथा संपादकाना आवडली आहे. पण ती थोडी आणखी मोठी करावी असे त्याला सांगण्यात आले. त्यात आणखी जास्त संवाद टाकावे असेही त्याला सांगण्यात आले. मग त्याने आणखी संवाद टाकून त्याने ती एक दीर्घ कादंबरी बनवली आणि पुन्हा पाठवली:

ती कथा थोडक्यात अशी होती –

“एका खेडेगावातला १५ वर्षांचा मुलगा त्याच्या वडिलांसह तालुक्याच्या गावी यात्रेत एका कार्यक्रमांचं तिकीट लकी ड्रॉ जिंकल्यामुळे जातो. तो कार्यक्रम बघून आणि यात्रेतला बाजार फिरून झाल्यानंतर मुलगा वडिलांचे लक्ष नसतांना त्याच्या धुंदीत एका स्टॉल वरच थांबतो. वडील सहज फेरफटका मारायला पुढे जाऊन परत येतात तर तो मुलगा तिथे नसतो. तो मुलगा यात्रेत घुसलेल्या एका स्मगलर्सच्या टोळीच्या तावडीत योगायोगाने सापडतो. त्यानंतर त्याचा एक चित्तथरारक प्रवास सुरु होतो - अचानक एका अशा जगाशी त्याची ओळख होते ज्या जगाचा त्याने आपल्या आयुष्यात कधी विचार सुद्धा केला नसता. मग आणखी एका योगायोगाच्या घटनेत त्याचेकडून टोळीतल्या एकाचा खून होतो आणि तो तेथून निसटतो. मग गुंड त्याचे मागे लागतात.. इकडे त्याचे वडील पोलिसांत तक्रार करतात. अनेक दिवस जाऊनही काहीच थांगपत्ता न लागल्याने ते स्वत:च जीव धोक्यात घालून मुलाला शोधायचे ठरवतात. तो सापडत नाही. नंतर दोन वर्षांनी एका विचित्र प्रसंगात त्यांची आपल्या मुलाशी भेट होते पण तो पार बदललेला असतो….”

संपादकांचे उत्तर आले - “आणखी संवाद टाकण्याची आमची विनंती मान्य करून कथेची सुधारित आवृत्ती पाठवल्याबद्दल धन्यवाद! आता मुख्य संपादकांच्या फायनल सिलेक्शनची फेरी होईल. त्यात तुमची कादंबरी सिलेक्ट झाली की मग दिवाळी अंक प्रकाशित होण्याच्या एक महिना आधी

तुम्हाला निर्णय कळवला जाईल. कादंबरी सिलेक्ट होईलच याबद्दल खात्री बाळगा. साहित्य पाठवत राहावे ही विनंती!"

बरेच दिवस वाट बघितल्यावर कुठलाच पत्रव्यवहार न आल्याने त्याने एक दोनदा दिवाळी अंक कार्यालयाला एसटीडी बूथ वरून फोन केला. फोन सतत बिझी यायचा. चार महिन्यांनी दिवाळीच्या एक आठवडा आधी त्याने पेपर स्टॉल्सवर चौकशी केली तर त्याला कळले की तो अंक बाजारात आलाच नाही. अनेक पेपर स्टॉल आणि न्यूजपेपर व्हेंडर्सकडे तो जाऊन आला. त्याचे हस्तलिखित सुद्धा पोस्टाने परत आले नव्हते. त्याची झेरॉक्स सुद्धा त्याने काढली नव्हती. पुन्हा त्याच्या मेंदूत शाळेतली घड्याळाची घंटा वाजली. खारकाते सर त्याला अचानक आठवून गेले.

कथेचे काय झाले याचा छडा लावण्यासाठी तो तडक मित्रासोबत मुंबईला गेला. दादर पश्चिमला दिवाळी अंकाच्या कार्यालयाचा पत्ता शोधत शोधत तो आणि त्याचा मित्र विनीत भर दुपारी एक वाजता घामाने चिंब होत एका गल्लीत पोहोचले.

पत्त्यानुसार ते कार्यालय वरच्या मजल्यावर होते. लोखंडी गोल वळणाच्या पायऱ्या चढून ते वर गेले. तेथे छोटे ऑफिस होते - "येथे स्टॅंप पेपर मिळतील" असे लिहिलेले होते.

"इथे दिवाळी अंकाचे कार्यालय होते ना?"

"होय, पण ते दोन महिन्यांपूर्वीच त्यांनी सोडले"

"काय? त्यांनी कार्यालय सोडले?"

"होय! माझे ऑफिस आधी खाली होते. मग त्यांनी सोडल्यावर आम्ही वर शिफ्ट झालो! वर भाडे कमी आहे!"

"बरं, ते ऑफिस कुठे शिफ्ट झाले ते कळू शकेल काय?"

"नाही बुवा. पण एक गोष्ट म्हणजे ऑफिस सोडताना त्यांनी घरमालकाशी खूप वाद घातला होता. पैसे पण दिले नाहीत शेवटच्या महिन्याच्या भाड्याचे!"

"काय?"

"होय! पण तुम्हाला कुणाला भेटायचं होतं का?"

"नाही. ठीक आहे. धन्यवाद! फक्त चौकशी करायची होती!"

राजेश आणि विनीत परत जायला निघाले आणि काहीतरी आठवून राजेश पुन्हा वर चढून आला आणि त्याने त्या माणसाला विचारले - "बरं, इथे असणारी माणसे दिसायला कशी होती? किती माणसे ऑफिसमध्ये काम करत होती?"

त्या माणसाला संशय आला, म्हणाला, "तुम्ही सीआयडीवाले आहात की "एक शून्य शून्य" ही पोलिसांवरची टीव्ही मालिका जास्ती बघता? नक्की काय समजू मी?"

विनीत म्हणाला, "नाही हो काका! आता काय सांगणार तुम्हाला!! याने एक कथा पाठवली होती छापायला! त्याबद्दल विचारायचे होते, बाकी काही नाही!"

"बरं! बरं! सांगतो! एकजण इथला मुख्य कर्मचारी होता - त्याचे नाव .....?? एक मिनिट! हां आठवले!! त्याचे नाव होते - रत्नाकर रोमदाडे! आणि त्याचा साथीदार ?? त्याला सगळे गोप्या म्हणायचे! आणि दिसायला रत्नाकर हा टक्कल पडलेला आणि वर्ण सावळा. थोडे पोट पुढे आलेले आणि उजव्या गालावर कसलातरी मोठा काळा डाग आहे. अगदी लक्षात येण्यासारखा काळा डाग!

"ओके अंकल! धन्यवाद!" राजेश म्हणाला.

"अंकल! आपण चहा नाश्टा करूया का? चला जाऊ!" विनीत त्या माणसाला म्हणाला.

"नको नको! आता बरीच कामं पडलीत. बोलावल्याबद्दल धन्यवाद!"

"ओके अंकल! बरंय येतो आम्ही!"

दादर स्टेशनवर त्यांनी दोन दोन वडापाव खाल्ले. मग वेस्टर्न लाईनला जाऊन दोघांनी मरीन लाईन्सला जायचे ठरवले. 5:35 ची स्लो लोकल पकडून ते मरीन लाईन्सला आले. थोडा समुद्राच्या कडेने फेरफटका मारून घडलेल्या गोष्टीवर विचार करून काही तोडगा किंवा उपाय करता येईल असे त्यांना वाटले.

"काय करू विनीत मी आता?"

"तू त्या स्टोरीची झेरॉक्स सुद्धा काढून ठेवली नाहीस?"

"हो रे! जरा चुकलंच माझं!"

राजेश मनात म्हणत होता, "चुकलं? एकदा नाही तर दोनदा चुकलं! एकदा अनुभव नव्हता म्हणून फसलो आता मात्र दुसऱ्या वेळेस एक पहिला वाईट अनुभव पाठीशी असतांना सुद्धा पुन्हा फसलो! खूप विश्वास ठेवला..."

"काय झालं? कसल्या विचारात गाढ बुडाला आहेस?"

"काही नाही! मी ती कादंबरी पुन्हा लिहून काढणार! मी हार मानणार नाही. माझी ती कादंबरी त्या नालायक संपादकाने इतर कुठे त्याच्या स्वत:च्या किंवा इतर कुणाच्या नावाखाली छापायला दिली आहे का ते बघावे लागेल!"

"मग त्यासाठी तुला दिवाळी अंकांची लायब्ररी लावावी लागेल. मी तुला शोधायला मदत करेन! मला तुझी कथा घरी गेल्यावर थोडक्यात सांग!"

"ठीक आहे. जर ती कुठे छापून आली नसेल तर मी दिवस रात्र मेहनत करून ती कथा पुन्हा कागदावर लिहून काढेन. पूर्वीसारखं जसंच्या तसं आठवणार नाही मला पण मी लिहेन! आणि पुन्हा पाठवेन दुसरीकडे!", राजेश निर्धाराने म्हणाला.

"आणि जर का ती इतर कुणाच्या नावाने या वर्षीच छापून आली असेल तर? तर मग काय करायचे आपण?", विनितची शंका बरोबर होती.

"ते मलाही माहीत नाही, पण आधी आपण जे ठरवलं आहे ते करूया!" राजेश म्हणाला.

तिकडे अरबी समुद्र अधून मधून खवळत होता आणि मोठमोठ्या लाटा दगडांवर आदळत होता. हे दोघे मरिन लाईन्स वर चालत होते.

"आणि समजा छापून आली तर? तू तुझी कथा पुन्हा लिहेपर्यंत ती दुसरीकडे छापली गेली तर?", विनितची ही शक्यताही नाकारता येत नव्हती.

"तर मग मी सांगेन की ही माझी कथा आहे!" राजेश आवेगाने म्हणाला आणि चालायचा थांबला.

"पण, छापलेली कथा पाहून पाहून कुणीही पुन्हा कागदावर लिहू शकतो आणि म्हणू शकतो की ही माझी कथा आहे! कोण विश्वास ठेवेल?", विनित म्हणाला तशी एक लाट जोराने दोघांच्या अंगावर आदळली. दोघेजण ओले झाले.

"तुझ्या म्हणण्यात तथ्य आहे. पण मला काही सुचत नाही आहे! पण आपण एक करूया! तू येत्या काही दिवसातल्या पेपरमध्ये 'कथमंथन' दिवाळी अंकासदर्भात काही बातम्या येतात का त्या तपासत राहा आणि दिवाळी अंकांची लायब्ररी लावून माझ्या कथेसारखी कथा कुठे छापली गेलीय का ते तपासत राहा! तोपर्यंत मी युद्धपातळीवर माझी कादंबरी पुन्हा लिहायला सुरुवात करतो!"

पुढच्या क्षणी निर्धाराने ते दोघे ओल्या कपड्यांसह झपाझप चालत स्टेशन वर गेले आणि घरी जायला लोकल पकडली. लोकलच्या डब्याच्या खडाखड हलणाऱ्या काही रिकाम्या कड्या बघत तो विचार करत होता. त्या कड्यांचा आवाज सहन न होऊन त्याने हलणाऱ्या दोन कड्या मुठीत पकडल्या. विक्रोळी स्टेशनवर गाडी थांबली. एवढया भयानक गर्दीत त्याची आई अचानक पाण्याचा ग्लास हातात घेऊन सहजपणे लोकलमध्ये शिरली आणि त्याला गदागदा हलवू लागली, "राजेश! अरे असा रात्रभर बसून छताकडे बघून काय विचार करतोयस? हे घे पाणी पी!" तो तंद्रीतून जागा झाला. आई लोकलमध्ये आली नसून आपली तंद्री भंग पावली हे त्याला कळले.

"बरा आहेस ना?"

"हो बरा आहे ! झोप तू!" पलंगावर बसलेला राजेश पाण्याचा ग्लास घेऊन म्हणाला.

# प्रकरण 17

सकाळी दहा वाजता आईने बनवलेलं भाजणीचं थालीपीठ हिरव्या मिरच्यांच्या ठेच्यासोबत खातांना राजेश आईला म्हणाला, "मस्त झालंय थालीपीठ आणि ठेचा! आणि सोबत ताजं दही असल्याने झकास बेत आहे. आता दुपारी तीनेक वाजेपर्यंत तरी भूक लागणार नाही. मी नाश्टा झाला की धर्मापूरला जाऊन येतो जरा."

"अरे राजेश! काय नुसता फिरत असतोस? आजच्या दिवस आराम केला असतास, मग उद्या गेला असतास. आज आपल्या गावातल्या नदीवरच्या दक्षिणमुखी हनुमान मंदिरात संध्याकाळी जाऊ आपण!"

"आई! मी येतांना तुला फोन करीन मग तू ये तिथे. मला आज धर्मापूरला जाणे जरुरीचे आहे!!"

"जा बाबा जा! मी सांगितले तरी तू तुझ्या मनाप्रमाणेच करणार आहे ते माहित आहे मला! पण संध्याकाळी लवकर ये! उद्या गोडंबे काका आणि त्यांची सुनंदा येणार आहेत आपल्याकडे! तू येणार आहेस म्हणून बोलावून घेतले मुद्दाम त्यांना! तुला आधीच सांगितले असते तर तू मुंबईहून आलाच नसतास इकडे! टाळाटाळ केली असतीस!"

"अगं आई, हे काय चालवलंयस तू? मी तुला मागच्या वेळेस सुद्धा सांगितले होते की मी लग्न करणार नाही आहे. सुनंदाशी तर नाहीच!"

"आता बास झालं राजेश! एक शब्द बोलू नको! आतापर्यंत ऐकत आले तुझं पण आता मी तुझं ऐकणार नाही! मी गोडंबे काकांना शब्द दिलाय. तुझं लग्न होईल तर त्या सुनंदाशीच!"

"आई मला थालीपीठ खाऊ दे!"

"अरे आरामात खा! अजून दोन थालीपीठ घे आणि पोटभर खा! पण, खाल्ल्यावर मी तुला पुन्हा हेच सांगणार आहे की सुनंदा आपली सून होईल! इतर काही ऐकू नकोस पण हे मात्र माझे तुला ऐकावेच लागेल!"

“अगं आई, मला तुलाही घेऊन कायमचा मुंबईत जायचा विचार आहे. ती आणि तिचे कुटुंब खूप खेडवळ आहेत! त्यांना माझी ही अशा प्रकारची नोकरी आवडणार नाही. मी ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्राबद्दल गावाकडे बरेच समज गैरसमज आहेत! आणि मी जरी तिला लहानपणापसून बघितले आहे तरीही तीच्याकडे मी त्या भावनेने बघितले नाही!”

“मला बहाणे नकोत! त्या भावनेने बघितले नाहीस ना? मग लग्न झाल्यावर बघ त्या भावनेने! तुला माहीत आहे ना आपण वचन दिलंय त्यांना?”

“वचन बिचन या सगळ्या लहानपणच्या गोष्टी आहेत! आम्ही मोठे झालो आता. विसरा ती वचनं!!”

“अरे त्या गोष्टी लहानपणाच्या असल्या म्हणून काय झालं? काळानुसार वचन हे वचनच राहते! आणि गोडंबे काकांनी आपल्याला किती मदत केली आहे माहित आहे ना तुला? त्याची परतफेड नको करायला?"

"अगं आई वेळोवेळी तू आणि मी पण त्यांच्या मदतीला धावून गेलोच आहोत की!" राजेशने आठवण करून दिली.

"हे वचन तुझ्या बाबांनी दिलं आहे हे ठावूक असूनही तू असा का वागतोस राजेश?" आई अर्धे रडून आणि अर्धे संतापून पदराने डोळे पुसत बोलली.

"थालीपीठ हळूहळू बेचव का होते आहे बरं? दही पण जरा जास्तच आंबट आहे! " उपरोधाने राजेश म्हणाला.

"हो का? सुनंदा थालीपीठ बनवेल तेव्हा चव परत येईल हळूहळू! काळजी करू नकोस हं बाळा!" आईसुद्धा दुप्पट उपरोधाने म्हणाली.

काही केल्या आई आणि तिची सुनंदा पाठ सोडणार नव्हती त्यामुळे शांततेने थालीपीठ पूर्ण खाऊन संपवल्यानंतर मनातला चढणारा संताप दाबून टाकत राजेश शक्य तितक्या हळू ताटावरून उठला. हो किंवा नाही न म्हणता मौन राहून तो कपडे घालू लागला. कधी कधी कुणी हो म्हणायचे असले तरी मौन बाळगतात आणि कुणी नाही म्हणायचे असले तर मौन पत्करतात. कुणाकुणाला हो किंवा नाही यापैकी काहीच म्हणायचे नसते तेव्हा मौन राहतात. पण समोरचा त्या मौनाचा स्वत:च्या सोयीनुसार अर्थ घेतो. राजेशच्या आईनेही त्याच्या मौनाचा होकारार्थी अर्थच गृहीत धरला, भले त्याने

आताच स्पष्ट संवादातून स्पष्ट नकार पोहोचवला का असेना! एकदाचा पाठीवर सॅक घेऊन तो राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी मध्ये बसला. बसमध्ये तुरळक गर्दी होती. त्याने खिडकीजवळची जागा पकडली. कंडक्टर कडून तिकीट काढले आणि खिडकीतून बाहेर बघू लागला. गाडी सुरु झाली. खिडकीतून गार वारा येत होता. आईच्या सकाळच्या लग्नासंदर्भातील चर्चेचे त्याच्या मनात विचार आले येऊ लागले.

"मी माझ्या लिहिलेल्या कथांमध्ये माझ्या मनाप्रमाणे सभोवतालाचे जग आणि पात्रे तयार करतो आणि ती सगळी पात्रे माझ्या हुकुमानुसार जगतात आणि मरतातसुद्धा! पण, खऱ्या जगातील एक पात्र म्हणजे मी मात्र पूर्ण माझ्या अधीन नाही. मला लग्नासारखा निर्णय आईच्या मर्जीनुसार आणि हुकुमानुसार घ्यावा लागतोय! पण ती सुद्धा कुणाच्या तरी खेळातले एक पात्र आहे? जगाला नियंत्रित करणाऱ्या कुणीतरी शक्तीच्या हातातले ती आणि मी सुद्धा पात्रच आहोत. पण त्याला इलाज नाही. लहानपणी दिल्या गेलेल्या काही वचनांमुळे आणि दिलेल्या शब्दांमुळे, कुणाच्या उपकाराच्या ओझ्यामुळे आणि कर्जामुळे आपण कधीकधी परावलंबी होतो."

खिडकीतून चांगला वारा येत होता. झोप येण्यासारखा हा वारा होता पण मनातील विचार त्याला झोपू देत नव्हते. राजेशचे विचारचक्र पुन्हा सुरु झाले, "पण मला एक समजत नाही की एखादा व्यक्ती आपल्याला मदत करतो तर खरं, पण त्यामागे त्याची भविष्यातली दूरदृष्टी असू शकते, पण आपल्याला हे आधी त्याची मदत स्वीकारतांना कळत नाही. कसे कळेल? कुणाचे मन थोडेच वाचता येते? काहीतरी स्वार्थ असल्याशिवाय कुणी आजकाल मदत करतच नाही का? मदतीच्या उपकारापायी परतफेडीची कुठेतरी अपेक्षा असतेच असते! असायला हवी की नको? ते ठरवणारा मी तरी कोण? आणि त्यातल्या त्यात मी आणि माझे कुटुंब मदत 'घेणारे' आहोत त्यामुळे 'देणाऱ्याने' अपेक्षा ठेवाव्यात की नको आणि काय ठेवाव्यात हे मी कसे ठरवू शकेन?"

सहजपणे राजेशची नजर बाजूला गेली तेव्हा त्याला दिसले की बाजूच्या सीटवर एकजण "जीवनाचे शिल्पवृक्ष" हे रा. म. मालवणकर यांचे पुस्तक वाचत होता. त्यानेही ते वाचले होते. पुस्तक बघितल्याने आणी त्यातील काही प्रसंग त्याला वाचल्याचे आठवल्याने त्याचे लग्नाच्या विषयाकडून ध्यान हटले आणि मन भूतकाळात गेले. रात्री आठवलेल्या प्रसंगांच्या पुढचे त्याला आठवू लागले.

# प्रकरण 18

विनितने युद्धपातळीवर त्या वर्षीच्या दिवाळी अंकाचा फडशा पाडला. इकडे तिकडे वर्तमानपत्रात तपासले. नवीन प्रकाशित झालेल्या कादंबऱ्याचा आढावा घेतला. तोपर्यंत राजेश कथा लिहिण्यात गुंतला. रात्रंदिवस मेहनत करून त्याने त्याची कथा पुन्हा लिहून काढली. स्वत:च्याच कथेचे जसेच्या तसे प्रसंग, वाक्य आणि शब्द जरी त्याला आठवले नसले तरी शेवटी कथा त्याने लिहून काढली. विनीतला जमेल तेवढे त्याने संशोधन केले. इतर मित्रानाही त्याने मदतीला घेतले. कुठेच त्याच्या कथेसारखी कथा छापून आलेली नव्हती.

मग आता त्याने पुन्हा नव्याने लिहिलेली ही कथा छापायला द्यायची का? याचे एखादे पुस्तकच छापायचे का? कुणी प्रकाशक तयार होईल का? की स्वत:च प्रकाशित करायची ती कथा? पुस्तक स्वत: प्रकाशित करण्याइतके भांडवल नव्हते राजेशजवळ! पुन्हा काही चौर्यकर्म घडले तर? आणि आता परिक्षा जवळ आल्या आहेत, तेव्हा कथेचे काय करायचे ते नंतर पाहू! असे म्हणून ती कथा त्याने नंतर कोणालाच आणि कुठेच पाठवली नाही!! परिक्षा संपल्यानंतर कुणा प्रकाशकाला भेटून बघूया असा त्याने विचार केला.

मग परीक्षा आली. कथा असलेली लाल रंगाची फाईल त्याने कपाटात ठेवून दिली. कालांतराने तो हळूहळू त्या विचारांतून बाहेर पडला. अभ्यासाला लागला. परीक्षा झाली.

अनेक महिने उलटले. अधून मधून राजेश वर्तमानपत्रात लिखाण करत होता. लेख लिहित होता. वाचकांचे प्रतसाद येत होते. त्याचे बहुदा सगळे लेखन संवादात्मक असायचे. एखाद्या विषयावर भाष्य करतांना सरळ लेख न लिहिता तो दोन तीन जण त्या विषयावर चर्चा करा आहेत असे संवाद लिहायचा. एकजण त्या विषयाच्या बाजूने तर दुसरा विरोधात वगैरे असे त्याचे लिखाण लोकाना आवडून जायचे. आता लिखाण पाठवताना योग्य ती खबरदारी तो घेत होता. झेरॉक्स काढून ठेवत होता.

या कालावधीत एक गोष्ट चांगली झाली होती की त्याची कथा कोणत्याही दिवाळी अंकात छापून आली नाही आणि ती इतर कुठेसुद्धा पुस्तकरूपाने किंवा इतर कसल्याही प्रकारे छापून आल्याचे त्याला समजले नव्हते.

अधून मधून त्याच्या आईचा सुनंदाबद्दलचा रेटा सुरूच होता. त्याला कसेतरी हो नाही म्हणत तो तोंड देतच होता. आई सुनंदाच्या नावाचे अनेक फुल टॉस बॉल टाकायची आणि दर वेळेस तो सुनंदाचा चेंडू सिक्स मारून सीमापार करायचा आणि आई आणखी दुसरा चेंडू लगेच तयार ठेवायची.

दरम्यान वेळ मिळेल तसे राजेशचे वाचन आणि लिखाण सुरूच होते. जुन्या काळातले राजे आणि राजांवर प्रभाव टाकणाऱ्या प्रभावी व्यक्तिमत्वाच्या पुस्तकांचा तो अभ्यास करायचा. चाणक्यबद्दल अनेक पुस्तके त्याने वाचून काढली. त्या कपाटातील त्याने पुन्हा लिहून काढलेल्या कादंबरीबद्दल का कोण जाणे त्याच्या मनात एक उदासीनता निर्माण झाली. कदाचित त्याला त्याद्वारे स्वत:च्या असहायतेची आणि विश्वासघात झाल्याची सतत आठवण होत असावी. त्याने ती कथा पुन्हा बाहेर काढली नाही.

एका वर्षानंतर - फायनल ईयरला नव्वदच्या वर मार्क पडून तो पास झाला. तोपर्यंत इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेवर त्याचे चांगले प्रभुत्व आले होते. कॉलेज संपले होते. सुट्ट्या लागल्या.

विनीत आणि त्याचे दोन मित्र राजेशकडे आले. तालुक्याच्या गावाला एका मित्राची मोठी गाडी घेऊन जवळच्या थंड हवेच्या ठिकाणी त्यांचे जायचे ठरले. दोन तीन दिवस मुक्काम करून मजा करायची, फिरायचे असे त्यांनी ठरवले. सगळयांच्या परीक्षा संपल्या होत्या त्यामुळे आनंदाचे भरते ओसंडून वाहात होते. ते अगदी सक्काळीच म्हणजे पाच वाजता निघाले. सगळी तयारी आणि समान बरोबर घेतला होता.

चार मित्र आणि फिरायला एक गाडी - अजून काय पाहिजे? अगदी स्वर्गीय सुख! नाही का?

दुपारी बाराला ते अलकापूर या तालुक्याच्या गावी पोहोचले. तेथून चार तासांचा रस्ता होता – “सावरीमाळ” या थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा! त्यांनी ब्रेक घेतला आणि एका खाणावळीत ते जेवणासाठी गेले. विनीत, राजेश, बंडू आणि सोमा असे ते चौघं चार वेगवेगळे पदार्थ मागवून त्यावर ताव मारत होते - झुणका भाकर त्या हॉटेलची खासियत होती. त्यासोबत मिरचीचा कोल्हापूरी झटका, वांग्याचं भरीत, पनीर मटर आणि तवा पुलाव!

बंडू म्हणाला, “अरे यार विनीत, एक आयडीया आहे. ‘मंडोला सिनेमा’ मध्ये ‘किस्मत का खेल’ पिक्चर लागलाय! जाउया का? त्यात दोन सुपरस्टार एकत्र आलेत! - रोहन कुमार आणि अमित श्रीवास्तव. अमितजींनी यात वडिलांची भूमिका केली आहे! आणि रोहन कुमार मुलगा आहे.”

सगळयांना आयडीया पसंत पडली. अजून त्यावेळेस दूरदर्शन हे एकमेव लोकप्रिय टीव्ही चॅनेल होते. अजून एक प्रायव्हेट चॅनेल होते पण दिवसातून चार तासच त्याचे प्रक्षेपण होते. व्हीसीआरचे सुद्धा प्रस्थ बरेच होते आणि इंटरनेटची अजून सुरुवात होती. पण तरीही मनोरंजनासाठी थिएटर मध्ये जाऊनच लोक सिनेमा बघत.

सोमा म्हणाला, “त्यात विनीतच्या आवडीची मस्त मस्त हिरीईन पण आहे ना यार! सुनीती पराडकर. काय झकास नाचते ती! मी पण फिदा आहे यार तिच्यावर!”

राजेश म्हणाला, “अरे असे फालतू सिनेमे काय बघतोस? किस्मत का खेल? ह्या! काय असणार आहे त्यात? हाणामारी, नाचगाणे अजून काय?”

विनीत म्हणाला, “ हा रे! मला पण वाटतंय जाऊ आणि बघू हा पिक्चर! मी ऐकलंय लय वेगळी स्टोरी आहे. परदेशात पण शूटिंग केली आहे. आणि खूप गर्दी आहे पिक्चरला! पिक्चर पाह्यलं की मग जाऊ सावरीमाळला!”

राजेश म्हणाला, “ठीक आहे! अमितजी आहेत म्हणून एकदा बघायला हरकत नाही. मसाला चित्रपट आहे पण वेगळा आहे तर मग चला! आटपा मग लवकर! ढकला पोटात अन्न पटापट अन सुटा!”

चौघेजण तिकीट काढून थिएटरमध्ये बसले. लाईट बंद झाले. पिक्चर सुरु झाला.

पिक्चरची कथा थोडक्यात अशी होती-

"एका शहरातला १५ वर्षांचा मुलगा (रोहन कुमार) एका कार्यक्रमांचं तिकीट मोफत जिंकल्यामुळे कंपनीमार्फत त्याच्या वडिलांसह (अमित श्रीवास्तव) परदेशात जातो. तो कार्यक्रम बघून आणि फिरून झाल्यानंतर मुलगा वडिलांचे लक्ष नसतांना त्याच्या धुंदीत एका ट्रेन स्टेशन वरच राहून जातो. वडील सहज फेरफटका मारायला पुढे जाऊन परत येतात तर तो मुलगा तिथे नसतो. तो मुलगा एका आंतरराष्ट्रीय स्मगलर्स च्या टोळीच्या तावडीत योगायोगाने सापडतो. त्यानंतर त्याचा एक चित्तथरारक प्रवास सुरु होतो - अचानक एका अशा जगाशी त्याची ओळख होते ज्या जगाचा त्याने आपल्या आयुष्यात कधी विचार सुद्धा केला नसता. मग आणखी एका योगायोगाच्या घटनेत त्याचेकडून टोळीतल्या एकाचा खून होतो आणि तो तेथून निसटतो. मग गुंड त्याचे मागे लागतात.. इकडे त्याचे वडील घाबरून जातात. पोलिसांत तक्रार करतात. योगायोगाने पोलीस अधिकारी भारतीय असतो, अनेक दिवस जाऊनही काहीच थांगपत्ता न लागल्याने ते शेवटी स्वत:च जीव धोक्यात घालून मुलाला शोधायचे ठरवतात. त्यासाठी लागणारी विसा पासपोर्टची सगळी मदत तो पोलीस अधिकारी करतो. मुलगा सापडत नाही! भारतात परत आल्यानंतर दोन वर्षांनी एका विचित्र प्रसंगात त्यांची आपल्या मुलाशी भारतात भेट होते पण तो पार बदललेला असतो...."

बंडू आणि सोमा चित्रपट बघण्यात गुंतले असताना मध्येच विनीत आणि राजेश उठून निघून गेले होते. त्याना प्रथम वाटलं की गाणे बिणे आवडले नसेल म्हणून बाहेर गेले असतील पण बराच वेळ ते बाहेर होते मग पुन्हा मध्ये आले.

चित्रपट सुटल्यावर -

"अरे काय चाललं होतं तुमचं दोघांचं आत बाहेर आत बाहेर? सुनीती पराडकर चा डान्स आवडला नाही का ह्या खेपेला??"

"आरे! त्या फटाकडी सुनीतीची ऐसी की तैसी रे! अरे इथे चोरी झालीय मोठी चोरी!"

"चोरी, कसली चोरी?"

"आपल्या राजेशच्या कादंबरीची चोरी झालीय. या पिक्चरची स्टोरी राजेशची आहे! एक वर्षांपूर्वी लिहिलेली. दिवाळी अंकात पाठवली होती पण दिवाळी अंकवाले गायब झाले आणि आता अचानक ह्या पिक्चरची कथा सेम टू सेम तीच! फक्त देश आणि परदेश एवढा फरक आहे बास!"

"अरे? असे कसे शक्य आहे?"

"शक्य झाले आहे. राजेश घरी जाऊन त्याची कथा दाखवेल आपल्याला! चला!"

राजेश आश्चर्य, संताप आणि निराशा अशा तिन्ही भावनांनी भारला गेला होता आणि नीट बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हता.

"आपण आपली ट्रिप कॅन्सल करूया. घरी जाऊया!", विनितने सल्ला दिला.

पण राजेशने झाले ते गेले असे समजून आणि ट्रिप एन्जॉय करूया असे सांगून त्यावर जास्त चर्चा टाळली.

ते अचानक परत घरी आले असते तर सगळीकडे गवगवा झाला असता. राजेशला ह्या गोष्टीची जास्त वाच्यता नको होती. त्याला आता स्वतःची लेखनाची पत कळली होती. त्याचे लेखन चित्रपट बनवण्यासाठी सहज योग्य होते आणि विशेष म्हणजे त्याच्या पहिल्याच कथेवर पिक्चर हिट होत होता.

चित्रपटाच्या सुरुवातीला नावे येत असताना पटकथा, संवाद, कथा लेखक कोण कोण आहे हे दिले नव्हते त्याऐवजी स्टोरी, स्क्रीनप्ले, डायलॉग अँड डिरेक्शन बाय – “के. के. सुमन” असे लिहिले होते.

के. के. सुमन हा सुमार माणूस इतक्या सगळ्या आघाड्या सांभाळण्याएवढा हुशार नक्कीच नव्हता. पण मग करायचे काय? ती कथा राजेशची आहे हे सिद्ध कसे होणार होते? जे घडले ते सगळे अकल्पित होते. अनाकलनीय होते. के. के. सुमन सारख्या प्रथितयश डायरेक्टवर आरोप केले असते तर लोकांनी राजेशला वेड्यात काढले असते. मुळात ती कथा त्यांचेपर्यंत पोहोचलीच कशी? विचार करून करून त्याचे डोके भणाणून गेले होते. पण आता माघार नाही. जोपर्यंत के. के. सुमनचा छडा लागत नाही, त्याचा बदला जोपर्यंत घेत नाही तोपर्यंत राजेशच्या मनाला शांती लाभणार नव्हती. ह्या घटनेने त्याला ती कथा कपाटातून बाहेर काढायला भाग पाडली. त्या कथेच्या फैलाचा रंग लालसर होता. फैलाकडे बघतांनाराजेश म्हणाला, “खारकातेला माफ केले, आता के के सुमनला माफी नाही! नक्कीच नाही! आणि फक्त के के ला पकडून मी थांबणार नाही तर अशा अनेक कथा चोऱ्या उघडकीस आणणार!”

त्यानंतर राजेश एका ध्येयाने पछाडल्यासारखा फिल्म जर्नालिझमचा डिप्लोमा कोर्स केला ज्याद्वारे त्याला फिल्म क्षेत्राशी जोडलेले राहाता येईल. आईचेही त्याने काहीएक ऐकले नाही! नंतर मग स्क्रिप्ट लेखनाचा डिप्लोमा केला. जळी स्थळी काष्ठी पाषाणी त्याला आता त्याची चोरालेली कथा आठवू लागली आणि मनात एकाच ध्यास होता – चित्रपट आणि टीव्ही क्षेत्रात लेखनाचे करियर!! आता मागे वळून बघायचे नाही! प्रथम जिथे ब्रेक मिळेल तेथे! टीव्ही किंवा चित्रपट कुठेही! पण जायचे म्हणजे जायचे! मला कुणीही रोखू शकणार नाही! हळूहळू त्याला मार्ग सापडू लागले. दिशा मिळू लागली.

एके दिवशी त्याला विनितकडून एक आनंदाची बातमी कळली. विनितच्या एका दूरच्या काकांच्या ओळखीने त्याला टीव्ही वरच्या एका सिरियलच्या काही एपिसोड्सचे स्क्रिप्ट लिहिण्याचा चान्स मिळाला. त्या संधीचे त्याने सोने केले आणि त्या काकांच्या हाताखाली त्यांना स्क्रिप्ट लिहायला मदत केली. त्यांचेकडून खूप काही त्याला शिकायला मिळाले. सोबतच तो वर्तमानपत्रांत चित्रपटविषयक लिहू लागला. चित्रपटविषयक मासिकांकडून त्याला मराठी टीव्ही जगतातील कलाकारांचे इंटरव्ह्यू घेण्याची संधी मिळू लागली. त्याद्वारे थोडी प्रसिद्धी मिळाल्यानंतर मग काही प्रकाशन संस्थांनी त्याच्या काही कथा छापल्या.

सुरुवातीला त्याच्या आईने त्याच्या या करियरला विरोध करायचा प्रयत्न केला खरा पण त्याच्या भयंकर ध्यासाकडे आणि त्याने एकदाच तिच्याकडे रोखून बघितलेल्या नजरेकडे बघून तिने त्याला नंतर विरोध केला नाही.

दरम्यान त्याने मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषेत काही कथा आणि लघू कादंबऱ्या लिहिल्या. त्या चांगल्या खपल्या. काळ पुढे सरकत गेला. इंटरनेटवर लोक वाचन करू लागले. न्यूजपेपर ऑनलाइन झाले. ब्लॉग्ज आले. राजेशने स्वतःचा ब्लॉग लाँच केला. त्याची वाचकसंख्या वाढली. मग तो बोरीवलीला येऊन राहू लागला कारण तो आता बऱ्यापैकी स्क्रिप्ट लेखन क्षेत्रात स्थिरावला होता. त्याला हवे तसे करियर मिळाले आणि बऱ्यापैकी प्रसिद्धी सुद्धा मिळाली. पण त्याच्या लिखाणाची चोरी करणाऱ्यांचा सूड घायची भावना त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. पण अजून तरी त्याला टीव्हीवरील एखाद्या चर्चेत किंवा एखाद्या कार्यक्रमात किंवा हिंदी चित्रपटांची संबंधित कुठेही रत्नाकर रोमदाडे नावाचा माणूस वाचनात किंवा बघण्यात येत नव्हता! आणि तो केके सुमन? त्याचा आणि त्या दिवाळी अंक कार्यालयातील रत्नाकर रोमदाडे चा काही संबंध असेल का? असलाच पाहिजे!

त्याबद्दल राजेश विचार करू लागला:

“आता मी मुंबईत आहेच! तर मग विनीतच्या काकांच्या मदतीने के के सुमनचा माग काढावा का? पण त्याने काय होईल? त्याला शोधले तरी मी सरळ त्याचेवर माझ्या कथा चोरीचा आरोप केला तर कोण विश्वास ठेवेल माझ्यावर? आणि त्यानेच माझ्यावर उलटा चोरीचा आरोप केला तर? कारण चित्रपट पाहून मग मी त्याप्रमाणे थोडा बदल करून कथा लिहिली असा आरोप त्याने केला तर? के के प्रसिद्ध आहे आणि मी? दिवाळी अंक कार्यालय आणि के के सुमन यांच्यात नेमके काय आणि कसे कनेक्शन आहे? आणि ते मी सिद्ध कसे करणार? माझ्याकड ठोस पुरावा आहे का?”

“माझी कादंबरी आणि चित्रपटाची कथा यात बराच फरक आहे, आणि शेवट पण थोडा बदललेला आहे! मी तर अजून फक्त या इंडस्ट्रीत सुरुवात करतोय. ते पण लेखक म्हणून! कलाकार म्हणून नाही! आणि लेखकांची स्थिती आणि महत्व काय आहे आज बॉलीवूड मध्ये? शून्य! माझ्यावर कोण विश्वास ठेवेल?”

“मी तर अजून कुठे मराठीत सुरुवात करतोय! ती पण कलाकार नाही तर लेखक म्हणून! असे हजारो मराठी ऑनलाईन आणि ऑफलाईन लेखक कार्यरत आहेत. लिहित आहेत. अनेक लेखक असे दिग्दर्शकांवर कथाचोरीचे आरोप करतात. त्यापैकी काही खरे आणि काही खोटे असू शकतात. त्यापैकीच मी एक खोटा म्हणून गणलो गेलो तर? शेवटी ही सगळी बॉलीवूडमधील मंडळी प्रतिष्ठित आणि प्रस्थापित आहेत. आणि करीयरच्या सुरुवातीलाच मी नाहक कोणत्या वादात अडकून बदनाम झालो तर? त्यामुळे बदला घेण्याची ही वेळ मला योग्य वाटत नाही! आणि पूर्वी माझ्या दोन कथांची चोरी झाली असली तरी मला इतर ठिकाणी चांगली संधी मिळतेय आणि माझी लेखक म्हणून हळूहळू ओळख निर्माण होते आहेच! तेव्हा मला घाई करायला नको. याचा अर्थ असा नाही की मी स्वस्थ बसून राहीन. नाही! मी फक्त योग्य संधीची मी वाट बघेन आणि संधी मिळेलच. नाही मिळाली तर मी निर्माण करेल. पण आता ती वेळ नाही!” असे म्हणून त्याने एकदा त्या लाल फाईलकडे पाहिले.

दरम्यान आईने सुनंदासाठी त्याचेकडे फिल्डिंग लावणे सुरू केले होते. गोडंबे काकांकडून दबाव वाढत होता. त्याच्या लेखनाच्या ध्यासापायी त्याचे लग्नाबाबतीतले विचार मागे पडले. अशातच "चार थापडा सासूच्या" च्या निमित्ताने सुप्रियाशी ओळख झाली. तिच्याबरोबर फिरणे हिरणे सुरु झाले. काहीवेळेस राजेशला वाटून जायचे ही सुप्रिया हीच आपल्यासाठी आयुष्याची योग्य जोडीदार आहे पण तो स्वतःला सावरायचा कारण त्याच्या जीवनाचे ध्येय वेगळे होते आणि विशेष म्हणजे आईचा सुनंदा सुनंदा असा सततचा जयघोष त्याला व्यथित आणि चिंतीत करत होता. दरम्यान के. के. सुमन चे फारसे चित्रपट आले नाहीत. नंतर तो प्रोड्युसर बनला....

◬◬◬◬

# प्रकरण 19

बस ड्राइवरने अचानक जोरात ब्रेक दाबल्याने राजेशची तंद्री भंग पावली. बसमध्ये बाजूच्या सीटवरचा रा. म. मालवणकर यांचे "जीवनाचे शिल्पवृक्ष" हे पुस्तक वाचणारा आधीच्या स्टँडवर केव्हाच उतरून गेला होता. धर्मापूरला जाऊन तो जे करणार होता त्याद्वारे त्याच्या प्रतिशोधाच्या शोधार्थ एक पाऊल तो टाकणार होता.

धर्मापूरच्या "धर्म वार्ता" या वृत्तपत्र कार्यालयात तो पोहोचला. तेथील संपादक त्याचे मित्रच झाले होते. धर्मापूरच्या समस्यांवर संवादात्मक पद्धतीने लिखाणातून भाष्य करून त्याने जनतेच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली होती. त्यानंतर कालांतराने त्याने चित्रपट परीक्षण लिहायला सुरुवात केली होती.

के. के. सुमनचे चित्रपट आले की त्याबद्दल तो मानधन न घेता आवर्जून आणि हटकून परीक्षण लिहायचा आणि त्याच्या चित्रपटाला फक्त अर्धा किंवा एकच स्टार रेटिंग द्यायचा. त्याच्या ब्लॉगवर सुद्धा त्याने के के सुमनच्या चित्रपटांची लिहून लिहून वाट लावली होती.

त्या वृत्तपत्राच्या संपादकाना भेटून त्याने खाली दिलेली विशेष जाहिरात छापायला दिली आणि त्यांचा निरोप घेऊन तो निघाला. संपादकांनी ती जाहिरात तो म्हणेल तितके दिवस आणि तेही विनामूल्य छापायचे ठरवले. त्यामागची राजेशची काय भावना आणि उद्देश्य आहे हे पूर्णपणे नाही तरी थोडीफार कल्पना त्याना आली होती. राजेशला बेस्ट लक देऊन त्यांनी गप्पा मारल्या आणि त्याला निरोप दिला. ते संपादक कलेची कदर करणारे होते.

ती जाहिरात अशी होती: "संसार संभाळून पार्ट टाईम मनोरंजन क्षेत्रात काम करू इच्छिणारे हौशी छंदिष्ट, सृजनशील, आणि कलाप्रेमींनी (स्त्री पुरुष) यांनी खालील पत्त्यावर भेटावे. एका अभिनव मोहिमेसाठी काम करण्याची सुवर्णसंधी! मोबदल्यात जास्त पैसे मिळणार नाहीत (आधीच सांगून ठेवतो) पण कलेच्या अभिव्यक्तीचे मानसिक समाधान जरूर मिळेल आणि आपण एका महत्वाच्या

मोहिमेत आजीवन सहभागी झालो आहोत याचा गर्व आणि अभिमान वाटल्याशिवाय रहाणार नाही. तुमच्यात कोणतीही कला असो - लेखनकला, चित्रकला, संवादकला, टीका करण्याचे कसब, वाईट गोष्टी चांगल्या कामांसाठी वापरण्याची कला या प्रकारे काहीही असो, तुमचे येथे स्वागत आहे! पुढे नंतर मनायोग्य व्यासपीठ मिळू शकते त्यानंतर मात्र तुम्हाला अमाप पैसा आणि प्रसिद्धी मिळण्याची शक्यता नाकारता नाही! मला प्रथम कॉल करा आणि मग भेटायची वेळ ठरवू! तुमचा बायोडटा माझ्या ईमेल आयडीवर पाठवा. मोहिमेसाठी तुमच्या सृजनशील कल्पनांच्या प्रतीक्षेत! तुम्ही माझी मोहीम यशस्वी करा, मी तुमची स्वप्ने पूर्ण करीन! प्रॉमिस!”

त्यानंतर चार पाच दिवस असेच गेले. गोडंबे काका आणि सुनंदा यांचे येणेसुद्धा लांबले. तसा त्याच्या आईला फोन आला होता. तेवढा सुटकेचा निश्वास राजेशने टाकला. जाहिरात देऊन आठ दिवस झाले होते पण अजून एकही फोन आला नव्हता. दोन कॉल्स आले खरे पण राजेशने उचलले नाहीत. ते जितेंद्र करमरकरचे कॉल्स होते. पण जितेंद्रने सहज कॉल केला असेल म्हणून राजेशने दुर्लक्ष केले. जितेंद्रनेही पुन्हा त्याला कॉल केला नाही. राजेशला कल्पना नव्हती की सुप्रियाने ती सिरीयल सोडली. कळले असते तरी तो तिला थांबवू शकला असता का? त्याचा कॉल तिने घेतला असता का?

बरोबर दहा दिवसानंतर तो फोन आला, “तुमची जाहिरात वाचली मी. तुम्हाला भेटायचे आहे. कुठे भेटायचे?”

ह्या एका बहुप्रतीक्षित फोन कॉल नंतर मग एकसारखे फोन कॉल्स सुरु झाले. साधारण दहा जणांचा कॉल आल्यानंतर त्याने सगळयांच्या सोयीनुसार एक दिवस आणि वेळ ठरवली. भेटायचे ठिकाण राजेशने निवडले होते ते म्हणजे - शाळेतली टीचर्स रूम, जेथे त्याने लिहिलेले लहानपणी त्याचे नाटक त्याच्या शिक्षकांकडे सुपूर्त केले होते. त्याला मिळालेल्या पहिल्या विश्वासघाताची खूण होती ते ठिकाण म्हणजे! शाळेतल्या ओळखीमुळे त्याला ती रूम शाळा सुटल्यानंतर पर्सनल वापरासाठी मिळाली कारण आज सकाळची शाळा होती. मात्र तेथे आता टीचर्स रूम नसून स्पोर्ट्स साहित्य ठेवण्याची ती खोली बनली होती आणि तिला बाहेरून वेगळा प्रवेश होता. त्याचे नाटक चोरून स्वतःच्या नावावर खपवणारे ते शिक्षक मात्र आता त्या शाळेत नव्हते. त्यांची बदली झाल्याचे त्याने नंतर ऐकले होते. मात्र कोणत्या गावाला हे त्याला कळले नाही.

संध्याकाळी चार वाजेपासून तर सात वाजेपर्यंत त्यांच्यातील चर्चा चालली. राजेशचे समजावून सांगण्याचे कसब जबरदस्त होते. कथेत तो जशी संवादातून योग्य शब्दयोजना करीत असे तसेच प्रत्यक्ष जीवनात संवाद कौशल्यात सुद्धा तो योग्य शब्दयोजना करे आणि समोरच्यावर प्रभाव टाके. त्याला अपेक्षित असलेले असे ते सगळे जण होते. त्यापैकी चारजण (दोन पुरुष दोन महिला) विवाहित तर इतर सहाजण (सगळे पुरुष) अविवाहित होते. त्यांना राजेशने व्यवस्थित मोहीम समजावून सांगितली. काहींना सुरुवातीला शंका आली पण नंतर त्यांना विश्वास बसला.

राजेशने मोहिमेचे सगळेच पत्ते सुरुवातीला त्यांच्यासमोर उघड केले नाहीत. त्या टीम मधला एक लीडर त्याने नेमला - सारंग सोमय्या.

रात्रीचे डिनर राजेशतर्फे हॉटेलमध्ये केल्यावर ते सगळे आपापल्या गावी निघाले. घरी गेल्यावर घरच्यांना तोंड कसे द्यायचे तो त्यांचा प्रश्न होता. मोहिमेतले किती आणि काय कोणाकोणाला सांगायचे किंवा नाही याबद्दल राजेशने नियम आखून दिले होते. ते सगळ्यांना पाळायचे होते. सगळ्यांचे मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी राजेशने घेतले. काहींचा बायोडाटा आधीच राजेशला ईमेलने मिळाला होता, ज्यांचा मिळाला नाही त्यांचा त्याने आता मागून घेतला किंवा नंतर इमेलवर पाठवायला सांगितला. प्रत्येकाचे मनोरंजन क्षेत्रातील पॅशन, इच्छा आणि स्वप्न काय काय आहेत ते त्याने जाणून घेतले. सगळे लिहून घेतले. आता ते सगळेजण वेळोवेळी राजेशच्या आदेशाची वाट बघणार होते. मुद्रेवर एक विजयी भाव ठेऊन तो घरी परतला. कामानिमित्त बाहेर गेलो होतो एवढेच त्याने आईला सांगितले होते. कारण सांगितले असते तरी तिला त्यातले जास्त काही कळलेच नसते.

त्यानंतर दोन दिवस गेले आणि गोडंबे काकांचा शेतातील विहिरीत पडून मृत्यू झाल्याचा राजेशच्या आईला फोन आला. घडलेली घटना अकस्मात आणि दुर्दैवी होती. कुठलाही घातपात नव्हता. जे घडले ते सगळे अचानक योगायोगाने घडले याबद्दल सगळीकडे हळहळ व्यक्त होत होती. राजेश आणि त्याची आई तातडीने 'धोरणा' या गावाला गेले. सुनंदाला भाऊ नव्हता. सुनंदा पुरती कोलमडली होती. शोकाकुल वातावरणात आठ दिवस गेले. सगळे अंतिम संस्कार पार पडल्यानंतर गोडंबे काकूंनी राजेशच्या आईला वचनाची आठवण करून दिली. राजेशच्या आईने सुनंदासाठी फिल्डिंग रचलेली होती पण ही एक घटना राजेशला अचानक क्लीन बोल्ड करून गेली. महिनाभरातच साखरपुडा आणि लग्न करायचे ठरले. तशी गोडंबे काकांचीच इच्छा होती म्हणे! सुनंदाच्या वडिलांचा बंगला आणि इतर बरीच संपत्ती तिच्या आणि राजेशच्या नावावर झाली होती. राजेशच्या आईचे सुनंदाचा तगादा मागे लावण्याचे हे सुद्धा एक सबळ कारण होते.

लहानपणापासून ओळखत असलेल्या परंतु एकमेकांचा "त्या" अर्थाने पूर्ण परिचय नसलेल्या अशा दोन जीवांचे लग्न झाले. राजेशचा मुक्काम दोन महिने लांबला. पहिली रात्र काय आणि दुसरी तिसरी काय त्या दोघांनी अजून अनुभवलीच नव्हती कारण सुनंदा सतत वडिलांच्या जाण्याच्या दु:खात बुडालेली आणि दडपणाखाली होती. लग्नानंतरचे बहुतेक दिवस ती माहेरीच होती. आता शहरात गेल्यावरच जो काय त्यांचा संसार होता तो सुरु होणार होता! काही नाती जपली जातात तर काही जपावी लागतात, तसेच काही नाती जोडावी लागतात तर काही जोडली जातात. आता जे जोडलं गेलेलं नातं टिकेल की टिकवावं लागेल हे काळच ठरवणार होता!!

# प्रकरण 20

राजेश मुंबईला जायला निघाला तेव्हा सुनंदा सुरुवातीला राजेशच्या आईसोबत गावातच थांबली कारण राजेशने बोरीवलीची रूम सोडून गोरेगांवला फिल्म सिटी जवळच घर शोधण्याचा निर्णय घेतला. सगळी व्यवस्था लावल्यानंतर तो मग तिला पुन्हा घ्यायला येणार होता. दरम्यान त्याने कोणतेही मेसेज चेक केले नाहीत कारण गावाकडे घडले ते सगळे त्याच्या मनाविरुद्ध होत होते आणि त्याचे मन त्याच्या ताब्यात नसल्यासारखे होते. त्याने जितेंद्रला तसेच इतर ज्यांच्यासाठी तो लिखाण करत होता त्यानाही थोडक्यात कॉल करून त्याला परत यायला उशीर होईल असे कळवले, मात्र लग्न झाल्याचे त्याने अजून कुणाला सांगितले नव्हते. नंतर त्याने एके दिवशी मुंबईची ट्रेन पकडली आणि निघाला - पुन्हा स्वप्ननगरी मुंबईत!

राजेश स्टेशनवर उतरला तेव्हा मुंबई तीच होती. तीच लोकलची जीवघेणी गर्दी आणि तेच ते एकामागून एक येणारे स्टेशन्स. समुद्रही तोच आणि तसाच ! कधी शांत तर कधी खवळलेला! दिवसरात्र धावणारे रस्ते. सगळे तेच होते. बदलले होते फक्त राजेशने आयुष्य! मुंबई सोडतांना सुप्रियाशी जाणूनबुजून केलेली ताटातूट आणि मग येतांना नको असलेल्या एका सोबतीचे ओझे. प्रत्यक्ष ती सोबत सोबतीला नव्हती पण मनावर असलेले ओझे होतेच!

राजेश चे दुसरे मन त्याला म्हणू लागले , "नाही राजेश! सुनंदाला तू हे जे ओझे मानतोस, ते चूक आहे. तू तुझी संमती दिली आहेस लग्नाला. मग तिला दोष देता कामा नये. काही गोष्टी आयुष्यात मनासारख्या होतात आणि काही मनासारख्या होत नाहीत. तू तर लेखक आहेस. तुला पूर्ण शक्य असूनही तुझ्या कथेतल्या पात्रांना तू त्यांच्या आणि तुझ्या मनासारखं भाग्य देतोस का? म्हणजे कल्पनेत सुद्धा तू तसे करत नाहीस मग हे खरे वास्तविक जग तर कल्पनेपेक्षा जास्त निर्दयी आहे."

बोरिवलीला रूमवर गेल्यावर दोन दिवस उदासवाणे गेले. मधूनच सुप्रियाची आठवण त्याच्या मन:पटलावरून तरळून गेली. ती कामानिमित्ताने सतत सोबत आणि जवळ होती. ती भेटायची तेव्हा त्याला असे काही प्रकर्षाने जाणवले नव्हते, पण आता ती अनेक दिवस भेटली नाही तेव्हा मात्र तीची

आठवण येण्याचे प्रमाण वाढले. विशेषत: ब्रेकप झाल्यानंतर प्रथमच तो आतां मुंबईत आला होता त्यामुळे सुप्रियाची आठवण तीव्र व्हायला लागली.

तेव्हा राजेशने स्वत:ला बजावले, “नाही, राजेश. तुझे आता लग्न झाले आहे. सोड ते विचार!”

बोरिवलीची रूम सोडण्याआधी त्याने प्रथम जितेंद्र करमरकरची भेट घायचे ठरवले, मग इतर काही जणांना ज्यांच्यासाठी सुद्धा तो लिहित होता त्यांना तो भेटणार होता. पण जितेंद्र आठ दिवसांसाठी सुट्टीवर गेला होता. रोशन रोकडे पण भेटला नाही. मग आधी गोरेगांवला रूमची सेटलमेंट करून मगच आता सगळयांना भेटण्याचे त्याने ठरवले.

चार दिवसांत रूम शोधून झाली. पुढच्या काही दिवसांत सामान शिफ्ट झाला. त्याचे लेखन त्याने त्याच्या रेग्युलर सिरियल्सच्या निर्मात्यांकडे अगोदरच पाठवून ठेवल्याने ते लोक तसे निश्चिन्त होते. पण आता पुढच्या लेखनासाठी मात्र जास्त दिरंगाई झालेलीही चालणार नव्हती.

दरम्यान त्याच्या सिरियलच्या कामाने प्रभावित होऊन एका मराठी मालिका निर्मात्याकडून त्याला कथा, पटकथा आणि संवाद लेखनाची ऑफर आली पण ती मालिकेसाठी नसून मराठी चित्रपटासाठी होती. तो निर्माता सिरीयलनंतर आता आपले नशीब चित्रपट निर्मितीत आजमावून बघणार होता. त्यांनी चित्रपटाच्या विषयाबद्दल राजेशला कल्पना दिली होती आणि सविस्तर चर्चेसाठी प्रत्यक्ष भेटायला बोलावले होते. राजेशच्या आनंदाला पारावार राहिला नाही. अधून मधून घरी कॉल करून तो आई आणि सुनंदाशी जुजबी बोलत होता. सुनंदाला मुंबईला आणायला थोडा उशीरच होणार होता. कारण आधी या निर्मात्याला भेटणे आवश्यक होते कारण अशी संधी पुन्हा येणार नव्हती.

निर्मात्याचे नाव होते - समीरण देवधर! आतापर्यंत चार यशस्वी मालिका टीव्ही जगताला देणारे! चारही मालिकांवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केलं होतं. टिपिकल गल्लाभरू सासू सुनेच्या ड्रामेबाजीपासून ते नेहमी दूरच राहिले होते. त्यांच्या चारही मालिका अगदी वेगवेगळया विषयांवर आधारित होत्या. त्यांच्या सगळयात पहिल्या मालिकेसाठी राजेशने संवाद लेखन केले होते.

समीरणने त्याला घरी भेटायला बोलावले होते. प्रथमच तो समीरणला घरी भेटायला जाणार होता. समीरण आरे रोड जवळ, आरे गार्डन रेस्टॉरंट जवळ असलेल्या "सुरभी" हौसिंग सोसायटीत रहात होता. आसपास अनेक मराठी आणि गुजराती व्यावसायिक रहात असत. त्याच्या घरी पोहोचतांना राजेशच्या मनात सारखी एक कल्पना घोळत होती. समीरणला ती कल्पना मान्य होईल की नाही याबद्दल तो साशंक होता. पण त्याला पटवून सांगण्याची त्याने पूर्णपणे पूर्वतयारी केली होती. समीरणने मान्य केले तर दोघांचा फायदा होणार होता आणि....?

बेल वाजली. समीरण घरी एकटा होता. त्याची पत्नी जॉबनिमित्ताने बाहेर आणि मुलगा शाळेत गेलेला होता.

दरवाजा उघडत समीरण म्हणाला, "अरे ये ये राजेश. काय म्हणतोस? ये बैस!"

राजेश एका सोफ्यावर बसला. टीव्ही सुरु होता. थोड्या वेळाने किचन मधून दोन कॉफी कप हातात घेऊन समोरच्या सोफ्यावर समीरण बसला.

एक कप राजेशला देत समीरण म्हणाला, "घे कॉफी! बोल राजेश. कसा आहेस?"

राजेश कॉफी घेत कम्फर्टेबल झाला आणि म्हणाला, "हो समीरण! आणि मी ठीक आहे. फार कमी वेळेत बराच काही घडून गेलंय माझ्या आयुष्यात!

समीरण, "म्हणजे? कसे? काय घडले ते?"

राजेश, "लग्न करून आलोय मी गावाकडून येतांना!"

समीरण कॉफी कप बाजूला ठेवत म्हणाला, "ओह माय गॉड! इट्स अ गुड न्यूज! अभिनंदन!", आणि त्याने हात पुढे केला. राजेशने अभिनंदन स्वीकारले व म्हणाला, "धन्यवाद!"

मग जुजबी विचारपूस झाल्यावर समीरण मूळ मुद्द्यावर आला.

समीरण, "हे बघ राजेश. आज मराठी इंडस्ट्रीत नवनवीन विषय हाताळले जात आहेत. हरहुन्नरी कलाकार, लेखक दिग्दर्शक उदयाला येत आहेत. विशेष म्हणजे प्रेक्षकांचा आश्रय जो कधी काळी मराठी चित्रपटांसाठी दुर्मिळ होता तोही आता मिळतोय. मल्टीप्लेक्स मध्येही मराठी चित्रपट हाउसफुल होत आहेत. अशा उमेदीच्या काळात अनेक निर्मात्यांना आणि दिग्दर्शकाना हुरूप न आला तर नवल!"

राजेश, “होय समीरण! बरोबर आहे तुमचे! भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके आज असते तर त्यांना खचितच खूप आनंद झाला असता. मध्यंतरी मराठी चित्रपट हळद, कुंकू, सासू सून, घरगुती भावनिक विषय अशा प्रकारच्या एकसूरी साच्यात अडकला होता. त्यातून आता तो समर्थपणे बाहेर पडलाय!”

समीरण, “आता कसे बरोबर बोललास! आज मराठी चित्रपट सगळया प्रकारचे आणि अगदी आजपर्यंत कधीही कुणीही स्पर्श न केलेल्या विषयांवर सुद्धा समर्थपणे चित्रपट काढतोय. अगदी अलीकडील काळापर्यंत मराठी टीव्ही जगतात सुद्धा फारसे आश्वासक चित्र नव्हते. पण आज इतके मराठी चॅनेल निघाले आहेत आणि ते यशस्वीपणे वाटचाल करत आहेत”

राजेश, “हो ना. खरे आहे! पण अजूनही काही मराठी सिरीयल मात्र सासू सुनेच्या घरगुती दळणात अडकून पडलीय! उलट पूर्वी दूरदर्शन वर २३ भागांच्या मालिकेचा ट्रेंड होता तो बरा होता. त्यावेळेस पण मालिकेत विविध विषय हाताळले जात असत! पण असे जरी असले तरी या इंडस्ट्रीत लेखक आणि पटकथा लेखक म्हणून टिकून राहाण्यासाठी अशा प्रकारच्या काही मालिकांसाठी मीही तेच करतोय. तेच ते सासू सुनेचे दळण! पण तसं पाहिलं तर तेही लिहिणं म्हणजे वाटतं तेवढं सोप काम नाहीये. रोज रोज प्रेक्षकांना कथेमध्ये काहीतरी वेगळं देऊन सिरीयलच्या पुढच्या भागाकरता गुंतवून ठेवणं तितकसं सोपं काम नाही. मोठ्या प्रमाणावर ज्या प्रकारच्या सिरीयल बनतात त्यांच्यासाठी लेखन करणं आवश्यक आहे, त्याशिवाय आमच्यासारख्या लेखकाचं पोट कसं भरणार?”

एव्हाना कॉफी संपली होती. समीरणने घरातील बाईला ताजा स्वादिष्ट स्वयंपाक बनवायच्या सुचना दिल्या.

समीरण हसत म्हणाला, “होय! तेही खरेच आहे. मलाही ते घरगुती विषयाचं जरा वावडंच आहे! बाकी काहीही असो पण पटकथा लेखनासोबतच तुझे संवाद लेखन फारच मस्त आहे बुवा! आपल्याला अगदी आवडलंय ते! आणि आता मी चित्रपट निर्मितीत उतरायचे म्हटल्यावर विषय तसे मुळीच नसणार आहेत. तर मला म्हणायचं आहे की माझेकडे दोन तीन विषय आहेत. दोन वर्षांच्या अंतरानंतर दोनेक चित्रपट काढायचा माझा विचार आहे. विषय मी सुचवणार. निर्मिती मी करणार. दिग्दर्शन सुद्धा मीच करणार आणि कथा, पटकथा आणि संवाद लेखनाची धुरा तू सांभाळायची. त्याचबरोबर चित्रपटाचे काही हक्क आणि नफ्यात हिस्सा सुद्धा देईन म्हणतो ते!”

राजेश, “धन्यवाद माझ्यावर एवढा विश्वास टाकल्याबद्दल. मी नक्कीच माझं सृजनशील लेखन सर्वस्व यात ओतणार यात वाद नाही! आजकाल अजूनही बरेच नवोदित लेखक या फिल्म इंडस्ट्रीत

येण्यात धडपडत आहेत. बरेचदा त्यांच्या कथांची सपशेल चोरी होते आणि त्याचे क्रेडीट सुद्धा त्यांना दिले जात नाही! "

येतांना राजेशने मनात योजून ठेवलेली गोष्ट हळूहळू आता समीरण जवळ काढायची वेळ आली आहे हे राजेशच्या लक्षात आले.

समीरण, "होय अगदी खरे आहे. मराठीत सुद्धा हा प्रकार आहेच पण हिंदीत तर हे प्रकार फार वाढलेत. कायदे धाब्यावर बसवून काही लेखकांच्या कादंबऱ्या किंवा कथा संहिता डायरेक्टर लोक वाचतात, ऐकून घेतात, रिजेक्ट करतात आणि मग काही वर्षांनी त्यात थोडा फेरफार करून त्यावर चित्रपट काढतात आणि पुन्हा त्या मूळ लेखकांना धुडकावून लावत त्यांचे क्रेडीट स्वत:कडे घेतात!"

राजेश मनात म्हणाला, "समीरण अगदी मूळ मुद्द्यापर्यंत पोहोचलाय पण मी अजून माझ्यासोबत भूतकाळात घडलेले याला सांगणार नाही. त्याऐवजी मला भविष्यात काय करायचेय त्याबाबत एक पाऊल टाकायला समीरणची मला मदत घ्यायची आहे. वेळ आली की समीरणला त्याबद्दल सांगता येईलच!"

समीरण, "कसल्या विचारांत गढून गेलास राजेश?"

राजेश, "नाही समीरण! तू जे आता म्हणालास ते अगदी योग्य आहे त्यावरच मी विचार करत होतो. बरं मी काय म्हणतो की माझी एक विनंती आहे"

समीरण, "काय विनंती आहे तुझी?"

राजेश, "सांगू की नको असे होत आहे!"

समीरण, "अरे बिनधास्त सांग. मला तुझा जवळचा मित्र समजून बिनधास्त सांग!"

राजेश, " मला असे सुचवावेसे वाटते की समीरण तू चित्रपट हिंदीत बनव! किंवा मी म्हणेन की पहिली चित्रपट निर्मिती तू हिंदीत करावीस. तू सुचवलेल्या विषयांपैकी एक विषय हिंदीत नवीन आहे. तेव्हा हिंदीत चित्रपट बनव!"

समीरण आश्चर्याने म्हणाला, "अरे काय सांगतोस राजेश हे? तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती.."

राजेश, "तू मला मित्र मनात असशील तर मी असा सल्ला देईन की जरी तू मराठीत अनेक मालिका यशस्वीरीत्या हाताळल्या आहेस तरी पहिली चित्रपट निर्मिती हिंदीत करावीस असे मला वाटते. अनेक हिंदी चित्रपट निर्माते दिग्दर्शक हे मराठी आहेत. त्यांनी सकस आणि दर्जेदार कथा

असलेले हिट चित्रपट हिंदीत दिले आहेत. नंतर त्यांनी मराठीत सुद्धा यशस्वी चित्रपट निर्मिती केली आहे. आणि हिंदीतल्या काही चांगल्या लोकांशी तुझ्या ओळखी सुद्धा आहेत, त्या उपयोगी पडतील. आपण तुझ्या हिंदी चित्रपटात मराठी संगीतकराला आणी मराठी कलाकारांना संधी देऊ. त्यांना मोठं व्यासपीठ मिळेल. हिंदीत लोकांना आपण दाखवून देऊ की कथा चांगली आणि अभिनव असेल तर चित्रपट नक्की चालतो. त्याद्वारे सशक्त कथाकारांना आपण समोर आणू शकतो!"

समीरण बराच विचार करून म्हणाला, "हम्म! तुझा सल्ला आहे तसा मुद्द्याला धरूनच, पण मला थोडा वेळ दे! मी नक्की विचार करून सांगतो पण ...."

राजेश, "अगदी हवा तेवढा वेळ घे तू समीरण! शेवटी तुझा कोणताही निर्णय मला मान्य असेलच! मी लेखनासाठी सदैव तयार असेन!"

मग अवांतर गप्पा झाल्यानंतर जेवण तयार झाले होते. स्वादिष्ट जेवण खाल्ल्यानंतर समीरण कडून राजेश निघाला. त्याच्या मनात थोडी साशंकता होतीच की समीरण त्याचा हा प्रस्ताव स्वीकारेल की नाही त्याची! हरकत नाही पण अगदीच नकाराच्या भीतीपोटी प्रयत्नच न करण्यापेक्षा थोडा प्रयत्न त्याने करून बघितला होता. ही संधी तो स्वत: निर्माण करत होता. जर कदाचित संधीने हुलकावणी दिलीच तरी हरकत नव्हती. पुढे आणखी संधी नक्कीच येतील याबद्दल त्याला विश्वास होता. "नाहीतर मी संधी निर्माण करण्याचा पुन्हा प्रयत्न करेन!" राजेश मनात म्हणाला.

◻◻◻◻

# प्रकरण 21

काही दिवसांनी गोरेगांवच्या राजेशच्या रुमवर -

राजेश फोनवर बोलत होता -"जितेंद्र करमरकर साहेब कुठे गेला होतात? आम्ही आपली वाट बघत होतो. आतुरतेने!"

जितेंद्र - "वा वा वा! चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात ते हेच का? आपण गावाकडे गेलात आणि गायब झालात. कॉल केले होते तेव्हा काही उत्तर नाही मिळाले. इकडे काय काय संकटे आली आम्हाला, काही कानावरून हवा गेली की नाही अजून?"

राजेश - "संकटं? कसली संकटं? तुझ्यासारखा माणसावर संकटं येण्याआधीच ती स्वत:च घाबरून पळून जाणार! अन म्हणे संकटं आली!"

जितेंद्र - " आरे मित्रा! एक तर त्या तुमच्या सुप्रिया मॅडम सिरीया सोडून गेल्या आणि ...."

राजेश - "काय ? काय? काय बोललास? परत बोल एकदा? सुप्रियाने सिरीयल सोडली??"

जितेंद्र - "असा अंगावर पाल पडल्यासारखा काय दचकून बोलतो आहेस? जसे काही तुला माहितीच नाही?"

राजेश - "अरे नाही मित्रा! खरंच मला माहिती नाही. ए पण एक सांग! तू माझी खेचत तर नाही आहेस ना?"

जितेंद्र - "मित्रा! आता बास झाले. आता प्रत्यक्ष भेट, तेव्हाच बोलू. अनेक नवी कामे द्यायची आहेत तुला. त्याबद्द्ल सुद्धा सविस्तर बोलता येईल!"

फोन बंद झाल्यावर क्षणभर राजेशच्या पोटात धस्स झाले. सुप्रियाने सिरीयल सोडली? अशक्य!

ती तर म्हणाली होती की --

".... हे बघ राजेश. आपण एकाच क्षेत्रात आहोत. कामानिमित्त आपली भेट होतच राहाणार. सो लेट्स बी प्रोफेशनल! आपल्या वैयक्तिक गोष्टी कामाच्या आड येऊ द्यायच्या नाहीत. नाहीतर त्यामुळे दोघांचेही नुकसान होईल...."

राजेश विचार करता करता अस्वस्थ झाला. अचानक त्याला सुप्रियाबरोबरचे सोबत घालवलेले क्षण भले ते कमी काळाकरता का होईना ते आठवायला लागले.

आणि ती सोबत होती तेव्हा मात्र ....?

राजेशला तीला भेटावेसे वाटायला लागले. कुठे असेल ती? फोन करु का? होय! फोनच करतो तीला आता!

सुप्रियाला फोन करताच, "हा नंबर स्विच्ड ऑफ म्हणजेच बंद आहे." असा संदेश एक मंजूळ स्त्री आवाज राजेशला सांगू लागला.

"सुप्रियाने नंबर बदलला असावा बहुतेक!" राजेशचे हृदय त्याला सुचवू लागले.

"राजेश! अरे तू आता ब्रेकअप केले आहेस! आता तूला काय अधिकार आहे तीला कॉल करण्याचा?" राजेशची बुद्धी त्याला सांगू लागली.

"पण ती असे कसे करू शकते? मला तिला एकदा भेटायलाच हवे !" पुन्हा हृदय म्हणू लागले.

दोघांचे द्वंद्व असतांना राजेशच्या मोबाईलची रिंगटोन वाजली.

“सुनंदा कॉलिंग ... “ अशी अक्षरे स्क्रीन वर उमटू लागली.

“हा सुनंदा ब.. ब.. बोल!”

“तुमचा स्वर असा चिंतीत कसा वाटतो आहे? काही काळजी आहे का? मला सांगा?”

“न .. न .. नाही! सगळं ठीक आहे. व्यवस्थित आहे. पुढच्या आठवड्यात तुला आणि आईला घ्यायला येतोय मी!”

“मला किती किती आनंद झालाय म्हणून सांगू?,” तिच्या स्वरातून आनंद ओसंडून वाहात होता.

जुजबी बोलून त्याने फोन ठेवला. सुप्रियाच्या बातमीमुळे त्याचे पुढचे प्लॅन तो विसरत चालला होता.

त्याचे हृदय गप्प बसले आणि बुद्धी सांगू लागली, “राजेश ! जितेंद्रला भेटायचे आहे. समीरणला भेटायचे आहे. स्क्रिप्ट लिहायच्या आहेत. तुझी महत्वाकांक्षा तुझ्याकडे मोठ्या अपेक्षेने बघते आहे की तू तिला नक्की न्याय देशील आणि तू अजूनही सुप्रियाच्या आठवणी काढतो आहेस? अरे सुनंदाला घेऊन ये, आई काही दिवस शहरात राहून गावी परत जाणार आहेच! मग आईची नेहेमीकरता यायची इच्छा असेल तर तिलाही नेहेमीकरता बोलावून घे. मग तुझी स्वप्ने पूर्ण कर! चल लाग कामाला! सोड त्या सुप्रियाची आठवण!”

काही काळ लोटला.

अधून मधून तो सारंग सोमैय्या सोबत फोन करून टच मध्ये होताच. सारंग आणि त्याची टिम सुद्धा अगदी राजेशच्या फ्रिक्वेन्सीशी जुळवून घेणारी होती. त्या टिमकडून राजेशला सामान्य नागरिकांची, फॅमिलिज्ची चित्रपटांविषयीची अनेक मतं आणि मतांतरं मिळण्यास मदत होत होती. त्याचा फायदा राजेशला चित्रपटांच्या कथा आणि परीक्षण लिहायला व्हायचा. ही टीम त्याचे पर्सनल

ध्येय साध्य करायला त्याला मदत करणार होतीच पण या इंडस्ट्रीत त्या टिममधील अनेकांना त्यांच्या कुवतीप्रमाणे आणि लायकीप्रमाणे ब्रेक देऊन शक्य तेवढी परतफेड सुद्धा त्याला करायची होतीच.

□□□□

# प्रकरण 22

या सगळ्या घटनांदरम्यान सुप्रिया आणि रागिणी रूम सोडून गेल्यानंतर सोनीच्या दोन नवीन रुम पार्टनर्स झाल्या होत्या - एलेना एडवर्ड आणि नताशा दत्ता. सुप्रियाचा नंतर ठावठिकाणा न लागल्याने सोनीने तिला कॉल करणे सोडून दिले होते. सोशल साईटसवर सुद्धा सुप्रियाचे जुनेच अपडेट्स दिसत होते. पुण्याला जाणे झालेच तर मात्र तिने सुप्रियाला धावती भेट देण्याचे मनाशी ठरवले होतेच. रागिणी मात्र सोनीच्या संपर्कात होती. रागिणी तिच्या बॉयफ्रेंड सोबत हॅप्पी लाईफ जगत होती आणि सोनी “त्या” फोटो प्रकरणातून सावरली होती. तसे तिच्या दृष्टीकोनातून त्यामुळे तिचे फार काही फारसे नुकसान झाले नव्हते. पण नंतर तिला काही काळ कोणत्या डान्स कार्यक्रमाच्या ऑफर आल्या नाहीत, त्यामुळे निराश होती.

मग एके दिवशी अचानक आणि अनपेक्षितपणे “बिग आय बिग क्वेस्ट (Big Eye Big Quest)- मुझसे बचके कहां जाओगे?” नावाच्या मेगा रियालिटी शोची तिला ऑफर मिळाली. त्या शोच्या कास्टिंग डायरेक्टरने तिला त्याच्या ऑफिसमध्ये जेव्हा बोलावले होते तेव्हा त्याने तिला स्पष्टपणे संगितले होते:

“तुला मी एकाच कारणाकरता बेबक्यू (BEBQ) ची ऑफर देत आहे. ते कारण सांगण्याआधी ह्या शोबद्दल तुला सांगतो. या रियालिटी शोचा कॉन्सेप्ट वेगळा आहे. यात दहा अगदी वेगवेगळ्या क्षेत्रातील लोक एका प्रायव्हेट रिसॉर्टवर वीस दिवसांकरता सोडले जातील. बाहेरच्या जगाशी संपर्क करण्याची कोणतीच साधने त्यांना दिली जाणार नाहीत, अनलेस देयर इज एनी इमरजेंसी! त्यांना एकमेकांशी जुळवून घ्यायचे आहे. त्यांना एक मिशन दिले जाईल. त्याचे नियम सांगण्यात येतील. त्यानुसार काही पॉईंट्स देण्यात येतील. शेवटच्या दिवशी फक्त तीन जण उरतील. एक विनर, दुसरा आणि तिसरा रनर्स अप!”

आयती संधी चालून आली होती. पण तिच्या मनात विचारचक्र सुरु झाले, "मला डान्सच्या क्षेत्रात पुढे जायचे आहे. पण गेल्या काही महिन्यांपासून माझ्याकडे एकही काम नाही. आता हा शो आहे

पण यात डान्स नाही, पण पैसा मिळेल. प्रसिद्धी मिळेल. एरवी मी मॅडम अॅकॅडमी आणि इतर संस्थांमध्ये डान्स शिकत राहाणारच आहे. या शोनंतर बघूया, एखादी डान्स संबंधित दुसरी ऑफर नक्की मिळेल. आता फक्त मिळेल ते काम आणि पैसा महत्वाचा आहे!"

"काय विचारात पडलाय मॅडम? "

"अं, काही नाही. सॉरी, सांगा तुम्ही! मी ऐकतेय!"

"तर मी सांगत होतो की तुम्हाला या शोमध्ये घेण्याचे मूळ कारण मी तुम्हाला सांगतो. या शोमध्ये डान्स क्षेत्रातली तूच एक व्यक्ती असणार आहे. यात तुला डान्सचा वापर करून क्रिएटिव्ह अंगप्रदर्शन करावे लागेल. क्रिएटिव्ह अंगप्रदर्शन म्हणजे माझ्या मते असे की, तू जाणूनबुजून तुझे शरीर दाखवत आहेस असे लोकांना आणि प्रेक्षकांना वाटता कामा नये, त्याऐवजी रियालिटी शोच्या फ्लो मध्ये किंवा ओघात आपोआप असे प्रसंग येतील (जे आपण मुद्दाम टाकू) त्यातून अपरिहार्यपणे तुझी बॉडी तू एक्स्पोज करायची जी कृत्रिम वाटायला नको! तुझी सेल्फी अजून काही लोकांच्या नक्की लक्षात आहे! अजूनही तुझ्या त्या चित्राला रोज गुगलवर सर्च केलं जातं! कळलं का तुला मला काय म्हणायचे आहे ते? सरळ हिशेब आहे! मान्य असेल तर अॅग्रीमेंट आणि सायनिंग अमाऊंटचा एक लाखाचा चेक आणलाय सोबत!"

विचारात गढून सोनी मनाशी म्हणाली, "सेल्फीमुळे जे नुकसान व्हायचं ते झालंय! मला सतत माझे “वलय” टिकवायचे असले तर तडजोड करावी लागेलच! चला सोनी मॅडम स्वीकारा ही ऑफर!"

मग ती निर्मात्याला म्हणाली, "तयार आहे. अट मान्य आहे!"

अंधेरीच्या ऑफिस मध्ये “बिग आय” शोच्या त्या कास्टिंग डायरेक्टरने (के. सचदेवा) तिची एग्रीमेंटवर सही घेतली. तिला सायनिंग अमाऊंटचा चेक दिला आणि त्याच्या ऑफिस मधून सोनी निघाली.

# प्रकरण 23

"लुफ्थांसा एयरलाइन्स" च्या विमानात रात्री बारा वाजता मुंबईहून ते दोघे बसले होते. सुबोध केतगावकर आणि सुप्रिया सोंगाटे! अर्थात आता तीही केतगावकर झाली होती! सुबोध पुण्याचा पण इटलीच्या रोम शहरात त्याला परमनंट जॉब होता. रोम जवळ असलेल्या पोमेझीया शहरात एका कंपनीत तो "टेक्निकल कोऑर्डीनेटर" होता. आता रात्रीचे नऊ वाजत आले होते. विमान "दा व्हिन्सी" विमानतळावर उतरायला सज्ज झाले होते. तशी अनाउन्समेंट झाली होती.

सुप्रिया सुबोधसोबत इटलीला स्थायिक होणार होती. विमानतळावर नऊ वाजता उतरल्यानंतर त्यांनी सगळ्या सिक्योरिटी आणि डॉक्युमेंट संबंधित फॉरमॅलिटिज पूर्ण केल्या, बॅग्ज कलेक्ट केल्या आणि दोघे विमानतळाबाहेर पडले. मग थर्मल वियर घालून ते रोम शहरातून पोमेझीया पर्यंत प्रायव्हेट कॅबने गेले. नवा देश, नवे शहर! तिला रूळायला वेळ लागणार होता. पोमेझिया मध्ये “ला एशीयाना” नावाच्या एका एशियन हॉटेल मध्ये ते गेले. टेबलावर बसल्यानंतर प्रथम भारतात दोघांच्या पेरेंट्सना कॉन्फरन्स मध्ये घेऊन त्यांनी सुखरूप पोचल्याचे कळवले. मग त्यांनी सँडविच, कॉकटेल आणि पिझ्झा मागवला. सततचा प्रवास आणि जेट लॅगमुळे दोघांनाही थकवा वाटत होता.

“काय मॅडम, कसं वाटलं आमचं रोम शहर?”, सुबोध म्हणाला.

“अगदी छानच! आवडलं. निदान प्रथमदर्शनी तरी आवडलंच!”, सुप्रिया म्हणाली.

“थंडी मात्र थोडी जास्तच आहे नाही का?”, सुबोध ने विचारले.

“हो. एवढी बोचरी थंडी मी माझ्या आयुष्यात प्रथमच अनुभवते आहे!”

“बियर घेणार का थोडी? थंडीत आवश्यक असते म्हणून म्हटलं!”

“तू घे तुला हवी असेल तर! मी तर कधी घेतली नाहीए पण कधीतरी गरज वाटली तर घेईन सुद्धा, पण आता नको!"

"ठीक! नो प्रॉब्लेम! आय विल टेक वन! यु एंजॉय युर पिझ्झा विथ कॉकटेल!"

त्यांनतर बराच वेळ ते दोघे न बोलता खाण्यापिण्यात मग्न होते. कारण दोघांनाही चांगलीच भूक लागली होती.

अचानक काहीतरी आठवून सुबोध म्हणाला, "अगं हो! मी मागे तुला बोललो होतो ना, तो 'प्राईम प्रॉस्पेक्ट' या इंग्रजी टीव्ही सिरीयलमधला तुझा फेवरीट टेलिव्हिजन ॲक्टर 'फ्रांको बोनुकी' रोम मध्ये म्हणजे आपल्या येथून जवळच राहातो. लवकरच आपण जाऊ त्याचेकडे! माझा एक ऑफिसमधला सहकारी ओळखतो त्याला."

"सो नाईस ऑफ यू सुबोध फॉर रिमेंबरींग इट!" असे म्हणून तिने त्याच्या ओठांवर एक छोटासा किस केला.

मग ते दोघेजण "सांता प्रोक्युला" येथे असलेल्या सुबोधच्या स्टुडिओ अपार्टमेंट मध्ये आले. आतमध्ये हिटर्सची गरमी दोघांना सुखावून गेली. लग्नानंतरचा हा दहावा दिवस होता. इटलीत जाऊनच मग पहिल्यांदा "हनीमून" साजरा करायचा म्हणजेच पहिला सेक्स इटलीत घरी पोहोचल्यावर करायचा असे दोघांनी ठरवले होते व त्यांनी ते पाळले होते. दोघेजण फ्रेश झाले आणि बेडवर पहुडले. लग्नाआधीचे काही दिवस आणि लग्नानंतरचे दहा दिवस जाणूनबुजून ते एकमेकांपासून दूर होते. स्पर्श सुद्धा टाळत होते. जेवढे टाळत होते तेवढी मिलनाची ओढ जास्त वाढत होती. पण एवढा लांबचा प्रवास झाल्यानंतर त्यांना एकमेकांच्या बाहुपाशात लगेच झोप लागली..

आणि सकाळी पाच वाजता दोघांना एकाच वेळेस अचानक जाग आली. सुबोधला एक जाणीव झाली - एक अर्ध अनावृत्त स्त्री शरीर आपल्याला चिटकून झोपलं आहे! आणि अचानक झालेल्या त्या जाणीवेने त्याचं सर्वांग शहारलं आणि उत्तेजित झालं. सुप्रियाही जागी झाली होतीच पण ती मुद्दाम झोपेच सोंग घेऊन वाट बघू लागली की, सुबोध आता स्वतःवर किती नियंत्रण करू शकतो ते?

आता तो प्रसंग आला होता जो त्यांनी ठरवून टाळला होता! त्याने तिला आवेगाने जवळ ओढले आणि तिच्या सर्वांगावर ओठांनी तो किस घेत राहिला आणि मग दोघांची शरीरे एकमेकांना जाणून घेण्यास एवढी अधीर झाली की जणू काही दोन अतिशक्तीशाली इलेक्ट्रोमॅग्नेट एकमेकांच्या सान्निध्यात आलेत! मग वस्त्रांनी बंधने गाळून पडली.

स्त्री पुरुषाना एकमेकांवरचे मानसिक आणि शारीरिक प्रेम व्यक्त करता करता सगळ्यात शेवटी मिळणारी अत्युच्च अनुभूती काय असते ते दोघांनी आता प्रथमच अनुभवलं. मग त्यातून मिळालेल्या आत्यंतिक समाधानाने मंद पिवळया रंगाच्या प्रकाशात एकमेकांच्या वस्त्रविरहित शरीरांकडे, न्याहाळत आणि एकमेकांना कुरवाळत ते बराच वेळ पडून राहिले तेव्हा नुकतेच सहा वाजले होते.

तिच्या अंगावरून तसूभरही न बाजूला होता तो म्हणाला, “मॅडम! आज दिवसभर मी कुठेच जाणार नाही!”

“हो का? आणि मग ऑफिसात कोण जाणार? मी?” लटक्या रागाने ती म्हणाली.

“ना तू, ना मी! फक्त माझा बॉस आणि माझे कलिग्ज जातील ऑफिसला!”

सुप्रिया हसायला लागली.

“उठा. पहाट झाली. झोप संपली. स्वप्नांतून जागे व्हा. जीवनाचा रियालिटी शो सुरु झालाय! ऑफिसला जायची तयारी करा. सुट्टी संपली आहे,” असे म्हणून तिने त्याला हळूच बाजूला ढकलले. अगदी अनिच्छेने तो उठला...

...काही वेळानंतर मध्येच बाथरूम मधून आंघोळ करतांना बाहेर येऊन तो म्हणाला, "आपला पहिला सेक्स होईल त्या दिवसापासून मी तुला प्रिया म्हणणार असं मी मनात ठरवलं होतं. आजपासून तू माझी प्रिया! आज की ताजा खबर, आज की ताजा खबर! सुप्रिया बनी प्रिया! जेव्हा जेव्हा मी तुला प्रिया म्हणून हाक मारेन तेव्हा तेव्हा तू आणि मी हा पहिला सेक्स आठवून ताजेतवाने होऊ!"

असे म्हणून त्याने तिला ही बाथरूम मध्ये ओढले. बराच वेळ बाथरूम मधून आनंद आणि हास्याचे आवाज येत राहिले...

सुबोध ऑफिसला गेल्यानंतर दिवसभर ती रिकामीच होती. आज लगेच तिला स्वयंपाक बनवायचा नव्हता. या आठवड्यात सगळया गोष्टी सेट करायच्या होत्या. एशियन शॉप मधून आणलेली काही फूड पॅकेट्स फ्रिज मध्ये होती, त्यात तिचे दुपारचे जेवणाचे काम भागणार होते. मग तिने आवरसावर सुरु केली. ते घर अगदी मनापासून तिला आवडलं. दरम्याम तिने आई वडिलांना आणि सुबोधच्या आईला भारतात फोन केला (सुबोधला वडील नव्हते) आणि खुशाली कळवली.

हॉलमध्ये एक फायरप्लेस होतं. बाजूला एक मोठी खिडकी आणि त्याबाजूला एक छोटंसं काचेचं कपाट होतं. त्यात अनेक इंग्रजी आणि मराठी पुस्तके ठेवलेली होती. सुबोधासारखीच तिलाही वाचनाची आवड होतीच.

त्या घराची ओळख करून घेता घेता तिला बाजूला टेबलावर ठेवलेला एफ एम रेडिओ दिसला तो तिने ऑन केला. कोणतं तरी इटालियन गाणं सुरु होतं. त्यातले शब्द नीट कळत नव्हते पण ऐकायला वेगळाच आनंद यायला लागला आणि कोणत्यातरी अद्भुत दुनियेत गेल्यासारखं वाटत होतं ते गाणं ऐकून! त्या गाण्याने भारावून जाऊन आणि मंत्रमुग्ध होऊन तिच्या हातून भराभर कामं होऊ लागली. मराठी आणि इंग्रजी गाणे ती नेहमी ऐकायची पण इटालियन म्युझिक ती प्रथमच ऐकत होती.

ती त्या दिवशी बाहेर कुठेच गेली नाही कारण शहर, माणसं आणि तो देश हे सगळं तिच्यासाठी नवीन होतं. दुपारी फ्रिजमधील भाज्यांचे सॅन्डविच करून सॉस सोबत खाल्ल्यानंतर तिने सुबोधला कॉल केला. त्याला लवकर घरी यायला सांगून तिने फोन ठेवला. मग थोडा आराम करावा म्हणून ती बेडवर आडवी झाली. गेल्या काही महिन्यातल्या वेगवान घटना तिला आठवायला लागल्या...

# प्रकरण 24

राजेश सोबतच्या दु:खद ब्रेकपनंतर जीवनाला अचानक मिळालेली सुखद कलाटणी तिला आठवली. तिने मुद्दाम राजेशला असे सांगितले होते की ती यापुढे प्रोफेशनल रिलेशन कायम ठेवेल म्हणजे राजेश बेसावध राहील आणि तिच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करणार नाही.

राजेशकडून नकार आला तर असे सांगायचे हे तिने आधीच ठरवले होते. नंतर सोनी बनकरला राजेशसोबत झालेल्या ब्रेकपची कल्पना दिल्यानंतर ती काही दिवसांनी हॉस्टेल सोडून गेली होती. तिने मॅडम अकॅडमीच्या फायनल इयरच्या असाईनमेन्ट बऱ्याच आधी संपवल्या होत्या आणि रीतसर "मॅडम" चे प्रोव्हीजनल सर्टिफिकेट मिळवले.

मग तिने कायमचे पुण्याला घरी परत जाऊन आईला ब्रेकपबद्दल सांगितले. सुरुवातीला ती थोडी डिप्रेस झाली होती पण लवकर सावरली. तिने प्रॅक्टिकली विचार केला आणि सर्वप्रथम "चार थापडा सासूच्या" ही निरर्थक सिरीयल सोडायचे ठरवले. कॉन्ट्रॅक्ट ब्रीच केल्याचे पैसेही तिने प्रोड्युसरला ऑनलाईन देऊन टाकले. तसेच स्वतःच्या लग्नासाठी तिने आईवडीलांकडे तयारी दर्शवली. आईवडील तिच्याकरता सुयोग्य वर शोधण्यात मग्न झाले.

सिरीयल्समध्ये येण्याआधी तिने नाटकात काम केले होतेच. म्हणून थोड्या प्रयत्नांनंतर काही दिवसांनी तिला एका नाटकात काम मिळाले.

“कुमारगंधर्व” मध्ये त्याचे 10 यशस्वी आणि 7 हाऊसफुल प्रयोग झाले. त्या नाटकाचे नांव- "चाफेकळी खुलली". दरम्यान कलेची आवड जपणारा आणि अत्यंत रसिक असलेला सुबोध केतगांवकर इटलीहून सुट्टी घेऊन भारतात आलेला होता. त्या नाटकाच्या 20 व्या प्रयोगाला तो आणि त्याची आई आले होते. तो तिचे काम बघून प्रभावित झाला. नाटक चालू असतांना सुबोध आणि त्याची आई पहिल्या रांगेत बसले होते. लव्ह ऍट फर्स्ट साईट जे काय म्हणतात ते त्या दोघांत नाटक चालू असतांनाच घडले. नाटकातील तिच्या प्रत्येक संवादाला आणि लाजवाब अभिनयाला सुबोधची मिळणारी दाद तिला आवडली. लवकरच त्याने तिचा पत्ता शोधून घरी येऊन तिला प्रपोज केले.

तिलाही तो आवडला कारण तिच्या मनातही तो होताच. मग सोबत फिरणे झाले. दोघांच्या घरच्यांना ते मान्य झाले. मग राजेशला ती हळूहळू विसरली.

फ्रेंडबुकवर राजेश तिच्या फ्रेंड्स लिस्ट मध्ये होताच पण तिने सिरीयल सोडल्यानंतर कटाक्षाने कोणतेच स्टेट्स अपडेट टाकले नव्हते. इतकेच नाही तर सुबोधने सुद्धा त्याचे स्टेट्स अपडेट केले नव्हते. लग्नानंतर इटलीला पोहोचल्यानंतरच सिंगल स्टेटस बदलून मॅरिड करायचे असे त्यांनी ठरवले होते. तिने सुबोधला राजेशबद्दल कोणताही आडपडदा न ठेवता सगळे सांगितले होते. त्यांचे लग्न पुण्यातच झाले पण तिने अभिनय क्षेत्रातील काही मोजके सहकारी आणि मोजके मित्र आणि नातेवाईक यांनाच बोलावले होते. सुबोधने तिला ऍक्टिंगचे करियर करायला मोकळीक दिली होती. त्यासाठी ती अधूनमधून भारतात येऊ शकणार होती. वडील आणि नवरा दोघेही तिला करियरसाठी मोकळीक देणारे मिळाले याहून आणखी भाग्याची गोष्ट दुसरी कोणती असू शकते? यावर आणखी चांगली गोष्ट म्हणजे इटली मधल्या काही टीव्ही स्टार्सशी सुबोधची त्याच्या ऑफिसमधील सहकाऱ्याद्वारे ओळख झाली होती आणि त्याने सुप्रियला त्यांचेशी ओळख करून घ्यायचे कबुलही केले होते. त्या ऍक्टर 'फ्रांको बोनुकी' ला प्रत्यक्षात भेटण्याची उत्सुकताही तिला होती. मुंबईत असतांना ती 'केपीएक्स' चॅनेल वरची 'प्राईम प्रॉस्पेक्ट' ही इंग्रजी सिरीयल नेहेमी बघायची.

नंतर तिचा व्हिसा आणि इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाली. दरम्यान ती हळूहळू इटालियन भाषा शिकली. त्यासाठी तिने पुण्यात "जोशींकडे झटपट परदेशी भाषा शिका!" अशी जाहिरात असलेला इटालियन भाषेचा कोर्स केला तसेच ऑनलाइन वेबसाईट्सची आणि विविध मोबाईल अप्लिकेशनची मदत घेतली. राजेश सोबत ब्रेकप झाला हे एका अर्थाने बरे झाले असे तिला वाटले.

कदाचित जे राजेश म्हणाला होता तेच बरोबर होते की: “हे बघ! प्रॅक्टिकली विचार कर सुप्रिया. तू आणि मी दोघेही या बेभरवशाच्या क्षेत्रात एकत्र येऊन भरवशाचा संसार नाही करू शकत.”

सुप्रिया फक्तच करियरिस्ट नव्हती तर तिला वर्क लाईफ बॅलन्स हवा होता. एका गोष्टीसाठी दुसऱ्या गोष्टीचा बळी द्यायची तिची इच्छा नव्हती. म्हणून लग्न वगैरे सारख्या जीवनातल्या महत्वाच्या गोष्टी वेळेवरच व्हायला हव्या असे तिला वाटे.

बेडवर विचारांत असतांनाच तिला अचानक आठवले:

फ्रेंडबुक? येस! आज फ्रेंडबुकचा फडशाच पडते मी!

असा विचार करून ती बेडवरून उठली आणि मोबाईल जवळ घेऊन बेडवर मोठ्या मऊ उशीला टेकून बसली. बघूया काय काय अपडेट्स आलेत? 1250 नवीन नोटिफिकेशन्स आलेले होते! ओह गॉड! किती दिवस झाले चेक केले नाही!

तिचे आणखी एक फेसबुक पेज सुद्धा होते तेही ती स्वतः मॅनेज करत असे आणि एक होते स्वतःचे फ्रेंडबुक अकाउंट! फ्रेंडबुकवर कुठेच तिने स्वतःचा मोबाईल नंबर कधीच दिला नव्हता. भारत सोडतांना तिने जुना नंबर कायमचा बंद केला आणि भारतात एक नवीन पोस्टपेड नंबर घेतला होता. तो आणि इटलीत आणखी एक नंबर ती घेणार होती. तिने तिचे स्टेटस अपडेट केले- “मॅरीड टू सुबोध केतगांवकर!”

त्याबरोबरच तिने फेसबुक वरचे आपले नांव बदलले- प्रिया केतगांवकर. सुबोधनेही नुकताच ऑफिसमधून त्याचे स्टेट्स बदलले. तेव्हा मेसेंजरवर राजेशसुद्धा तिला ऑनलाइन दिसला. त्याचे प्रोफाइल तीने चेक केले तेव्हा तिला दिसले की त्याने सुद्धा एका तासांपूर्वीच त्याचे स्टेटस "मॅरीड टू सुनंदा!" असे केले होते. काय योगायोग असतो एकेक! तिला आश्चर्य वाटले. आणि ही जी कोण सुनंदा आहे ती मात्र फ्रेंडबुकवर नव्हती.

तिचे स्वतःचे नवे स्टेटस बघून राजेशला काय वाटेल असा विचार तिच्या मनाला शिवून गेला आणि राजेशकडून कधी सुनंदाबद्दल काहीच ऐकले नव्हते. आणि मुळात माझ्यासोबतच काय पण राजेश लग्नालाच तयार नव्हता मग त्याने अचानक घाईत लग्न का केले असावे? असे विचार तिच्या मनात येऊ लागले. एनिवे तुला काय करायचे ते जाणून घेऊन, सुप्रिया! ऑनलाइन असल्याने कदाचित राजेश तिच्याशी चॅट सुरु करू शकतो असे वाटून ते टाळण्यासाठी तिने इंटरनेट बंद केले आणि बेडवर

आडवी झाली. राजेश सोबतचे अनेक प्रसंग तिला आठवायला लागले पण तिने ते विचार झटकन बाजूला सारले.

सुप्रियाचा इटली देशातला पहिला आठवडा नव्या शहराची ओळख करून घेण्यात गेला. सुबोधने घरातल्या टीव्हीवर लोकल इटालियन चॅनेल्स सोबतच इंडियन आणि इंटरनॅशनल चॅनेल्सचे पॅक (कार्ड) सुद्धा घेतले होते. ते महाग होते पण त्याच्या रसिक वृत्ती साठी आणि सुप्रियाच्या एकूणच पुढच्या संभाव्य करियरसाठी ते आवश्यक होते. त्यायले भारतीय कार्यक्रम सिलेक्टेड होते आणि त्याच्या वेळा या भारतात ते कार्यक्रम टेलिकास्ट होण्याच्या वेळांपेक्षा वेगळया होत्या. सुबोधकडे घरी ब्रॉडबँड वायफाय आणि एक लॅपटॉप होता, लँडलाईन फोन होता. सुप्रियाचा स्वतःचाही लॅपटॉप तिने सोबत आणलेला होता आणि सुबोधचा ऑफिसचा लॅपटॉप वेगळा होता.

एके दिवशी सुप्रियाने चॅनेल बदलता बदलता “चार थापडा सासूच्या” सिरीयल मधली बदललेली सून पाहिली. वैशाली विचारे. तिने सुप्रिया करत असलेला रोल चांगलाच निभाऊन नेला होता. एकूण काय, तर सुप्रिया गेल्याने सिरीयल थांबली नव्हती किंवा सिरीयलचे नुकसान झाले नव्हते हे महत्वाचे!

□□□□

# प्रकरण 25

गॉथिक शैलीने बांधलेल्या एका भव्य बिल्डिंगमध्ये एक गौरवर्णीय उंचापुरा माणूस शिरतो. त्याच्या हातात बंदूक असते. भव्य दरवाज्यातून आत येताच आधी उजवीकडे आणि मग डावीकडे बघून तो बंदूक समोर धरतो. कुणी दबा धरून बसलेलं असेल तर त्याला हालचाल आणि हल्ला करायला मिळू नये म्हणून तो सावधगिरीने पावले उचलतो. त्याची नजर वर जाते. वर एक भव्य काचेचे झुंबर असते.

वरच्या बाजूला रंगीबेरंगी काचेच्या तुकड्यांनी बनलेला वाटावा असा भव्य गोल घुमट असतो. तो माणूस पुढे जात राहतो. दोन्ही हात नाकासमोर ताणून त्याने बंदूक धरलेली असते. पुढे गुलाबाच्या पाकळ्या एकमेकांमध्ये गुंतल्या आहेत असे वाटणारे बांधकाम असते. त्या बाजूला काचेच्या रंगीत तुकड्यांतून मस्त सूर्यप्रकाश आत येत असतो. बहुतेक जे तो शोधत होता ते न सापडल्यामुळे त्या माणसाची निराशा झाली असावी.

....तो बंदूक खाली करतो आणि उलट्या दिशेने चालू लागतो. तो माणूस पाठमोरा वळताच, त्याच्या मागच्या त्या रंगीत काचेच्या खिडक्या ताडताड फुटतात आणि त्यातून लोखंडी दांडा हातात घेतलेला आणि स्टेनगन हातात घेतलेला असे दोन माणसं उड्या मारून खाली पडतात. खाली पडल्यावर ते दोघे उठतात आणि त्या आवाजामुळे तो बंदुकवाला माणूस सावध होऊन पुन्हा मागे वळतो. पण तो माणूस सावरायच्या आत लोखंडी दांड्यावाला त्याच्या हातावर दणका मारून त्याची बंदूक खाली पाडतो.

ती बंदूक खाली उचलण्याचे नाटक करत तो माणूस खाली वाकतो आणि वायूवेगाने मागच्या बाजूला पाय फिरवून स्टेनगन वाल्याला आणि लोखंडी दांड्यावल्या माणसाला एकाच वेळेस खाली पाडतो. स्टेनगन आणि दांडा दूर जाऊन पडतात.

आता तिघेही शस्त्र विहीन असतात. तिघेही धडाधड एकमेकांना भिडतात. हातापायांचे वार आणि थापडा एकमेकांना बसू लागतात. त्याचा चटाचट आवाज येऊ लागतो... बराच वेळ तिघांमध्ये धुमश्चक्री चालते. तो एकटा दोघांना भारी पडतो...

तीन बाजुंनी तीन हलते कॅमेरे आणि एक समोरून स्थिर कॅमेरा (सगळे कॅमेरे एका बाजूच्या अर्धगोलात) असे चार कॅमेरे हा प्रसंग टिपत होते कारण हा चित्रपट थ्रीडी असणार होता. तो एक इटालियन चित्रपट होता. दूरवरच्या बाकड्यांवर काही मोजके लोक ही शुटिंग श्वास रोखून बघत होते. त्यात सुप्रिया, सुबोध आणि त्याचा ऑफीसातला कलीग "व्हीटोरिओ अंतीनिओ" हे सुद्धा होते. तो बंदुकवाला माणूस म्हणजेच 'फ्रांको बोनुकी' होता. टीव्ही सिरीजनंतर त्याचा हा पहिला इटालियन चित्रपट होता. सुप्रियाचे फ्रांकोला याची डोळा बघण्याचे स्वप्न पूर्ण होत होते. ही सगळी शुटिंग इटलीच्या रोम शहरातील "सिनेसीत्ता" (इंग्रजीत - सिनेमा सिटी) या भव्य फिल्म स्टुडिओमध्ये होत होती. इटलीत येऊन आता दोघांना दोन महिने झाले होते. एका विकेंडला दोघे रोम शहर बघायला आलेले होते. प्रथम त्यांनी फिल्म स्टुडिओ बघितला. व्हीटोरिओच्या ओळखीने त्यांना ही शूटिंग बघायला मिळत होती.

'फ्रांको बोनुकी' इतका मोठा ऍक्शन शॉट देत असतांना सुद्धा त्याच्या मनात काहीतरी वेगळेच चालले होते. इतक्या शारीरिक कसरतीच्या सिन मध्ये सुद्धा त्याच्या मनात आठवणींचा कल्लोळ सुरु होता.

"एंजेलिना करोल"- त्याची गर्लफ्रेंड, जिच्यासोबत तो गेली चार वर्षे लिव्ह इन मध्ये राहात होता ती मागील सहा महिन्यांपासून बदलली होती. फ्रांकोला तिने एकसारखे बोलून बोलून डिवचायला सुरुवात केली होती. त्याची सुरुवात एका छोट्याशा वाटणाऱ्या प्रसंगाने झाली होती. पण त्यातून राईचा पर्वत झाला होता आणि तो पर्वत दिवसेंदिवस मोठा मोठा होत चालला होता. आता गेल्या काही दिवसातला तो प्रसंग त्याला आठवला -

एंजेलिना त्याला इटालियन भाषेत खूपच टाकून बोलली होती -

"आंद्रे अल इन्फर्नो कोन ला तूआ रगझ्झा!'

म्हणजे -

"म्हणजे तुझ्या गर्लफ्रेंड सोबत तू मसणात जा!"

त्याला बोलायचा चान्स न देताच तिने त्याला शिवीगाळ केली होती.

तिचा गैरसमज झाला होता. ती ज्या गर्लफ्रेंडबद्दल बोलली होती ती फ्रांकोची गर्लफ्रेंड नव्हती. त्याने लाख समजावण्याचा प्रयत्न केला पण...ती ऐकत नव्हती.

तिला खरंच एक मुस्काटात द्यावे असे त्यावेळेस त्याला वाटले होते पण ती धाडकन त्याच्या तोंडावर दरवाजा आपटून त्या दिवशी बाहेर निघून गेली होती..

..फ्रांकोने अगदी जोर लावून समोरच्या माणसाच्या मुस्काटात दिली. एवढ्या जोरात की तो मार खाणारा समोरचा स्टंटमॅन अनपेक्षितपणे फ्रांकोकडे बघत राहिला आणि हेलपाटे खाऊन बराच दूर जाऊन पडला. पण कॅमेरामनच्या ते लक्षात आले नाही. तो शॉट जरुरीपेक्षा खूप जास्त रियल शूट झाला. पण फ्रांकोच्या लक्षात आल्यावर त्याने डायरेक्टरला खूण करून शूटिंग मधेच थांबवण्याची विनंती केली. त्या स्टंटमॅनला मदतीचा हात देऊन त्याने उठवले आणि सॉरी चुकून झाले म्हणून त्याची माफी मागितली. त्या दिवशीचा हा शेवटचा सिन असल्याने थोडे थांबून उरलेला सिन पुन्हा शूट करायचे ठरवले गेले. खरचटलेले आणि फाटलेले कपडे बदलले गेले.

व्हीटोरिओ, सुबोध आणि सुप्रिया हे तिघे फ्रांकोची फ्री होण्याची वाट बघू लागले. फ्रांको आणि बघ्यांमध्ये केव्हापासून बसून असलेली त्या चित्रपटाची हिरोईन "मार्सेला रमानो" हे दोघेजण आणि डायरेक्टर असे तिघेजण पिझ्झा खायला बसले. सोबत डाएट कोक होता.

व्हीटोरिओ वाट बघू लागला की फ्रांकोचे त्याच्याकडे दुरून का होईना थोडे लक्ष गेले तर बरे होईल. पिझ्झा खाऊन झाल्यावर थोडा आराम करण्यासाठी म्हणून बाजूच्या रूममध्ये जाण्यासाठी फ्रांको वळला तर त्याला नजरेच्या कोपऱ्यातून व्हीटोरिओ दिसला आणि त्याला हायसे वाटले. त्याच्या

मनाला त्रास देणारा इश्यू विसरून अचानक त्याचे मन थोडे त्यातून बाहेर आले. फ्रांको स्वतःहून त्यांचेकडे चालत गेला तसे सुबोध आणि सुप्रिया नर्व्हस झाले आणि थोडे अलर्ट झाले.

सेटवरील इतर सर्वजण आपापल्या इतर कामांत गढून गेली. दरम्यान व्हीटोरिओने दोघांची ओळख फ्रांकोशी करून दिली. सुबोध कलाप्रेमी आणि सुप्रिया एक ऍक्टर आहे, दोन्ही भारतातून आलेत वगैरे थोडक्यात कल्पना दिली. व्हीटोरिओ आणि फ्रांको अनेक वर्षांपासूनन एकमेकांना ओळखत होते. अगदी थोड्या वेळाच्या त्या भेटीत सुप्रिया फ्रांकोला त्याचा अभिनय तिला आवडत असल्याचे सांगायला विसरली नाही. विशेष म्हणजे फ्रांको नावाप्रमाणे अगदी फ्रँक वाटला तिला! मनमोकळा! चित्रपट विषयावर त्यांनी थोड्या गप्पा केल्या. एक सेल्फी सुद्धा त्यांनी काढली. सुबोध सुप्रिया दोघेही खुश होते.

फ्रांको पुन्हा शूटिंगला निघून घेल्यावर व्हीटोरिओने सुद्धा त्या दोघांचा निरोप घेतला. दोघांनी अर्धे "सिनेसीत्ता" बघितले. नंतर पुन्हा वेळ मिळेल तसे ते पुन्हा येथे येणार होतेच. नाहीतरी सुबोध सुप्रिया सारख्या सिने रसिकांसाठी "सिनेसीत्ता" हे ठिकाण फक्त एकदा भेट देऊन एका दमात बघून मोकळे होण्यासारखे नव्हतेच!

एकंदरीत त्यांची त्या दिवशीची रोम ट्रिप स्मरणीय ठरली.

# प्रकरण 26

राजेश, सुप्रिया, सोनी आणि रागिणी यांचे जीवन वेगवेगळी वळणे घेत होती. कधी अपेक्षित तर कधी अनपेक्षित! सोनी आणि रागिणीचे मॅडम अकॅडमी मधील रीतसर शिक्षण आता पूर्ण झाले होते. सुप्रियाचे सुद्धा आधीच ते झाले होते. त्यांना रीतसर सर्टिफिकेटस मिळाले होते. तसेच त्यांनी होस्टेल सोडले. सोनी मालाडला भाड्याने रूम घेऊन राहू लागली होती. जवळच्याच एका भागात तिची एक दूरची एक विधवा स्त्री-नातेवाईक रहात होती. तसा त्यांचा जास्त घरोबा नव्हता पण ती एकदा तिच्याकडे जाऊन आली. तसेच गावाकडे आईला सोनी पैसे नियमित पाठवत असे.

आता एलेना आणि नताशा तिघींच्या पूर्वीच्या हॉस्टेल रूम मध्ये राहत होत्या. एलेना कॅनडाहून तर नताशा श्रीलंकेहून बॉलिवूड मध्ये नशीब कमवायला आलेल्या होत्या. त्या दोघींनी सुद्धा मॅडम अकॅडमी जॉईन केलेली होती. त्या दोघींसोबत तिसरी पार्टनर त्यांना जॉईन झाली, तिचे नाव - मिष्टी मेहरान!

ती मॅडम अकॅडमी मध्ये नवोदित स्टुडंट्सना शॉर्ट फिल्म्स आणि ऍड फिल्म्स बनवण्याची कला शिकवायची! आणि अर्थातच मिष्टी हे नांव आता मॅडम अकॅडेमीतच नाही तर शॉर्ट फिल्म्स क्षेत्रातही खूप प्रसिद्ध होत होते. मिष्टीने फारच कमी वयात हे यश मिळवले होते.

दरम्यान राजेशने त्याच्या स्पेशल टीममधील अनेक जणांना मिष्टीच्या शॉर्ट फिल्म्समध्ये काम मिळवून दिले आणि त्या कलाकारांचा अभिनय अनेकांकडून वाखाणला गेला, कौतुक झाले. तसेच मसालेदार कथालेखन करायची इच्छा असलेल्या काही जणांना राजेशने तो लिहीत असलेल्या स्क्रिप्टससाठी त्याचा सहायक म्हणून घेतले होते आणि ते लोक त्या बदल्यात राजेश म्हणेल त्या चित्रपटाबद्दल “अपप्रचार” करायला एका पायावर तयार होते. विशेषकरून “के. के. सुमन” शी संबंधित चित्रपट!

दरम्यान समीरण देवधरने राजेशची विनंती मान्य केली होती आणि मराठी ऐवजी हिंदी चित्रपट बनवण्याची कल्पना त्याला पसंत पडली होती. चित्रपट निर्मिती लवकरच सुरु होणार होती.

दरम्यान रागिणी आणि सूरजने लग्न करायचा विचार लांबणीवर टाकला. लिव्ह इन मध्ये ते खुश होते. सूरजच्या परदेश वाऱ्या (विशेषतः ब्राझील देशातल्या) वाढू लागल्या आणि त्याचे वडील डी. पी. सिंग यांच्यासोबत रागिणी करत असलेल्या हॉरर सिरियल्स सुपरहिट होत होत होत्या. सुभाष भटने रागिणीला त्यांच्या आगामी हॉरर चित्रपटात घेण्याबद्दल डी. पी. सिंग यांना एकांतात विचारले होते कारण रागिणीला मुंबईत कुणी नातेवाईक नाहीत हे सिंग यांनी भट यांना सांगितले होते तसेच सूरज आणि रागिणी लिव्ह इन मध्ये राहातात ही त्यांना कल्पना होती. मग सिंग यांना विचारणेच योग्य आहे असे भटना वाटले. विचार करून सांगतो असे म्हणून त्यांनी भटकडे वेळ मागितला पण रागिणीजवळ त्याबद्दल बोलण्याऐवजी त्यांना ते सूरजला आधी सांगणे योग्य वाटले.

सूरजला सांगितल्यानंतर आश्चर्य असे की त्याने परवानगी तर दिलीच नाही उलट तो म्हणाला की आता आपण रागिणीला हळूहळू मनोरंजन क्षेत्रापासून दूर करायला हवे. तिने हाउस वाईफ म्हणून राहावे किंवा सूरजच्या फूड कंपनीत त्याला काहीतरी मदत करावी अशी त्याची इच्छा दिसली. म्हणून नाईलाजाने सिंग यांनी रागिणीला भटच्या प्रपोजलबद्दल डायरेक्ट सांगणे टाळले. सूरजने त्यांना आश्वासन दिले की तो रागिणीशी याबद्दल बोलेल त्यामुळे सिंग निर्धास्त झाले आणि दोघांच्या मध्ये न पडण्याचे त्यांनी ठरवले.

पण सूरजने रागिणीला त्याबद्दल सांगितलेच नाही. दरम्यान रागिणीला राहुलच्या फोनवरच्या धमक्या पुन्हा सुरू झाल्या. पैसे संपेपर्यंत तो चूप बसायचा मग परत कॉल करायचा. ती त्याला पैसे पुरवत होती. आता सूरजला याबद्दल सांगण्यावाचून पर्याय नव्हता!!!

# प्रकरण 27

मग तिने एके दिवशी सूरजला तिचा रोहनसोबतचा संबंध सांगितला, मग रोहनच्या ऍक्सिडेंटबद्दल सांगितले. सूरज शांतपणे ऐकून घेत होता.

रागिणी पुढे म्हणाली, "रोहनच्या मृत्यूनंतर मी डिप्रेशनमध्ये गेले आणि राहुलच्या नादी लागले. अर्थात त्यांचेशी माझे शारीरिक संबंध नव्हते आणि तसे ते रोहनसोबतही नव्हते. राहुल आधीपासून माझ्यावर एकतर्फी प्रेम करत होता आणि मी त्याला नाकारले होते पण रोहनच्या मृत्यूनंतर तो थोडा सुखावला आणि मी आता त्याला हो म्हणेन अशी एक आशा त्याच्या मनात तयार झाली. मी राहुलला भेटायला लागले हे माझ्या घरी माहिती नव्हते. राहुलने मला मानसिक आधार देण्याचे नाटक करून मला हळूहळू सिगारेट, दारूची सवय लावली. मग एकदा मला माझ्या नकळत एका सिगारेट मध्ये ड्रग्ज भरून दिले!"

ड्रग्जचे नाव काढताच सूरजच्या चेहेऱ्यावर एक प्रकारची वेगळीच चिंतायुक्त अस्वस्थता पसरली. ती लपवून तो म्हणाला, "ओह नो रागिणी! खूपच वाईट झालं! आणि हे सगळं तू माझ्यापासून लपवून का ठेवलंस? माझ्यावर विश्वास नव्हता का?"

रागिणी म्हणाली, "तसे नाही रे सूरज! मला भीती होती की मी तुला गमावून बसेल! एकदा रोहनला गमावले होते आणि तुला गमवायचे नव्हते!"

सूरज म्हणाला, "आय कॅन अंडरस्टॅन्ड रागिणी, माय लव्ह! एनिवे मग पुढे काय झालं ते सांग ना?"

रागिणी: "मी ड्रग्जच्या नशेत असतांना राहुलने माझ्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला पण मी अगदी वेळेवर शुद्धीवर येऊन तेथून कसेतरी पळाले. घरी काही कळू दिले नाही. राहुलला सांगून टाकले की आपल्यात जे झाले ते झाले पण आता यापुढे मला भेटू नकोस आणि आता मी लग्न करणार आहे. मग मी घरच्यांना लग्नासाठी तयार असल्याचे सांगितले. आणि मग माझ्या त्या नवऱ्याबद्दल मी तुला सांगितले आहेच. घरच्यांनी माझे लग्न एक बिझिनेस डील मिळावी म्हणून लावून दिले होते. म्हणजे ते एक डील होतं. दोन बिझिनेसमॅन फॅमिली मधले डील! नवरा मारकुटा निघाला. सॅडिस्ट निघाला!! छोट्या कारणांवरून मारायचा! रात्री सेक्स करतांना मला बांधून ठेवायचा! त्याने मला ऍक्टिंगमध्ये करियर करायची बंदी घातली होती. मग मी एके दिवशी बेमालूमपणे घरून पळून आले मुंबईत! दिल्लीतील एका मैत्रिणीच्या मदतीने!"

"ओह् गॉड! मग पुढे?"

"घरच्यांनी मला सांगून टाकले की आता आपला संबंध संपला. मग नंतर राहुलला कसे माहित पडले ते माहित नाही पण माझ्या सिरियल्स पाहून त्याला कळले असावे की मी मुंबईत आहे आणि त्याने कुठूनतरी माझा फोन नंबर मिळवला असावा आणि आता मला तो ब्लॅक मेल करतोय की तो माझ्या नवऱ्याला माझा ठावठिकाणा सांगणार! मला भीती वाटतेय! माझा नवरा खूप खुनशी आहे. तो त्याचे गुंड पाठवेल! घटस्फोटाचा किंवा फसवणुकीचा दावा करून पैसे उकळेल किंवा माझ्यावर पुन्हा बलात्काराचा प्रयत्न करेल! मला आता पुन्हा दिल्लीला परत जायचे नाही. प्लिज! हेल्प मी! माझे घरचेही माझ्या नवऱ्याला साथ देतील, वेळ पडली तर!" असे म्हणून ती रडायला लागली.

"हे बघ रागिणी! मला तू हे सगळं सांगितलंस ते बरं केलंस! मी ब्राझीलहून तीन दिवसांत परत येईन...आणि हे बघ, रडू नकोस!", असं म्हणून तो विचारात गढला.

मनावरचा भार हलका होऊन सूरजने तिला समजून घेतल्याबद्दल रागिणीला हायसे वाटले.

बराच वेळ विचार करून सूरज पुढे म्हणाला, "तू असं कर! तू मला राहुलची काही माहिती, फोटो दाखव! मी ब्राझीलहून परत आल्यावर फोन करून त्याला मुंबईला भेटायला बोलाव! आपण काहीतरी आमिष दाखवू त्याला! तू त्याला भेटायला एकटी जा आणि मी लपून तुझ्या मागे असेनच! मग बघूया काय करायचे! डोन्ट वरी!"

मग तिने त्याला तिच्या मोबाईलवरचा राहुलचा फोटो दाखवला. फोटो बघताच त्याच्या चेहेऱ्यावर अस्वस्थता पसरली. तीला दिसू न देता त्याने तो स्वतःच्या मोबाईल मध्ये सेंड केला!

मग ब्राझीलला निघतांना तो तिला म्हणाला, "संशय येऊ नये म्हणून तू त्याला तो मागेल तेवढे पैसे पाठव. तोपर्यंत मी येतोच! आणि हो! त्याला माझ्याबद्दल काहीही सांगू नकोस! नाहीतर तो सावध होईल!"

सूरजला घेऊन विमान हवेतून ब्राझीलकडे निघून गेले. दोन कामवाल्या बाई गेल्यानंतर ती फ्लॅटमध्ये एकटीच होती. आता ती वाट बघत होती सूरज परत येण्याची! काल राहुलचा फोन आला होता आणि त्याने आज संध्याकाळच्या आत 50000 रुपये मागितले होते ते तिने त्याच्या अकाउंटवर पाठवले. आतापूरता प्रॉब्लेम मिटला. सूरज आल्यावर आता पुढचे काय ते ठरवायचे होते.

मुंबईला पळून आल्यानंतरच्या घटना तिला आठवू लागल्या:

मुंबईला बोरिवलीला तिची दिल्लीतली एक मैत्रीण राहात होती. ती एकटीच होती. गौरी सहानी. तिच्या रूमवर सहा महिने रागिणी राहिली कारण नंतर गौरीला कॅनडात कायमचा जॉब मिळाला. म्हणजे तिला आता फक्त सहा महिने होते!

मग रागिणीने तात्पुरता सेल्स वूमन म्हणून जॉब पकडला आणि तिच्या मैत्रिणीने गौरीने काही पैशांची मदत केली. मग जमतील तसे अनेक पार्ट टाइम जॉब पकडून तिने मॅडम अकॅडमी जॉईन केली. तेथे सुप्रिया, सोनीशी ओळख आणि मैत्री झाली. परत टाइम जॉब सुरूच होता. टीव्ही किंवा सिनेमा कुठेतरी छोटासा का होईना रोल मिळणे अत्यावश्यक झाले होते अशातच मॅडम अकॅडमित डी. पी. सिंग यांचे सिरीयलसाठी ऑडिशन झाले. त्यात रागिणीची निवड झाली आणि अशा प्रकारे तिची करियरची सुरुवात झाली. मग गौरीची पैशांची परतफेड करतेवेळी गौरीने ते पैसे नाकारले आणि कॅनडाला जातांना फक्त ती एवढीच म्हणाली, "तुझी करियरची लाईन लागली ना! मग बास! पैसे मला परत नकोत. फक्त माझी आठवण ठेव म्हणजे झाले!"

◸◸◸◸

# प्रकरण 28

दरम्यान सोनी बनकरचा लव्हर साकेत न सांगता तिला सोडून निघून गेला. नेमका कुठे गेला त्याचा थांगपत्ता सोनीला लागलाच नाही. मग सोनीने स्वतःला बेबक्यू (BEBQ) च्या शुटिंगमध्ये व्यस्त ठेवलं. काही भागाचं शुटिंग झालं होतं आणि काही भागाचं बाकी होतं. पण प्रोग्रॅम टेलिकास्ट व्हायला सुरु झाला होता. सुभाष भट बारकाईने BEBQ शो वेळ मिळेल तेव्हा बघत होता कारण त्याला त्याच्या हॉरर चित्रपटासाठी नवीन चेहरा हवा होता आणि अशा रियालिटी शोजमध्ये नवे चेहेरे आणि नवनवीन टॅलेंट चिक्कार मिळतात हे तो जाणून होता. त्यातल्या त्यात त्या कार्यक्रमातली सोनी बनकर त्याचे जास्ती लक्ष वेधून घेत होती. सिंग यांचेकडून रागिणीसाठी नकार आल्याने सुभाष भटला दुसरे कुणीतरी शोधणे भाग होतेच. एकदा का हा शो संपला की सोनीला विचारून बघावे असा विचार त्याच्या मनात आला.

एका प्रायव्हेट रिसॉर्टवर दहा जणांना बोलावून त्या रियालिटी शोची शुटिंग सुरु झालेली होती. त्यात पन्नास टक्के काय करायचे ते आधीच स्क्रिप्ट लिहून ठरवलेले होते तर पन्नास टक्के आपल्या मनाने वागण्याची परवानगी होती. मात्र प्रेक्षकांना सांगण्यात आले होते की हा जगातील पहिलाच असा शो आहे की ज्यात सगळे कलाकार किंवा भाग घेणारे पार्टीसिपॅन्ट संपूर्णपणे उत्स्फूर्तपणे जगणार आणि खेळ खेळणार! म्हणजे काहीही प्लान केलेले नाही!

चोवीस तासांपैकी जवळजवळ अठरा तास सतत कॅमेरे त्यांच्या मागे राहणार होते. काही हलते कॅमेरे काही स्थिर तर काही गुप्त ठिकाणी लपवलेले कॅमेरे असणार होते. मोबाईल आणि इतर उपकरणे सगळयांजवळून काढून घेण्यात आली आणि फक्त एक लँडलाईन फोन गरजेपुरता वापरता येणार होता.

रिसॉर्टवर दिवसभर कंटेस्टन्ट मनाप्रमाणे इकडे तिकडे फिरू शकत होते. दरम्यान त्यांना विविध ठिकाणी लपलेले चिठ्ठ्यांच्या स्वरूपातील दुवे (क्लू) शोधायचे होते. त्या क्लू मध्ये सांगितल्याप्रमाणे पुढे वागायचे होते. तसेच काही क्लू मध्ये खेळाडूला कठीण टास्क देऊन ते न जमल्यास त्याला बाद करण्यात येत होते. सगळयांना शेवटी कोणती वस्तू शोधायची आहे हे सुद्धा माहिती नव्हते. गेमच्या शेवटच्या लेव्हलला पोहोचेपर्यंत ते माहित असणार नव्हते. मग शोध

संपल्यावर ज्यानेही ते शोधले तो पहिला येणार! आणि गेमच्या नियमानुसार शेवटी जे तीन जण टिकले त्यापैकी ज्या दोघांना शोध लागला नाही तो किंवा ती दुसऱ्या आणि तिसऱ्या नंबरवर येणार!

तसेच गेम मधले नियम एकदा तोडणाऱ्याला पेनल्टी म्हणून त्या गेमचा "बिग आय" म्हणून बघणारा संयोजक काहीतरी करायला लावणार होता. दुसऱ्यांदा नियम तोडल्यास मात्र गेम मधून बाहेर!

सोनी बनकरने एकदा गेमचा नियम मोडला. मग बिग आयने तिला एक पेनल्टी दिली - ती जोपर्यंत गेम मध्ये टिकून आहे तोपर्यंत तिने रोज रात्री दोन बॉलिवूड आयटम सॉन्गवर डान्स करून दाखवायचा. त्यानंतर त्या गेमपेक्षा त्या गेममधले सोनीने डान्सच लोकप्रिय व्हायला लागले. पुन्हा तिच्या जुन्या सेल्फीबद्दल चर्चा व्हायला लागली. सुभाष भट हे सगळे बारकाईने पाहात होते. त्यांनी BEBQ च्या कास्टिंग डायरेक्टर के. सचदेवाला कॉल केला आणि त्याला भेटायची इच्छा बोलून दाखवली. प्रथम सचदेवाला आश्चर्य वाटले की नक्की सुभाषजीना आपल्याला का भेटायचे आहे?

पण त्यांच्या भेटीत ते क्लियर झाले, ते असे:

"मला सोनी माझ्या पुढच्या हॉरर फिल्ममध्ये हवी आहे! माझ्या डोक्यात अशी स्क्रिप्ट घोळते आहे की ज्यात म्युझिक आणि डान्स संबंधित एका ग्रुप सोबत काही सुपरनॅचरल घटना घडतात! म्हणजे सोनीचे डान्स टॅलेंटही सिनेमात वापरता येईल आणि तिला हिरोईन म्हणून पण लाँच करता येईल! लोकांना फ्रेश चेहेरा हवाय! तीच एक हिरोईन रिताशा सतत माझ्या बहुतेक हॉरर चित्रपटांत काम करतेय आणि आताशा तिचे नवे चित्रपट फ्लॉप होत आहेत!"

"बरं! हरकत नाही! सोनीच्या उपलब्धतेबद्दल बोलायचे झाल्यास आमच्या शोचे सगळे एपिसोड टेलिकास्ट होऊन संपले की ती आमच्या अग्रीमेन्ट पासून मुक्त असेल! मग ती इतर कुठेही काम करू शकते! आय एम अबसोल्युटली फाईन विद धिस!"

"ते ठीक आहे! पण मला तुमच्याकडून काय हवंय ते ऐका! मला हवंय की या गेम शोची विनर तीच असेल! सोनी!"

"हे बघा! आमचा हा रियालिटी शो आहे त्यामुळे यात काय घडणार आणि काय नाही हे मी नाही सांगू शकत! आणि तिला ठरवून जिंकवणे म्हणजे इतरांवर अन्याय नाही का होणार?"

"मिस्टर मिस्टर! ऐका माझं जरा! तुमच्या या सगळ्या रियालिटी शोबद्दलची आतली रियालिटी मला चांगली कळते! तेव्हा मला तुम्ही शिकवू नका! तुम्ही या शोचे कास्टिंग डायरेक्टर आणि स्क्रिप्ट मॅनेजरपण आहात. तेव्हा तुम्ही हे मॅनेज करू शकता!"

"मिस्टर सुभाष! मी मॅनेज करू शकतो की नाही हा मुद्दा वेगळा! पण मला सांगा, मी तुमचे का ऐकू? माझा फायदा काय?"

"सांगतो! मूळ मुद्यावर येतो मी आता! मला माझी पुढची नवी हिरोईन ही गेम शो मध्ये जिंकून फेमस झालेली अशी हवी आहे आणि ती सोनीच हवी! त्याबदल्यात मी तुमचा फायदा करून देईन! तुम्हाला मी माझ्या चित्रपटाचा सहायक दिग्दर्शक म्हणून घेईन! तुम्हाला आयती प्रसिद्धी मिळेल. चित्रपटाच्या उत्पन्नातला 20 टक्के हिस्सा देईन आणि आता सायनिंग अमाऊन्ट म्हणून ताबडतोब 2 लाख रुपये देतो. मग तुमच्या शोच्या प्रोड्युसर वगैरे मंडळींना मॅनेज करून सोनीला कसे जिंकवायचे कसे ते तुमचे काम! बोला! आहे मंजूर?!"

"आता तुम्ही एवढं सगळं माझ्यासाठी करत आहात तर मी पण तुमचं काम केलंच पाहिजे, नाही का? नाहीतरी कुणाला न कुणाला तरी जिंकायचं आहेच! माझ्या माईंडमध्ये ती इंडियन-ओरिजिन फॉरेनर कंटेस्टन्ट - "जेसिका कर्टिस" जिंकायला हवी होती पण एनिवे मला जिथे फायदा आहे तिथे मी जाईन! ठीक आहे, सोनीला विनर बनवू या!"

"अरे तुझ्या त्या जेसिका कर्टिसला सेकंड नंबरवर आण! मी तिलापण चित्रपटात छोटासा रोल देतो! तिला सांग की तू तिला बॉलिवूड मध्ये ब्रेक मिळवून देणार आहे! खुश होईल ती! "

शेवटी डील ठरली. सुभाष भटना हे दाखवून द्यायचे होते की डी. पी. सिंग च्या रागिणीवाचून त्यांचे काही अडत नाही. रागिणीने स्वतः नकार दिला असे सुभाष भटना सिंग यांनी सांगितले होते. त्यामुळे ते दुखावले गेले होते. मग त्यांनी अर्थातच रागिणीला स्वतःहून कॉल करण्याचा प्रयत्न केला नव्हता...

◬◬◬◬

# प्रकरण 29

इकडे रागिणी सूरजच्या ब्राझीलहून परत येण्याची वाट बघत होती. संध्याकाळ झाली होती. स्वतःसाठी स्वयंपाक बनवून ती जेवली. मग सूरजला कॉल करण्याचा प्रयत्न केला पण तो कॉल उचलत नव्हता. मग झोपतांना सहज बातम्या बघाव्या म्हणून तिने टीव्ही लावला.

'फ्रेश न्यूज- आप तक, आपके घर तक!" हे चॅनेल सुरु होते. "फिल्मी खुलासा" या कार्यक्रमात निवेदक ओरडून ओरडून सांगत होते:

"फेमस हॉरर सिरीयल की फेमस ऐक्ट्रेस रागिणी के बारे में एक बडा खुलासा! एक ऐसा सच जो आजतक किसीको नही था पता! देखीये थोडीही देर में!"

बेडवर झोपलेली रागिणी अचानक उठून बसली. तिला धक्काच बसला.

"हे चाललंय काय या चॅनेलचं! काय सांगणार आहेत ते माझ्याबद्दल? मला तर डोळ्यांवर विश्वास बसत नाहीये! आतापर्यंत मी फिल्मी पत्रकारांना माझ्या पूर्वीच्या जीवनाबद्दल माहिती सांगणे शिताफीने टाळले होते. मात्र या चॅनेलला अचानक कुणी माझ्याबद्दल सांगितलं आणि काय सांगितलं? नक्कीच राहुल असणार! त्याला पैसे देऊन सुद्धा त्याने जे करायचे तेच केले वाटते!"

पुढे निवेदक सांगू लागला:

"दरअसल ये रागिणी भाग गयी थी अपने घर से! बिना अपने हजबंड को बताये! क्या फिल्म इंडस्ट्री में आनेके लिए कोई इस हद तक जा सकता है? हमारे जर्नालिस्टने ये भी खुलासा किया है की शादी से पहले रागिणी के दो लडकों के साथ रिश्ते थे और इतना ही नही ..."

पुढे ऐकवले जात नव्हते. रागिणीच्या मनात संताप, आश्चर्य आणि पराकोटीचा अनपेक्षित धक्का या तीन भावना एकत्र झाल्या आणि त्याचा परिणाम म्हणजे तिने रिमोट टिव्हीकडे जोराने भिरकावले. टीव्ही खळकन फुटून बंद पडला. तिने पुन्हा सूरजला कॉल केला असता त्याचा नंबर स्विच ऑफ होता.

ओह नो! आता काय करू मी? रागिणी अस्वस्थपणे येरझारा घालू लागली. मला या शहरात दुसरं कोण आहे? जवळचं? सूरजशिवाय? आता तिला प्रश्न पडला की ही बातमी पाहून सूरजच्या आधी त्याच्या वडिलांनी, डी. पी. सिंग यांनी तिला बोलावले तर? त्यांना तिने तिच्या पूर्वायुष्याबद्दल काहीच सांगितले नव्हते आणि त्यांनीही काही विचारले नव्हते कारण त्यांची वागणूक प्रोफेशनल होती. ते कामाशी काम या वृत्तीचे होते. पण आता मात्र गोष्ट वेगळी होती कारण ती आता त्यांच्या मुलाची गर्लफ्रेंड होती. त्याचेसोबत रहात होती. पण त्यांना कॉल करण्याऐवजी प्रथम सूरज आल्यानंतर त्याच्या सोबत बोलूया असा विचार तिने केला....

□□□□

# प्रकरण 30

रागीणीची ही बातमी इटलीत सुप्रिया दुपारी टीव्हीवर बघत होती. तिला आश्चर्य वाटले आणि जुन्या होस्टेलच्या आठवणी जाग्या झाल्या. मेडिया आता सेलिब्रिटींच्या खासगी जीवनात जरा जास्तच शिरायला लागलीय असे तिला वाटले. सेलिब्रिटीजना एक हवेहवेसे सोशल "वलय" प्राप्त तर होते पण ते "वलय" आपल्यासोबत अनेक दुःखदायक आणि नकोशा गोष्टी घेऊन येते हे नक्की! असा विचार सुप्रियाच्या मनात आला.

ती एव्हाना चांगलीच इटालियन बोलू शकत होती. तिने जवळच्या शहरातील एका एफएम रेडिओ स्टेशनवर दिवसातील चार तास रेडिओ जॉकी म्हणून जॉब पत्करला होता. आसपासच्या शहरातील एशियन लोकांसाठी चार तास एशियन गाण्यांचा प्रोग्रॅम त्या रेडियोवर आठवड्यातून तीन दिवस लागायचा. त्यासाठी त्यांना थोडे इंग्लिश, इटालियन आणि हिंदी भाषा येत असणारी एशियन वूमन हवी होती. लोकल न्यूजपेपर मध्ये तशी ऍड आली होती. सुबोधने ती ऍड सुप्रियला दाखवली आणि तिने एप्लाय केले. इंटरव्ह्यू झाला आणि तिला निवडण्यात आले. इंटरव्ह्यू साठी जास्त स्त्रिया आल्या नव्हत्या आणि ज्याही दोन पाच आल्या होत्या त्यात सुप्रियाच सगळयात उजवी ठरली. मध्यंतरी तिचे आईवडील आणि सुबोधची आई येऊन त्यांचेकडे चार आठवडे राहून गेले होते. एकंदरीत दोघांचं बरं चाललंय हे पाहून समाधानाने ते इंडियात परत गेले होते...

एकदा रात्री सुबोध लॅपटॉपवर ऑफिसचे काम करत होता. घरातली कामं आटोपली होती. सुप्रियाने सहज म्हणून एक न्यूज चॅनेल लावले असता तिला एक फिल्मस्वर आधारित प्रोग्रॅम दिसला. त्याचा दुसरा भाग सुरु होता. राजेश त्या कार्यक्रमाचा मुख्य सूत्रधार आणि अँकर होता. समोर ऑडिएन्स बसली होती आणि स्टेजवर अनेक प्रोड्युसर आणि डायरेकटर मंडळी बसली होती. ऑडिएन्स मध्ये बरीचशी मंडळी ही राजेशने बनवलेल्या टीम मधली होती. अर्थात हे फक्त त्यांना आणि राजेशला माहिती होते. प्रथम टीव्ही बंद करायला तिचा हात वळला पण स्वतःच्या मनाविरुद्ध उत्सुकतेने ती सरसावून बसली आणि उशी मांडीवर घेऊन प्रोग्रॅम बघू लागली.

राजेशने माईक हातात धरून म्हटले, "आपल्या पहिल्या भागात आपण भारतीय चित्रपट सृष्टीचा इतिहास पहिला. दादासाहेब फाळके यांचे अविस्मरणीय कार्य यानिमिताने आपण बघितले. भारतीय चित्रपट कसा बदलत गेला याचा इतिहास आपण बघितला. पहिला भाग आवडल्याबद्दल

अनेकांचे ईमेल, ट्विट्स आणि फ्रेंडबुक वर प्रतिक्रिया आल्यात. आपण सोशल मीडिया आणि फोनद्वारे या कार्यक्रमात सिनेरसिकांच्या थेट प्रतिक्रिया आणि प्रश्न या कार्यक्रमात लाईव्ह समाविष्ट केल्या त्यामुळे हा कार्यक्रम लोकांना आपलासा वाटला. आजच्या भागासह यापुढचेही भाग प्रेक्षकांना जागतिक मनोरंजन क्षेत्राबद्दल असेच मनोरंजनपूर्ण ज्ञान आणि ज्ञानपूर्ण मनोरंजन पुरवत राहतील अशी मी खात्री देतो. तर चला सुरुवात करूया आजच्या भागाला!"

स्टुडिओत आलेले प्रेक्षक, व्यासपीठावरचे प्रोड्युसर, डिरेक्टर्स वगैरे सगळे सरसावून बसले.

राजेश म्हणाला, "तर आजच्या आपल्या या कार्यक्रमाचा विषय आहे- "सिनेमा आणि लेखक!" आपणास माहिती आहेच की कार्यक्रमाची सुरुवात आपण एका प्रश्नाने करतो. तर आजचा प्रश्न आहे- "सिनेमाला सशक्त कथा, पटकथा आणि संवाद असावेत असे आजकाल अनेक निर्माते दिग्दर्शकांना का वाटत नाही?" किंवा दुसऱ्या अर्थाने विचारायचे झाल्यास "निर्माते दिग्दर्शकांना स्वतःच लेखन करावेसे का वाटते?"

थोडा वेगळाच प्रश्न होता. अनेक निर्माते, दिगदर्शकांमध्ये आणि प्रेक्षकांमध्ये अस्वस्थ चुळबूळ सुरु झाली.

रामरत्नम नावाचे निर्माते म्हणाले, "मिस्टर! तुमचा प्रश्नच चुकीचा आहे. निर्माते आणि दिगदर्शक हेच खऱ्या अर्थाने चित्रपटाला अंतिम रूप देतात. त्या दोघांच्या अनुभवी नजरेशिवाय कितीही सशक्त कथा लेखकाने लिहिली तरीही ती पडद्यावर साकारता येत नाही. दिग्दर्शकाच्या व्हिजनची सर लेखकाच्या व्हिजनला येऊच शकत नाही आणि दिग्दर्शकाच्या व्हिजनला पैशांच्या वेसणात बांधून शेवटी पडद्यावर येते ते चित्रपटाचे फायनल रूप!"

प्रेक्षकांतील काहीजणांनी टाळया वाजवल्या. एका खुर्चीवर बसलेला कथाचोर के. के. सुमनपण मनोमन सुखावला. टाळया शांत झाल्यावर हळूच राजेश म्हणाला, "पण मला सांगा की आडातच नाही तर पोहोऱ्यात कोठून येणार हो? म्हणजे मला म्हणायचे आहे की लेखकाने कथाच लिहिली नाही तर त्याला पैशांच्या वेसणात बांधणारे आणि पडद्यावर साकारण्याचे व्हिजन येणार

कोठून? मुळात एखादी मूर्ती बनवून झाल्यावरच तिला मूर्तिकार किंवा इतर कुणीतरी फायनल टच किंवा रंग देऊ शकतो! आधी मूर्तीला फायनल टच आणि रंग देऊन घ्यायचा आणि मग मूर्ती बनवायला सुरुवात करायची असं कोण करतं का, सांगा बरं मला प्रेक्षकांनो?"

हे बोलून संपताच दुप्पट टाळया वाजू लागल्या. टाळया संपल्यावर रामरत्नम् काही बोलू इच्छित होते पण त्यांना नेमके शब्दच सापडेनासे झालेत आणि जवळपास ते निरुत्तर झाले.

ही संधी साधून राजेश पुढे म्हणाला, "आणि आता आजकाल तर हद्द झालीये. बरेच निर्माते, दिग्दर्शक तर लेखकांच्या कथा तोंडी ऐकून घेतात किंवा त्याचे कथा वाचन किंवा स्क्रिप्ट ऐकून घेतात, लेखकांना कथा न आवडल्याचे सांगून हाकलून लावतात आणि कालांतराने तीच कथा स्वतःच्या नावाने खपवतात!"

के. के. सुमन आणि काहींच्या चेहेऱ्यावर घाम आला आणि प्रेक्षकांमध्ये चलबिचल सुरु झाली.

“व्ही. शामसुंदर” नावाचे दिग्दर्शक उभे राहिले, "राजेश, काही ठिकाणी असे होत असेलही पण सगळेच जण असे करत नाहीत. मी असा दिग्दर्शक आहे की जो लेखकाला त्याचे पूर्ण मानधन निर्मात्यांकडून द्यायला लावतो आणि त्याच्या कथेशी कुठे तडजोड करत नाही!"

राजेश म्हणाला, "मान्य आहे! मान्य आहे. पण असे चित्र फार दुर्मिळ आहे. आजही लेखकांना हवा तेव्हढा मान, मानधन आणि प्रसिद्धी सिनेमाच्या प्रमोशनमध्ये दिली जात नाही. अवार्ड्स फंक्शन मध्ये सुद्धा चित्रपटाच्या लेखनासंबंधी फारसे अवार्डस् नाहीये. लेखकाला त्याचा सन्मान मिळालाच पाहिजे. आणि प्रत्येक निर्मात्याने एका सशक्त कथेचा आग्रह धरलाच पाहिजे! लक्षात ठेवा लेखक हा पुरातन काळापासून आहे आणि कथा लिहून तो शतकानुशतके वाचकांचे मनोरंजन करत आहे. सिनेमा नंतर आला. लेखक फार पूर्वीपासून अस्तित्वात होते! प्रसिद्ध इंग्रजी लेखक केतन सहानी यांच्या पहिल्या कादंबरीवर आधारित चित्रपट चार चतुर खूप चालला पण केतनला त्याचे श्रेय दिले गेले नाही पण त्याची वाचकसंख्या खूप असल्याने नंतर सोशल मेडीयातून निर्मात्यावर दबाव येऊन त्यांना केतनची माफी मागणे भाग पडले, नंतर त्याच्या आणखी एका कथेवर चित्रपट बनला तेव्हा त्याचे योग्य ते क्रेडीट केतनला मिळाले, पण सगळ्याच आणि नवोदित लेखकांसोबत मात्र असे होत नाही!"

पुन्हा टाळया....

पण एक प्रोड्युसर "सी. आर. छब्बीसिया" म्हणाला, "पण राजेश! मी अनेक चित्रपट बनवलेत की ज्यात मी कुणाच लेखकाची मदत घेतली नाही. माझ्याजवळ फॉर्मुले आहेत! त्यात थोडा तिखट मीठ मसाला टाकला की झाला चित्रपट तयार! कशाला हवेत लेखक अन बिखक! रोमँटिक चित्रपटांचे अनेक फॉर्मुले, थ्रिलरचे, सस्पेन्सचे, इमोशनल, कॉमेडी असे प्रत्येक प्रकारच्या सिनेमाचे विविध फॉर्मुले असतात!"

या प्रोड्यूसरला दे दणादण बदडून काढण्याचा प्लॅन राजेशच्या मनात आला पण त्याने स्वतःला कंट्रोल केले कारण त्याच्या टीमचा एक प्यादा त्याला ठरल्याप्रमाणे मदत करणार आहेच हे त्याला माहित होते...

त्याऐवजी राजेश त्याला एवढेच म्हणाला, "येथे बसलेल्या आणि देशभरातील करोडो सिनेरसिकांना तुमचा एखादा फॉर्म्युला सांगाल का?!"

"हे बघा! सामान्य माणूस तिकीट काढून पैसे खर्च करून दोन अडीच तास चित्रपट पाहण्यासाठी येतो ते दोन घटका मनोरंजन करायला! सॉरी मी दोन अडीच तास म्हणालो कारण आजकाल चित्रपट पूर्वीसारखे तीन साडेतीन तासांचे राहिले नाहीयेत! आणि आजच्या मल्टिप्लेक्सच्या जमान्यात तर एका तिकिटाला दोनशे ते पाचशे रुपये पडतात. एवढे पैसे खर्च करून फक्त दोन तासांचा सिनेमा असतो, त्यातही जर समोर पडद्यावर डोक्याला जड असे काहीतरी बघायला मिळाले तर प्रेक्षक शिव्या देईल! चित्रपट प्रेक्षकाला दोन घटका करमणूक देण्यासाठी असतो आणि मसाला फॉर्म्युला त्यासाठी पुरेसा आहे. त्यासाठी लेखकाची गरज नाही. मला तरी नाहीच नाही!"

राजेश म्हणाला, "अहो तुम्ही फॉर्म्युला सांगणार होतात ना! सांगा ना एखादा फॉर्म्युला आम्हाला!"

छब्बीसिया सांगू लागला, "समजा रोमँटिक मुव्ही घेऊ! एक हिरो घ्यायचा एक हिरोईन घ्यायची! मग त्यांची भेट एखाद्या परदेशातल्या एका सुंदर नयनरम्य ठिकाणी घडवायची. चार पाच नाचगाणी. रुसवे फुगवे. तिथल्या एखाद्या पब, डिस्को किंवा क्लबमध्ये एकादे सेक्सी आयटम सॉंग टाकायचे. वर आम्ही सेन्सॉरला असे म्हणायला मोकळे की हे अंगप्रदर्शन किंवा सेक्सी नंगा नाच जास्त वाटत असला तरी ते परदेशात घडतंय, आपल्या भारतात थोडंच घडतंय! आणि मग हिरोईनचे वडील तिच्या मर्जीविरुद्ध लग्न लावून देतात. मग त्या नियोजित वराच्या ओढून ताणून वाईट सवयी दाखवायच्या आणि मग हिरो ते उघडकीस आणतो आणि मग थोडी मारामारी आणि मग हॅपी एंडिंग! माझा पिक्चर "दुल्हन हमारी हिंदुस्तानी" बघितला ना तुम्ही??"

काही जणांनी टाळया वाजवल्या. दरम्यान राजेशने त्याच्या टीम मधल्या गावाकडील एका मेम्बरला एसेमेस केला आणि प्रोग्रॅम मध्ये कॉल करायला सांगितले. तो मेम्बर काय ते बरोबर समजला.

छब्बीसिया पुढे म्हणाला, "हा होता रोमँटिक चित्रपटाचा एक फॉर्म्युला. तसेच ऍक्शन चित्रपटाचाही माझा एक फॉर्म्युला आहे. मी जवळपास सत्तर ऐंशी मोडक्या तोडक्या गाड्या गैरेज मधून विकत घेतो आणि चित्रपटभर त्या गाड्या बॉम्बने उडवत राहातो! गाड्यांचे पाठलाग, ऍक्सिडेंट करत राहातो, गाड्या तोडतो फोडतो. प्रेक्षकांना आवडतं! मी लहानपणी माझ्या स्वतःच्या आणि मित्रांच्या खेळण्यातल्या कार तोडून टाकायचो, दिवाळीत गाड्या सुतळी बॉम्बला बांधून त्यांना फोडून ब्लास्ट करून टाकायचो तेव्हाच माझे एक बॉलिवूडमधले काका बोलले होते की हा मोठा झाल्यावर नक्की एक मोठ्ठा ऍक्शन डायरेक्टर किंवा प्रोड्युसर होणार! खि खि खि!"

पब्लिकपण हसायला लागली. राजेश त्याला म्हणाला, "वा! तुमचे फॉर्मुले आणि तुमचा सेन्स ऑफ ह्युमर छानच आहे की! तुम्ही आता एखादा कॉमेडी मुव्हीपण बनवायला हवा! मग त्याचाही फोर्मुला बनवायला हवा! मी तुमच्या या मताशी सहमत आहे की प्रेक्षकाला दोन घटका करमणूक हवी असते पण मी या मुद्द्याशी सहमत नाही की लेखकाची गरजच नसते. मुळात तुमचे हे जे फॉर्मुले आहेत ते कोठून आलेत? ते तुमचे स्वतःचे नाहीत. एखाद्या लेखकाची एखादी कादंबरी हिट होते त्यावर पिक्चर बनतो आणि मग त्याची कॉपी करून तसे अनेक पिक्चर बनतात आणि मग त्याचा फॉर्म्युला होतो. म्हणजे त्याचे श्रेय लेखकालाच जाते शेवटी! अर्थात असेही असेल की एखादा दिग्दर्शक मुळातच

एक प्रतिभावान लेखक किंवा संवाद लेखक असू शकतो. असा योग म्हणजे दुग्धशर्करा योग्य किंवा सोने पे सुहागा म्हणावा लागेल! पण विजय शेवटी लेखकाचाच!"

तेवढ्यात फोन वाजला.

"आपल्याला भारतातील एका प्रेक्षकाकडून फोन आलाय. आपण तो फोन घेऊया, हॅलो?"

"हॅलो, मी एक सामान्य सिनेमा रसिक बोलतोय. माझे नाव जय भोसले! मी केव्हापासून तुमची चर्चा बघतोय, ऐकतोय. मला काहीतरी सांगायचं आहे. मी जे सांगणार ते माझं आणि माझ्या अनेक मित्राचं मत आहे!"

"सांगा जय आपले मत! आम्ही सगळे ऐकायला उत्सुक आहोत!"

"तर मी काय म्हणत होतो की छब्बीसिया साहेबांची गाड्यांची तोडफोड आम्हाला आवडत नाही. आपल्या देशात लय गरिबी आहे. नुसत्या मनोरंजनासाठी गाड्या तोडफोड कशापायी करायच्या? त्यापेक्षा गरिबाला एकवेळ भाकर दिली तर तो दुवा देईल. आणि आमाला लेखकाशिवाय पिक्चर सहन होत नाही. पिक्चरला लेखक पायजेलच पायजेल! आणि एखादाच फॉर्म्युला एकदाच फक्त हिट होतो पण नंतर फ्लॉप होतात. त्या के. के. सुमनवर आम्हाला लय डाऊट येतो राव! इतके सगळे पिक्चर तो स्वतःच लिहितो आणि डायरेक्ट पण करतो? शक्य वाटत नाही राव. सुमन एवढाss हुशार आहे हे त्याच्या एकंदरीत अवतारावरून वाटत नाय!" आणि फोन कट झाला. प्रेक्षकांत एकच हशा पिकला आणि सुमन अस्वस्थ झाला. राजेश मनातून आनंदला....

सगळी चर्चा सॉलिड इंटरेस्टिंग होत चालली होती पण डोळ्यांवर आता झोपेचा अंमल येत चालला होता त्यामुळे सुप्रियाने टीव्ही बंद करून टाकला मात्र सुबोधकडे बेडरूमकडे जातांना तिच्या

मनात थोड्या वेळाकरता राजेशबद्दल विचार येऊन गेले, "राजेशच्या मनात काहीतरी नक्की वेगळे आहे. काहीतरी आहे ज्यासाठी तो धडपडतोय! राजेशचे इतर प्रोग्राम सुद्धा बघितले पाहिजेत. तो नक्की काहीतरी वेगळे करेल असं एकंदरीत वाटतंय! अगदी राजेशच्या पुन्हा प्रेमात पडावेसे वाटते आहे! छे! सुप्रिया! काय हे!" असे म्हणून तिने सुबोधला मागून येऊन मिठी मारली...

◸◸◸◸

# प्रकरण 31

काही दिवस मुंबईबाहेर असल्याने डी. पी. सिंग हे रागिणीबद्दलच्या टीव्हीवरील गौप्यस्फोटाबाबत मौन बाळगून होते. मौन बाळगण्याचे आणखी एक कारण म्हणजे ते सूरज ब्राझीलहून परतण्याची वाट बघत होते. तो कालच आला होता. मात्र मुंबईत पोहोचल्यानंतर दुसऱ्या दिवशी ते सूरजशी फोनवर बोलले तेव्हा मी सगळे बघतो, तुम्ही चिंता करू नका असे आश्वासन सूरजने त्यांना दिले होते.

कालांतराने एका हिंदी टिव्ही शोच्या सक्सेस पार्टीला जुहू येथील फाईव्ह स्टार हॉटेल "गोल्डन सिटीझन" मध्ये रविवारी संध्याकाळी रागिणी, सूरज, डी. पी., सुभाष भट, पत्रकार म्हणून राजेश, तसेच सोनी बनकर, तिच्या शो मधील इतर कलाकार यांच्यासह सिने क्षेत्रातील अनेकांना आमंत्रण होते. एव्हाना सोनी बनकर रियालिटी शो जिंकली होती. जवळपास महत्वाची अशी सगळी टीव्ही फ्रॅटर्निटी आणि काही प्रमाणात बॉलिवूड मधील मंडळी सुद्धा येणार होती. ती सक्सेस पार्टी आयोजित केली होती सर्वाधिक टीआरपी मिळवणाऱ्या एका ऐतिहासिक टीव्ही मालिकेच्या निर्मात्यांनी!! कारण त्यांच्या “चक्रवीर राजा विक्रमसेन!” या शोचे नुकतेच दोनशे भाग पूर्ण झाले होते.

प्रथम टीव्हीवरील त्या न्यूजने अस्वस्थ झालेली रागिणी पार्टीला यायला तयार नव्हती पण सूरजने आग्रह केला. विशेष म्हणजे तो रागिणीच्या भूतकाळाचा गौप्यस्फोट करणारा टीव्ही जर्नालिस्ट "सुधीर श्रीवास्तव" पण तेथे येणार होता. त्या टीव्हीवरील कार्यक्रमाबद्दल जास्त टेन्शन घेऊ नको असे सूरजने रागिणी सांगितले तसेच सूरजने त्या पत्रकारावर लीगल ऍक्शन घ्यायचे ठरवले होते. पण जर का त्याने माफी मागितली तर प्रकरण मिटवून टाकू असे रागिणीला सांगितले. असे अनेक धक्के सेलिब्रिटीजना पचवावे लागतात असे तो म्हणाला. ती शेवटी पार्टीला तयार झाली होती.

पण कितीही केले तरी त्यादिवशीनंतर आजतागायत ती एका अनामिक दडपणाखाली होती. आतापर्यंत तिने शिताफीने पत्रकारांपासून लपवलेले सत्य नेमके सूरज ज्यादिवशी ब्राझीलला गेला त्यानंतरच कसे काय पत्रकारांना समजले? राहुलने तर नाही ना हे सगळे केले? पण सूरजला

राहुलबद्दल सांगितल्यानंतर राहुलचा फोन येणे बंद का झाले? सूरजने त्याला धमकावले असावे! त्यामुळेच राहुलने टीव्ही चॅनेलला माझे पूर्वायुष्य सांगितले असेल!!

पार्टीच्या दिवशी संध्याकाळी कारमध्ये मुंबईतील रस्त्यांवर सूरजची कार धावत होती. सूरजसोबत रागिणी बसली होती-

"एनिवे रागिणी, राहुलचा फोन तुला पुन्हा आला होता का?"

"नाही!"

"पुन्हा फोन आलाच तर आपण काही ठोस ऍक्शन घेऊ! तसे मी त्याचा फोटो माझ्या काही विश्वासू सहकाऱ्यांना दाखवून काही माहिती मिळतेय का हे गुप्त रीतीने तपास करायला सांगितलंय. पोलिसांत गरज पडली तरच जाऊया! कारण पोलिसांचा उगाच ससेमिरा मागे लागतो, यु नो!"

यानंतर रागिणी काही न बोलता शांत विचार करत राहिली. म्हणजे अजून तरी सूरज राहुलशी डायरेक्ट बोलला नाहिए तर! सूरज ब्राझीलहून आल्यानंतर थोडा बदलला आहे असे तिला वाटल्यावाचून राहवले नाही. पण कामाच्या व्यापामुळे तसे असेल म्हणून तिने दुर्लक्ष केले. बराच वेळ कुणी कुणाशी बोलत नव्हतं...

"गोल्डन सिटीझन" च्या टेरेसवर म्हणजे बाराव्या मजल्यावर खास मोठे पार्टी लाऊंज होते. ते आजच्या पार्टीसाठी बुक केले होते. जसा अंधार पडायला लागला तसे टीव्ही आणि बॉलिवूड मधील चमकते वलयांकित तारे एकेक करून पार्टीत यायला सुरुवात झाली.

आजकाल टीव्ही पण बॉलिवूड इतकाच ग्लॅमरस झाला असल्याने एकेकाळी छोट्या पडद्याला नाकारणारे अनेक बॉलिवूड मधील लोक टीव्ही पार्ट्यांना आवर्जून हजेरी लावत. डिनर जॅकेट, डेंनीम जॅकेट, जीन्स पॅन्ट, शेरवानी, स्लीवलेस टीशर्ट , ग्रे, ग्रीन, ब्लु ब्लेझर्स अशा अनेक प्रकारच्या पोशाखात टीव्ही तसेच बॉलिवूड मधली पुरुष कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी, गीतकार, संगीतकार, गायक मंडळी अवतरत होती. ऐतिहासिक आणि पौराणिक सिरीयलचे कलाकार मात्र थोडे वेगळ्या वेशात आले होते कारण शूटिंग साठी जुन्या काळातील व्यक्तिरेखांप्रमाणे त्यांना तसे राहाणे भाग होते. कुणी टक्कल केलेले तर कुणी केस वाढवलेले असे सगळेजण आले होते.

तर स्त्रियांपैकी काहीजणी सलवार, स्लीव्हलेस टॉप, जीन्स, लो कट् ब्लाऊज आणि मुद्दाम कमरेखाली नेसलेल्या साड्या, तर काहीजणी अतिशय शॉर्ट स्कर्ट आणि खूप मोठा क्लिव्हेज दाखवणारे शॉर्ट टॉप, पार्टी गाऊन्स, वन पीस टॉप, वन पीस गाऊन अश्या प्रकारचे कपडे घालून आणि हातात पर्स आणि महागडे मोबाईल मिरवत येत होत्या. अनेक ग्लॅमरस स्त्रिया एकेक करून पार्टीत येत होत्या. त्यांनी वापरलेल्या वेगवेगळ्या सेंट्सचा सुवास त्या पार्टीला एक वेगळीच अनुभूती देत होता. काही स्पॉन्सर बिझिनेसमॅन मंडळींनीही हजेरी लावली होती. सोनी बनकर अंगाला घट्ट आणि फिट बसणारा, तिचे स्त्रीत्व दर्शवणारे अंग उठून दिसेल असा स्लीव्हलेस टॉप आणि अतिशय छोटी पण हिप्सचा गोलाकार ठळकपणे दर्शवणारी जिन्सची पॅन्ट घालून आली होती. त्यामुळे तिच्या गोऱ्या उघड्या पुष्ट पायांकडे आणि मांड्याकडे सगळ्या पार्टीतील पुरुषांची नजर होती. काही स्त्रिया तिला लाभलेले असे सौंदर्य पाहून मनातल्या मनात जळून नाक मुरडत होत्या. सोनी बनकर या पार्टीत तिच्या रियालिटी शोमधील कोस्टार "भूषण ग्रोवर" याच्यासोबत पोहोचली होती.

सोनीच्या चेहेऱ्यावरचा नेहमीचा अल्लडपणा आणि उच्छृंखलपणा ओसंडून वाहात होता आणि तो तिच्या कपड्यांशी मॅच होत होता. भूषण ग्रोवरचे दणकट बाहू पकडून पार्टीत येतांना तिला खूप गर्व आणि आनंद वाटत होता.

सुभाष भट त्यांची साडी घातलेली पत्नी रजनी घोसाळकर सोबत नुकतेच पोहोचत होते. सुभाष भटना आज सोनी बनकरला त्यांच्या आगामी हॉरर, थ्रिलर म्युझिकल चित्रपटात घेण्याबद्दलची

औपचारिक घोषणा करून सगळ्यांना आश्चर्याचा धक्का द्यायचा होता. तशी BEBQ च्या प्रोड्यूसरने थोडी पूर्वकल्पना सोनीला दिली होतीच!

पार्टीत स्टार्टर्स आणि सॉफ्ट ड्रिंक सर्व्ह केले जात होते. रागिणी आणि सूरज “ऑन द वे” होते तर राजेश घरून निघण्याच्या बेतात होता. तो बहुदा अश्या पार्ट्यांना हाफ स्लीव्ह ग्रे टी शर्ट आणि जीन्स घालायचा पण यावेळेस त्याने ग्रीन ब्लेझर निवडले जे त्याने नुकतेच ऑनलाइन मागवले होते खास अशा पार्ट्यांसाठी ज्यात तो फिल्मी पत्रकार म्हणून जात असे.

◸◸◸◸

# प्रकरण 32

शक्यतो सुनंदा त्याच्यासोबत अशा पार्ट्यांना येत नसे. फक्त एक दोनदा ती आली होती पण तिला ग्रामीण जीवनाची सवय अंगवळणी पडली असल्याने अशा पार्ट्यांना तिला अवघडल्यासारखे वाटे. मध्यन्तरी राजेशची आई त्यांचेकडे राहून गेल्यानंतर तिची एक दूरची काकू दोन महिन्यापासून त्यांचेकडे राजेशच्या इच्छेविरुद्ध येऊन राहात होती कारण सुनंदाला शहरात करमत नव्हते. काकू राहायला आल्यापासून सुनंदा राजेशवर संशय घ्यायला लागली कारण ती काकू सुनंदाला नेहेमी राजेश नसताना असे काहीतरी सांगायची ज्यामुळे तिला राजेशवर संशय निर्माण होईल!

"या फिल्मी क्षेत्रात काय खरं नसतं बरं! बायका लै लफडेबाज असत्यात! आपला मतलब साध्य करायला त्या कायबी करायला तयार व्हत्यात! माझ्या एका दूरच्या चुलत भावाकडून म्या ऐकलंया तसं! तो शुटिंगच्या ठिकाणी स्पॉट-बाय आसतो. त्यो सांगतो की त्यानं लै येळा एका कारमंदी एका फेमस नटीला एका लगीन झालेल्या डायरेक्टर सोबत लव्ह करताना पायलंय, त्या हिरोईनचा नवरा एक जानमाना यापारी हाय, बिझीनेशमॅन! त्याला हे लफडं माहिती नाय! नायतर..." विविध प्रकारे अशिक्षित हातवारे करून बांगड्यांचा खळ खळ आवाज करत ती अशा ऐकीव सुरस आणि चमत्कारिक कथा सुनंदाला सांगायची.

"खरंच कावो काकू असं असतं?" गावभोळी सुनंदा तिच्या बोलण्यात यायची.

"असतं मंजे? बिलकुल असतं! मला तो चुलत भाऊ अजुन काय काय सांगत आसतो! न सांगितलेलं बरं! आन या बायका राजेशसारक्या सध्यासुध्या माणसाला लवकर जाळ्यात ओढत्यात! असं झालं तर तुझा संसार संपलाच की सुनंदे! तू त्याच्यावर लक्ष ठिव! त्याच्या बोलण्या वागण्यात काय बदल होतो का, त्याच्या शर्ट, पॅन्टवर कसला बाईचा लिपस्टिक, लांब केस बारीक तपासत जा, शरीराचा बदललेला वास ओळखत जा म्हणते मी! काय? तुला आता हे सांगायला नको! बाई

माणसाला माहित पायजेत या गोष्टी! श्रेयापदा आणि जयदेवी या नट्यांचे पिक्चर पहाते ना तू नेहमी टीव्हीवर? त्यातून शिकत जा ना जरा!"

"व्हय! व्हय व्हय नक्की!", सुनंदा आणखीनच गोंधळून जायची आणि मान डोलवायाची.

"शक्य झालं ना तर त्याला म्हणा ही पत्रकार, टीव्ही सिनेमा वाली नोकरी सोडून दे आणि दुसरीकडे हाफिसात नोकरी कर! 9 ते 5", काकू मोलाचा सल्ला द्यायच्या. त्यांना राजेश सुनंदाच्या संसाराबद्दल काय आकस होता माहीत नाही पण जणू काही त्यांचा चाललेला सुखाचा संसार तिला सहन होत नसावा.

"नाही पण काक्कु! ते तर त्यांचे स्वप्न आहे! ते हे क्षेत्र ही नोकरी कधीही सोडणार नाही! ते मला तसं बोलले होते मागे!", सुनंदा म्हणायची.

मग ती "काक्कु" वेगवेगळे उपाय सांगे आणि मग सुनंदा राजेशच्या मागे तगादा लावायला लागली की दुसरीकडे नोकरी शोधा आणि त्याचेवर संशय घ्यायची. राजेश सुरवातीला वाद टाळण्यासाठी काही बोलायचा नाही पण नंतर वाद व्हायला लागले तेही अगदी मोठ्याने. राजेशला काकूंवर संशय होताच पण त्याचेकडे काही पुरावा नव्हता आणि बोलायला सोयही नव्हती.

सासू सुनेच्या सिरीयलसाठी तो अनेक कथा लिहायचा ज्यात संसारात लावालावी करणारी अनेक स्त्री पात्रे असायची पण तशा प्रकारचं एक जिवंत पात्र त्याच्या घरात आज ठाण मांडून बसलं होतं आणि तो काहीही करू शकत नव्हता! त्याचे जीवन म्हणजे त्याने लिहिलेली कादंबरी थोडेच आहे ज्याला तो हवे तसे वळण देईल?

सध्या तो त्याच्या प्रोफेशनल लाईफ आणि त्याच्या महत्वाकांक्षेकडे जास्त लक्ष देत होता. समिरणने त्याच्या म्हणण्यानुसार हिंदी चित्रपटाचे काम् सुरु केले होते. राजेशने त्या चित्रपटाच्या लेखनाचे काम संपवले होते. चित्रपटाचे शूटिंग जोरात सुरु होते. विशिष्ट दिवशी समिरण त्याला सेटवर बोलवून त्याचे इनपुट्स घ्यायचा. इकडे त्याचे फिल्मी लेखन तसेच टीव्हीवरील त्याचे फिल्मी कार्यक्रम लोकप्रियता मिळवत होते. के के सुमन कडे त्याची आणि त्याच्या टीमची वक्रदृष्टी होतीच!

आजच्या पार्टीत के के सुमन पण येणार होता कारण आता तो म्हणे यापुढे टीव्ही सिरियल्स पण प्रोड्यूस आणि डायरेक्ट करणार होता असे राजेशला त्याच्या टीममधील अशा खबऱ्यांनी सांगितले होते ज्यांना त्याने सेटवर आणि इतर ठिकाणी छोटी मोठी कामे मिळवून दिली होती आणि ज्यात ते खूप खूश होते कारण त्यांना विविध स्टार्सच्या आसपास वावरायला मिळायचे!

सारंग सोमैया हापण आता एका मराठी साप्ताहिकासाठी टीव्ही स्टार्सच्या मुलाखती घेणारा एक पत्रकार बनला होता. त्यानिमित्ताने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत तसेच टीव्ही क्षेत्रात त्याचा वावर वाढला होता. या सगळ्या गोष्टी यशस्वीपणे मॅनेज करतांना घरी निर्माण झालेल्या या "साँस बहू टाईप" प्रॉब्लेमचे मात्र त्याचेकडे सोल्युशन नव्हते. कथेत जर असे पात्र असते तर त्याने कदाचित त्या काकूंना सुनंदाचा पती खडे बोल ऐकवून हाकलून देतो असे त्याने लिहिले असते, पण येथे तो तसे करू शकत नव्हता कारण त्याचे परीणाम जेही होतील ते झेलण्याची त्याची तयारी आणि मानसिकता नव्हती...

तर आज तो पार्टीसाठी ग्रीन ब्लेझर अंगावर चढवतच होता आणि ती काकू त्यांच्या हॉल मध्ये टीव्ही बघत बसली होती तेव्हा बेडरूम मध्ये सुनंदा आली आणि राजेशला म्हणाली, "काय गरज होती एवढ्या महाग ब्लेझरवर खर्च करण्याची? खरं म्हणजे सारख्या सारख्या पार्ट्यांना जायची गरजच काय म्हणते मी?"

ऐन पार्टीच्या तयारीआधी अचानक हे प्रश्न आल्याचे बघून प्रथम राजेशला आश्चर्य वाटले आणि मग खात्री झाली की हे काम त्या टीव्ही बघत बसलेल्या खाष्ट बाईचे असणार! त्याने त्या काकूकडे नजर टाकली तर ती राजेशकडे बघून टीव्हीचे रिमोट हातात घेऊन उपहासाने तोंड वाकडे करत हसत होती, जणू काही आता सुनंदाला कंट्रोल करायचे रिमोट तिच्या हातात आहे असे ती दर्शवत होती. म्हणजे आता सुनंदाशी वाद घातला आणि नाही घातला तरी राजेशच्या डोक्याला ताण हा असणारच आहे हे उघड होते!

पण राजेश त्यातल्या त्यात काहीतरी उत्तर द्यायचे म्हणून शक्य तेवढ्या संयमाने म्हणाला, "असं बघ सुनंदा, आता विकत घेतलाच आहे हा ब्लेझर तर घालू दे ना मला. मग तो घ्यायची आवश्यकता होती की नव्हती हे नंतर पार्टीहून परतल्यावर आपण ठरवू!"

"हो का? बरंय बुवा तुमचं झगमगतं जग! बरं पण एकटेच तयारी करता आहात, मला विचारलं नाही की चलतेस का म्हणून?"

"अगं, तुला काल विचारले की आजच्या पार्टीला येणार का तर तू नाही म्हणाली होतीस आणि आता??"

"एकदा नाही म्हटलं तर तेच धरून ठेवलं? परत विचारता येत नाही? एवढी का मी नकोशी झालेय तुम्हाला!"

"बरं, आता विचारतो! परत विचारतो! चलतेस का?", येथे सावध पवित्रा घेऊन राजेश बोलत होता कारण विनाकारण राजेशने शब्द पकडून काकू “ध चा मा” करून सुनंदाला भडकवायची शक्यता होती.

"मी लक्षात आणून दिल्यावर मग तुम्ही मला आमंत्रण देता? आता तर मी मुळीच येणार नाही तुमच्यासोबत. पण घरी लवकर या! शक्यतो अकरा वाजेपर्यंत परत या!"

"लवकर येणं शक्य नाही सुनंदा! तुला चांगलं माहिती आहे की अशा पार्ट्यांना रात्री उशीर हा होतोच! तू आधी आली आहेस अशा प्रकारच्या पार्ट्यांना एक दोनदा आणि तुला चांगलं माहिती आहे !"

"आली होती म्हणूनच सांगतेय की लवकर या! कुणी आहे का एखादी सटवी तेथे तुम्हाला सोबत करायला? गळयात गळा घालून नाचायला? मागच्या वेळेस ती तुमच्या सारखी एक पत्रकार.. काय नाव होतं तिचं? हां! मोहिनी मोने! काय बाई कपडे घालते आणि काय सगळं अंग अंग मिरवते, शी बाई!?" मग तिचा शब्दांचा पेटारा असा काही उघडला की वाक्यांवर वाक्ये राजेशवर आदळू लागली.

थोड्या वेळानंतर, मुंबईतील रस्त्यांवरून नुकत्याच विकत घेतलेल्या कारमध्ये ड्राइव्ह करत राजेश सुटकेचा निश्वास टाकत होता. असे वादविवाद आता रोजचे झाले होते. त्याच्या आयुष्याने थोड्याच कालावधीत वेगळेच वळण घेतले होते. घरातून निघतांना मोठ्याने सुनंदा ओरडली होती ते त्याच्या कानात गाडी चालवतांना सारखं घुमत होतं:

"मी म्हणते सोडून का नाही देत तुमची ही नोकरी! मला आवडत नाही हा तुमचा फिल्मी तमाशा! एखाद्या ऑफिसात 9 ते 5 क्लार्कची नोकरी पकडा! डबा बनवून देत जाईन रोज! टिफिन! रोज खाऊन घरी येत जा...मी म्हणते काय गरज आहे त्या नटव्या सटव्या बायांसोबत नाचायची आणि जेवण करायची??.. आणि ती घोडी काय नांव तिचं? ती साउथची अप्सरा? “माया भैरवी”! पूर्ण पाय आणि अर्धी छाती उघडे टाकणारे कपडे घालून येते पार्टीत! भलती आवडत असेल नाही ती तुम्हाला? चार चार वेळा मुलाखत घेतली होती तिची तुम्ही म्हणून म्हटलं..." अशा प्रकारे ती बऱ्याच असंबंध गोष्टी सुद्धा बडबडत राहिली होती आणि राजेश चढलेला पारा उतरवत घराच्या पायऱ्या उतरू लागला होता.

कार चालवत चरफडत राजेश मनातल्या मनात खूप मोठ्याने विचार करत होता: "अरे, मूर्ख स्त्री! ज्या महत्वाकांक्षेसाठी मी सुप्रियाला सोडलं, ज्यासाठी मी आईचा एकसारखा तगादा ऐकून ऐकून तुझ्याशी लग्न केलं, तीच महत्वाकांक्षा, तेच क्षेत्र सोडून दे म्हणतेस?..आणि तुझं ते संशय घेणं कधी थांबणार? असा बिनबुडाचा संशय आता जर का तू सतत घेत राहिली तर कदाचित तुझ्या संशयाला मी खरे करूनच दाखवेन! साला! याला घरगुती वादळाचा वीट आलाय! त्या इष्टमनकलर काकूचा हात पिरगाळून तिला जाब विचारून घराबाहेर काढलं पाहिजे! घरची भांडणं आता सिनेमास्कोप एवढी जास्ती मोठी व्हायला लागलीत! 70 एम एम!"

विचारांतील संतापामुळे त्याने स्टिअरिंग व्हीलवर जोरात उजवा हात आपटला आणि त्यामुळे गाडी अचानक थोडी उजवीकडे वळून बाजूच्या वेगातल्या कारला थोडी स्पर्शून पुढे गेली. पण पटकन स्टिअरिंग व्हील सावरून मोठा अपघात होण्यापासून त्याने वाचवला. ती मागची कार वेगाने समांतर पुढे आली आणि त्या कारचा पुढचा काच हळूहळू खाली होऊ लागला. आता त्या कारमधला ड्रायव्हर वाद घालणार! नक्की! राजेशनेही काच खाली केला आणि उजवीकडे बघितले. आहे कोण त्या कारमध्ये?

अरेच्चा! मोहिनी मोने! वाचलो! दुसरं कुणी अनोळखी असतं तर? राजेशच्या कपाळावर आठ्या आणि चेहे्ऱ्यावर सुनंदासोबतच्या भांडणाच्या निराश रेषा पसरल्या होत्या.

मोहिनी म्हणाली, "अरे! काय रे राजेश काय झालं? अशा प्रकारे गाडी का चालवतोयस्? माझ्या माहितीप्रमाणे शक्यतो तू जास्त पीत नाहीस आणि मला एक सांग की पार्टीच्या आधीच कुणी घरूनच पिऊन निघतं का रे?"

राजेश मनात म्हणाला, “ आता हिला कसं सांगावं की हिच्यामुळेच एक काल्पनिक संशय निर्माण होऊन आता सुनंदाशी माझे भांडण झाले आहे!”

आणि मग तो मोठ्याने म्हणाला, "हे मोहिनी, समांतर गाडी चालवू नकोस, एक तर पुढे हो नाहीतर मागे तरी जा! नाहीतर या जास्त ट्राफिक वाल्या रोडवर आणखी अनेक ऍक्सिडेंट व्हायचे! आणि सॉरी, माझेकडून ते चुकून झालं आणि हॅलो, मी काही पिलेलो बिलेलो नाही बरं का, नॉटी गर्ल!" राजेश हसून म्हणाला.

अचानक मोहिनी भेटल्याने त्याच्या डोक्यातला ताण थोडा हलका झाला. मोहिनीने आज अतिशय आकर्षक पोशाख केला होता - खोल गळयाचा पिवळा टी शर्ट आणि शॉर्ट निळी जीन्स! तिच्याकडे पाहून राजेश क्षणभर देहभान विसरला!

तिची गाडी त्याच्या गाडीच्या पुढे झर्रकन घेत ती म्हणाली, "नो प्रोब्लम्, आपण पार्टीत बोलूया! आणि मी माझ्या गाडीला झालेल्या डॅमेजची वसुली कोणत्या न कोणत्या मार्गे करणार हे विसरू नकोस!" मिश्कीलपणे हसत ती म्हणाली आणि भरपूर वेगात ती त्याच्या खूप पुढे निघून गेली कारण राजेशने आधीच त्याचा वेग कमी केला होता आणि तो आता हळूहळू चालवत होता.

□□□□

# प्रकरण 33

जुहू येथील फाईव्ह स्टार हॉटेल "गोल्डन सिटीझन" च्या बाराव्या मजल्यावर टेरेसवरील पार्टी लाउंज मध्ये टेलिव्हिजन आणि सिनेक्षेत्रातील तारे तारका जमले होते. कुणी टेबलवर खुर्चीवर बसून तर कुणी उभ्याने खात आणि पीत होते. वर्तमानपत्र आणि टीव्ही पत्रकार आपापल्या कामात मग्न होते. राजेश आणि रागीणीच्या पूर्वायुष्याचा गौप्यस्फोट करणारा सुधीर श्रीवास्तव, सारंग सोमैया तसेच इतर पत्रकार त्यात होते.

सारंगने त्याच्या गावाकडील एका मैत्रिणीला, वीणा वाटवे हीला पार्टीत बोलवून एका हिंदी सिरियलच्या कास्टिंग डायरेक्टरशी तिची भेट घालवून दिली. तसेच तिची ओळख त्याने मिष्टी मेहरानशी करून दिली. तिला छोटासा रोलसुद्धा पुरेसा होता. मिष्टी तिला तिच्या एका शॉर्ट फिल्म मध्ये घेणार होती.

रागिणी आणि सूरज एका ठिकाणी उभे होते. डी. पी. सिंग हे त्या दोघांशी जुजबी बोलणे झाल्यावर दुसरीकडे निघून गेले. रागिणी टेन्स दिसत होती तर सूरज कसल्यातरी विचारांत गढलेला होता. बॅकग्राऊंडला म्युझिक सुरु होते. सोनी आणि भूषण ग्रोवर एकमेकांच्या कमरेभोवती हात घालून एकमेकांच्या डोळयात डोळा घालून डान्स करत होते. सुभाष भट आणि त्यांची पत्नी रजनी अनेकांशी ओळख आणि गप्पा करत होते. ते दोघेजण सोनीला आणि के. सचदेवाला भेटले आणि मग गप्पा मारत पुढे निघून गेले. राजेश सोनी आणि रागिणीला एकत्र भेटला पण सुप्रियाचा विषय निघणार असे वाटत असतांना त्याने त्यांच्यातून काढता पाय घेतला. मग तो सारंग सोमैय्याला भेटला. एलेना, नातशा, मिष्टी, जेसिका कर्टिस हे सुद्धा हजर होते.

बाजूला लावलेल्या एका स्टेजवर ऐतिहासिक सिरीयलचा निर्माता आणि काही कलाकार तंत्रज्ञ मंडळी उभी होती. विशेष म्हणजे अचानक बॉलिवूड मधील एका मसल्स मॅनचे म्हणजे अरमान खानचे तेथे आगमन झाले.

त्या ऐतिहासिक सिरीयलमधील राजाची लहानपणाची भूमिका करणारा चौदा वर्षाचा कलाकार सोहम सूरी याने बॉडी बिल्डिंगचे धडे या अरमान खान कडून घेतले होते आणि अरमानला सोहमची ऍक्टिंग खूप आवडायची. वेळ मिळेल तेव्हा तो "राजा विक्रमसेन" ही मालिका जरूर बघायचा.

त्याने माईक हातात घेतला आणि बोलू लागला, "मे आय हॅव युर अटेन्शन प्लिज स्वीट लेडीज अँड नॉट सो स्वीट जन्टलमेंन! प्लीज गीव्ह ऑल ऑफ देम अ स्टँडिंग ओव्हेशन! ऐतिहासिक सिरीयल बनाना कोई आसान बात नही है! बहोत सोचना और पढना पडता है! आजकल तो वैसे भी ये छोटा पर्दा बडे परदे से भी बडा हो गया है!"

थोडे थांबून मग अरमान पार्टीतून निघून गेला. मग नंतर त्या सिरियलमधील मुख्य कलाकारांचे, तसेच प्रोड्युसर, डायरेक्टर, आर्ट डायरेक्टर वगैरे यांचे इंटरव्ह्यू झाले. हा इव्हेंट टीव्ही चॅनेल्स लाईव्ह टेलिकास्ट करत होते. मग स्टेजवर सुभाष भट आले. सगळेजण आता त्यांचेकडे लक्ष देऊन होते.

त्यांनी माईक हातात घेतला आणि बोलू लागले, "आज मैं इस पार्टी में आकर गर्व महसूस कर रहा हूं! मैंने मेरी कई फ़िल्मो में टेलिव्हिजन ऍक्टर्स को चान्स दिया और वे आगे जाकर बडे कलाकार बन गये और बाद में उन्होने कई सुपरहिट फिल्मे दी. आज इस स्टेज पर मैं एक अनौन्समेंट करना चाहता हूं! वो ये है की, BEBQ शो की विनर सोनी बनकर को मैं मेरी आनेवाली म्युजीकल डान्स हॉरर फिल्म में ले रहा हूं!" त्याने सोनीला स्टेजवर बोलावले आणि आणखी एक अनौन्समेंट केली, "को-विनर जेसिका कर्टीस को भी इस फिल्म मी एक रोल दिया जायेगा और "राजा विक्रमसेन" के आर्ट डिरेक्टर निलेश देसाई मेरे फिल्म का आर्ट डिरेक्शन करेंगे और BEBQ का “कास्टिंग डिरेक्टर” इस फिल्म के लिए मेरा असिस्टंट डिरेक्टर रहेगा!"

उपस्थितांनी टाळ्या वाजवल्या आणि रागिणीला एक जबरदस्त धक्का बसला आणि रागिणी सूरजसोबत काही बोलणार अगदी त्याच वेळेस तिची नजर चोरून “एक्सक्यूज मी” म्हणून सूरज कुणालातरी भेटायला म्हणून गर्दीत पुढे निघून गेला.

सुधीर पण त्याच्या जागेवरून उठला आणि बाहेरच्या छोट्या डान्स फ्लोरच्या काचेच्या रूमच्या दिशेने जाऊ लागला. मध्ये स्टेजवर पुढे अनेक गोष्टी सुरु होत्या. सेलिब्रेशन झाले. रागिणीच्या मनात एक सुप्त आशा होती की तीच सुभाष भटच्या पुढील हॉरर चित्रपटात असेल पण सोनी? माझ्याच मैत्रिणीला सोनीला चान्स मिळाला हे चांगलेच झाले पण ...? खरे पाहता दोन समकालीन अभिनेत्रींच्या मधून विस्तव जात नाही पण रागिणी आणि सोनी यांच्यातील रिलेशन सौख्याचे होते. त्यामुळे रागिणीला सोनीचा द्वेष किंवा मत्सर वाटला नाही.

“आणि आजकाल सूरजचे वडिल पण माझेपासून दूरदूर राहात होते, ते का? सुभाष भटने सिंग यांचेकडे माझेसाठी चित्रपटाकरता शब्द तर टाकला नसेल? पण तसे असते तर सिंग यांनी मला सांगितले असते! रागिणी विचार करत बसली! कदाचित टीव्हीवरच्या बातमीमुळे आणि माझ्या झालेल्या बदनामीमुळे सिंग आणि सुभाष भट यांनी त्यांचा विचार बदलला असावा का?” रागिणी विचार करत राहिली.

स्टेजवर उशिराने आणखी एक व्यक्ती चढली. ती व्यक्ती नुकतीच पार्टीत आली होती. तो एक टक्कल पडलेला सावळा आणि लठ्ठ माणूस होता. त्याच्या उजव्या गालावर मोठा काळा डाग होता. दरम्यान आता फ्लॅश लाईट्स चमकत होते. तो माणूस अर्धी हिंदी आणि अर्धी मराठीत बोलू लागला, "के के सुमनला आज काही कारणास्तव वेळेवर पार्टीला येणे कॅन्सल करावे लागले लेकिन मैं उनका असिस्टंट और अनके फ़िल्मो का असिस्टंट डिरेक्टर ‘आर. रत्नाकर’ आज यहां अनौन्स करता हूं की केकेजीने भी विक्रमसेन के प्रॉडक्शन हाऊस के साथ मिलकर एक हिस्टोरीकल सिरीयल बनाने का फैसला किया हैं!...."

राजेश त्याच्या पत्रकारितेच्या कामामधून थोडा ब्रेक घेऊन मोहिनीसोबत ड्रिंक्स घेण्यात मग्न होता तेवढ्यात गंमत म्हणून मोहिनीने कोपराने ढोसून राजेशला स्टेजकडे बघायला लावले, "ए राजेश, ते बघ ना तिकडे स्टेजवर! केकेचा टकला असिस्टंट म्हणतोय केके म्हणे ऐतिहासिक सिरीयल बनवणार!..खि खि खि! लायकी तरी आहे का त्या केकेची? मी सिने वर्तुळात केके बद्दल बरेच काही ऐकले आहे."

राजेशने स्टेजकडे पहिले...

फ्लॅश लाईट्स मध्ये “आर. रत्नाकरचा” टकला चेहेरा चमकला आणि राजेशच्या डोक्यातपण लख्ख प्रकाश पडला...

त्याला आठवू लागले...

विनित आणि तो.

त्याच्या कथेची चोरी.

दिवाळी अंक कार्यालय.

रत्नाकर रोमदाडे नावाचा ऑफिस मधला माणूस.

त्या भाडेकरूने वर्णन केलेला तोच हा रत्नाकर.

उजव्या गालावर मोठा डाग.

सावळा, टाकला आणि लठ्ठ माणूस!!

आर. रत्नाकर.

हाच तो चोर.

याचेकडेच तर पोष्टाने पाठवली होती मी कथा.

हाच सामील असणार कथा चोरीमध्ये...

माझ्यासारख्या अशा कित्येकांच्या कथा याने चोरल्या असतील..

"मोहिनी, एक मिनिट जरा येतोच!", असे म्हणून ग्लास टेबलावर त्याच्या वायरलेस माईक जवळ ठेवत राजेश गर्दीतून स्टेजच्या जवळ जाऊ लागला.

"अरे, राजेश अचानक काय झाले?" असे मोहिनी म्हणाली पण ते ऐकायला राजेश तेथे नव्हता.

तोपर्यंत इकडे इतर काही पार्टीतले उत्साही पाहुणे काचेच्या रूम मधल्या डान्स फ्लोअरवर डीजेच्या तालावर नाचायला निघून गेले होते.

इकडे स्टेजवर पण म्युझिक सुरूच होते. राजेश स्टेजकडे गर्दीतून वाट काढत पोहोचणार तोपर्यंत रत्नाकरला कसला तरी फोन आला म्हणून तो स्टेजवरून उतरून बाजूच्या अंधाऱ्या टेरेसकडे फोनवर बोलायला जाऊ लागला. त्याचा पाठलाग करायचा म्हणून पुन्हा राजेश स्टेजकडून त्याच्या मागे जायला लागला.

टेरेस बरेच मोठे होते. पण सगळीकडे अंधार होता. रांगेने विविध रोपांच्या कुंड्या लावलेल्या होत्या. टेरेस वरून खाली खोलवर दिसणाऱ्या विविध वाहनांनी भरलेल्या रस्त्यांकडे बघत रत्नाकर केकेशी बोलत होता. राजेश गर्दीतून मार्ग काढत टेरेसकडे जात होता...

पण जातांना बॅकसाईडला एका खिडकीजवळ त्याला असे काही ऐकू आले की तो तिथेच थिजला. कुणीतरी फोनवर संशयास्पद रीत्या बोलत होते.

अंधारात तो माणूस राजेशला नीट ओळखू येत नव्हता पण डान्स फ्लोर रूममधून अधूनमधून येणाऱ्या फ्लॅशलाईट मुळे चेहरा दिसत होता पण त्या व्यक्तीचे राजेशकडे लक्ष नव्हते.

"कोण आहे हा? हो! करेक्ट! सूरज आहे हा! रागिणीचा बॉयफ्रेंड!"

सूरज बोलत होता: "अपनी दिल्ली की टीम का एक पंटर राहुल गुप्ता साला अपनी रागिणी का लव्हर निकला, साला ब्लॅकमेल कर रहा था उसे! चूप करा दिया उसे! अब बार बार फोन नही करेगा उसे! और सुधीर श्रीवास्तव को मैने ही कहां था रागिणी का सब सच टीव्ही पर बताने के लिये! जैसेही रागिणीने मुझे उसके अतीत के बारे में बताया जिसमे राहुल था तो मैने उसे तो चूप कर दिया, लेकीन मैने सुधीर की जबान खोल दी! दोस्त है वोह मेरा! उसे मैने टीव्ही प्रोग्राम बनाने को कहां! सिर्फ एक

दिन के लिये! बाद में मेरे कहने पर वो टीव्हीपर रागिणी की माफी मांग लेगा! मग मी रागिणीला सांगणार की कोर्टाच्या कारवाईची धमकी दिल्याने आणि अब्रू नुकसानीचा दावा ठोकण्याच्या भीतीने सुधीरने माफी मागितली! आणि मी हे का केलं सांगू? रागिणीचा आत्मविश्वास कमी करायचाय मला आणि हळूहळू या इंडस्ट्रीपासून दूर न्यायचे आहे मला तिला! तिने नाही ऐकले तर माझेकडे उपाय आहेत! शेवटचा उपायही आहे! मीच तर सुभाष भटची ऑफर तिच्यापर्यंत पोहचू दिली नव्हती.. हा हा हा!"

सूरज बरेच काही बोलत होता. राजेशला हे ऐकून धक्का बसला. सुप्रियाकडून त्याने सोनी आणि रागिणीबद्दल ऐकलेले होते आणि या क्षेत्रातील पत्रकार म्हणून त्याला बऱ्याच कलाकारांबद्दल माहिती होती. हे सूरजचे ऐकलेले बोलणे रागिणीला जरूर सांगितले पाहिजे असे त्याला त्याचे मन सांगू लागले.

हे ऐकत असतांना राजेशला आठवले की आपण रत्नाकरचा पाठलाग करत होतो. त्याने टेरेसवर नजर फिरवली. तेथे रत्नाकर नव्हता. त्याने लिफ्टकडे पाहिले. रत्नाकर लिफ्टमध्ये बसून खाली जाण्याच्या तयारीत होता त्याचे मागे राजेश जाणार इतक्यात सुनंदाचा कॉल आला. कॉल नाही उचलला तर घरी गेल्यानंतर एका मोठ्या वादविवादाला सामोरे जाण्यापेक्षा तो उचललेला बरा असे म्हणून त्याने कॉल उचलला, तोपर्यंत रत्नाकर लिफ्टमध्ये शिरून खाली निघून गेला.

सुनंदा विचारत होती की तो घरी केव्हा येणार आणि त्याने सांगितले की पार्टी संपल्यावर! तिने तो येईपर्यंत ती जागीच रहाणार असे त्याला बजावले. सुनंदाशी बोलून झाल्यावर त्याने पहिले आता तेथे सूरजही नव्हता.

सूरजचे फोनवरचे बोलणे रागिणीला सांगितलेच पाहिजे! पण कशाला उगाच त्यांच्या पर्सनल मॅटर मध्ये पडायचे? नाही राजेश! हा मामला काहीतरी वेगळा वाटतोय! मला रागिणीला सावध केले पाहिजे! माणुसकी म्हणून! एक पत्रकार म्हणून! सुप्रियाची ती एक रूम पार्टनर होती म्हणून!

हा फूड इंडस्ट्रीचा मालक मला काही बरोबर वाटत नाही! पण रत्नाकर सुद्धा निसटायला नको! मग त्याने मोहिनीला कॉल केला.

"अरे कुठे आहेस! इकडे ये! डान्स करुया!"

"मोहिनी ! ऐक! पटकन रागिणीला जाऊन भेट आणि तिला सांग की राजेशला तिला काहीतरी महत्वाचे सांगायचे आहे. राजेशला भेटल्याशिवाय जाऊ नकोस असे सांग! प्लीज! का, कसे असे प्रश्न विचारू नकोस!"

"बरं बाबा! सांगते!"

दुसऱ्या एका लिफ्टने राजेश रत्नाकरच्या मागावर खाली गेला. तो इमारतीच्या बाहेर पडला तोपर्यंत रत्नाकर गाडीत बसून निघून गेला.

राजेश विचार करु लागला: "आता लगेच याचा पाठलाग करण्यात काही अर्थ नाही. त्याचा नंबर घेऊन त्याचा ठावठिकाणा मी नक्की शोधणार! रत्नाकर वर टेरेसवरच पकडला गेला असता तेथेच अंधारात त्याला मी चांगला चोप दिला असता आणि सगळं कबूल करवलं असतं त्याचेकडून पण सूरज ....? ओह नो! मला रागिणीला सावध केलेच पाहिजे."

तो लिफ्टने पुन्हा वर गेला तेव्हा बहुतेक सगळे लोक डान्स फ्लोरवर गेले होते. सूरज बराच वेळ पार्टीत नव्हता आणि रागिणी थोडी नर्व्हस होवून टेरेसवर बाहेर बघत उभी होती. मोहिनीने तिला राजेशचा निरोप दिला होता. राजेश लगेचच रागिणी जवळ आला आणि म्युझिकच्या आवाजात तिला मोठ्याने म्हणाला, "मला तुझ्याशी महत्वाचे बोलायचे आहे."

प्रथम तिला आश्चर्य वाटले पण नंतर ती तयार झाली. ते दोघे टेरेस वर गेले. राजेशने वेळ न दवडता थोडक्यात तिला सूरजचे फोनवरील बोलणे सांगितले. ते बराच वेळ बोलत होते आणि ते इतर कुणाला ऐकू जाण्याची शक्यता तशी कमी होती कारण मोठ्याने म्युझिक सुरु होते आणि जवळपास जास्त कुणी नव्हते आणि जे लोक होते ते म्युझिकच्या तालावर नाचत होते.

शेवटी तो म्हणाला, "मला तुमच्या खासगी आयुष्यात नाक खुपसून काहीही करायचे नाही पण मी जे ऐकले आहे ते तुला सांगणे मला आवश्यक वाटले."

असे म्हणून तो जायला निघाला. रागिणीने त्याला काही अडवले नाही.

आता तिच्या डोक्यात विचार चक्र सुरु झाली. अनेक दिवसापासून तिच्या मनात जे काही संशयास्पद विचार येत होते ते खरे ठरत होते. "डी. पी. सिंग" यांची सध्याची वागणूक कदाचित सूरजच्या दबावामुळे तर नाही ना? सुभाष भट यांनी अचानक सोनीला कसा काय ब्रेक दिला? राजेशला मी सांगितले त्यानंतरच राहुलचे कॉल अचानक बंद झाले? त्यानंतरच नेमके सुधीरने टीव्ही वर माझ्यावर प्रोग्राम केला? माझ्या आयुष्यात रोहन नंतर जोडीदाराचे सुख लिहिलेच नाही का? सूरजला आजकाल काय झाले आहे? माझे काही चुकले का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे हळूहळू तिला सापडत होती. आता हे सगळे प्रश्न सूरजलाच विचारले पाहिजेत असे ठरवून ती सूरजला शोधायला गेली...

इकडे डान्स फ्लोअर वर डीजे वेगवेगळे आयटम साँग वाजवत होता आणि मोहिनी बेधुंद होऊन नाचत होती.

"आजा मेरे राजा, आजकी रात गुजार मेरी प्यासी बाहों में"

"देखके तेरा अंग अंग, चढ गया मेरे प्यार का रंग रंग"

"दिल मेरा दिल, चाहता है तो एक बस तुम्हे सुबह शाम "

राजेशने एकाकडून रत्नाकरचा मोबाईल क्रमांक मिळविला आणि आणखी काही व्यक्तींना भेटून मोहिनीकडे गेला. तिने ड्रिंक्स जरा जास्तच घेतली होती आणि ती जोरात आणि जोशात नाचत होती. आपल्याला सहन होईल आणि आपण स्वतःला कंट्रोल करू शकू एवढेच पिले पाहिजे असा विचार

मोहिनीकडे जाताना त्याच्या मनात आला. खरे तर तो तिला बाय करायला आला होता पण तिथे तो पोचेपर्यंत मोहिनी जवळपास शुद्ध हरपून बाजूला असलेल्या सोफ्यावर कलंडली.

ती आईवडिलांपासून वेगळी एका फ्लॅटमध्ये भाड्याने एकटी राहात होती. नुकताच तिचा ब्रेक अप झाला होता आणि त्यामुळे तिने अलीकडे जास्त प्यायला सुरुवात केली होती. या मोहिनीची कथा काही वेगळीच होती. तिला क्रिकेटचे वेड होते आणि ती ट्वेंटी ट्वेंटी आणि वन डे सामने नेहमी बघायला जायची. एका सामन्यादरम्यान संपत साधू या आयपीएल खेळाडूशी तिची ओळख झाली. मग काही सामन्यांदरम्यान एकमेकांना भेटणे सुरु झाले. पण तो खेळाडू कालांतराने काही आंतरराष्ट्रीय सामने खेळायला गेला. मोहिनी तेव्हा तेथे जाऊ शकली नाही. तेथून आल्यापासून संपत वेगळा वागत असल्याचा तिला दिसला. तो तिला टाळू लागला होता. काही दिवसांनी त्याने तिला एका मेसेजिंग एपवर आता "यापुढे मला भेटू नकोस" असे सांगितले. तिने नंतर त्याला भेटण्याचा आणि कॉल करण्याचा प्रयत्न केला पण त्याने रिप्लाय केला नाही. नेमके झाले काय, तिचे काही चुकले काय अशा प्रश्नांची उत्तरे तिला हवी होते पण ती उत्तरेपण तिला मिळाली नाहीत. जीवनातल्या पहिल्या प्रेमात फसवणूक आणि प्रेमभंग झाल्याने ती दुखावली गेली आणि अल्कोहोलच्या आहारी गेली.

नंतर राजेशमध्ये तिला एक चांगला मित्र सापडला. राजेशने तिला जीवनात अशा प्रसंगातून पुढे कसे जायचे याबद्दल तिचा चांगलाच ब्रेनवॉश केला.

सिनेक्षेत्रात केवळ शारीरिक पातळीवर असणाऱ्या आणि नंतर दोनेक वर्षांनी दुसरा पार्टनर शोधायचा, एकमेकांत मानसिकरीत्या अडकायचे नाही अशा प्रकारच्या मानसिकतेच्या काही फ्रेंडशिपच्या जमान्यात राजेश आणि मोहिनी हे मित्र मैत्रीण होते. त्यांची मैत्री शारीरिक पातळीवरची नसून प्लॅटोनिक रिलेशनशिप होती. पण त्यांचे वागणे एकमेकांशी इतके मोकळे होते की आपण मित्र आहोत पण स्त्री-पुरुष आहोत याचा त्या दोघांना विसर पडायचा आणि मग त्या दोघांबद्दल अनेकांच्या मनात संशय निर्माण व्हायचा.

मोहिनीने अनेकदा पर्सनल आयुष्यात राजेशचा सल्ला घेतला होता. तो तिला उपयोगी पडला होता. आता सुद्धा अशा नशाधुंद अवस्थेत राजेशशिवाय दुसरा पर्याय होता का तिला?

"राजेश मला सोडतोस का रे घरी? माझी गाडी उद्या माझ्या ड्रायव्हरला घेऊन यायला सांगेन मी!" ती बरळत होती. बारा वाजले होते. मोहिनीची विनंती अमान्य करून चालणार नव्हते. ती त्याची चांगली मैत्रीण होती. समोर काचेतून त्याला दिसले की रागिणी आणि सूरज एकमेकांशी तावातावाने काहीतरी बोलत होते.

रागिणीला सूरजचे फोनवरचे बोलणे सांगितले ते मी चूक तर केले नाही ना?

नाही राजेश! तू नेमका त्या फोनच्या वेळी तिथे उपस्थित होतास हा निव्वळ योगायोग समजावा का? मला जे योग्य वाटले ते मी केले. पार्टी संपली होती. बारा वाजून गेले होते. सगळेजण आता हळूहळू परत जायला निघाले होते.

□□□□

# प्रकरण 34

शेवटी राजेश मोहिनीला सोबत स्वतःच्या गाडीत घेऊन निघाला. ती अर्धवट धुंदीत राजेशच्या बाजूला बसली होती. मोहिनीने "यंग गर्ल" हा परफ्यूम लावला होता. त्याचा सुवास अगदी छान, मस्त आणि मादक होता. अगदी फक्त लेडीजला शोभेल असा!

थोडी कमी शुद्धीत असल्याने ती त्याला जास्त चिकटून बसली होती आणि त्यामुळे तिच्या शरीराचा गंध राजेशच्या शरिराला हळूहळू लागत होता. घरी जायला आधीच उशीर झाला होता त्यात अजून आता मोहिनीला सोडून आल्यानंतर आणखी वेळ होणार होता.

त्याने आतापर्यंत अनेक कथांमधून असे प्रसंग चितारले होते की रात्री कारमध्ये एक सुंदर तरुणी असतांना कार खराब होते, मग ते दोघेजण रात्र एका अज्ञात बंगल्यात घालवतात, मग पाऊस येतो, विजांचा कडकडाट होतो, मग ती तरुणी तरुणाला बिलगते आणि मग "ते" घडते किंवा मग रात्री तरुणी तरुणाच्या फ्लॅट वर थांबते आणि मग "ते" घडते अशा प्रकारचे अनेक प्रसंग लिहिले होते. मनातल्या मनात तो ते प्रसंग आठवून हसत होता. खऱ्या जीवनात असे घडत नाही! विशेषत: एक चांगली मैत्रीण सोबत असतांना??

मग एका लेखकाच्या दृष्टीकोनातून तो विचार करू लागला: तरुण तरुणी योगायोगाने कारमध्ये एकत्र आल्यावर खऱ्या जीवनात नेमके काय घडते किंवा घडू शकते? असा विचार करत असतांनाच त्याने एका शॉर्टकट मार्गाने गाडी वळवली कारण शॉर्टकट मारूनसुद्धा अजून अर्धा तास मोहिनीच्या फ्लॅटवर जायला लागणार होता आणि मग तेथून निघून अंदाजे रात्री अडीच वाजेपर्यंत तो घरी पोहोचणार होता...

बराच वेळ गाडी चालवत चालवत आता एक निर्जन रस्ता लागला होता. उद्या रत्नाकरचा माग काढायचा आणि काय काय करायचे याचा तो गाडी चालवतांना विचार करत होता.

रत्नाकारला त्याने जाब विचारायचे ठरवले की "मित्रा माझी कथा का चोरलीस? चोरलीस ते एका दृष्टीने चांगले केले की मला माझ्या लेखनाची पत कळली की माझ्या लेखनावर चित्रपट सुद्धा बनू शकतो! पण मित्रा, चोरी ती शेवटी चोरीच! अशा अनेक लेखकांच्या कथांची चोरी तू केली असशील! माझ्या प्रयत्नांनी मी येथपर्यंत पोहोचलो पण ते सगळे लेखक ज्यांच्या कथा तू चोरल्या असशील त्यांनी काय केले असेल? त्यांचे किती नुकसान झाले असेल?"

स्ट्रीट लाईटच्या प्रकाशात समोरच्या काचेतून चार माणसं काठ्या घेऊन अगदी रस्त्याच्या मधोमध उभी असलेली त्याला दिसली. त्याने गाडीचा वेग कमी केला पण तरीही ती माणसे रस्त्यातून बाजूला होईनात. ती सगळी माणसं दारू पिलेली दिसत होती असे एकंदरीत त्यांच्या अडखळत चालण्यावरून दिसत होते. राजेशने हॉर्न वाजवला पण ते रस्त्याच्या मधून तसूभरही बाजूला झाले नाहीत. शेवटी राजेशला गाडी थांबवावीच लागली कारण उलट्या बाजूने पटकन वळून परत जाण्याऐवढा रस्ता काही रुंद नव्हता.

आता काय करायचे या विचारात असतांनाच त्यातला एक माणूस मोहिनीच्या बाजूच्या खिडकीजवळ येऊन म्हणाला, "खोलो दरवाजा. इस लडकी को बाहर निकालो, बाहेर काढ तिला साल्या! पळवून नेतोस काय मुलींना रात्री? आमच्या हवाली कर तिला! अशा सेक्सी मुलींवर आमचा हक्क आहे!"

ते लोकल गुंड आहेत हे ओळखून राजेश गाडीचे काच खाली सरकवून आवाजात उसने अवसान आणि हिम्मत आणून खोटे खोटे म्हणाला, "माझ्याकडे बंदूक आहे, चुपचाप बाजूला हो आणि जाऊदे आम्हाला! नाहीतर मी गोळी घालेन एकेकाला! मी घाबरत नाही कुणाला! खून करून टाकीन मी तुमचा!"

तो आणि इतर गुंड हसायला लागले.

राजेशला न जुमानता त्या गुंडाने मध्ये हात घालून दरवाजा उघडला आणि मोहिनीला गाडीबाहेर खेचले. गुंडांजवळ काठ्या आणि चाकू होते. हे अगदीच अनपेक्षित आणि अचानक झाल्यामुळे राजेशपण पटकन दरवाजा ढकलून गाडीबाहेर आला. इतर तिघांनी मिळून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला पण तो चपळाईने गाडीच्या मागच्या बाजूला गेला आणि डिक्की उघडून त्यातील कॅमेराच्या स्टिक बाहेर काढून तो त्या चौघांकडे पळाला.

मोहिनी अर्धवट शुद्धीत असल्याने तिचा प्रतिकार कमी पडत होता. गुंडांपैकी दोघांनी तिला पकडून ठेवले आणि एका गुंडाने डोक्यातून आपण बनियन काढून टाकतो तसा तिचा टिशर्ट ओढून काढला. ओढतांना तिने विरोध केल्याने तो फाटला. आता फक्त मोहिनीच्या छातीवर एक छोटीशी ब्रा होती. ते तिच्याशी लगट करायला लागणार तोपर्यंत राजेश स्टिक घेऊन तिथे वेगाने आला आणि त्याने गुंडांना आव्हान दिले.

राजेश - "सोड तिला!"

गुंड1- "तूच सोडून दे तिला आमच्याकडे आणि चुपचाप गाडीत बसून घरी जा. नाहीतर तुझा मुडदा घरी जाईल!"

गुंड2- "अशे मस्त मस्त मस्त कपडे घालून ही गाडीतून रात्री बेरात्री तुझ्याबरोबर फिरते आहे आणि तू रे? मूर्खा! जंटलमन सारखा तिच्या शेजारी नुसता बसून राहिलास आणि निमूटपणे गाडी चालवत होतास?"

गुंड3- "तुझ्या जागी आम्ही असतो तर तिला केव्हाचा...जाऊ दे! तुझ्यासारख्याला सांगून काय उपयोग रे नामर्द माणसा! आता तिला आता आम्हीच सगळे मर्द गडी मिळून...!!!"

गुंड2- "या रस्त्याने जी पण मुलगी रात्री जाते ना ती आमच्या तडाख्यातून सुटत नाही! एकटी असो की दुकटी!"

राजेश स्टिकने प्रहार करायची योग्य संधी शोधत होता.

तो मिस्कीलपणे म्हणाला, "तिची हरकत नसेल तर ती येईल तुमच्याबरोबर! काय गं मोहिनी जायचं आहे का तुला त्यांचेबरोबर? ते म्हणतात की ते खूप तगडे मर्द गडी आहेत! तुझी हरकत नसेल तर जा तू त्यांचे सोबत! मला काहीच प्रॉब्लेम नाही"

त्यांना अनपेक्षित बोलण्यात अडकवून तो काठीचा झटका त्यांना मारण्याची संधी शोधत होता. हे मोहिनीलाही कळत होते. पण ती अर्धवट शुद्धीत होती.

मोहिनी नशेत हेलकावे खात म्हणाली, "नाही राजेश! मला या चार नामर्दांबरोबर कुठेच जायचे नाही आहे! पण मला यांना सगळयांना कुठेतरी पाठवायचे नक्की आहे! काय रे नामर्दांनो? जाणार का? "

राजेश, "कुठं गं? कुठं पाठवायचं म्हणतेस यांना?"

"यमाच्या रेड्यावर बसवून नरकात पाठवायचं आहे यांना! तिथे उकळत्या तेलाच्या कढईत चौघांना नंगे करून तळतील!" असे म्हणून तिने लहान मुली सारख्या टाळया वाजवल्या.

गुंड त्यामुळे भयंकर चिडले.

राजेश, "ठिक आहे! तू कशाला घेऊन जातेस? मीच पाठवतो त्यांना तेथे! साधारण अर्धा तास बेदम मारले की हे नक्की मरून जातील! मग डायरेक्ट नरकात!"

असे म्हणून त्याने संधी साधून चपळाईने अचानक हमला करून त्याच्या हातातली स्टिक जोरारोराने फिरवली आणि गुंडांच्या हातातील चाकू आणि काठ्या खाली पाडल्या.

ते चारही जण चवताळले. एकाने मोहिनीला घट्ट धरून ठेवले आणि इतर तिघांनी राजेशवर लाथा बुक्क्यांचा प्रहार करायला सुरुवात केली. राजेशनेपण प्रत्येकावर प्रत्युत्तर म्हणून लाथा बुक्क्यांनी जोरजोरात प्रहार करून त्यांना खाली पाडले. एकेक जण पुन्हा पुन्हा आला पण राजेशने चपळाईने त्यांना बेदम मारले.

असे म्हणतात की अशा अटीतटीच्या प्रसंगी सामान्य माणसात सुद्धा असामान्य ताकद येते! तशीच काहीशी ताकद राजेशच्या अंगात संचारली होती. चार गुंडांपैकी एकाच्या जबड्यावर राजेशची लाथ बसली आणि तो ओरडत खाली पडला. तोपर्यंत चौथ्याने मोहिनीला सोडले आणि इतर तिघांच्या मदतीला धावला. राजेश तिघांवर सतत प्रहार करत होता.

इतर तिघे सावरत असतानाच त्या चौथ्याने एक काठी उचलली आणि राजेशकडे जोरात भिरकावली. राजेशने उडी मारून काठी पकडली आणि चपळाईने कारच्या छतावर चढला आणि काठीसहित त्याने त्या चौथ्या गुंडावर उडी मारली आणि त्या चौथ्या गुंडासहित राजेश इतर तिघांच्या अंगावर पडला. मग चपळाईने उठून राजेशने आजूबाजूला जेही सापडेल जसे की दगड, धोंडे, काच त्या सगळयांचा उपयोग केला आणि एकेकावर हल्ला केला.

राजेशला या सगळया प्रकरणात बरेच खरचटले.

गुंड मार खाऊन कण्हत पडले असतांना राजेश म्हणाला, "हे तर फार लेचेपेचे गरीब गुंड निघाले मोहिनी! गुंडानो, तुम्हीही काय याद राखाल की एका लेखकाच्या हातून मार खाल्ला! पेन ने लिहून लिहून, कॉम्प्युटरवर टाईप करून करून आम्हा लेखकांचा जरा हातांचा व्यायाम जास्तच होतो मग हात अशे स्ट्रॉंग बनतात! तुम्हाला आता सोडून देतो! तुमच्या नरकात जायची वेळ आता अजून आलेली नाही! पण लवकरच येईल!"

ते गुंड पुन्हा सावरेपर्यंत तेथून निघणे सोयीस्कर होते कारण जास्त प्रकरण वाढवले तर सहाही जणांपैकी कुणाच्याही जीवावर बेतू शकले असते म्हणून राजेश आणि मोहिनी पटकन गाडीत जाऊन बसले. राजेशने जवळपास मोहिनीला खेचूनच पटकन गाडीत बसवले आणि त्याने गाडी जवळच्या एका मोकळया मैदानातून विरुद्ध दिशेने वळवली आणि मार्ग बदलला.

ते गुंड पुन्हा उठून उभे राहिले आणि कारवर दगडफेक करू लागले पण तोपर्यंत कार बरीच पुढे निघून गेली होती.

मोहिनीने राजेशनचे मनापासून आभार मानले आणि नंतर कारमध्ये या प्रसंगाबद्दल दोघेही एकमेकांशी फारसे बोलले नाहीत. गाडी चालवत असतांना मोहिनीच्या सौंदर्याकडे त्याचे अचानक लक्ष गेले. एवढ्या जवळून त्या सौंदर्याकडे बघतांना क्षणभरासाठी राजेशचे भान हरपले कारण सुनंदाव्यतिरिक्त त्याने इतर दुसऱ्या कुणा स्त्रीचे असे अर्ध-अनावृत्त आणि इतके रेखीव सौदर्य आणि तेही इतक्या जवळून बघितले नव्हते - अगदी सुप्रियाचे सुद्धा!

दुसऱ्या क्षणीच त्याने स्वत:ला सावरले आणि आपली नजर मोहिनीच्या छातीवरून बाजूला केली.

या सगळ्या गडबडीत तिचा फाटलेला टीशर्ट त्या ठिकाणी जमिनीवरच राहिला होता, हे तिच्या लक्षात आले. राजेशची नजर लक्षात आल्यानंतर मोहिनीने दोन्ही हातांनी आपली छाती झाकली. मग राजेशने गाडी थांबवून तिला अंग झाकायला मागच्या सीटवर ठेवलेला त्याचा ग्रीन ब्लेझर दिला आणि तो तिच्याकडेच राहू द्यायला सांगितला कारण तिच्या सोसायटीत सीसीटीव्ही कॅमेरे होते. ती तशा अवस्थेत फ्लॅटवर परत जाऊ शकली नसती. तीला तिच्या फ्लॅटवर दोन वाजता सोडल्यानंतर राजेश घरी तीन वाजता पोहोचला.

सुनंदा जागीच होती. तिने दार उघडले. हॉल मध्ये काकू झोपलेल्या होत्या. खरचटलेले त्याने अँटिसेप्टिकने धुतले, तोंडावर पाणी मारले. मग तो बेडरूम मध्ये गेला. नाईट लॅम्प चालू होता. पटकन नाईट पॅन्ट घालून तो हळूच झोपायला सुनंदाजळ सरकला. पांघरूण घेतले. झालेला प्रसंग त्याला आठवला.

"जास्त पिलेल्या मोहिनीला एवढ्या रात्री तिच्या घरी सोडण्याची जबाबदारी मी उचलली खरी पण नसत्या प्रसंगातून निभावलो हे बरे झाले!" असा विचार तो करत होता आणि त्याने सुटकेचा निश्वास टाकला.

रागिणीच्या जीवनात जे चाललं होतं ते ऐकून त्याला आश्चर्य वाटत होते आणि आपण काल रागिणी आणि मोहिनी दोघांना अनपेक्षितरीत्या मदत करण्यास कारणीभूत झालो याबद्दल त्याला एक

चांगली फिलिंग आली आणि रत्नाकरचा शोध तर अचानक लागला पण या गडबडीत तो आपल्या हातातून मात्र निसटला याचे त्याला वाईट वाटत होते.

त्याला आता झोप लागणे अशक्य होते. सारंग सोमैयाला बोलावून त्याच्या मदतीने रत्नाकरला पकडून त्यांचेकडून छडा लावलाच पाहिजे असे त्याने ठरवले आणि ते काम उद्याच सुरु करायला हवे असे त्याने मनोमन ठरवले. सकाळ कधी होते याची तो वाट पाहू लागला.

सुनंदा जागीच होती, ती हालचाल करू लागली आणि तिच्या एकंदर हालचाली आणि हावभावांवरून वाटत होते की तिला आता लगेच राजेशसोबत सेक्स हवा होता पण राजेशच्या मनात एकूणच घडलेल्या प्रसंगांबद्दल आणि रत्नाकरचे निसटणे याबद्दल जे काही चाललं होतं त्यामुळे त्याला आता सेक्सची मुळीच इच्छा नव्हती. तिने दहा मिनिटे त्याच्या अंगावर सगळीकडे तिचा हात फिरवून पाहिला, तिच्या अर्धनग्न शरीराचा त्याला ती स्पर्श करू लागली. पण त्याच्या तुटक आणि अलिप्त हालचालीवरून तिला त्याची अनिच्छा कळली. मग तिने प्रयत्न सोडले आणि थोडे दूर सरकून झोपली.

राजेशला आठवत होते की सुनंदासोबत रात्रीचे सुखाचे क्षण फार कमी वाट्याला आले होते. सुरुवातीलाच तिचे वडील वारल्यानंतर काही दिवस असेच गेले, मग त्यानंतर रूम शोधल्यानंतर तिला मुंबईत आणले आणि दोघांचे सूर जुळणार तेव्हढ्यात ही काकू अचानक येऊन धडकली. मग त्यांच्यातले ते सुखाचे क्षण फारसे वाट्याला आले नाहीत. फक्त काही दिवसांपूर्वी एकदा काकूला मुंबईमधल्याच एका दूरच्या नातेवाईकाकडे मुक्कामी पाठवले ते दोनचार दिवस आणि रात्र त्यांचा सेक्स कधी नव्हे तेवढा उत्कट झाला होता ज्याद्वारे ते दोघेजण प्रथमच समाधानी झाले होते... आणि त्यानंतर आता??

ही आजची रात्र!!

पाच मिनिटांनी काहीतरी संशय येऊन सुनंदाने अचानक तोफेसारखा त्याच्यावर शाब्दिक हल्ला चढवला,

"तुम्ही आलात ते मी बेडरूम मधून पाहिले. तुमच्या अंगावर ब्लेझर नव्हते. ब्लेझर कुठे गेले? आणि तुमच्या सेंटचा वास वेगळाच येतोय. जातांना असा वास नव्हता काही! कुठे गेला होतात का पार्टीनंतर?"

राजेश अतिशय सौम्यपणाचा आव आणून म्हणाला, "ओह् नो! अगं ब्लेझर विसरलोच वाटतं पार्टीत! ठीक आहे! मी कुणाकडून तरी मागवून घेईन ते उद्या परवा. अगं आणि वास तोच तर आहे, कुठे बदललाय! तुझं आपलं काहीतरीच! सारखा संशय घेतेस!"

मोहिनीला रात्री तिच्या घरी सोडायला गेलो होतो हे चुकूनही तिला समजता कामा नये नाहीतर तोफेऐवजी हायड्रोजन बॉम्बचा सामना करावा लागेल याची त्याला जाणीव होती.

त्याचे स्पष्टीकरण न पटल्यासारखे तोंड करून म्हणाली, "आता झोपा! उद्या बोलू! खरं खोटं काय ते उद्या पाहू! काकूंसमोरच तुमची खबर घेते मी उद्या!"

हे ब्लेझर प्रकरण आपल्याला भोवणार असे वाटत असतांनाच सुनंदाचे शाब्दिक वादळ अनपेक्षितपणे अचानक शांत झालं पण ते दुप्पट वेगाने केव्हातरी येणारच होते हे राजेशला माहिती होते पण, "आजच्यापुरते वाचलो म्हणजे किमान मला आता उद्याचा रत्नाकर रोमदादडेचा प्लॅन आखता आखता विचार करत करत झोपेचे सोंग घेता येईल!" असे म्हणून राजेशने तोंडावर पांघरून घेतले आणि रत्नाकर रोमदाडे आणि के के सुमनला नामोहरम करण्यासाठी प्लॅन आखू लागला.

सुनंदा झोपून गेली होती आणि घोरायला लागली होती. तासभर वेगवेगळे प्लॅन त्याच्या मनात आले, पण बेडवर पडून राहणे त्याला असह्य झाले, तो उठला आणि फ्रिजमधून पाणी प्यायला. मग जवळच्या पुस्तकांच्या कपटाजवळ जाऊन त्याने एखाददुसरे पुस्तक काढले, लॅम्प लावला आणि

बाजूच्या टेबल खुर्चीवर बसून वाचू लागला. सकाळ होईपर्यंत त्याला कसातरी वेळ काढायचा. त्याला सगळया जुन्या घटना आठवायला लागल्या.

बराच वेळ तो वाचत बसला. सकाळचे पाच वाजले. वाचण्यात लक्ष लागत नव्हते. बाजूला टेबलवर त्याचा मोबाईल त्याने ठेवला होता. त्यात एक न्यूज नोटिफिकेशन आले.

सहज म्हणून त्याने ते पहिले त्यात लिहिले होते –

"प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रागिणी राठोडची तिच्या बॉयफ्रेंडच्या फ्लॅटच्या गॅलरीतून उडी मारून रात्री आत्महत्या! अजून डिटेल तपशील उपलब्ध झाला नाही."

राजेशला शॉक बसला. त्याने रागिणीला सूरज फोनवर असलेल्या गोष्टी सांगितल्यानंतर ते दोघे भांडताना त्याने पहिले होते. पण म्हणून त्याचा शेवट काय आत्महत्येत व्हावा?

"सुनंदा, उठ! मी जरा जाऊन येतो! एक बातमी कव्हर करायची आहे, एक आत्महत्येची केस आहे!" असे म्हणून तयारी करून राजेश जायला निघाला.

"अहो, थांबा जरा, आताच तर आले आणि लगेच चालले कुठे?" सुनंदा थांबवत म्हणाली. काकू पण उठल्या होत्या. त्या मोठमोठ्याने आवाज करत गुळण्या करत होत्या पण त्यांचे लक्ष पूर्णपणे त्या दोघांकडे होते.

"टीव्ही वर बातम्या लाव आणि बघ! मी तुला नंतर फोन करतो. आता मला जाऊदे!", असे म्हणून राजेश निघालासुद्धा!

□□□□

# प्रकरण 35

ही बातमी मोहिनीला कळताच तिनेसुद्धा पटकन तयारी केली, टीशर्ट आणि जीन्स घातली, हातात माईक घेतला आणि घाईघाईत बाजूला पडलेले राजेशचेच ब्लेझर घालून रागिणीच्या फ्लॅटकडे कॅमेरामनसोबत पोहोचली.

ती कॅमेऱ्यासमोर पाहून बोलत होती आणि बातम्या देत होती. राजेश तेथे नंतर पोहोचला. तोही बातम्यांचे डिटेल्स घेत होता. राजेशचे ब्लेझर घालून मोहिनी बातम्या देत असतांना टीव्हीवर सुनंदा आणि तिची काकू बघत होत्या. तिने काकूला त्या ब्लेझरबद्दल सांगितले. काकूंच्या म्हणण्याप्रमाणे झाले. सुनंदाचा संशय पक्का झाला की राजेश पार्टीनंतर मोहिनीच्या फ्लॅटवर थांबून मग घरी आला होता. काकूंना आयते कोलीत मिळाले. त्यांनी आणखी तिच्या मनात विविध संशयपिशाच्चे टाकली. सुनंदाने संतापाच्या भरात राजेशला कॉल केला पण "आपण कॉल करत असलेला नंबर उत्तर देत नाही" असा आवाज येत होता...

"आता सुनंदाचा कॉल उचलून उपयोग नाही, घरी गेल्यावरच जे काय व्हायचे ते होईल कारण तिने नक्की ब्लेझर मोहिनीच्या अंगावर टीव्हीत पाहिले असावे", असा विचार करून राजेशने घटनास्थळी काय होतेय याकडे लक्ष देणे जास्त पसंत केले. तशात लगबगीने मोहिनीने राजेशला त्याचा ब्लेझर शुटिंग चालू असतानाच परत केला. हेही सुनंदाने बघितले आणि टीव्ही बंद करून टाकला आणि दोघीजणी चहा पिता पिता खलबते करू लागली..

सूरज खूप दुःखात बुडालेला दिसत होता. राजेशला तर काहीच कळेनासे झाले. त्याला वाटत होते की रागिणीच्या आत्महत्येला तोच अप्रत्यक्षरीत्या कारणीभूत आहे. पण नंतर दुसरे मन त्याला सांगू लागले की त्याने सूरजचे जे बोलणे फोनवर ऐकले ते नुसते ऐकून सोडून देण्याइतका तो माणूसकीहीन नव्हता कारण सूरज जे काही बोलत होता ते केवळ त्याचे खासगी मॅटर म्हणून सोडून देण्यासारखे नक्की नव्हते. त्याने त्यावेळेस योग्य वाटले ते केले. विचारांतून बाहेर निघत त्यानंतर त्याचे पत्रकार म्हणून असलेले काम त्याने केले. पोलीस आलेले होते. पंचनामा वगैरे सुरु होता. मोहिनीच्या निरोप घेऊन त्याने घटनास्थळातून काढता पाय घेतला.

राजेशला या क्षणी जरा एकांत हवा होता. शांत एके ठिकाणी बसून याला योजना आखायच्या होत्या. रत्नाकर रोमदाडे शक्यतो के के सुमन सोबत क्वचितच दिसायचा. नाहीतर एरवी राजेशने अनेक पार्ट्या किंवा शोज मध्ये किंवा टेलिकास्ट मध्ये टीव्हीवर नक्की त्याला ओळखले असते पण काल तर तो प्रत्यक्ष समोर येऊन हातातून निसटला होता.

घटनास्थळाहून राजेश तडक सारंगच्या रूमवर गेला. दरम्यान त्याने सुनंदाला कळवायला फोन केला की तो काही कारणास्तव घटनास्थळाहून सरळ सारंगकडे जातोय पण दोन तीन वेळा ट्राय करूनही ती फोन उचलत नव्हती. काकूंचा फोन पण त्याने ट्राय केला पण कुणीही उचलला नाही. आता जर तो घरी गेला असता तर भांडणामुळे आणखी मूड खराब झाला असता. आता भांडण होणारच आहे तर रात्रीच होऊ दे, तोपर्यंत मी माझे रत्नाकर संशोधनाचे काम आटोपतो असा विचार त्याने केला आणि सारंगच्या घरी पोहोचला.

सारंगला फोन केल्यावर त्याला कळले की सारंगची पत्नी (बँकेत नोकरी करत असल्याने) घरी नव्हती आणि सारंगही आज घरी नव्हता मात्र सारंग त्याला एवढा मान द्यायचा की राजेशला त्याने बिनधास्त शेजाऱ्यांकडून चाबी घेऊन घरी बसायला सांगितले. सारंगला राजेशने थोडक्यात सगळी कल्पना दिली आणि आज दिवसभर शांततेसाठी त्याला सारंगच्या घरी थांबायचे आहे असे सांगितले.

गाडीतून राजेशने लॅपटॉप काढले, आणि सारंगच्या फ्लॅट मध्ये गेला. लॅपटॉप ऑन केला. किचन मध्ये जाऊन कॉफी बनवली. फ्रिजमधून ब्रेड काढून त्याचे सॅन्डविच बनवले आणि कॉफीचे झुरके घेत सारंगच्या फ्लॅटच्या टेरेसवर खुर्ची टाकून बसला. रागिणीची न्यूज त्याने लॅपटॉपवर तयार करून एडिटरला पाठवली. आता शांतपणे तो पुढे काय करायचे याचा विचार करू शकणार होता. मग त्याने लॅपटॉप बाजूला ठेवला आणि समोरच्या स्टूलवर पाय टेकवून दोन्ही हात मानेमागे घेऊन डोळे बंद करून विचार करत बसला...

बराच वेळ विचार केल्यानंतर मग त्याने लॅपटॉपवर सर्च करून रत्नाकरची माहिती काढली, त्याचा पत्ता शोधून काढला. सारंगला कॉल करून त्याने रत्नाकरची माहिती काढायला सांगितले होते. त्यासाठी सारंगने त्याच्या मासिकासाठी रत्नाकरचा इंटरव्ह्यू घायचा ठरवला. सारंग त्याच दिवशी

अपॉइंटमेंट घेऊन रत्नाकरला भेटायला त्याच्या ऑफिसमध्ये गेला. सारंग ज्या मासिकासाठी काम करत होता त्यात मुलाखत छापून येणे म्हणजे हमखास प्रसिद्धी असे समीकरण होते. इंटरव्ह्यू दरम्यान अनेक प्रश्न विचारून रत्नाकरची खासगी माहिती काढली. एकंदरीत रत्नाकरच्या बोलण्यावरून असे वाटत होते की त्यालाच एखाद्या इंटरव्ह्यूची आणि जास्त प्रसिद्धीची गरज होती. सध्या के के सुमन एका सिनेमाच्या शूटिंगसाठी लोकेशन शोधण्यासाठी आणि परमिशन घेण्याकरता परदेशात गेलेला होता.

मग सारंगने रत्नाकरकडून एक गोष्ट कबूल करवून घेतली की राजेशसुद्धा त्याचा काही दिवसांनी इंटरव्ह्यू घ्यायला येणार आहे आणि त्यावेळेस सोबत केकेच्या मुलाला पण सोबत असू द्या असे सारंगने सुचवले. रत्नाकारला जास्तीत जास्त प्रसिद्धी हवी होती म्हणून तो हो म्हणाला कारण रत्नाकर आणि के के चा मुलगा मिळून त्यांच्या एका आगामी चित्रपटासाठी स्टोरी लिहीत होते आणि स्टोरी जवळपास पूर्ण होत आली होती असे रत्नाकरने सारंगला सांगितले होते.

अशा प्रकारे रत्नाकारबद्दल बरीच माहिती सारंगने राजेशला फोनवर कळवली. या आणि इतर माहितीच्या आधारे सारंग आणि राजेश मनात वेगवेगळे प्लॅन बनत होते. रात्री सारंगच्या घरी बराच विचारविनिमय केल्यानंतर दोघांनी संगनमताने एक प्लॅन तयार केला आणि रात्रीचे जेवण केल्यानंतर राजेश आपल्या घरी जायला निघाला. गाडीत त्याच्या मनात मिक्स फिलिंग्ज होत्या. रागिणीची आत्महत्या, सुनंदाचे संशय घेणे, रत्नाकारचा लागलेला शोध, मोहिनी आणि त्याचेवर बेतलेला रात्रीचा प्रसंग आणि आता घरी गेल्यावर सुनंदाला तोंड द्यावे लागेल...

घरी पोहोचल्यावर त्याने बेल वाजवली. कुणीच दार उघडले नाही. त्याने स्वतःकडच्या चवीने दरवाजा उघडला. घरात सर्वप्रथम दर्शन देणाऱ्या काकू आता दिसत नव्हत्या आणि हाक मारल्यावर सुनंदाचाही ओ येत नव्हता. समोर टेबलवर एक चिठ्ठी पडलेली होती. त्यात काकूंच्या हस्ताक्षरात लिहिले होते.

"सुनंदाने कायम माहेरी जाण्याचा निर्णय घेतला आहे...

जर तुम्ही पत्रकार, लेखन आणि सिनेमा जगतापासून दूर जाऊन ऑफिसमधे 9 ते 5 वेळेतली नोकरी शोधल्यास ती परत येण्याचा विचार करेल!" - सुनंदाची काकू!

राजेशने कपाळावर हात मारला आणि सोफ्यावर बसला. आता शांत बसायांचे आणि गावाकडून आईचा फोन आलाच तर बघू काय करायचे ते असा विचार करून त्याने ती चिठ्ठी व्यवस्थित घडी करून एका प्लास्टिकच्या चौकोनी डबीत ठेवली आणि बेडखाली ठेऊन दिली. त्यावर उशी ठेऊन रात्रभर तो सुनंदाच्या बदललेल्या वागणुकीबद्दल आणि त्याला कारणीभूत असलेल्या काकूंचा विचार करत होता. काकूंचा काहीतरी बंदोबस्त करायला हवा पण त्याआधी मिशन रत्नाकर रोमदाडे!

सुनंदा काही दिवस माहेरी राहील आणि शेवटी अविचाराने घेतलेला तिचा निर्णय चूक आहे हे लक्षात येईल आणि ती परत येईल असा विचार करून तो उशिरा रात्री झोपला कारण त्याच्या मनात अनेक विचारांचा कल्लोळ चालला होता....त्याचे मन खूप थकले होते!....

राजेश एकटाच लिफ्टमध्ये चढला कारण सुनंदाला त्याने विनंती केली होती पण ती त्याच्यासोबत आली नाही. लिफ्टमध्येही दुसरं कुणी नव्हतं. 6 व्या मजल्याचे बटण दाबायला त्याने हात पुढे केला तेव्हा त्याला तेथे आकडे दिसत नव्हते. त्याऐवजी आकाराने मोठे होत जाणारे स्टार होते. क्षणभर काय करावे हे न सुचल्याने त्याने इकडेतिकडे पहिले आणि लिफ्टमधून उतरून जायचे ठरवले आणि लिफ्टच्या दरवाज्याचे बटण दाबले.

दार उघडले गेले. दरवाज्यासमोर केस मोकळे सोडलेली रागिणी उभी होती. अतिशय घाबरल्याने त्याने पुन्हा दरवाजा बंद केला आणि सगळ्यात मोठा स्टार असलेले बटन दाबले. लिफ्टने अचानक खूप वेग घेतला आणि ती विचित्र पद्धतीने हेलकावे खाऊ लागली आणि राजेशला समजेनासे झाले की ही लिफ्ट नेमकी वर जातेय की खाली जातेय किंवा मग जमिनीला समांतर रेल्वेसारखी पळतेय?

अचानक एक जोराचा धक्का देऊन लिफ्ट थांबली. दार उघडले गेले आणि समोर अंधूक प्रकाशात एक पांढरी दाढी असलेली वृद्ध व्यक्ती उभी होती पण त्याचा चेहरा दिसत नव्हता. तरीपण त्याला चेहरा ओळखीचा वाटत होता पण नेमका तो कोण आहे हे समजत नव्हते एवढ्यात त्या व्यक्तीने राजेशला मदत करण्यासाठी हात पुढे केला. राजेश त्याच्या हातात हात देणार तेवढ्यात लिफ्टमधून मागच्या बाजूने राजेशच्या खांद्यावर एक नाजूक हात पडला आणि मागे वळून बघणार तेवढ्यात

राजेश दचकून स्वप्नातून जागा झाला. त्याचा चेहरा घामाने डबडबला होता. सकाळचे पाच वाजले होते. नंतर दहा मिनिटे तो त्या स्वप्नाचाच विचार करत राहिला. आपल्याला असे स्वप्न का पडले असावे? फ्रिजमधून थंड पाणी काढून तो प्यायला आणि त्याने स्वप्नाचा विचार सोडून दिला आणि ब्रश करायला सुरुवात केली. आज तयार होऊन राजेशला रत्नाकरचा इंटरव्ह्यू घ्यायला जायचे होते. तयारी करून राजेश रत्नाकारच्या ऑफिसकडे निघाला. रत्नाकारला त्याने तसे कळवले आणि मग सारंगला फोन लावला.

"सारंग, मी पहिला इंटरव्ह्यू घ्यायला निघालोय. बाकी सगळे ओके ओके आहे ना?"

"होय राजेश. सगळे ओके ओके आहे. ऑन ट्रॅक आहे!"

"ठीक आहे. आपण यापुढील घडामोडींचे अपडेट रेग्युलरली एकमेकांना देत राहू! चल बाय!"

राजेशने रत्नाकरची अर्धा तास मुलाखत घेतली. या इंडस्ट्रीत तो आणि केके कसे आले हे त्याने जाणून घेतले.

मग राजेशने त्याच्या मनात तयार असलेल्या वेगवेगळया कथांचे विषय तोंडी रत्नाकरला सांगण्याचे आमिष दाखवले पण त्यासाठी रत्नाकरला राजेशसोबत डिनर आणि ड्रिंक्स घ्यायला यावे लागेल असे कबूल करवून घेतले. हे सगळे केके परदेशातून परत यायच्या आधी राजेशला उरकायचे होते.

# प्रकरण 36

केकेचा मुलगा पिके सुमन (पवन किशोर सुमन) हा पक्का पार्टीबहाद्दर आणि प्लेबॉय होता. तो चित्रपटांसाठी खूप चांगले नसले तरी बरे लिखाण करायचा आणि विशेष म्हणजे ते लिखाण कधीही चोरलेले नसायचे. पण केके आणि रत्नाकर मात्र ऑनलाइन आणि इकडे तिकडे छापल्या जाणाऱ्या असंख्य कादंबऱ्या आणि कथांतून कथेचा गाभा बिनधास्त चोरायचे आणि त्यात मीठ मसाला टाकून त्याचा चित्रपट बनवायचे आणि स्वतःच्या नावाखाली ते खपवायचे आणि त्याचे क्रेडिट स्वतः उकळायचे. पिकेला हे अर्थातच माहित नव्हते.

राजेश रत्नाकरला ज्या रात्री डिनर आणि ड्रिंक्ससाठी बोलावणार होता त्याच्या काही दिवसापूर्वी...

पिके एका पार्टीत धूम नाचला. आता वडील सध्या भारतात नसल्याने आणि त्याची आई ही वडिलांपासून वेगळी राहत असल्याने त्याला रान मोकळे झाले होते. त्या रात्री पार्टीत तो बेफाम नाचला. रात्रीचे बारा वाजले आणि एक आकर्षक पोशाख घातलेली महिला त्याचेकडे आली.

"हॅलो, मी रविना! हाऊ आर यू मिस्टर पवनकुमार सुमन?", पिकेच्या डान्स स्टेप्ससारख्याच डान्स स्टेप्स करत तिने पिकेला शेकहॅन्ड साठी हात पुढे केला.

पिकेची डान्स पार्टनर साक्षी तिच्याकडे बघू लागली. ती आणि पिके या रविनाला प्रथमच बघत होते. या आधी रविना कधीही त्यांना कुठे दृष्टीला पडली नव्हती.

"आय एम फाईन! पण सॉरी मी आपणाला ओळखले नाही. म्हणजे तू रविना आहेस ते तू सांगितलंस पण मी तुला ओळखत नाही!" पिके म्हणाला.

"मी लेखकांची चाहती आहे. विशेषतः तुमच्या कथा मला फार आवडतात!", रविना त्याच्या आणखी जवळ येत म्हणाली.

पार्टी, सुंदर मुली आणि लेखन हे तीन विक पॉईंट असलेल्या पिकेला पार्टीत एक सुंदर मुलगी त्याच्या लेखनाचे कौतुक करतेय म्हटल्यावर तो पघळला, नरमला.

"अ हो! थँक्स! थँक्स फॉर द कॉम्प्लिमेंट्स!" नाचतांना तिच्याकडे सरकत रविनाला पिके म्हणाला.

"वुड यु माईंड मी डान्सिंग विथ यु?" रविना त्याचे अधिक जवळ जात म्हणाली.

पिकेला रविनाचा आग्रह मोडवेना म्हणून मग नाईलाजाने त्याने साक्षीला जायला सांगितले. थोड्या नाईलाजानेच साक्षी त्याच्यापासून दूर झाली आणि अंधुक प्रकाशात उघडझाप करणाऱ्या डिस्को लाईट्सच्या प्रकाशात बेधुंदपणे डान्स करणाऱ्या काही जोडप्यांतून मार्ग काढत ती एका सोफ्यावर जाऊन बसली.

काही वेळाने जेव्हा अगदी मंद प्रकाशात संथमधुर संगीत सुरु झाले तेव्हा नाचतांना हळूहळू रविना आणि पिके हे दोघे एकमेकांच्या कानामध्ये कुजबूजत संभाषण करत होते.

रविना- "तुमच्या सर्व कथा मला आवडतात. मनात जे आहे ते स्पष्ट आणि रोखठोकपणे तुम्ही तुमच्या कथेत मांडता, हे मला खूप आवडते!"

पिके- "हो! जीवनाच्या विविध पैलूंवर मला लिहायला आवडते! जीवनातील कोणत्याही विषयावरचा कोणताही प्रसंग लिहायचा असल्यास मी कोणतीही आडकाठी न ठेवता त्याबद्दल लिहितो आणि चित्रपटातही ते तसेच असावे असा माझा आग्रह असतो!"

रविना- "विशेषतः प्रेमाबद्दल आणि सेक्सबद्दल तुम्ही जे स्पष्ट आणि रोखठोक लिहिता ते मला आवडते! काही लेखक फक्त सेक्स हा भाग मुद्दाम वगळून लिहितात!"

पिकेला अशी धाडसी मत व्यक्त करणारी मुलगी प्रथमच भेटली आणि आवडली!

पिके- "हो! अनेक कादंबरीकार अनेक कादंबऱ्या लिहितात, एखाद्याची पूर्ण जीवनकथा लिहून काढतात पण त्या माणसाच्या सेक्स लाईफचा त्या कादंबरीत साधा उल्लेखही नसतो! मला सांग रविना, माणसाच्या जीवनातील प्रत्येक पैलू हा महत्वाचा असतो आणि असा प्रत्येक पैलू संपूर्ण जीवनावर कमी अधिक परिणाम करणारा असतो. मग फक्त सेक्स हाच एक महत्वाचा पैलू टाळून एखादी कादंबरी लिहिली तर त्या कादंबरीतल्या विविध पात्रांना आणि त्यांच्या जीवनप्रवासाला आपण संपूर्ण न्याय देऊ शकू का? अर्थातच नाही!"

"अगदी बरोबर बोललात! मला हेच म्हणायचे होते!" असे म्हणत रविना आणखीन त्याचेजवळ सरकली.

साक्षीला हे पाहवत नव्हते. ती सोफ्यावरून उठली आणि दुसरीकडे गेली. तसा साक्षीला पिकेचा सुंदर मुलींबाबतचा विक पॉईंट माहिती होता. त्यामुळे हे तिला अगदीच अनपेक्षित नव्हते पण पिके भेटून तिला फक्त काही महिनेच झाले होते,  त्यामुळे थोडी जेलसी तिच्या मनाला स्पर्शून गेली इतकेच!

रविनाने पिकेला आपली अशी ओळख सांगितली की, ती या मुंबईतल्या फिल्म इंडस्ट्रीत कलाकार बनण्यासाठी आली आहे. टीव्ही किंवा फिल्म्स यात तिला करियर करायचे आहे आणि ती

मैत्रिणीच्या एका बंगलोमध्ये सध्या काही दिवस एकटी राहते आहे. मैत्रीण आणि तिचा नवरा परदेशातून परत आले की मग ती दुसरी रूम शोधेल.

* * *

त्या पार्टीनंतर रोज त्यांचे एकमेकांना फोन करणे सुरू झाले. मग चार पाच दिवसातच त्यांच्या प्रेमाचा असा काही अंकुर उगवला की त्याचे आठवड्याभरातच झाड होईल की काय असे एकंदरीत वाटत होते. सोबत बागेत फिरणे झाले, सिनेमा बघून झाले, हॉटेलिंग झाले, मॉल्स मध्ये फिरणे व्हायला लागले, एकमेकांच्या आवडीनिवडी एकमेकांना कळू लागल्या. तिने त्याच्या कथा वाचणे सुरु केले.

* * *

काही दिवसांनी एकमेकांना आलिंगन देणे तसेच परस्पर संमतीने किस घेणे वाढू लागले. बरेचदा किस घेताना पिके अनावर व्हायचा पण राविनाने त्याला हसवून अडवायची मग शेवटी एके दिवशी ती त्याला लाडिक हसत म्हणाली,

"पिके साहेब, तुम्ही प्रेमात बरेच फास्ट दिसता! कथेत लिहिता त्याप्रमाणे खऱ्या जीवनातही बिनधास्त दिसता! आज रात्री नक्की आपण प्रेमाच्या अत्युच्च आविष्कारात भ्रमण करूया! या लवकर संध्याकाळी सात वाजेपर्यंत! मी तयार राहते! माझ्या बंगलोमध्ये! मी वाट पाहाते! येताना लॅपटॉप पण घेऊन ये तुझा! तुझ्या कथा वाचायच्या आहेत, मोकळया वेळात! तुझ्या नव्या कथेतले सगळे प्रेम प्रसंग वाचायचे आहेत मला, म्हणजे आपण कदाचित त्या प्रसंगांसारखे प्रेम खरोखर अनुभवू शकू"

"व्हेरी नाईस आयडिया!" पिके म्हणाला.

त्या रात्री साडेसात वाजता-

त्याने अंगावरचे बहुतेक कपडे काढले होते. मग तिचे कपडे काढायची त्याला घाई झाली. त्याने तिला हात लावताच ती म्हणाली, "राजा, घाई करू नकोस! माझ्याकरता "रेड क्राऊन" चा पेग आण! आपण दोघे पिऊ! आजची रात्र मेमोरेबल झाली पाहिजे! कारण रेड क्राऊनशिवाय मजाच ती काय? पाच मिनिटांच्या अंतरावर शॉप आहे! जा, घेऊन ये ना प्लिज!"

पिके एका पायावर तयार झाला. त्याने पुन्हा कपडे घातले आणि म्हणाला, " बरंय मॅडम! आणतो! मी जनरली रेड क्राऊन घेत नाही. थोडी स्ट्रॉंग आहे पण हरकत नाही, तू म्हणतेस तर घेईन मी! पण त्यांनतर मात्र एकही जास्तीचा बहाणा चालणार नाही बरं का! एवढं तडपवू नका माझ्यासारख्या गरीब माणसाला! पाच मिनिटांच्या अंतरावर शॉप आहे, घेऊनच येतो स्वतः जाऊन!"

असे म्हणून तो जायला निघाला तेवढ्यात तिने त्याला थांबवले आणि म्हणाली, "तू येतोस तोपर्यंत मला तुझी नवी चित्रपटाची कथा दे ना वाचायला! तू मला वाचायला द्यायचे कबूल केले होतेस ना! प्लिज! बाकी सगळया कथा मी वाचल्या आहेत! विशेषतः त्यातील प्रेम प्रसंग मला वाचायचेत आणि तुझ्यासोबत ते जिवंत करायचेत!"

त्याने तिला त्याचे लॅपटॉप ऑन करून दिले आणि पासवर्ड टाकून दिला आणि वेगवेगळया फोल्डर्स मधून त्याच्या नव्या कथेच्या फाईल्स तिला वाचायला दिल्या आणि बाहेर निघून गेला. सेक्ससाठी अधीर झाल्याने त्याचे डोके चालणे जवळपास बंद झाले होते.

मग घाईघाईने लॅपटॉप मांडीवर घेत तिने दरवाजा बंद केला, तिच्या मोबाईलची मेमरी चिप बाहेर काढली, लॅपटॉपला कनेक्ट केली. पिकेच्या नवीन लिखाणाच्या सगळया फोल्डर्स आणि फाईल्स तिने कॉपी केल्या आणि मेमरी कार्ड पटकन मोबाईलमध्ये टाकले आणि मोबाईल परत जसाच्या तसा

लावला. तिची पर्स आणि इतर साहित्य घेऊन ती पिके यायच्या आत रस्त्यावरच्या गर्दीत मिसळून परागंदा झाली.

तिने पिकेला फोन करून सांगितले की तिच्या एका मैत्रिणीच्या आईला अचानक छातीत त्रास सुरू झालाय आणि मैत्रीण एकटी असल्याने तिच्या आणि आईच्या मदतीला ती रिक्षेने तातडीने जात आहे आणि ती त्याला नंतर भेटेल... सॉरी!

रेड क्राऊनच्या बाटल्या बेडवर ठेऊन तो संतापाने चरफडत होता, पण इलाज नव्हता. आपले लॅपटॉप सोबत घेऊन त्याच्या कारने तो साक्षीकडे जायला निघाला. दरम्याने त्याने रविनाला फोन केला पण स्विच ऑफ येत होता.

"मी नसतं का सोडलं हिला कारने, पण मला न सांगता ही अशी कशी निघून गेली?" असा विचार करतांना त्याच्या मनात रविनाची प्रतिमा येत होती. ती रात्र त्याने शेवटी साक्षीकडे घालवली.

दरम्यान राजेश एका बारमध्ये रत्नाकर सोबत ड्रिंक्स घेत होता. राजेशकडून अनेक नवीन कथा ऐकून त्यावर आधारित आयते अनेक चित्रपट बनवता येतील अशी इच्छा बाळगून रत्नाकर राजेश सोबत वेळ घालवत होता. एक विशिष्ट पेय रत्नाकारच्या नकळत त्याच्या पेयात मिसळल्यानंतर रत्नाकर भडाभडा राजेशला त्याच्या आणि केकेच्या एकंदर फिल्म इंडस्ट्रीतील प्रवासाबद्दल स्वत:च्या नकळत सगळे खरे खरे सांगू लागला. राजेश हा अशा काही लेखकांपैकी एक असेल ज्याची कथा आपण कधीतरी चोरली आहे याची पुसटशी सुद्धा कल्पना रत्नाकरला नव्हती.

"केके आणि मी उनाडक्या करणारे बेरोजगार युवक होतो. त्याची आणि माझी चांगली मैत्री होती. केकेची आई आणि गावातील लोक आमच्या उपदव्यापांनी त्रासले होते. केकेचा (किशोर) चा भाऊ कुमार याच्यासारखे अभ्यासात हुशार होण्यासाठी आमच्यावर दबाव यायचा. कुमार चांगल्या मार्कांनी पास व्हायचा तर किशोर आणि मी कॉपी करून काठावर पास व्हायचो. स्वतः मेहेनत न करता लोकांच्या मेहनतीची नक्कल करणे आणि त्यावर यश मिळवणे हा आमचा लहानपणापासूनचा आवडीचा खेळ!!

आम्हाला अभ्यासवगैरेंचा जाम कंटाळा यायचा पण चित्रपट बघणे आम्हाला खूप आवडायचे. मी आणि किशोर तासनतास विचार करत बसायचो की ही फिल्म इंडस्ट्री म्हणजे चमधमक आहे. येथे एकदा प्रवेश मिळवला की पुढे पैसाच पैसा आणि सुंदर सुंदर बायका. अभिनय कशाशी खातात किंवा चित्रपटासारखी कलाकृती बनवण्यासाठी काय मेहनत करावी लागते, सकस लिखाण करावे लागते हे आम्हाला माहिती नव्हते आणि कुणी सांगून ते आम्हाला पटलेही नसते.

त्या काळात सिंगल स्क्रीन थिएटर मधले सकाळी दहा वाजता लागणारे खास ऍडल्ट बी ग्रेड चित्रपट खूप पैसा कमवायचे. त्यामानाने त्या चित्रपटांना बजेट कमी असायचे. त्यात सुंदर सुंदर मुलीही काम करायच्या. आपण जर का अशा चित्रपटात काम केले तर आपल्याला पैसेही मिळतील आणि सुंदर सुंदर स्त्रियांचा सहवासही लाभेल या विचाराने आम्ही पछाडलो आणि मग आम्ही दोघे शेवटी गावातून पळून गेलो आणि मुंबईत आलो. रस्त्यांवर राहिलो. पडेल ती कामे केली. आमचे चित्रपटाचे वेड पाहून जेथे आम्ही काम करत होतो तेथील एकाने आम्हाला एका बी ग्रेड सिनेमा बनवणाऱ्या डायरेक्टर प्रोड्युसरचा पत्ता दिला. त्याचे नाव होते- केवलजीत! मग त्याने आमची टेस्ट घेऊन त्याच्या बी ग्रेड सिनेमात काम दिले. पैसे थोडेफार मिळत होते आणि सुंदर मुलींबरोबर काम करायला मिळायचे. तशा सिनेमात सिरीयसली अभिनय वगैरे फारसा करावा लागायचा नाही. मग आम्ही परस्पर एक धंदा सुरु केला!"

"कसला धंदा रत्नाकर? सांग ना!", राजेश म्हणाला.

"तुला माहिती आहे राजेश की भारतात फिल्म इंडस्ट्रीचे किती आकर्षण आहे ते! पूर्वीही आणि आजही भारतातील अनेक खेडे आणि शहरांतून अनेक मुली मुलं नशीब आजमावण्यासाठी हजारोंच्या संख्येने मुंबईत येतात. काही खरोखरीच अभिनयगुणसंपन्न असतात आणि त्यांना कालांतराने संघर्षानंतर यश जरूर मिळते. काहींमध्ये अभिनयगुण नसतात ते निराश होऊन परत जातात. पण काही जण विशेषतः त्यातील काही मुली ज्या घरून पळून वगैरे तर आलेल्या असतात पण त्यांच्यात अभिनयगुण नसतो पण सुंदर असतात आणि जीवनात खूप पैसे मिळवणे हेच यांचे ध्येय असते. रिच लाइफस्टाइल त्यांना जगायची असते. जीवनाची अनेक सुखे त्यांना भोगायची असतात. मग त्या स्वतःच्या शरीराचा उपभोग इतरांना घ्यायला देऊन येनकेन प्रकारे चित्रपटात विशेषतः बी ग्रेड चित्रपटात कामं मिळवतात.

मग आम्ही अशा प्रकारच्या मुलींना जाळ्यात ओढायचे सुरु केले. त्यांची शरीरं उपभोगली आणि त्यांना केवलजीतकडे पाठवायचो. काही मुली राजीखुषीने तर काहींना आम्ही बळजबरी करून आमच्याशी शरीरसंबंध ठेवायला भाग पडायचो आणि मग केवलजीतकडे पाठवायचो. त्यावेळी मुली आतासारख्या सजग नव्हत्या. अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला घाबरायच्या. केवलजीत पण त्यांच्याकडे शरीरसुखाची मागणी करायचा. पण आम्हीही त्यांना उपभोगायचो हे केवलजीतला कळले आणि ते त्याला आवडले नाही. आम्हाला दोघांना त्याने कायमचे कामावरून काढले.

मग नंतर आम्ही स्वतःची प्रोडक्शन कंपनी काढली कारण आमच्याकडे तोपर्यंत बराच पैसे आला होता आणि नेहमीप्रमाणे केवलकडे काम करून करून आम्ही जे काही फिल्म मेकिंग बद्दल शिकलो तेच आमच्या साठी आम्ही कामी आलं. कॉपी करायची आमची सवय कामी आली. इतरांच्या सृजनशीलतेवर जगण्याची आमची लहानपणापासूनची सवय होती तीच अंगावळणी पडली.

पण नंतर नंतर बी ग्रेडचे चित्रपट आणि मेनस्ट्रीम सिनेमा असा भेद जवळजवळ नष्ट झाला. मग आम्ही मेनस्ट्रीम सिनेमामध्ये नशीब आजमावून बघायचे ठरवले. तेव्हा आम्हाला चित्रपट बनवतांना अडचण आली ती सशक्त कथेची. आम्ही दोघे त्याबाबतीत मठ्ठ!!

काही दिवसानंतर एकदा मी रेल्वेत प्रवास करत होतो. बाजूच्या सीटवर कॉलेजचा एक मुलगा "डिटेक्टिव्ह कथा" नावाचा दिवाळी अंक वाचतांना दिसला. आपल्या आईला एका सस्पेन्स कथेबद्दल तो सांगत होता आणि म्हणत होता की अनेक हॉलिवूड आणि हिंदी, मराठी चित्रपटांना शोभतील अशा कितीतरी कथा दिवाळी अंकात छापून येत असतात, पण ते क्षेत्र कधीही या कथांची दखल घेत नाही असे दिसते.

झाले! माझ्या माझ्या मेंदूत 'कॉपी करण्याची सृजनशीलता' दाटून आली. मग दादरला मी तात्पुरते दिवाळी अंक कार्यालय उभारले आणि पेपरात जाहिरात देऊन महाराष्ट्रभरातून नवीन दिवाळी अंकासाठी कथा मागवल्या. हजारोंनी कथा आल्या आणि मग त्या कथा घेऊन आम्ही कार्यालयाला टाळा ठोकला. त्यातील एका कथेवर आम्ही "किस्मत का खेल" हा सिनेमा बनवला त्यात खुद्द अमितजींनी म्हणजे सुपरस्टार अमित श्रीवास्तव यांनी काम केले आहे! मग काळ बदलला तसा

इंटरनेटवर अनेक मराठी लेखक हजारो फ्री कथा लिहून टाकू लागले मग आम्हाला फुकटात खजिनाच सापडला! चोरून न्यायला!"

आताच त्याच्या कानाखाली चार पाच दणादण माराव्यात आणि त्याला रस्त्यावर फरफटत नेऊन दोनचार तगडे गुंड भाड्याने घेऊन त्याला धो धो बदडून काढावा असं राजेशला प्रकर्षानं जाणवलं पण त्याने स्वतःला सावरलं. शेवटी इतक्या उशिरा का होईना पण छडा लागला होता.

राजेश आणि रत्नाकर बसले होते त्या टेबलखाली एक माईक लावलेला होता आणि शेजारी असलेल्या एका टेबलवर वेष बदललेला सारंग सोमैया त्याच्या चष्म्याला लावलेल्या मायक्रोकॅमेरामधून ह्या सगळ्याची व्यवस्थित व्हीडिओ रेकॉर्डिंग करत होता. या सगळ्यांच्या बदल्यात राजेशने रत्नाकरला एक कथा फुकटात लिहून रत्नाकारच्या चित्रपटासाठी द्यायचे कबूल केले होते.

काही दिवसांनी –

वीणा वाटवे (जिला सारंगने गावाकडून मुंबईत टीव्ही आणि फिल्म इंडस्ट्रीत काम मिळवून देण्यासाठी आणले होते), राजेश आणि सारंग हे तिघे राजेशच्या फ्लॅटवर बसले होते.

सारंग म्हणाला, "तर मग रविनाजी उर्फ वीणाजी, ती पिकेकडून चोरलेली कथा मिष्टी मेहरानला दिली ना?"

वीणा, "होय! आपण ठरवल्याप्रमाणे मिष्टी लवकरच त्यावर एक तासांची शॉर्ट फिल्म बनवते आहे. लवकरच ती बनून पूर्ण होऊन "व्हीडिओ ट्यूब" वर अपलोड सुद्धा होईल. मग पिके, केके आणि रत्नाकर तिघांना जबर धक्का बसेल!"

राजेश, "ग्रेट! आता पिकेच्या इतरही काही कथांवर शॉर्ट फिल्म बनवा आणि जगभर जाहिरात करून त्यात लेखक म्हणून एक कुणाचेतरी काल्पनिक नाव टाका! त्या फिल्म्स रिलीज होताच बरोबर पिके आणि केके यांची मेहनत वाया जाईल आणि त्यांना कळेल कथाचोरीचे दुःख!"

सारंग, "आणि वीणा! त्या शॉर्ट फिल्म रिलीज होईपर्यंत तू अधूनमधून पिकेला भेटत राहा. हळूहळू त्यांचेपासून दूर निघून जा! असे की त्याला तुझ्यावर संशय येता कामा नये!"

वीणा, "होय! मी रविना बनताना खूप मेहनत घेतली, वेशभूषा बदलली, मेकप केला. इतकं की रविना म्हणून मी त्याच्या आयुष्यातून निघून गेल्यानंतर जरी वीणा म्हणून पुन्हा त्याचे समोर गेले तरीही तो मला ओळखण्याची शक्यता कमी आहे!"

राजेश, "वा सारंग! माझा शिष्य शोभतोस! खऱ्या जीवनात जर ही मुलगी एखाद्या काल्पनिक पात्राची भूमिका बेमालूमपणे वठवते तर सिरियल्स आणि चित्रपटांत तर धमालच करेल! वीणा, तुला मी आताच माझ्या टेलिव्हिजन शोसाठी को-अँकर म्हणून घेतो!"

वीणा, "थँक्यू राजेश सर!"

मग पुढचे काही प्लॅन आखले गेले.

मध्यंतरी राजेशला आईकडून काही कॉल आले खरे पण त्याने काहीतरी जुजबी बोलून आईला थोपवून धरले. सुनंदाचा मुक्काम सध्या तिच्या फेवरीट काकूंकडे होता. खरे तर त्या काकूला सुनंदाकडून राजेश आणि त्याच्या आईला मिळालेली संपत्ती डोळ्यात खुपत होती. तसेच तिचा मुलगा आणि राजेश याची तुलना ती लहानपणापासूनच करायची आणि राजेशला मिळालेले प्रसिद्धीवलय तिच्या डोळ्यात खुपायला लागले. म्हणूनच ती राजेश-सुनंदाचा घटस्फोट करवण्याच्या मागे होती हे कालांतराने राजेशच्या आईला कळून चुकले होते आणि आता सुनंदाला हे कसे समजवायचे आणि त्या काकूच्या प्रभावातून बाहेर कसे काढायचे आणि मग राजेशला हे सगळे कसे समजावून सांगायचे या विवंचनेत राजेशची आई होती पण राजेश सध्या काही ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हता! दरम्यान त्या काकूंच्या शेजारपाजारच्याकडून राजेशच्या आईला आणखी एक बातमी कळली...!!

* * *

मिष्टी मेहरानने पिकेकडून चोरलेल्या कथेवर एक तासाची सशक्त शॉर्ट फिल्म बनवली आणि व्हीडिओ ट्यूबवर रिलीज केली फक्त मुद्दाम शेवट थोडा बदलला. ती फिल्म पहिल्याच दिवशी चार लाख लोकांनी पहिली कारण त्या फिल्मला माऊथ पब्लिसिटी मिळाली.

दरम्यान वीणा रविना बनून पिकेला अधूनमधून भेटत राहिली. केके आणि रत्नाकरच्या चोरीचा भुर्दंड पिकेला भरावा लागला होता. खरं तर पिके काही कथाचोर नव्हता. काही पर्सनल गोष्टी सोडल्या तर प्रोफेशनली पिके खूप चांगला माणूस होता. विणाचे पिकेवर कालांतराने खरंच प्रेम बसले. तो तिला आवडू लागला.

नंतर केके परदेशातून परत आला. तोपर्यंत शॉर्ट फिल्मबद्दल पिके, केके आणि रत्नाकर या तिघांना कळले आणि त्यांना दुःखद आश्चर्याचा झटका बसला.

मिष्टी मेहरानकडे तिघांनी जाब विचारला आणि जवळची कथाही तिला दाखवली आणि चोरी मान्य कर नाहीतर कोर्टात केस दाखल करु अशी धमकी दिली.

पण मिष्टीने त्याला सांगितले, "एकच कल्पना दोन किंवा जास्त जणांना सुचू शकते मिस्टर केके! आणि लक्षात घ्या की तुमच्या आणि माझ्या कथेचा शेवट सारखा नाही. समजलं? त्यामुळे तुमचा दावा खोटा आहे. तुम्हाला कोर्टात जायचं तर खुशाल जा! मी निर्दोष सुटेन!"

हळूहळू विश्वासात घेऊन विणाने पिकेला त्याच्या कथांची चोरी तिने रवीना बनून कशी केली ते सांगितले आणि त्याच्या वडिलांच्या आणि रत्नाकारच्या भूतकाळातील चौर्यकृत्यांबद्दल सांगितले. त्यालाही आश्चर्य वाटले आणि त्याचा वडिलांबद्दल संताप झाला.

विणाने पिकेकडून वचन घेतले की जोपर्यंत राजेश केकेला योग्य धडा शिकवत नाही तोपर्यंत त्याने केकेला यातले काहीएक सांगू नये. कारण केकेला कोर्टात जाण्यापासून रोखणे, त्याची कथा चोरून जशास तसे बदला घेणे आणि केकेच्या आगामी चित्रपटाची कथा आधीच फोडून त्याचे जबर आर्थिक नुकसान करणे एवढाच फक्त राजेशचा उद्देश या सगळ्यामागे नव्हता तर केके आणि त्याच्यासारख्या इतर लोकांचा खरा चेहरा टीव्ही, बॉलिवूड इंडस्ट्रीसमोर आणणे हा उद्देश होता म्हणजे पुन्हा कुणी असे करायला धजावणार नाही.

नंतर पिके कडून चोरलेल्या आणखी दोन कथांवर मिष्टीकडून शॉर्ट फिल्म बनवून नेटवर फ्री अपलोड करण्यात राजेश यशस्वी झाला आणि समिरणला मराठीऐवजी हिंदी चित्रपट बनवायला सांगून बॉलिवूडमध्ये लेखक म्हणून राजेशचा शिरकाव आधीच झाला होता. तो आता योग्य वेळ आणि योग्य व्यासपीठ मिळण्याची वाट बघत होता.

# प्रकरण 37

राजेश एकटाच लिफ्टमध्ये चढला.

सुनंदाला त्याच्यासोबत आली नाही.

तो लिफ्टमध्ये एकटाच!

नंबर्सऐवजी आकाराने मोठे होत जाणारे स्टार!

लिफ्टच्या दरवाज्याचे बटण.. दार उघडले गेले. दरवाज्यासमोर रागिणी!

घाबरल्याने पुन्हा दरवाजा बंद!

मोठा स्टार असलेले बटन!

लिफ्टचा अनाकलनीय वेग आणि हेलकावे!

अचानक जोराचा धक्का, लिफ्ट थांबली!

दार उघडले गेले..

अंधूक प्रकाशात एक दाढी असलेली वृद्ध व्यक्ती!

चेहरा क्लियर दिसत होता!

येस! हे तर सुपरस्टार अमित श्रीवास्तव!

त्यांनी लिफ्टमधून राजेशला बाहेर येण्यासाठी मदतीचा हात पुढे केला!

मग खांद्यावर एक नाजूक हात?

कुणाचा हात आहे? बघूया तर खरं?

तेवढ्यात राजेश स्वप्नातून जागा झाला.

सकाळचे पाच वाजले होते!

सुपरस्टार अमित श्रीवास्तव! त्यांचा आजपर्यंत एकदाही इंटरव्ह्यू घेण्याचा प्रसंग राजेशला आला नव्हता. ते खूप बिझी स्टार होते. नुसते स्टार नाही तर ते सुपरस्टार होते. स्वप्नात त्यांनी मला मदतीचा हात दिला? का? माझ्या सध्याच्या संघर्षात त्यांची मला मदत होईल असा त्याचा अर्थ घ्यायचा का? तो पाठीवरचा हात कुणाचा? सुनंदाचा? नसावा कारण ती तर लिफ्टमध्ये आली नव्हती!

विचार करत करत राजेश उठला. ब्रश करून त्याने चहा घेतला आणि गॅलरीत जाऊन तो विचार करू लागला. सुनंदाविना रिकामे घर भकास वाटत होते.

सुरुवातीला अनिच्छेने लग्न केले असले तरी राजेश सुनंदाचा संसार नंतर रुळावर आला असे वाटत असतानाच काकूंच्या कालवलेल्या विषाने तोही संसार अधांतरी लटकत होता. सकाळी झोपेतून उठल्यानंतरच्या सुनंदाच्या हालचाली, चाहूल सगळे त्याला आठवायला लागले. कदाचित सुप्रियाचे हृदय मी तोडले म्हणून तर मला अशा प्रसंगातून जावे लागत नाही ना? पण मी सुप्रियाशी ब्रेकप घेतला ते त्यावेळेस योग्य होतं असं मला वाटतं!

कदाचित आज माझा बदला आणि संघर्ष अंतिम टप्प्यावर पोहोचतोय ते बघायला ती असती तर?

ती सोबत असतांना सुद्धा मी इथपर्यंत पोहोचू शकलो असतो का?

ती बरोबर म्हणत होती का?

पण त्यावेळेस समजा सुप्रियाशी लग्न केलं असतं

आणि आईचा सुनंदाशी लग्न करण्याचा तगादा त्याच वेळेस रोखला असता तर?

पण तो सुनंदावर अन्याय नसता का झाला?

वचन मोडले नसते का गेले?

पण सुप्रियावर तरी अन्याय कसा झाला असू शकतो?

ती तर लग्न करून इटलीत सेटल झाली आहे!

मग मी आता काय करू?

अन्याय तर माझ्यावर झाल्यासारखा वाटतोय, नियतीचा!!

* * *

सकाळी दहा वाजता समिरणचा फोन आला.

"अरे! लेखक साहेब आहेत कुठे? कशी काय चालली आहे सुट्टी? एन्जॉय करतोय का बायकोसोबत?"

"अ हो हो! म्हणजे ... हो हो!"

"चला बरंय! अरे मी तुला यासाठी कॉल केला आहे की एक गुड न्यूज आहे आपल्या चित्रपटासाठी!"

"काय आहे ती न्यूज समिरण?"

"अरे! मी अमितजींना आपल्या एका आगामी मराठी चित्रपटांत पाहुणा कलाकार घेतो आहे कारण त्यांना माझे पूर्वीचे चित्रपट आवडलेत आणि त्यांनी स्वतःच एका पार्टीत मला विचारले की समिरण मला तुझ्याबरोबर काम करायची इच्छा आहे! ऐकलं का? स्वतः अमितजी!"

राजेशचा प्रथम कानांवर विश्वासच बसेना. आपल्याला पडलेले स्वप्न??

"अरे! काय विचारात पडलास राजेश? मी खरं तेच सांगतोय! पुढे तर ऐक! मी त्यांना म्हटलं की सर मी माझे हे भाग्य समजतो की तुमच्यासारखा सुपरस्टार माझ्या चित्रपटात काम करायला उत्सुक आहे आणि त्यांच्या पंधरा मिनिटांच्या रोलसाठी तुला लिखाण करायचे आहे तेही त्यांचेशी चर्चा करून!"

"काय सांगतोस समिरण?" खरंच, ग्रेट न्यूज दिलीस!"

समिरण पुढे म्हणाला,

"आणि माहितीये का? ते आपल्या मराठी चित्रपटाला फायनान्स पण करणार आहेत. तसेच ते एक हिंदी चित्रपट काढत असून मला दिगदर्शक म्हणून घेणार आहेत आणि तुला लेखक म्हणून घायचं मी आधीच त्यांचेकडून कबूल केलंय! आणि त्या चित्रपटासाठी त्यांच्या मुलाला – अभिजितला लीड रोलमध्ये घायचे आहे! अभिजितसाठी सशक्त व्यक्तिरेखा लिहिणे हे आता तुझे कौशल्य आहे रे बरं का राजेश! त्यांच्या मुलाला एका हिट चित्रपटाची आवश्यकता आहे! तर मग बोल केव्हा भेटतोस मला राजेश?"

पुढच्या दहा मिनिटांत राजेश वेगाने समिरणकडे निघालासुद्धा आणि कार चालवत असतांना त्याचा मनात एक प्लॅन तयार होत होता!

◬◬◬◬

# प्रकरण 38

सकाळचे अकरा वाजले होते.

चार पाच वेळा बेल वाजवूनसुद्धा दरवाजा उघडत नाही म्हणून रायमा बोस यांनी शेजारच्यांच्या मदतीने दरवाजा तोडला. त्या आणि शेजारच्यांपैकी दोन महिला घाईघाईत सरळ बेडरूम मध्ये पोहोचल्या तर त्यांना बेडवर अस्ताव्यस्त पहुडलेली रिताशा दिसली.

तिचा श्वास चालू होता आणि जवळच्याच टेबलवर दोन टॅब्लेट्स पडल्या होत्या त्या उचलून बघत त्यांनी रिताशाला गदागदा हलवत आणि स्वर रडकुंडीला येत म्हटले, "बेबी, शोना उठ! तुझी मम्मी आलीय. तू झोपेच्या गोळ्या घेतल्या? मला अशक्य वाटतंय!

उत्साहाने सळसळणारी सतत पॉझिटिव्ह राहणारी माझी बेबी रिताशा! आज काय हालत झाली तुझी? आणि मला एका शब्दानंही कॉल करून तू सांगितलं नाहीस? बेबी उठ!"

असे म्हणून रडत रडत रिताशाचा हात हातात घेऊन बाजूच्या खुर्चीवर रायमा बोस बसल्या. तिच्या सोबतच्या एक महिलेने एका ग्लासमध्ये फ्रिजमधले थंड पाणी घेतले आणि रिताशाच्या चेहऱ्यावर ओतले. ती आता हालचाल करू लागली पण तिचे डोळे खोल गेले होते आणि चेहऱ्यावर अतिशय निर्विकार आणि शून्याकडे बघत असल्याचे भाव होते. रायमाने तिला कमरेत धरून उठवले आणि उशीला टेकून बसवले.

रायमा इतर दोन महिलांना म्हणाली, "कृपया, मी तुम्हाला विनंती करते की हे सगळं कुणाला सांगू नका आणि तुमच्यासोबत असलेल्या इतरांनाही सांगा की कुणाला सांगू नका म्हणून! मीडियाला हिच्या अशा अवस्थेबद्दल कळलं तर ते प्रश्न विचारून विचारून हिचं जगणं नकोसे करून ठेवतील!"

त्यापैकी एक महिला म्हणाली, "काळजी करू नका ताई. आम्ही कुणाला सांगणार नाही. आजपर्यंत आमच्याशी रिताशाचे शजारी म्हणून वागणे खूप चांगले राहिले आहे. तुम्ही हिला हॉस्पिटल मध्ये घेऊन जा!"

रायमा म्हणाल्या, "धन्यवाद तुमच्या या सगळ्या मदतीबद्दल! मी आता हिला कोलकात्याला घेऊन जाते मगच तिथल्या हॉस्पिटलला दाखल करते! काहीही केलं तरी इथे मीडिया पाठ सोडणार नाहीत!"

रायमा बोस यांनी त्या रात्री सगळीकडे गुप्तता पाळून एयर अम्ब्युलन्स मागवली आणि त्या रिताशासह कोलकात्याला पोहोचल्या. तोपर्यंत आई सोबत असल्याने रिताशाला हायसे वाटले आणि प्रवासात ती जराशी रिलॅक्स वाटत होती पण अधून मधून स्फुंदून स्फुंदून रडतही होती तेव्हा तिची आई तिच्या पाठीवरुन हात फिरवत होती मग तिला तेवढ्यापुरते बरे वाटे पण अर्ध्या तासानंतर तिला पुन्हा रडू कोसळे!

मुंबईत अशी बातमी पसरवली गेली की अभिनेत्री रिताशा काही काळाकरता सुट्टीवर गेल्याची शक्यता आहे.

तेथील डॉक्टरांनी आठ दिवसानंतर हॉस्पिटलमधून तिला परत जाऊ दिले. झोपेच्या गोळयांचा डोस जास्त झाल्याने झालेले परिणाम भरून काढण्यासाठी त्यांनी मेडिसिन दिले आणि घरी जाऊ दिले पण त्यांनी तिचे मन इकडेतिकडे रमवायला सांगितले. रिताशाचे वडील लहानपणीच वारले होते. मग तिची आईच तिचे वडीलसुद्धा झाली होती. आईनेच तिला फिल्म इंडस्ट्रीमध्ये जाण्याच्या तिच्या निर्णयाचे समर्थन केले होते. पण रिताशाला सहजासहजी बॉलिवूडमध्ये एंट्री मिळाली नव्हती...

रिताशाला एका रात्री अंथरुणात पडल्या पडल्या जुने संघर्षाचे दिवस आठवू लागले...

कोलकात्यातील नाट्यगृहात एकच टाळ्यांचा आवाज ऐकू आला कारण छोटी रिटा (म्हणजेच रिताशा) हिने वयाच्या बाराव्या वर्षीच "अभिसुंदरी" या नाटकातील "मौमिता" या पत्राचे संवाद अशा काही सहजसुंदर अभिनयाने सजवून म्हटले जाते की टाळ्यांचा गाजर काही केल्या थांबेचना.

जरी ती सावळी होती तरी नाकी डोळी आणि अंगाने नीटस होती. नाटकाचे दिगदर्शक बिजॉन घोष यांनी तर त्यानंतर तिला यानंतरच्या त्यांच्या सगळ्या नाटकांत तिला भूमिका देण्याबाबत घोषणासुद्धा करून टाकली. वडील लहानपणीच वारल्यानंतर आईच रिटासाठी सगळे काही होती. रिटाची लहानपणापासूनची अभिनयवृत्ती ओळखून तिने त्याला विरोध करण्याऐवजी सपोर्ट केला.

विविध बंगाली नाटकांत आणि टीव्ही शो मध्ये रिताला भाग घेण्यासाठी प्रोत्साहन तर तिने दिलेच त्याबरोबरच तिच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ नये हेही तिने कटाक्षाने पाळले. तिच्या नात्यातील एका काकांचा घराण्यातील मुलींनी नाटकात, टिव्हीत काम करायला विरोध होता. पण त्यांच्या विरोधाला न जुमानता प्रसंगी समाजाचे टक्के टोपणे सहन करत तिने आपल्या लाडक्या रिटाला तिच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी सर्वतोपरी प्रोत्साहन दिले. त्या काकांनी समाजात तिचे लग्न होऊ देणार नाही अशी धमकी दिली पण त्यावेळेसही रिटाची आई अटळ राहिली.

बिजॉन घोषच्या पुढील प्रत्येक नाटकांत रिटाचा रोल असायचा. त्या रोलला ती जीव तोडून आपल्या उपजत अभिनयाने न्याय द्यायची. तिच्या अनेक नाटकांत तिच्यासोबत काम केलेला पुरुष सहकलाकार सौमित्र सरकार याचे तिच्यावर एकतर्फी प्रेम होते. पण तो ते कधीही शब्दांनी व्यक्त करू शकला नाही आणि डोळ्यांची भाषा समजण्यात रिताशा कमी पडली. पण रिताशाच्या आईला हे समजलं होतं. ती एके दिवशी सौमित्राशी बोलली आणि रिताशाच्या मनात काय आहे हवं ती जाणून गजेईन असे तिने त्याला सांगितले, त्यासाठी तिने त्यांचेकडे काही काळ मागितला.

दरम्यान एके दिवशी मूळचे बंगाली आणि आता एक प्रसिद्ध बॉलिवूड दिगदर्शक रबिंद्र सरकार एका बंगाली पुस्तकावर आधारित बॉलिवूड चित्रपट बनवण्यासाठी काही बंगाली कलाकार निवडीसाठी बिजॉनला भेटले. त्यांची काही नाटके त्यांनी पहिली. त्यांनी रिताशाला आपल्या आगामी हिंदी चित्रपटासाठी कास्ट करायचे ठरवले आणि बिजॉन यांची परवानगी मागितली. बिजॉन यांनी प्रथम रिताशाचा कल तपासला. फक्त राज्यापुरता अभिनय मर्यादित न ठेवता पूर्ण देशाला आपले अभिनयगुण कळले पाहिजेत असे तिलाही वाटले आणि मग बिजॉय यांनी सुद्धा तिला थांबवले नाही.

अर्थातच रिताशाच्या आईनेसुद्धा तिला परवानगी दिली. मुलीच्या सुखातच आपले सुख आहे असे तिने ठरवले होते. तिचे ग्रॅज्युएशन सुद्धा तोपर्यंत पूर्ण झाले होते. मग अशी अनुकूलता झाल्यावर रिताशाने चित्रपटांत जीव तोडून काम केले. तिची आईसुद्धा मुंबईत येऊन तिच्यासोबत राहिली.

रिताशाचा हा पहिलाच बॉलिवूड चित्रपट "दास बावरा" सुपर डुपर हिट ठरला. अर्थात त्यात रिताशासोबत बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री "तरण्या अरोरा" सुद्धा होती. पण तरण्यासोबतच रिताशाचा अभिनयसुद्धा वाखाणला गेला.

समीक्षकांकडून आणि प्रेक्षकांकडून तिचे वारेमाप कौतुक झाले. मग तिला अनेक चित्रपटांच्या ऑफर येऊ लागल्या. तिने मग आपल्या आईलाच आपले मॅनेजर बनवले. दिगदर्शक, प्रोड्युसर यांना रिताशाला डायरेक्ट कॉन्टॅक्ट करता येईनासा झाला.

रिताशाला न सांगताच परस्पर तिची आई तिला ऑफर झालेल्या काही भूमिका नाकारून टाके. कथेची गरज असली तरी काही किसिंग, बेड सिन चित्रपटांत असतील तर ते कापावे अथवा रिताशा चित्रपटांत काम करणार नाही असे तिची आई ठणकावून सांगायला लागली. कधीकधी ती शूटिंगच्या सेटवरही हजेरी लावायची. प्रथम रिताशाला हे योग्य वाटले पण नंतर तिला ऑफर येईनशा झाल्या तेव्हा बदलत्या जगानुसार आपणही बदलावे असे तिला वाटू लागले, ती आईशी वाद घालू लागली. सौमित्रबद्दल आईने सांगताच ती चिडली आणि त्याच्याशी लग्न करणार नाही असे तिने निक्षून सांगितले कारण बॉलिवूडचा एक मॅचो मॅन आणि ऍक्शन हिरो जॉनी डिसुझा तिच्या जीवनात आला होता. त्याचे अजून दोन तीनच चित्रपट आले होते आणि ते खूप जास्त सुपरहिट नव्हते पण फ्लॉपसुद्धा झाले नव्हते.

शेवटी रिताशापुढे आईने हार मानली आणि पोरीच्या सुखातच आपले सुख असे मानून तिला हवी ती मोकळीक दिली. पण तोपर्यंत तिच्या हातून अनेक चांगल्या भूमिका निघून गेल्या. एक दीड वर्षे ती रिकामी बसली.

मग एके दिवशी सुभाष भट यांनी तिला हॉरर चित्रपटाची ऑफर दिली ज्यात अनेक बेड ऐन, किसिंग सिन आणि खूप अंगप्रदर्शन करावे लागणार होते. रिताशाने कोणतीही अट न घालता होकार दिला. काही दिवस परदेशात शुटिंग होती. चित्रपटाचे नाव होते "जमीन का राज". चित्रपट खूप सुपरहिट झाला.

काही समीक्षकांनी रिताशावर अंगप्रदर्शनाचा मार्ग स्वीकारल्याबद्दल टीकेची झोड उठवली आणि टीव्ही चॅनेल्सनी रिताशाचे चित्रपटातील हिरोबरोबर, पिंटो मोरिया बरोबर परदेशातील शुटिंगसाठीच्या वास्तव्यादरम्यान अफेअर असल्याच्या काल्पनिक बातम्या पसरवल्या. त्या इतक्या खऱ्या वाटल्या की रिताशा ने स्वतः त्याचे खंडन करूनही लोकांना आणि इंडस्ट्रीतील लोकांना ते अफेअर खरेच वाटले. याचा परिणाम म्हणून जॉनीने तिच्याशी ब्रेकप केला.

खरं तर नवखा हिरो पिंटो यानेच स्वतःच्या प्रसिद्धीसाठी या अफवा पसरवल्या होत्या पण हे त्याने बेमालूमपणे केले आणि ते अजूनही कुणालाच कळले नाही. त्यानंतर ती डिप्रेशनमध्ये गेली पण आईच्या मदतीने सावरली.

दरम्यान तिला एकाच साच्याच्या हॉरर चित्रपटातल्याच भूमिका ऑफर होऊ लागल्या पण त्या स्वीकारण्याशिवाय तिच्याकडे पर्याय नव्हता. अर्थात ते चित्रपट हिट होत होते आणि ती समाधानी होती. जणू काही हॉरर चित्रपटांत तिची एकटीची एकाधिकारशाही झाली पण प्रत्येक चित्रपटांत तिचे अंगप्रदर्शन हटकून असायचे पण कालांतराने वय वाढत गेल्यावर तिच्या अभिनयात आणि अंगप्रदर्शनात तोचतोचपणा आला. तिचा हॉटनेस कमी झाला. दरम्यान तिची आई पुन्हा आपल्या घरी निघून गेली होती.

रिताशाला महागड्या लाईफस्टाईलची तोपर्यंत सवय झाली होती. जवळचे पैसे चैनीसाठी मुंबईत अपुरे पडू लागले. दर उन्हाळ्यात युरोप फिरून येण्याची सवय होती त्यासाठी आता पैसे कमी पडू लागले.

तशातच तिला कळले की एका सुमार दर्जाच्या टीव्ही स्टारला म्हणजे सोनी बनकरला सुभाष भटनी त्यांच्या आगामी चित्रपटांत घेतले. आता हक्काचे सुभाष भट सुद्धा दुरावले होते आणि हॉरर चित्रपटांची लाट थंडावली. कित्येक दिवस तिने आईला फोन केला नाही. ती डिप्रेशन मध्ये गेली.

डॉक्टरांची ट्रीटमेंट सुरू केली. एकदा कहर झाला. तिने एका रात्री नैराश्यापोटी झोपेच्या जास्त गोळ्या घेतल्या पण योगायोगाने त्या दिवशी तिची आई तिच्याकडे आली आणि तिने तिला कोलकात्याला परत आणले...

हे सगळे आठवल्यावर तीला घाम आला. ती थरथर कापू लागली. तिला तहान लागली. फ्रिज मधून काचेच्या ग्लास मध्ये पाणी ओतत असतांना तिच्या डोक्यात विचारांचा गलका असह्य झाला आणि तिला डीप्रेशनचा सौम्य झटका आला. तिने ग्लास समोरच्या भिंतीवर भिरकावून दिला!!

ती मोठमोठ्याने म्हणत होती, "एक सुमार दर्जाची अभिनयशून्य नाचरी नालायक बाई, सटवी! सोनी बनकर! माझी जागा घेते? आणि तेही सुभाष भटच्या पिक्चर्स मध्ये?"

रायमा बोस, तिची आई जागी झाली आणि तिने लाईट लावला आणि तिच्याकडे धावत गेली तोपर्यंत रिताशाने तीन शोभेचे काचेचे फ्लॉवर पॉट जमिनीवर फेकून त्यांचा चुरा चुरा करून टाकला होता आणि आता तिच्या हातात भिंतीवरचे महागडे क्लॉक होते. ते क्लॉक तिने टीव्हीच्या दिशेने भिरकावले पण रायमा आडवी आली आणि ते क्लॉक जमिनीवर पडून फुटले. टीव्ही वाचला!

रायमाने तिला बळजबरीने खांद्याला पकडून ओढत नेले आणि पलंगावर बसवले.

"रिलॅक्स, बेबी! असे तोडफोड करून काहीच होणार नाही. शांत हो!"

"त्या सटवीला, सोनी बनकरला मी धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही."

"तिने तुझे काय बिघडवले आहे रिटा? तिला दोष देऊ नकोस!"

"तिने माझा हक्काचे काम हिरावले माझ्यापासून! माझे “वलय”, माझे ग्लॅमर हिसकवले आहे तिने माझ्यापासून!"

"बेबी! हे तर चालायचंच या इंडस्ट्रीमध्ये! तिने ते काही मुद्दाम केलेले नाही हे तुला माहितेय! तिच्याकडे संधी आली आणि तिने ती स्वीकारली!"

"पण तिने माझी जागा घेतली त्याचे काय? नाही! मी तिला असं करू देणार नाही! ती मस्त पिक्चर करेन, यश चाखेन आणि मी इथे गाशा गुंडाळून स्वस्थपणे बसणार? मुळीच नाही!"

"अगं, मग तू करणार आहेस तरी काय?"

"मी परत मुंबईला जाणार!"

"अगं, तुझी हालत ठीक नाही. तिथे जाऊन काय करणार?"

"माझी हलत ठीक आहे! सगळं ठीक आहे. यापूर्वीही मी डिप्रेशनमधून सावरले होते! आतासुद्धा मी सावरले आहे नैराश्यातून! मी परत जाणार! काम शोधणार!"

"हे बघ बेबी! इथे कोलकात्याला पुन्हा तू थिएटर मध्ये काम करायला लाग!"

"नाही, मी बरी आहे! मी उद्याच पुन्हा मुंबईला जाणार!"

आईने लाख समजावले पण तिने ऐकले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी तिच्या वागणुकीत बदल जाणवत होता. ती जाणीवपूर्वक स्वतःला कंट्रोल करत होती आणि ही एक चांगली गोष्ट होती. तिने

फ्लाइटचे तिकीट बुक केले आणि सामान बांधून ती तयारी करू लागली. तिच्या मनात नेमके काय चाललंय हे आज तिच्या आईला मुळीच समजत नव्हते शेवटी नाईलाजाने तिने परवानगी दिली.

मुंबईच्या विमानात बसल्यानंतर रिताशाच्या चेहऱ्यावर एक अद्भुत आणि गूढ हसू उमटले. तिच्या मनात नेमके काय चाललंय हे फक्त तीच सांगू शकणार होती, पण कसलातरी गाढ निश्चय तिच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता हे विमानातील तिच्या बाजूच्या सहप्रवाशाला जाणवलं हे नक्की!

☐☐☐☐

# प्रकरण 39

ऑस्ट्रेलियातील बोन्डी किंवा युकेतील बाऊनमाऊथ बिचवर जसे स्त्रियांना टॉपलेस व्हायला व्हायला परवानगी आहे तसे ब्राझील देशातल्या रिओ दि जनैरोच्या कोपाकबाना बीचवर परवानगी नाही. त्यादिवशी संध्याकाळी सूर्य मावळतीला असतांना कोपाकबाना बीचवर आलेल्या बहुतेक ब्राझीलियन किंवा इतर देशांतील पर्यटक स्त्रियांनी घातलेली बिकिनी ही आकाराने एवढी छोटी आणि तोकडी होती की त्या जवळपास न्यूडच वाटत होत्या.

काही जणी पोहोण्यासाठी बिकिनी तर काहीजणी फक्त ऊन खाण्यासाठी नेहमीच्या वापरातील रंगीबेरंगी ब्रा आणि पँटी किंवा फक्त पँटी घालून तेथे आलेल्या होत्या. बहुतेक पुरुष मंडळी ब्रीफ घालून फिरत होते. अनेक स्त्रिया बिनधास्तपणे नियम झुगारून टॉपलेस होऊन फिरत होत्या आणि हे नियम बनवणाऱ्याना सुद्धा माहिती होतेच. या बीचवरील स्त्रियांपैकी अर्ध्या स्त्रिया या बहुतेक करून मॉडेल होत्या आणि असतातच. रिओला दक्षिण अमेरिकेचे पॅरिस म्हणतात ते उगाच नाही. त्या बीचवर नेहमीच या मॉडेल्स येत असतात. कधी कधी येथे सौदर्य स्पर्धा सुद्धा भरते. हॉलीवूड चित्रपटांत दिसणाऱ्या बिकिनीतील सुंदर आणि भरीव शरीरयष्टीच्या अभिनेत्रींपेक्षाही कित्येक पटींनी सुंदर अशा हजारो स्त्रिया अगदी तिथे सहजच दृष्टीस पडत होत्या.

स्थानिक पुरुषांच्या दृष्टीला असे उघड उघड मादक सौंदर्य बघणे अंगवळणी पडलेले असते पण भारतात राहणाऱ्या मंडळींना मात्र ते डोळे भरभरून बघतच बसावे असे वाटते.

असेच दोन भारतीय चेहरे काळा कोट, हातात ब्रिफकेस आणि चेहऱ्यावर गॉगल लावून झपाझप चालत किनाऱ्याकडे निघाले होते. बिचवरच्या टॉपलेस मॉडेल्सकडे बघून त्यांचे मन भरत नव्हते. किनाऱ्याजवळ आरामात पहुडलेल्या एका पिळदार शरीरयष्टीच्या माणसाकडे ते आले. तो माणूसही भारतीयच होता. ते दोन जण आल्याचे बघून तो अलर्ट झाला आणि जागेवरून उठून उभा राहिला, त्याने त्या दोघांशी हस्तांदोलन केले.

"हॅलो मिस्टर बाजवा अँड मिस्टर काजवा! केव्हा येणार आहे ती व्हेरोनिका सिसिली?"

"सर साहेब, ती येतच असेल. पंधरा मिनिटात पोचेल ती आपल्याकडे!"

मग ते तिघे जवळच्या चार पैकी तीन खुर्च्यांवर बसले. एक खुर्ची रिकामी होती. ती बहुदा त्या व्हेरोनिकासाठी असावी. तिघेही बराच वेळ बोलत होते आणि त्या बीचवर आलेल्या स्त्री पुरुषांकडे बघत होते.

पाच मिनिटातच व्हेरोनिका समोरच्या गर्दीतून वाट काढत येतांना दिसली. तिने काळया रंगाची बिकिनी घातली होती. ती त्या तिघांच्या जवळ आली आणि तिघांनीही तिला उभे राहून शेक हँड केले. त्या तिघांमध्ये बराच वेळ काहीतरी बोलणे झाले आणि मग चौघे जवळच्या आराम खुर्च्यांवर बसले. ते बीचवरच्या स्त्री पुरुषांची लगबग बघत बसले.

व्हेरोनिका मग फोनवर कुणाशीतरी बोलली. ते दोघेजण नंतर निघून गेले. आता तिथे व्हेरोनिका आणि तो "सर साहेब" हे दोघेजण होते. ते दोघे बराच वेळ बोलत होते आणि गर्दीत कुणी त्यांचेकडे बघतय का असा मागोवा घेत होते.

मग, व्हेरोनिकाने सरसाहेबकडे हसून पाहिले, स्वत:ची ब्रा काढून टाकली आणि बाजूच्या एका टेबलावर ठेवली. आता ती संपूर्ण टॉपलेस झाली होती. मग इकडेतिकडे पाहिल्यावर ती सरसाहेबला बाय करून टॉपलेस अवस्थेत त्या बीचवरील गर्दीत निघून गेली. जातांना तिच्या नजरा सावधपणे इकडेतिकडे भिरभिरत होत्या. मग ती गर्दीत दिसेनासी झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी अटलांटिको पेस्ताना या हॉटेल मध्ये सरसाहेब अंघोळ करून सोफ्यावर कुणाची तरी वाट बघत होता. बाजूला विमानप्रवासासाठी एक बॅग तयार दिसत होती. थोड्याच वेळात बेल वाजली आणि एक अतिशय सुंदर स्त्री आत आली. तिच्याकडे बघून ती युरोपिअन

असावी असे वाटत होते. तिचे केस लालसर सोनेरी होते. चेहरा अतिशय बोलका आणि सुंदर होता. तिने हसून सरसाहेबकडे पाहिले. तिच्या हातात एक हँडबॅग होती. ते दोघे इंग्रजीत बोलू लागले.

"शाल वी गो?"

"एस, माय लव्ह! बट व्हेअर इज माय गिफ्ट?"

"गिफ्ट?", तो हसायला लागला, "हे काय! देतो थांब!"

त्याने बाजूला ठेवलेली काळ्या रंगाची ब्रा तिला दिली.

"वाव! मस्त आहे! पण माझ्या आधी तूच माझे गिफ्ट म्हणजे ती नवी कोरी ब्रा उघडून बघितलीस? एवढी घाई?", असे म्हणून तिने त्याचेकडे लाडाने बघितले.

तो डोळे मिचकावत म्हणाला, "मला उत्सुकता होती तू यात कशी दिसशील ते, म्हणून मी तू येण्याआधी थोडी कल्पनाशक्ती लढवत होतो!"

तिने मग तिचा टॉप त्याच्यासमोर काढला. ती आता टॉपलेस होती. त्याने तिला मिठी मारली आणि कुरवाळायला सुरुवात केली.

ती त्याची मिठी सोडवत म्हणाली, "नाही डियर! आता नाही. आता आपल्याला प्रवास करायचा आहे ना! हे आता नंतर! इंडियात गेल्यावर! आता मला तुझी गिफ्ट घालू दे ना!"

मग तो नाईलाजाने बाजूला झाला कारण त्याना लवकरच एयरपोर्टकडे निघणे जरुरी होते. तिने ती काळी ब्रा घातली आणि टॉप चढवला. ते दोघे हॉटेलचे चेकआउटचे सोपस्कार आटोपून निघाले.

थोड्याच वेळात सिक्युरिटी चेक झाल्यानंतर मग त्यांचे "एयर फ्रांस" चे विमान आकाशात उडाले.

भारतात आल्यावर विमानतळावरचा सिक्युरिटी ऑफिसर म्हणाला, "वेलकम टू इंडिया! मिस्टर सूरज सिंग और मिस ऑलिव्हिया ब्रूनर!"

⍓⍓⍓⍓

# प्रकरण 40

नंतर मुंबईतील सूरजच्या फ्लॅट वर -

सेक्स केल्यानंतर सूरज आणि ऑलिव्हिया एकमेकांच्या बाहुपाशात पहुडले होते.

"रागिणी इज आऊट ऑफ माय माईंड नाऊ. तुला भेटायला मला ब्राझीलला येण्याची वाट बघावी लागत होती पण आता रागिणी इज आऊट ऑफ माय माईंड अँड आऊट ऑफ धिस वर्ल्ड ओल्सो! मला तुम्ही दोन्ही आवडत होत्या!" हसत सूरज म्हणाला. पण अधून मधून त्याचे लक्ष टेबलावर पडलेल्या त्या काळ्या ब्राकडे होतं.

"तुला आम्ही दोन्ही आवडतात यात मला त्यात काही हरकत नव्हती पण रागिणीने आत्महत्या करून योगायोगाने का होईना माझं शेअर केलेलं प्रेम एकट्या मला दिलं! न मागता मला तू पूर्ण मिळालास!", ओलिव्हिया म्हणाली.

"खरं तर मलाही तेच हवं होतं कारण रागिणी आजकाल माझ्यावर जास्त संशय घ्यायला लागली होती. कुठून कुठून काय काय माहिती मिळवून आणि माझे फोनवरचे बोलणे चोरून ऐकून मला जाब विचारायला लागली होती ती!

मला ती वडलांच्या पार्टीत भेटली आणि आवडली पण मला तिने सिनेक्षेत्रापासून दूर राहावे असे वाटत होते. घरच्या प्रोडक्शन हाऊस मध्ये ठीक आहे पण त्यापुढे जाऊन चित्रपटात तिने काम करणे मला नको होते. तिची सुभाष भटच्या चित्रपटातली एक संधी मी मुद्दाम हुकवली! हे कळलं तर मला जाब विचारायला लागली ती!"

"यु आर सो बॅड! का केलंस असं? तू मला तर तसे नाही ना करणार?", ऑलिव्हिया म्हणाली.

"तू तिच्या साईडची आहेस की माझ्या? मी तुला असं करणार नाही ऑलि! तू मला खूप आवडतेस! आणि ठरल्याप्रमाणे आपण आता "लिव्ह इन" मध्ये राहू! माझ्याच फ्लॅटवर! आणि तुला काय वाटलं? रागिणी धुतल्या तांदळासारखी होती? नाही! तिचा एक बॉयफ्रेंड होता, तो मेल्यानंतर तिने ज्याच्याशी लग्न केलं त्याला सोडून पळून निघून आली होती ती मुंबईला!"

"तू जर माझ्या सुद्धा करियरच्या आड आलास तर मी आहे तशी युरोपला निघून जाईन!"

"तशी वेळ येणार नाही. आता मी चित्रपट निर्मितीत उतरणार आहे. सोबत हॉटेल आणि फूड चेंन्स आहेतच माझ्या. पप्पांशी माझे रागिणिच्या आत्महत्येवरून मतभेद झाल्यावर आता आम्ही एकमेकांना भेटत नाही. यापुढेही नाही भेटणार! ते त्या मूर्ख रागीणीची बाजू घ्यायला लागले मग मी त्यांना खडसावले. खरं तर पत्नीने कसं पतीला पूर्ण समर्पित व्हायला पाहिजे आणि रागिणी? बरं झालं आम्ही लग्न केलं नव्हतं! एनिवे! मेलेल्या व्यक्तीबद्दल वाईट बोलू नये म्हणतात! चल बस झालं! तिचा विषय बंद! मस्तपैकी अंघोळ करून ये आता! पण मला तिच्या आत्महत्येचा अफसोस वाटतो आणि वाटत राहीन!"

आंघोळ केल्यानंतर ओलिव्हिया तयारी करून तिच्या मुंबईतील तिच्या एका मॉडेल मैत्रिणीला भेटायला निघून गेली.

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत सूरज हसत मनात म्हणाला, "ओलिव्हिया, तू मला दाखवतेस तितकी स्मार्ट नाहीयेस! तुला एक गोष्ट माहीत नाही की पार्टीच्या रात्री घरी रागिणीच्या नकळत ती किचनमध्ये असतांना मी घरातील फ्यूज निकामी केला, अंधार केला. मग तिच्याशी भांडताना खांद्यावर धरून हलकेच तिला गॅलरीच्या कठड्याच्या बाजूला आणले आणि तिला ती

बेसावध असतांना ढकलले! तिचा तोल गेला... मग काय! ही एक आत्महत्याच वाटली! कारण रागिणीला माझे असे सत्य गवसले होते जे अजून तुलाही माहीत नाही!

मी आंतरराष्ट्रीय ड्रग्ज टोळीशी संबंध ठेऊन आहे. माझी “फूड चेन” ही माझे लोकांना दाखवायचे दात आहेत. त्यातले फूड्स एकदा खाल्ले की लोकांना एवढे चटक लावतात की पुन्हा पुन्हा ते तो पदार्थ खातात, कारण मी त्यात सौम्य असे एडीक्टिव्ह ड्रग्ज (नशिले पदार्थ) मिसळतो ज्यामुळे लोकांना त्याची खूप चटक आणि सवय लागते आणि मी भारतात विषेशतः मुंबई आणि दिल्लीत ड्रग्जचे जाळे पसरवून ड्रग्ज विकतो...

आणि आता पुढचं पाऊल म्हणजे, एका आंतरराष्ट्रीय डॉन कडून मला चित्रपटनिर्मितीसाठी करोडो पैसे मिळणार आहेत! पण त्याची अट एकच आहे, ती म्हणजे भारतातील आणि परदेशातील त्या डॉनशी संबंधित असणाऱ्या गुन्हेगारांच्या जीवनावर चित्रपट बनवायचा, त्यांचे उदात्तीकरण करायचे!”

असा विचार करून तो हसायला लागला आणि पुढे मनाशी विचार करत राहिला, "ओलिव्हिया, आता तुला मी माझ्या पिक्चर मध्ये काम देणार! तुझ्यासोबत राहून मजा करणार! पिक्चर बनवून करोडो कमावणार! फूड चेन मधून कमावणार! मालामाल होणार! जीवनातली सगळी सुखं उपभोगणार! माझ्या जीवनाचा एकच उद्देश आहे, अमाप पैसा कमावणे, मग तो कोणत्याही मार्गाने असो आणि मग त्या पैशांनी तुझ्यासारख्या आणि तुझ्यापेक्षाही सुंदर अशा अनेक स्त्रियांना उपभोगणार! अगं, स्मार्टनेसचा आव आणणारी तू एवढी बुद्धू आहेस की, तूला हे ही माहीत नाही की तुझा वापर मी ब्राझीलहून येतांना तुझ्या ब्रा मध्ये लपवून आणलेल्या एका नव्या अमली पदार्थाच्या तस्करीसाठी केला आहे. विशिष्ट प्रकारे खास बनवून घेतलेल्या त्या काळया ब्राची शिवण उसवून मी आता त्यातून ड्रग्जची पावडर काढणार! आणि पुन्हा जशीच्या तशी तुझी ब्रा तुला परत! काय? बरोबर ना?"

काही दिवसांनंतर, सूरज आणि त्याच्या नव्या गर्लफ्रेंडबद्दल न्यूज चॅनेल्सनी वेगवेगळे प्रोग्राम्स केले. सूरजने एका पत्रकार परिषदेत जाहीर केले, "आता मी चित्रपट निर्मितीत उतरणार आहे. माझी

स्वर्गीय मैत्रीण रागिणी हिला मी माझा पहिला चित्रपट समर्पित करणार! माझ्या प्रॉडक्शन हाऊसचे नाव सुद्धा रागिणी एंटरटेनमेंट हाउस लिमिटेड हेच असणार आहे."

याच वेळेस दूर आकाशात कुठेतरी एक अतृप्त आत्मा पृथ्वीवर पुन्हा येण्यासाठी काय करावे लागेल या विवंचनेत भटकत होता पण त्याला अजून मार्ग सापडत नव्हता.

रागिणीची केस पोलिसांनी बंद करून टाकली होती कारण सूरजने पोलिसांना सांगितले होते की, "ती तिच्या पूर्वायुष्याबद्दल खूप टेन्शन घ्यायची. तिचे विवादास्पद पूर्वायुष्य मी खुल्या मनाने स्वीकारले होते. पण जेव्हा टीव्हीवर त्याबद्दल चर्चा झाली त्यानंतर ती खूप तणावाखाली होती. मी तिला खूप समजावलं पण ...", असे म्हणतांना त्याला खोटे रडू कोसळले होते.

मनातल्या मनात सूरज म्हणाला, “आणि एखाद्या पत्रकाराने एखाद्या कलाकाराचे खरे पूर्वायुष्य जगासमोर आणले म्हणून त्या कलाकाराने आत्महत्या केली तरी त्या पत्रकाराला दोषी धरता येणार नाही कारण मनोरंजनाच्या या वलयांकित क्षेत्रात अशा अनेक गोष्टी पचवायची हिम्मत असावी लागते!”

त्यावेळेस रागिणीची कॅनडातील मैत्रीण मात्र अस्वस्थ होती. तिला एकंदरीत रागिणीच्या नेहमी येणाऱ्या फोन कॉल वरून आणि एकंदरीत बोलण्यावरून ती आत्महत्या करेल असं कधी वाटलं नव्हतं. मात्र कॅनडात राहून याबद्दल ती पोलिसांना काय आणि का आणि कसे सांगणार?

सूरजला लवकरच एक फोन आला, "सर साहेब, बाजवा बोल रहा हूं!"

"बोल बाजवा!"

"सरसाहेब, व्हेरोनिका को आपकी याद आ रही है! मिलने बुलाया है आपको!"

"साले, बाजवे! सिर्फ इतना बताने के लिए मुझे कॉल किया? मुझे पता है! उसने मुझे कॉल किया था!"

"सरसाहेब, और एक दुसरी जरुरी बात है, भाईने आपके लिए संदेसा भेजा है!"

"क्या संदेसा है? बोल जलदी!"

"दुबई में भाई का एक चचेरा भाई है “कातील खान”, उसपर ऍक्टिंग और कॉमेडी का भूत सवार है!"

"हां हां, आगे बोल!"

"तो भाई चाहते है की आप पहले एक कॉमेडी मूव्ही बनाव और उसने भाई के भाई को हिरो लेलो!

"चलो ले लिया! आगे बता!"

"कातील को अब भाई के लिए जुर्म करने का कंटाला आगया है और उसका दिल बॉलीवूड हिरोईन माया माथूर पे आ गया है! तो मूव्ही में उसको हिरोईन लेना है!"

माया माथूर त्याच्या चित्रपटाला हो म्हणेल की नाही याबद्दल सूरजच्या मनात शंका दाटायला लागली पण...

बाजवा म्हणाला, "अगर माया ना बोले ना, तो भाई को बोलो, भाई को अपने तरिके से काम करवाना आता है! चलो अब फोन रखता हूं!"

सूरज विचार करू लागला.

"भाई म्हणतो आहे तर कॉमेडी मूव्ही जरूर बनवू, लागलं तर माया माथूरला धमकावू! ते काही कठीण नाही! पण व्हेरोनिकाला भेटण्याची आता मला जास्त ओढ लागली आहे कारण तिच्यासोबत फार कमी क्षण मला राहायला मिळाले आहेत आणि आता ऑलिव्हिया भारतात आल्यानंतर व्हेरोनिकाला ब्राझीलला जाऊन भेटणे थोडे चॅलेंजिंग झाले आहे!"

सूरजच्या चेहऱ्यावर व्हेरोनिकाला भेटण्याची अनावर ओढ दिसत होती. त्याला आता ऑलिव्हियाला काहीतरी कारण सांगून ब्राझीलला जावे लागणार होते.

आधी व्हेरोनिका मग भाईची कॉमेडी मूव्ही!

# प्रकरण 41

हॉलीवूड आणि बॉलीवूड यांच्या एकत्र प्रयत्नातून जो एक जागतिक कथा असलेला भव्यदिव्य चित्रपट तयार होणार होता आणि ज्याची भारतीय पातळीवरील कलाकार निवडीसाठी एकमेव भव्य ऑडिशन “मॅडम” मध्ये टप्प्याटप्प्याने होणार होती. त्याचा डिरेक्टर आणि प्रोड्युसर होता, "पीटर ब्लूमबर्ग" आणि कास्टिंग डायरेक्टर होता, "केंट पॉल".

चित्रपटाची स्क्रिप्ट जवळपास तयार होती, पण नेमकी कथा काय आहे याची पुसटशी कल्पना ठराविक लोक वगळता कुणालाही नव्हती. ते अतिशय गुप्त ठेवण्यात आले होते. या दोघांनी मिळून आणि वेगवेगळे असे जवळपास आठ हॉलिवूड सुपरहिट आणि भव्य चित्रपट बनवले होते आणि हा त्यांचा आतापर्यंतचा एक अतिशय महत्वाकांक्षी प्रोजेक्ट होता. हे दोघेजण भारतात इतर हिंदी डिरेक्टर सोबत प्रसिद्ध मराठी डायरेक्टर "श्यामकांत निळजे" यांच्याशी सम्पर्क साधून होते कारण त्यांच्या "गावरान गोष्ट" या मराठी चित्रपटाला “हॉस्कर” आणि “गोल्डन डॉल” पुरस्कार मिळाला होता आणि तो चित्रपट या दोघांना खूप भावला होता.

हा चित्रपट 4K ultra HD म्हणजे थ्रीडीच्या पलीकडे जाऊन फोरडी तंत्रज्ञानाने बनणार होता आणि एकूणच या चित्रपटाची हवा आणि आवाका पाहता, जगभरातील मनोरंजन क्षेत्रातील व्यक्तींना या भव्य प्रोजेक्ट मध्ये थोडा का होईना सहभाग हवा होता आणि ज्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने चित्रपटाचा भाग होता येणार नव्हता ते एकतर निराश तरी झाले नाहीतर त्यांनी चित्रपटाविषयी आणि चित्रपटाशी निगडित व्यक्तींचा द्वेष करणे किंवा त्यांची बदनामी करणे असे खेळ खेळण्याचे मनोमन ठरवले.

लंडनमधील जगप्रसिद्ध नाट्यभूमीतून केंटने तीन कसलेले कलाकार निवडले.

मग चायना, फ्रांस, जर्मनी अशा देशातून विविध कलाकार, गायक, संगीतकार आणि तंत्रज्ञ निवडीनंतर अभिनयसमृद्ध इटालियन चित्रपटसंस्कृतीकडे ते दोघे वळले.

आणखी एक युनिट यूएसए मधील लॉस एंजिल्स आणि नॉर्थ अमेरिकेत कार्यरत होते. इटलीतील भव्य थ्रीडी चित्रपट बघून फ्रांको बोनूकी याला विचारणा करण्यात आली.

फ्रांको जास्त प्रसिद्ध कलाकार नव्हता आणि म्हणून तो या प्रोजेक्टसाठी जास्त वेळ देऊ शकणार होता. फ्रांकोच्या मनात एक भारतीय चेहरा होता- सुप्रिया जिचा एक्सप्रेसिव्ह आणि बोलका चेहरा त्याने सिनेसीत्ता मध्ये पहिला होता आणि तेव्हापासूनच त्याने तिला त्याच्या सिनेमात एक रोल दिला होता आणि सोबतच एक डबिंग आर्टिस्ट म्हणून काम मिळवून दिले होते.

आता सुप्रियाने या भव्य हॉलिवूड चित्रपटात काम करावे असे त्याला मनापासून वाटत होते आणि त्यासाठी त्याने केंट कडे विनंती केली होती. तिच्या आवाजाच्या क्लिप्स पाहून आणि इंग्रजीतील स्पष्ट उच्चार ऐकून केंटने तिला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. हे व्हीटोरिओला कळवल्यानंतर त्याने सुप्रियाचा फोन ट्राय केला पण तो सायलेंट वर होता कारण ती रेडिओच्या प्रोग्राम मध्ये बिझी होती. मग व्हीटोरिओने सुबोधला फोन लावण्याचे ठरवले..

याच वेळेस इटलीत एक घटना घडली. इटली देशातील कार्यरत असलेल्या एका दहशतवादी संघटनेने आपल्या मागण्यांसाठी रोम शहरातील एका बिझिनेस सेंटर जवळ ठेवलेल्या डस्टबिनमध्ये शक्तिशाली स्फोट केला. इमारतीच्या काही भागाला आग लागली. अनेक जण मारले गेले. स्फोट होतांना त्यातून अनेक छर्रे उडाले आणि अणकुचीदार पत्रे आग लागून हवेत वेगाने उडाले. जवळून एक ट्रेन जात होती आणि नेमका त्याच वेळेस हा स्फोट झाल्याने, त्या स्फोटाच्या वेगाने आणि जळते पत्रे डब्यावर आदळल्याने डब्याला आग लागली.

गरम हवेच्या झोताने डबा हळूहळू रुळावरून घसरू लागला. घाबरून डब्यातील लोक पटापट उड्या मारू लागले. ट्रेनमध्ये मोबाईलवर बातम्या वाचत सुबोध उभा होता. अचानक खिडकीतून एक जळता अणकुचीदार पत्रा त्याचेकडे आला आणि खिडकीची काच फुटली आणि त्याच्या अंगात घुसला. इतर लोकांप्रमाणे काय करायचे ते न कळून इमर्जन्सी एक्सिटच्या खिडकीतून सुबोधनेही उडी मारली आणि सुबोधसाहित ते सर्वजण बाजूच्या रुळांवर पडले. त्या रुळावर उलट्या दिशेने भरधाव वेगाने एक

ट्रेन आली त्याखाली हे सगळे चिरडले गेले. सुबोधच्या दूर फेकल्या गेलेल्या मोबाईलवर व्हीटोरिओचा कॉल आला पण तो उचलायला सुबोध जिवंत नव्हता...

एफएम रेडिओच्या ऑफिस मध्ये रेडिओवर सुप्रिया प्रोग्रॅम अंकरिंग करत असतांना तिच्या प्रोग्राम कोओर्डीनेटरने तिला गाणे मध्येच थांबवून ट्रेन दुर्घटनेची अनौन्समेंट करायला सांगितली. अनौन्समेंट करता करता ज्या मृत व्यक्तींची ओळख पटली होती त्यात सुबोधचे नाव ऐकून ती बेशुद्ध झाली. रेल्वे रुळांवर सुबोधचे आयडी कार्ड सापडले असल्याने त्याच्या मृतदेहाची ओळख पटली होती.

# प्रकरण 42

सूरजशी भांडण होऊन तो अलग झाल्यानंतर आणि त्यांची हक्काची सिरीयल मधली कलाकार रागिणी जी त्यांची सून होऊ शकणार होती, तिने आत्महत्या केल्यानंतर डी. पी. सिंग काही दिवस अस्वस्थ होते.

रागिणी गेल्यानंतर जणू काही त्यांच्या सिरीयल मधली जान निघून गेली होती. लोक सिंग फॅमिलीकडे संशयाने बघायला लागले होते. दुसऱ्या कलाकारांना घेऊन ती सिरीयल त्यांनी चालवली पण त्या सिरीयलची टीआरपी रेटिंग दिवसेंदिवस घसरत चालली होती.

ज्या चॅनेलवर ती सिरीयल प्रसारित होत होती त्यांनी एक महिन्यांत सिरीयलची टीआरपी वाढवण्याची मुदत दिली अन्यथा ती सिरीयल “ऑफ एयर” करण्याची वॉर्निंग दिली, कारण त्या सिरीयलचा फायनान्सर चिडला होता आणि जाहिराती मिळणे कमी झाले होते.

हॉरर व्यतिरिक्त अन्य विषय निवडून नवीन प्रकारची सिरीयल बनवणे सोपे काम नव्हते, कारण त्यासाठी पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागणार होती. विविध माध्यमांनी ही बातमी छापली होती आणि टीव्हीवर सुद्धा दाखवली होती:

"प्रसिद्ध हॉरर मालिकेचे सर्वेसर्वा सिंग संकटात. मालिका बंद पडण्याच्या मार्गावर! टीव्ही चनेलने दिली नोटीस!"

एके दिवशी घरी चिंताग्रस्त डी. पी. सिंग सोफ्यावर डोक्याला हात लावून बसले होते तेव्हा त्यांची पत्नी म्हणाली,

"दिनकर, एवढे टेन्शन घेऊ नका. तुमच्याप्रमाणेच मलाही दुःख वाटते आहे. सूरज घर सोडून गेला. रागिणी जग सोडून गेली. आपल्या प्रोडक्शन हाऊसच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पण शांत मनाने विचार केल्यास काहीतरी मार्ग निघेलच!"

"माझं काही डोकच चालेनासं झालंय! सूरजचे मला काही खरे दिसत नाही. त्याने आता एक नवी गर्लफ्रेंड ब्राझीलहून आणली आहे म्हणे! तिच्यासोबत आता लिव्हिन मध्ये राहणार आहे! आणि पठ्ठा भरपूर कामावतोय आणि आता चित्रपटनिर्मितीत उतरणार आहे! मला विचारले असते तर मीपण कोप्रोड्यूस केला असता त्याचा पिक्चर! पण एनिवे, तो रागिणीला नीट हँडल करू शकला नाही! आणि आपल्याशी भांडून गेला तो! कोणत्या मार्गाने जातोय काही कळत नाही! त्याचा मार्ग वेगळा आहे! जाऊदे!"

तेवढ्यात त्यांचा फोन वाजला. अनोळखी नंबर होता.

"हॅलो? कोण?"

पलीकडून एका स्त्रीचा सुंदर आवाज आला, "तुम्ही सिरीयल बंद करू नका! तशी पाळी तुमच्यावर येणार नाही."

"क क कोण आपण?", आवाज थोडा ओळखीचा वाटत होता, पण नक्की ओळखू येत नव्हता.

"उद्या तुमच्या ऑफिसमध्ये मी येते, तेथेच तुम्हाला माझी ओळख होईल आणि तुमची चिंता पण नाहीशी करते!"

"हॅलो, हॅलो, कोण? तुमचं नाव तर सांगा आधी?"

"उद्या सकाळी दहा वाजता! शार्प! बाय!" असे म्हणून फोन कट् झाला.

"कुणीतरी लेडीज आहे. म्हणतेय की आपली सिरीयल बंद करायची पाळी येणार नाही! उद्या भेटायला बोलावलंय!"

"जाऊन पाहा! बघू काहीतरी सोल्युशन असेल तिच्याजवळ! चान्स घ्यायला काय हरकत आहे? नाहीतरी आपल्याकडे काय ऑप्शन आहे?"

दहा वाजता सिंग आणि त्यांची पत्नी (जी सिंग यांच्या प्रोडक्शन हाऊसचे काही व्यवहार सांभाळायची) दोघेही ऑफिसमध्ये वाट बघत बसले. दरवाजा टक टक करून अभिनेत्री रिताशा आत आली तसे सिंग पती पत्नी आश्चर्याने उभे राहिले आणि शेक हॅंड करून तिला बसायला सांगितले. मीडियाने ओळखू नये म्हणून ती गॉगल घालून थोड्या वेगळया गेटअप मध्ये आणि भाड्याची कॅब करून आली होती.

गॉगल काढून टेबलावर ठेवत ती म्हणाली,

"सिंग साहेब! ही एंटरटेनमेंट इंडस्ट्री खूप वाईट आहे असे नाही! एकदा का तुम्ही मेहनत करून जम बसवला की ती आपल्याला भरभरून देते! सगळं देते! मान, सम्मान, प्रसिद्धी, पैसा, घर, सोशल लाईफ! पण जर का आपल्याला आपले “वलय” अनेक वर्षे टिकवता आले नाही तर मात्र आपली हालत

'ना घर का ना घाट का' अशी होते!", रिताशा पाणी प्याली. तिला हे बोलतांना भर एसी मध्ये घाम फुटलेला दिसत होता.

"हो! मान्य आहे! रिताशाजी! तेच तर घडतेय माझ्यासोबत आता!", हताश होऊन सिंग म्हणाले.

रिताशा हसली आणि म्हणाली, "सिंग साहेब, हे सगळं मी तुमच्याबद्दल नाही तर माझ्याबद्दल बोलते आहे! आणि जास्त खोलात न शिरता मी सांगू इच्छिते की खरं तर मला तुमची गरज आहे! तुम्ही मला वाचवू शकता आणि त्या बदल्यात कदाचित तुमची सिरीयल वाचू शकते असा प्रस्ताव मी घेऊन आलीय! पूर्वी मी छोट्या पडद्याला महत्व देत नव्हते पण आज मला त्याचीच मदत घ्यावी लागतेय!"

"नक्की तुमच्या मनात काय ते सांगा!"

"सांगते! हे बघा! मला तुमच्या हॉरर सिरीयल मध्ये काम करण्याची इच्छा आहे!"

"ओह! पण मला तुमचे मानधन परवडणार नाही रिताशाजी!", असे म्हणून सिंगनी पत्नीकडे बघितले, तिने आश्वासक नजरेने त्यांना हो खुणावले.

"मी मानधनाबद्दल बोलले का काही? याचा अर्थ असा नाही की मी मानधन घेणार नाही! एक बॉलिवूड मधली प्रसिद्ध हॉररपटातील हिरोईन टीव्ही मालिकेत काम करणार म्हटल्याबरोबर तुमच्या मालिकेला नवचैतन्य लाभणार! टीआरपी वाढणार! नंतर तुमचा फायदा झाल्यावर तुम्हाला वाटलं तर मग मला पैसा द्या!"

"नाही नाही! रिताशा जी! तुमचे कारण कोणतेही असो, तुम्ही आमच्या सिरीयल मध्ये काम करणार हीच खूप मोठी गोष्ट झाली, मी तयार आहे! मी तुम्हाला सुरुवातीपासून तेवढेच मानधन देणार जेवढे रागिणीला देत होतो!"

"खरंच! खूप चांगली अभिनेत्री होती ती, सिंग साहेब! माझ्यानंतर तीच बॉलिवूड हॉरर क्वीन व्हायला लायक होती, पण सुभाष भटनी सोनी बनकर नावाच्या सुमार आणि अभिनय न येणाऱ्या नाचऱ्या नटव्या बाईला ती संधी दिली याचे खूप आश्चर्य वाटते! रागिणीबद्दल ऐकून खूप वाईट वाटले! ती तुमच्या मुलाची गर्लफ्रेंड होती नाही का?"

सिंग पती पत्नी थोडे भावूक झाले पण लगेच रिताशा म्हणाली, "आय एम सॉरी! बरं, माझी आणखी एक विनंती आहे! सिरीयल मध्ये काही बदल करण्याचे आणि सिरीयलचे काही कलाकार निवडण्याचे स्वातंत्र्य तुम्ही मला दया!"

"हरकत नाही!"

"मला तातडीने तुमच्याकडून त्याबद्दल मदत हवी आहे!"

"कोणती?"

"मला भूषण ग्रोवर आपल्या मालिकेसाठी माझ्यासोबत हवा आहे! मुख्य पुरुष पात्र!"

"भूषण ग्रोवर? अच्छा! तो BEBQ मधला पार्टीसिपेंट? जो मागील एका पार्टीत सोनी बनकर सोबत दिसून आला होता तो?"

"एक्साक्टली! तोच! कसेही करुन त्याला राजी करा! माझेकडे एक कथा आहे त्यात तोच फक्त फिट बसेल!"

"ठीक आहे! काम होऊन जाईल!" सिंग पती पत्नी राजी होत म्हणाले.

सिंग यांच्या ऑफिसमधून कॅब मधून परत जातांना रिताशा मनातल्या मनात खुश होत म्हणाली, "सोनी बनकर! माझी बॉलिवूडमधली जागा लायकी नसतांना तू पटकवतेस काय? आता जर का तुझा बॉयफ्रेंड नाही गटवला तर नावाची रिताशा नाही मी!"

# प्रकरण 43

सकाळी सकाळी ९ वाजता मेन गेट वरील सिक्युरिटी गार्डला पास दाखवल्यावर त्या शांत बंगल्यात पाठीवर सॅक असलेल्या राजेशने प्रवेश केला.

गार्डने घराजवळील बागीच्याकडे बोट दाखवले, "साहब, वहां है! आपको वही बुलाया है! जाईये!"

एवढा मोठा सुपरस्टार, पण अगदी सामान्य माणसासारखा बागेतील झाडांना तन्मयतेने पाणी देत होता. त्यांनी साधे आणि सफेद कपडे परिधान केले होते. गेटवरील हालचाल ऐकल्याने आणि भेटण्याची वेळ ठरलेली असल्याने राजेश त्यांचेकडे आल्यावर त्याची मागे वळून पाहिले.

त्यांच्या धीरगंभीर आवाजात ते म्हणाले, "आईये! आईये! राजेशजी! स्वागत है आपका! आप सामने रखी कुर्सी पर विराजमान होईये.. हम जरा आते है! बसा! बसा! संकोच करू नका!"

त्यांचा मराठी उच्चार अगदी छान होता. बागेच्या मधोमध तीन खुर्च्या आणि एक टेबल ठेवलेला होता. वातावरण अगदी प्रसन्न होते. राजेशने सॅक बाजूला ठेवली.

"धन्यवाद सर!" असे म्हणत राजेश बसला. थोड्या वेळाने अमित श्रीवास्तव आले. सोबत चहा घेऊन एक नोकर आला. त्याने चहाचे समान टेबलावर ठेवले आणि तो मध्ये निघून गेला. लगेचच तेथे त्यांची पत्नी वंदना आली.

जुजबी बोलणे झाल्यावर अमितजी म्हणाले, "राजेश और मेरे लिये गरम थालीपीठ और थंडा दही बनाइएगा श्रीमतीजी!"

राजेशला आश्चर्य वाटले की एवढे मोठे सुपरस्टार पण किती अदबीने बोलत आहेत! आणि त्यांची पत्नी सुद्धा किती नम्र? आणि त्या स्वत: नाश्ता बनवणार आणि तो पण मराठी? यांना कसे कळले की मला थालीपीठ आवडतंय?

राजेशची चेहऱ्यावरील धांदल आणि आश्चर्य पाहून अमितजी हसत म्हणाले, "राजेश जी! हमने भी आपके इंटरव्ह्यू पढ रखे है, आपकी पसंद नापसंद के बारे में हमने थोडीसी जानकारी तो पहले से ही पता कर ली थी!"

त्यांची पत्नी हसत म्हणाली, "राजेश जी आपकी पत्नी नाही आयी? उनको भी साथ में ले आते तो हम दोनो थोडा समय साथ में बीता लेते, गपशप कर लेते! वैसे भी हमारा बेटा अभिजित और बहू सौंदर्या देश से बाहर गये हुये है!"

सुनंदाबद्दल काय सांगावे या विवंचनेत राजेश पडला पण तो लगेच म्हणाला, "ती माहेरी गेली आहे! मैके गायी है!"

ओके ओके म्हणत त्या मध्ये निघून गेल्या.

"आप बहोत अच्छे लेखक है! समीरण के मुव्ही में मेरे छोटेसे रोल के लिये आप स्क्रिप्ट लिखने वाले है यह सुनके मुझे बहोत आनंद हुवा!

"धन्यवाद सर!" सॅक मधून लॅपटॉप काढत फाईल ओपन करून तो म्हणाला, "मैने ये स्क्रिप्ट लिखी है, प्रथम आपण ती वाचा मग आपण त्यावर चर्चा करू शकतो!"

दोघांनी चहा घ्यायला सुरुवात केली. अमिताजीनी काही वेळ ती स्क्रिप्ट वाचली. त्या चित्रपटातील काही पात्रे समाजातील तळागाळातील लोकांसाठी खूप संघर्षानंतर एक संस्था स्थापन करतात हा त्या चित्रपटाचा मूळ गाभा होता. समाजातील काही विघातक प्रवृत्ती त्यांना त्रास देतात, हे टीव्हीवर बघून अमितजी व्यथित होतात आणि ते त्या संस्थेला मदत करायचे ठरवतात. त्यांच्या सपोर्टमुळे आणि स्वत: त्या संस्थेच्या समर्थनार्थ एके ठिकाणी त्यांनी दिलेल्या भाषणामुळे संस्थेला विरोध करणारे काहीजण नरमतात. त्या संस्थेला अमितजी पैशांची सुद्धा मदत करतात एवढा त्यांचा चित्रपटात रोल होता ज्यासाठी राजेशने स्क्रिप्ट लिहिली होती. ती स्क्रिप्ट खूप प्रभावशाली होती. अमितजींना ती आवडली. समीरणला लगेच कॉल करून त्यांनी राजेश एक चांगला लेखक असून त्याची स्क्रिप्ट त्यांना आवडल्याचे सांगूनही टाकले.

मग वंदनाजी नाश्ता घेऊन आल्या. तिघांनी सोबत नाश्ता केला. थोडे जुजबी बोलणे झाले. मग वंदनाजी निघून गेल्या.

राजेश मग म्हणाला, "आप जो अभिजित को लेकर होम प्रोडक्शन में मुव्ही बना रहे है, उसमे आपके बेटे अभिजित के किरदार के लिये स्टोरी और स्क्रिप्ट लिखना शुरू कर दिया है! वह भी आप एक बार देख लिजीए!"

मग अमितजी ते वाचू लागले. अर्थातच तेही त्याना आवडले. त्यांनी थोडे बदलही सुचवले व म्हणाले, "स्क्रिप्ट और स्टोरी कम्प्लीट होने के बाद अभिजित को जरूर दिखाईएगा! वे बहोत उमदा कलाकार है! वे आपके स्टोरी को बहोत पसंद करेंगे! उनको भी आपके साथ काम करने की बहोत बहोत इच्छा है! अभिजीतने आनेवाले समय में कुछ मराठी फिल्मे प्रोड्यूस करने का निश्चय किया है!"

"बिलकुल सर! शुअर! इट्स माय प्लेजर!"

त्या चित्रपटाची संकल्पना थोडक्यात अशी होती:

"एका आंतरराष्ट्रीय डॉनला पकडण्यासाठी भारत सरकार चार जणांची गुप्तचर टोळी बनवून परदेशात पाठवते ज्याच्या प्रमुखाचा (म्हणजे कप्तान वीरेंदर सिंगचा) रोल अभिजित करणार असतो. दरम्यान एका देशात गुप्तहेर कारवाया करत असतांना त्याला नताशा भेटते जिचा रोल प्रसिद्ध अभिनेत्री शलाका करणार असते, पण ती नेमकी कोण असते? भारताची मित्र कि शत्रू? कप्तान वीरेंदर तिचा पर्दाफाश कसा करतो? मग अनेक देशांत प्रवास करून अनेक थ्रिलिंग हाणामारी एक्शन घडून या चित्रपटाचा क्लायमॅक्स भारतात संसद भवनाजवळ होतो."

मग राजेशने एका वेगळ्या विषयाला हात घातला, "अमितजी! एक महात्वाच्या विषयावर बोलायचे आहे! तुम्हाला वेळ आहे ना?"

"बोलिये बोलिये राजेश जी! आज शाम पाच बाजे तक हम आपके लिये मौजूद है! बस हमने आजका डिनर किसी फॅमिली के साथ करने का वादा कीया है! इसलिये शाम को बाहर जायेंगे! यु नो! थोडा सोशलायझेशन जीवन में आवश्यक है!"

"हा अमितजी! आप बिलकुल ठीक कह रहे है!" राजेशने पुष्टी जोडली.

"हा तो बोलिये! क्या कहना चाह राहे है आप? आप अपने विषय पर बोलने के बाद आपके लिये हमारे पास एक सरप्राईज और एक न्यूज है! बहोत बडा सरप्राईज!"

राजेशला मनोमन आश्चर्य वाटले. कोणते सरप्राईज असणार यांचेकडे? पण त्याआधी माझा विषय मी संपवतो.

"अमितजी! आजकल आपने सुना होगा की उमदा लेखको जो कथा लिखकर निर्माता और निर्देशक को सुनाते है, वे बाद में उस कथा के आधार पर अपना नाम डालकर मूवी बनाते है! और लेखको को उसका क्रेडीट देते नाही है!"

"हा राजेश! हमे पता है! हम भी ऐसी घटनाओ से व्यथित है! पर ज्यादातर ऐसी घटनाओ मे सबूत न होने के कारण और कॉपीराईट के नियम पता न होने के कारण लेखक कुछ नाही कर पाते! कुछ लेखक जल्दबाजी में अपनी कथा निर्माताओ को सुना देते है और कोई सबूत नही रहता की उसने कथा सुनाई की नही इस बात का कोई सबूत बचता नही!"

आता राजेश हिम्मत करून जे सांगणार होता ते अमितजी स्वीकारतील की नाही आणि कसे स्वीकारतील याबद्दल तो थोडा साशंक होता!

पण थोडी हिम्मत करूज तो म्हणाला, " अमितजी! तुम्हाला तुमच्या करीयरच्या सुरुवातीचा चित्रपट आठवत असेल! "किस्मत का खेल!"?

"हा! बिलकुल! हमे याद है! त्या चित्रपटामुळे माझ्या करियरला चांगले वळण मिळाले! मग मला अनेक चित्रपट मिळत गेले आणि मी यशस्वी झालो! के के सुमनची कमाल म्हणावी. त्यांनी त्या चित्रपटात माझा दमदार रोल लिहिला होता. त्यानंतर जरी मी त्याच्या पुढच्या चित्रपटात काम केले नाही, तरी माझ्या करियरला यशस्वी वळण दिल्याबद्दल मी त्यांचे नेहमी आभार मानतो!"

"आणि मी जर का म्हणालो कि केके सुमनने ती कथा सपशेल चोरली आहे तर?"

"क्या? क्या कह रहे है राजेश आप?"

"सर! और अगर मै आपसे कहू की वो स्टोरी मैने ही अपने कॉलेज जीवन में लिखी है तो?"

अमितजी अस्वस्थ होत म्हणाले, "क्या बात कह रहे हो राजेश? आप "केके सुमन" पर गंभीर किस्म के आरोप लगा रहे है! माना की आप एक जाने माने लेखक है पर किसी निर्माता को बदनाम करके आपको क्या मिलेगा? आप जो आरोप लगा रहे है, उसके पुष्टी के लिये क्या सबूत है आपके पास?"

अमिताजींचा हा पवित्रा थोडा अनपेक्षित असला तरी त्याने असा अंदाज बांधला होता.

तो तयारीनिशी आला होता.

त्याने लॅपटॉपवर एक व्हीडीओ प्ले केला आणि अमितजी तो पाहू लागले. रत्नाकरला विश्वासात घेऊन राजेशने त्याचेकडून जी माहिती आणि कबूली त्याच्या नकळत रेकॉर्ड केली होती त्याचा तो व्हीडीओ होता. त्यांनंतर राजेशने अमितजींना थोडक्यात त्याच्या जीवनातील पूर्वीच्या घटना सांगितल्या.

तसेच केकेचा मुलगा पिके याच्यासोबत राजेशने केलेल्या ऑपरेशनबद्दल पण सांगितले. अमितजींना ते ऐकून राजेशचे कौतुक वाटले आणि हसू सुद्धा आवरले नाही.

"राजेश जी! मै मानता हुं! आपके साथ बहोत गलत हुवा है! माझी सहानुभूती आहे तुम्हाला! पिके सोबत तुम्ही जे केलत ते एका अर्थाने योग्यच होतं! "

दुपारी जेवण झाल्यानंतर आता तिघेजण निवांत बसले होते.

वंदनाजी, राजेश आणि अमितजी!

अमितजींनी आपल्या पत्नीला सुद्धा राजेशबद्दल आणि एकूण सगळया लेखन चोरीच्या प्रकाराबद्दल सांगितले.

मग अमितजींनी राजेशला यासंदर्भात सर्वोतोपरी शक्य असेल तशी मदत करण्याचे आश्वासन दिले! मग राजेशने निरोप घेण्याआधी अमितजी सकाळी त्याला जे सिक्रेट किंवा सरप्राईज सांगणार होते ते त्यांनी राजेशला सांगितले. ते सरप्राईज म्हणजे अतिशय दुर्मिळ अशी संधी होती जी राजेशकडे लवकरच चालून येणार होती आणि त्याद्वारे राजेशला न भूतो न भविष्यती असा फायदा होणार होता.

ती गोष्ट अशी होती की – हॉलीवूडच्या त्या बहुचर्चित आगामी भव्य चित्रपटासाठी भारतात घडणाऱ्या घटनांमध्ये एका अध्यात्मिक महागुरुची भूमिका करण्यासाठी अमितजींना केंटकडून डायरेक्ट ऑफर आली होती आणि त्यांनी ती स्वीकारली होती.

तसेच अभिजितसाठी राजेशने लिहिलेल्या स्क्रिप्टमुळे प्रभावित होऊन त्या हॉलीवूडच्या चित्रपटाच्या भारतात घडणाऱ्या भागासाठी लेखन करण्याची संधी राजेशला मिळावी अशी विनंती ते केंटला करणार होते!!!

समाधानी मनाने राजेश समीरणकडे जायला निघाला. आजचा दिवस त्याचेसाठी आणि त्याच्या एकूणच करियरसाठी खूपच मोलाचा आणि महत्वाचा ठरला होता पण सुनंदाचा विचार मात्र त्याला अधूनमधून अस्वस्थ करत होता.

# प्रकरण 44

फ्रांको आणि व्हिटोरीओ दोघांनी एकमेकांना संपर्क साधल्यावर त्यांना कळले की अपघातात सुबोधचा मृत्यू झाला आहे. व्हिटोरीओने सुप्रियाच्या आई वडिलांना आणि सुबोधच्या आईला कॉल करून ही वाईट बातमी सांगितली. प्रसंग खूपच दु:खद होता. सुबोधची आई शुद्ध हरपून बसली. सुप्रियाच्या घरी सुद्धा वाईट हाल होते. दोघांचे नातेवाईक इटलीत यायला निघाले. ते येईपर्यंत सुप्रियाला धीर देण्याचे काम व्हिटोरीओ आणि त्याची पत्नी क्रिस्टीना यांनी केले. मृतदेहाचे तुकडे एकत्र करून तो घरी आणला गेला होता. दहशतवाद्यांना लवकरच पकडून शिक्षा करण्याचा निर्धार स्थानिक पोलिसांनी केला. मृतदेहाचे इटलीतच विद्युत दाहिनीत अंतिम संस्कार करण्याचे ठरवले गेले. सुप्रिया सतत स्फुंदून रडत होती. तिचे हाल बघवले जात नव्हते.

शेवटी तिचे मन वळवण्यासाठी व्हिटोरीओ इंग्रजीतून तिला म्हणाला, “हे बघ, ऐक! एक बातमी सांगतो तुला. तुला एका भव्य हॉलीवूडपटात डबिंग आर्टिस्ट म्हणून काम मिळण्याची शक्यता आहे, गरज आहे फक्त तू एक ऑडीशन देण्याची!"

तिच्या चेहऱ्यावर खिन्नता आणि विषाद दर्शवणारी शून्य नजर होती. तिच्याकडून काहीएक प्रतिक्रिया आली नाही. तिने फक्त थोडेसे वळून व्हिटोरीओकडे पाहिले.

व्हिटोरीओने क्रिस्टिनाकडे पाहिले. ती म्हणाली,

"हे बघ सुप्रिया, जीवनात असे प्रसंग सांगून येत नाहीत. पण आपण अश्या प्रसंगाना सामोरे जायला शिकले पाहिजे!"

आता सुप्रियाच्या चेहऱ्यावर भयंकर राग दिसून आला.

"मी त्या दहशतवाद्यांना सोडणार नाही. मला त्या सगळयांना गोळया घालायच्या आहेत. तरच सुबोधला ती श्रद्धांजली ठरेल!"

क्रिस्टिना म्हणाली, "तुझा राग योग्य आहे, पण दहशतवाद्यांना शिक्षा करण्याचे काम तुझे नाही पोलिसांचे आहे!"

व्हिटोरीओ पुढे म्हणाला, "सुबोधची सुध्दा इच्छा तुला मनोरंजन क्षेत्रात खूप यश मिळावं हीच होती. तेव्हा तू या दुःखातून सावरून लवकरच या क्षेत्रात अधिकाधिक यश मिळवले तर ती खरी श्रद्धांजली ठरेल सुबोधला!"

क्रिस्टिनाने विनंती केली, "एकच कर की यापुढे सगळे निर्णय विचारपूर्वक घे. लगेच इटली सोडून जाण्याचा निर्णय घेऊ नकोस. इथे एकटे वाटून घेऊ नकोस. आम्ही दोघे आहोत. आम्हाला तुझे फॅमिली मेंबर समज!"

दुसऱ्या दिवशी सगळे सोपस्कार आटोपल्या नंतर दहा दिवसांसाठी सुप्रिया भारतात गेली.

***

दरम्यान राजेशच्या आईने राजेशला कॉल केला.

"राजेश, फोन कट करू नको. मी काय सांगते ते ऐक. तूला बाळ होणार आहे. आणि सूनंदाच्या त्या काकूला मी लवकरच वठणीवर आणणार आहे. तिनेच तुझ्या बायकोच्या मनात विष पसरविण्याचे काम केले आहे. तिला सुनंदाची संपत्ती आपल्याला मिळाल्याचं सहन झालं नव्हतं म्हणून ती असे तुमच्या संसारात विष कालवण्याचे काम करत होती!"

पुढचं जास्त न ऐकता आपल्याला बाळ होणार या कल्पनेने राजेश सुखावला होता.

"आई, फार छान बातमी सांगितली, कधी आहे तारीख?"

"काही महिन्यातच!!"

"मग निघतो यायला पण सुनंदा, तिच्या मनातले गैरसमज?"

"मी जेव्हा तिच्याशी बोलले होते राजेश तेव्हा तिला पण तिची चूक वाटू लागली पण काकूच्या धाकाने ती तुला संपर्क करण्यास धजत नव्हती. शेवटी लहानपणा ासूनच त्या नालायक काकुचा पगडा तिच्या मनावर होता..तू ये. ती नाही कसला गैरसमज करणार! आणि गावाला निघून येण्याआधी जे काही घडले ते तिने मला सांगितले आता त्याचं मात्र काय ते तू बघ बाबा, आधी ये तर घरी!"

राजेश स्वागतपुरीला जायला निघाला. त्याला वारंवार पडणाऱ्या त्याच त्याच स्वप्नांत लिफ्टमध्ये तो नाजूक हात कुणाचा होता ते आता त्याला कळून चुकले होते, तो होता बाळाचा!!

***

माया माथूर जॉगिंगला गेली. सकाळच्या सहा वाजेच्या फ्रेश हवेत जॉगिंग केले तर बॉडी अर्थातच फिट राहणार होती. गेले तीन महीने तिने आराम करायचे ठरवले होते. अजून तिच्याकडे एकाही नवीन चित्रपटाची ऑफर नव्हती.

"माया मॅडम!" कुणीतरी आवाज दिला होता.

"एक्स क्यूज मी, तुमच्या मागे बघा!"

"आय डोन्ट नो यू, कोण तुम्ही!"

"मी सूरज सिंग. म्हटलं तुमच्याशी बोलायला ही सकाळची वेळच योग्य होईल, एरवी जरी सध्या चित्रपट आणि शूटिंग नसली तरी तुम्ही डान्स क्लासेस घेतात त्यामुळे बिझी असता."

"पण तुम्ही आहात कोण मिस्टर, सॉरी मी तुम्हाला ओळखले नाही. जन्टलमन तर दिसता पण तुम्हाला साधा शिष्टाचार माहीत नाही की अनोळखी महिलेशी बोलता तर बोलता, आणि विचारून सुद्धा ओळख सांगत नाहीत!"

थोडासा अंधार होता पण हळूहळू उन्हाची तिरीप चेहऱ्यावर पडल्यावर अचानक मायाला काहीतरी आठवले, "एक मिनिट, एक मिनिट, मी ओळखलं तुम्हाला! टीव्ही अॅक्टर रागिणी राठोडचे पती! आय फील सॉरी फॉर युवर गर्लफ्रेंड! आय थिंक यू आर एन ओनर ऑफ ए फुड चेन! डी. पी. सिंगचे पुत्र ना तुम्ही?"

सूरजने चेहरा गंभीर केला.

"चला बाजूला बाकड्यावर बसूया!" सूरज म्हणाला.

बाकड्यावर:

"माझ्या जीवनातल्या त्या घटना मला विसरायच्या आहेत. पत्रकाराने टीव्हीवर रागिणीच्या पूर्वायुष्यातल्या घटना उघड केल्याने तिने फार मनाला लावून घेतले होते, मी तिला सपोर्ट केला पण तिने .... !" असे म्हणून तो थोडा गंभीर झाला आणि पुढे बोलू लागला, "काही कारणास्तव मी आता डी. पी. सिंग सोबत राहत नाही. पण सोडा त्या सगळ्या गोष्टी आणि मी तुमच्याकडे कशाकरता

आलोय ते सांगतो! मी चित्रपट निर्मिती सुरू केलीय हे तुम्हाला माहीत असेलच, तेव्हा माझ्या चित्रपटात तुम्ही काम करावं अशी माझी इच्छा आहे, पण चित्रपटात लीड ॲक्टर मात्र नवीन आहे, आणि आपल्या देशातला नाही पण इंडियन ओरिजिन आहे."

थोडा विचार करून माया म्हणाली, "मला वाटते थोडी घाई होतेय. मला इतर सगळे डिटेल पण हवेत, लीड ॲक्टर कोण आहे काय आहे हे सगळं बघावं लागेल नाही का! तुम्ही पुढच्या आठवड्यात माझ्या ऑफिस मध्ये सगळे डिटेल्स घेऊन या, मग बघुया!"

सूरज बागेतून परत गाडीत बसत असतांना थोडा चिंताग्रस्त दिसत होता. हिने ऐकलं नाही तर? मग तिला राजी करायला दुसरा पर्याय वापरायची वेळ तर नाही ना येणार? बघूया!" असे म्हणून तो गाडी वेगाने पळवू लागला.

नंतर एके दिवशी सूरजने मायाच्या ऑफिसमध्ये तिला त्याच्या विनोदी पण गुन्हेगारी पार्श्वभूमीवर आधारित चित्रपटाची कथा ऐकवली जी स्वत: त्याच्या “भाईने” सांगितली होती. मायाला काही ती कल्पना पसंत पडली नाही! तसेच अशा अप्रकाच्यां नवख्या हिरोबद्दल ती काम करायला तयार नव्हती. तिने नकार कळवला.

सूरज अस्वस्थ झाला. तिकडे दुबईहून भाईचा अभिनयशून्य “चचेरा भाई” माया माथुर सोबतच चित्रपटात येण्यासाठी अडून बसला होता आणि भाई त्याचेसाठी काहीही करायला तयार होता कारण चचेरा भाईने त्या भाईच्या ड्रग्ज बिझिनेस मध्ये भाईला खूप मदत केली होती. आणि इकडे सूरजने जर भाईचे ऐकले नाही तर त्याच्या धंद्याला आणि पर्यायाने एकूणच त्याला मिळणाऱ्या अमाप संपत्तीला आणि त्याद्वारे मिळणाऱ्या विविध सुंदर स्त्रियांना मुकावे लागणार होते. माय माथूर...? काय करू तुला राजी करण्यासाठी?

***

सोनी बनकर आणि भूषण ग्रोवर यांचा साखरपुडा पार पडला. अनेक वर्तमानपत्रे आणि बॉलीवूड न्यूज चॅनल्सनी त्याला ठळक प्रसिद्धी दिली. राजेशने विणा वाटवे आणि सारंग सोमय्याला त्या इव्हेंटचे कव्हरेज करायला सांगितले होते.

भूषण ग्रोवरला बॉलीवूड अभिनेत्री रिताशासोबत टीव्ही सिरीयलची ऑफर आल्याने तो खूश होताच पण सोनी सुध्दा दुप्पट खुश होती. एकंदरीत दोघांचे टिव्ही इंडस्ट्रीत बरे चालले होते आणि दोघेही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडलेले होते म्हणून त्यांनी साखरपुड्याचा निर्णय घेतला होता आणि लवकरच ते लग्न बंधनात अडकणार होते. रिताशाही त्या साखरपुड्याला आवर्जून हजर होती. "डर की दहशत" ही सिरियल सुरू झाली होती आणि त्यात रिताशा भूषण यांची प्रमुख भूमिका होती. सिरियल पुन्हा चालायला लागली. लोकांमध्ये लोकप्रिय व्हायला लागली आणि सोनीची पण सुभाष भटच्या चित्रपटाची शूटिंग जवळपास संपली होती.

रिताशा आता त्या दोघांचे लग्न होण्याची वाट बघत होती. साखरपुड्याला रिताशाने त्या दोघांना भेट दिलेला एक आकर्षक आणि महाग ताजमहाल रात्री त्यांनी पॅकेज मधून उघडला तर टेबलवर ठेवताच त्याचे आपोआप दोन तुकडे झाले. दोघानाही आश्चर्य वाटले आणि थोडी चिंताही वाटली कारण हा एक प्रकारचा अपशकुन होता का? पण कदाचित अनेक हातांनी हाताळला गेल्याने तो तुटला असावा असे समजून त्यांनी तो फेकून देण्याचे ठरवले. मुद्दाम टीचलेला ताजमहाल रिताशने पॅक करून दिला होता आणि तो उघडताच दोघांचा चेहरा कसा झाला असेल हे आठवून ती गालातल्या गालात घरी रात्री हसत होती.

लवकरच त्या दोघांचे लग्न झाले. सिरियल अजूनही चॅनलच्या टॉप लिस्टवर होती. हनीमूनसाठी स्विसला जातांनाचे, गेल्यानंतरचे, सकाळी झोपेतून उठल्यावरचे, खातांना, पितांना, नाचताना, गातांना, बर्फ खेळताना, ट्रेनमध्ये एकमेकांचा किस घेतांना असे सगळे फोटो म्हणजे सेल्फी त्या दोघांनी फोटोग्राम, फ्रेंडबुक, चॅटर या सोशल साईट्स वर शेअर केले. फक्त रात्रीचे प्रायव्हेट क्षण सोडून!! रिताशा हे सगळे फॉलो करत होती. तिला त्यांची आयती खबर मिळत होती. सोनी ऐवजी फोटोत मी असेन, हा माझा पक्का निर्धार आहे असे म्हणून तिने रागाने एक फ्लावर पॉट जमीनीवर आदळला.

दोघेही हनिमूनहून परत आल्यावर काही दिवसानंतर:

रितशाने डी. पी. सिंग यांना एक सल्ला दिला की आता सिरियलची शूटिंग आपण युरोपात केल्यास प्रेक्षकवर्ग अजून वाढेल. युरोप मध्ये रहात असलेले भारतीय आणि त्यांचे स्थानिक मित्र यांना तिथे आलेले भूतांचे अनुभव आपण युरोप टूरच्या सिझन मध्ये दाखवू. तेथील स्थानिक कलाकारांना सुध्दा सामील करून घेऊ. त्यांना कल्पना पसंत पडली. मग लवकरच युरोपात जाऊन लेखकांची टीम काम करायला लागली. हा हेतू होताच पण सिरियल भारताबाहेर घेऊन जाण्याचा मूळ हेतू रिताशाचा हा होता की त्याच दरम्यान सोनी बनकरला एका डान्स रियालिटी शो मध्ये तीन पैकी एक जज्ज म्हणून संधी मिळाली, म्हणजे ती युरोपात भूषण सोबत येऊ शकणार नव्हती!

# प्रकरण 45

टीव्हीवर राजेशचा एक प्रोग्राम टेलिकास्ट होत होता. त्याची शूटिंग आधीच झालेली होती आणि आता तो फक्त टेलिकास्ट होत होता आणि पब्लिक डिमांड मुळे हा शो आज बहुतेक सगळ्या प्रमुख प्रायव्हेट आणि दूरदर्शन चॅनल्स वर प्रसारित करण्यात येत होता. अमितजी सुद्धा आवडीने हा कार्यक्रम बघत होते.

"आजचा आपला विषय आहे भारतीय चित्रपटसृष्टीतील आणि टिव्ही क्षेत्रापुढील विविध आव्हाने. आज कधी नव्हे एवढी चित्रपटातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याची चर्चा होते आहे पण त्याचबरोबर विविध मार्गांनी चित्रपटांची सेन्सॉरशिप पण वाढली आहे!"

स्टेजवर साऊथ, मराठी, हिंदी तसेच इतर अनेक चित्रपट सृष्टीतील आघाडीचे तसेच नवखे प्रोड्युसर्स आणि डायरेक्टर्स आणि काही सुपरस्टार हिरो हिरोईन बसलेले होते, आणि नेहमीप्रमाणेच ऑडीयंस मध्ये सामान्य सिनेप्रेमी माणसे, तसेच बॉलीवूड मधील पडद्यामागे काम करणारे कलाकार तसेच त्यांचे नातेवाईक व इतर मंडळी बसले होते.

एक निर्माता म्हणाला, "हे एक आव्हान आहेच. सिगारेट पिताना दाखवलं तर सिगारेट हानिकारक अशी सूचना दाखवा, दारुसाठी तेच! प्राणी असल्यास त्याच्या जीविताला हानी पोहोचवली नाही हे दाखवा, शिव्या चालत नाहीत, पण खून मारामारी, हे सगळं चालतं. प्राण्यांना हानी पोचवली तर चालत नाही पण येथे स्टंटमेन स्टंट सिन करताना बरेचदा मृत्यूमुखी पडतात त्याचे काही सोयरसुतक नाही!"

दुसरा एक निर्माता म्हणतो, "जितकी बंधनं जास्त होत गेली तेवढे जास्त स्वातंत्र्य चित्रपटात घेण्यात येऊ लागले. कुठल्यातरी आडमार्गाने चित्रपट सेन्सॉर कडून मंजूर करून घेणं किंवा ए

चित्रपटाला यू ए सर्टिफिकेट लाच देऊन मिळवणं हे सुरु झालं. तसं पाहिलं तर ए आणि यू ए चित्रपटां मध्ये आता सीमारेषा नाहीशी झाली आहे किंवा पुसट झाली आहे. टीव्हीवर सुध्दा आता सेन्सॉर सर्टिफिकट बंधनकारक करण्यात येणार असल्याचे ऐकिवात आहे. अशाने आधीच हॉलिवूडशी स्पर्धा करण्यासाठी म्हणून खर्चिक झालेली भारतीय चित्रपटनिर्मिती अशा सेन्सॉरशिप मुळे धोक्यात आली आहे. सेन्सॉर बोर्ड कमी आहे की काय म्हणून आता विविध संघटना सुध्दा जाळपोळ करतात, धमकी देतात. बायोपिक काढला तर त्यांचे वंशज धमक्या देतात, पण एका अर्थाने बायोपिक काढताना निर्मात्यांनी भान ठेवलेच पाहिजे कारण तथाकथित व्यक्ती ज्याच्यावर बयोपिक निघतोय त्यांच्या बद्दल खरेच दाखवले गेले पाहिजे आणि शक्यतो वादग्रस्त भाग टाळला पाहिजे."

राजेश म्हणाला, "आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की सेन्सॉर बोर्ड अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करतंय की अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली काहीजण सेन्सॉर बोर्डाची मुस्कटदाबी करत आहेत तेच कळेनासं झालंय. मुळात हे दोघे एकाच बाजूला आहेत की विरुद्ध बाजूला तेच समजत नाही!"

एक मराठी निर्माता म्हणाला, "तुझे म्हणजे अंशत: बरोबर आहे आणि त्यात भरीस भर म्हणून पायरसी वाढली आहे. आजकाल लोक चित्रपटाची पायरेटेड कॉपी मोबाईलवर, लॅपटॉपवर बघणे पसंत करतात, थिएटरमध्ये कुणी येत नाही!"

एक कसलेला अभिनय सम्राट तरुण अभिनेता म्हणाला, "पण मल्टिप्लेक्स थिएटरचे दर किती वाढले आहेत हो! त्यामुळे सामान्य माणूस जातच नाही चित्रपट बघायला, आणि आजकाल मनोरंजनासाठी घरी स्वस्तात कितीतरी पर्याय उपलब्ध आहेत, पूर्वी असे नव्हते म्हणून थियटर मध्ये पिक्चर गोल्डन जुबिली साजरे करायचे. आजकालच्या पिढीला हे माहितीसुद्धा नाही!"

दुसरी एक अभिनेत्री म्हणाली, "पायरसी रोखू शकत नाही म्हणून मल्टिप्लेक्सला पहिल्या एक दोन आठवड्यात कमावून घ्यायला लागते म्हणून तिकिटांचे दर वाढवले आहेत असे म्हणायचे की

मल्टिप्लेक्सचे दर जास्त असल्याने पायरसी वाढली आहे असे म्हणायचे? अंडे आधी की कोंबडे असा हा सवाल आहे!"

आणखी एक अभिनेता म्हणाला, "काहीही असले तरीही पायरसीचे समर्थन करता येणार नाही. उलट आजकाल दोन तीन आठवडे चित्रपट चालल्यानंतर दोन चार महिन्यांच्या आत टीव्हीवर येतोच ना! तरीही पायरसी चालूच आहे. ती रोखण्यासाठी कठोर शिक्षा व्हायला हवी पण मुळात सर्वप्रथम कॉपी कधी आणि कुठे होते ते आपण शोधू शकत नाही मग शिक्षा नेमकी कुणाला करणार?"

राजेश म्हणाला, "हो, तो मोठा गहन प्रश्न आहे. बनावट सीडी विक्रेत्यांना अटक करून फारसे काही होणार नाही!"

राजेश पुढे सांगू लागला, "आजकाल चित्रपटसृष्टीच नाही तर लेखनक्षेत्रात सुध्दा पायरसी वाढली आहे, बनावट पुस्तके सर्रास रस्त्यांवर विकत मिळतात आणि त्यात भरीस भर म्हणून काही डायरेक्टर लोकं लेखकांच्या कथेची सर्रास चोरी करतात, पण असो तो विषय वेगळा आहे आणि या आधी चर्चिला गेला आहे!"

एक निर्माता म्हणाला, "मग कधीतरी बॉलीवूड मंदीतून सावरायला सेक्सचा आधार घेते असे आढळून येते. सेक्सवर आधारित कथा हा चित्रपट चालण्याचा हुकुमी एक्का मनाला जातो! यात इन्व्हेस्टमेंट कमी असते आणि रिटर्न्स बऱ्यापैकी मिळतात, निदान नुकसान होण्याची शक्यता कमी असते नाही का?"

प्रेक्षकांतला एकजण म्हणाला, "पण एकूणच समाजमनावर याचा परिणाम काय होतो याचा कुणीही निर्माता, लेखक, निर्देशक विचार करतांना दिसत नाही!

राजेश, "ते ही काही अंशी खरे आहे, पण प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात हे ही लक्षात घ्या. तर आपण एकूणच भारतीय चित्रपट सृष्टीसमोरील आव्हाने याबद्दल चर्चा करत होतो. चुकीची सेन्सॉरशिप किंवा वैयक्तिक आकसापोटी किंवा राजकीय हेतूने प्रेरित अशी लादली गेलेली सेन्सॉरशिप, पायरसी आणि अजून कोणती आव्हाने आहेत, सांगा बरे?"

दुसरा एक प्रेक्षक म्हणाला, “आजकाल टीव्हीवर एक ट्रेंड दिसतो. एखादी सिरीयल वर्षानुवर्षे चालते आणि मग अचानक काहीतरी कारण देऊन निर्माते ती अचानक बंद करतात. ही तर प्रेक्षकांची शुद्ध फसवणूक आहे. याची दाद कुठे मागता येईल का? वर्षानुवर्षे सिरीयल रोज रोज बघून अचानक मधूनच ती बंद केल्यास प्रेक्षकांनी आतापर्यंत सिरीयल बघायला दिलेल्या वेळ हा वाया गेल्यासारखा नाही का?”

राजेश म्हणाला, “हा मुद्दा बरोबर आहे. कुणी सिरीयल विरोधात तक्रार केली असेल आणि कोर्टाने तसा सिरीयल बंद करायचा आदेश दिला असेल तर तो भाग वेगळा पण निर्मात्यांच्या लहरीखातर सिरीयल बंद करणे हा मात्र अन्याय आहे. याबाबत कन्झुमर कोर्टात दाद मागता यायलाच हवी!”

प्रेक्षकांतला आणखी एकजण म्हणाला: "राजेश मला असे वाटते की कास्टींग काऊच हा आपल्या भारतीय चित्रपट सृष्टीतील एक मोठ्ठा कलंक मोठ्ठा डाग आहे, आजही ते चालते हे सत्य नाकारून चालणार नाही! आणि आपल्या मॅडम अॅकॅडमी आणि त्यासारख्या संस्थांमध्ये पण आजकाल भ्रष्टाचार वाढलाय असे ऐकिवात आहे, अभिनय शिकविणाऱ्या अशा प्रकारच्या अनेक संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढतोय असे नाही का वाटत?"

राजेश म्हणाला, "प्रत्येक क्षेत्रात बऱ्यावाईट गोष्टी असतातच, त्यामुळे आपण मिळून वाईट गोष्टी कमी करण्याचा प्रयत्न करू म्हणजे लोकांचे या क्षेत्राबद्दल गैरसमज दूर होतील. मी याबद्दल सुपरस्टार अमित श्रीवास्तव यांची मदत घेणार आहे. त्यांनीही या चर्चेत सहभागी होण्याबद्दल मी विनंती केली होती पण काही कारणास्तव ते येऊ शकले नाहीत. कास्टींग काऊच बद्दल माझेकडे

बॉलीवूड मधील काही तथाकथित प्रसिद्ध व्यक्तींविरोधात पुरावे सुध्दा आहेत, स्टिंग ऑपरेशनमध्ये ते अडकले आणि पुरावे हाती आले, योग्य वेळ आली की ते जगासमोर मी आणणार!"

हा कार्यक्रम टीव्हीवर बघत असताना राजेश त्याच्या छोट्याशा बाळाशी खेळत होता आणि पिकेचा संताप होत होता. त्याने राजेशला कॉल केला, "राजेश, विणा वाटवेने मला सांगितल्या प्रमाणे तुम्ही लोकं माझ्या वडिलांचे काळे कारनामे पब्लिक समोर आणणार नव्हता फक्त माझ्यासाठी, माझ्या विनंतीवरून! माझ्या कथा चोरून तुम्ही आमचा बदला घेतला, फिट्टम फाट झाले आता मला वाटते तुम्ही थांबावे, वडिलांच्या भविष्याचा प्रश्न आहे, आमच्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे!"

राजेशने त्याला खोटा दिलासा दिला, "काळजी करू नको पिके, ते मी प्रोग्राम मध्ये सहज म्हणालो पण मी तसे करणार नाही! माझ्यावर विश्वास ठेव!"

राजेश मनात म्हणाला, "बेटा पिके, कथाचोरीचा गुन्हा तर तुझ्या बापाने केला आहेच पण, चित्रपटांत काम देण्याच्या आमिषाने फसवणूक आणि लैंगिक अत्याचार केलेल्या मुलींबद्दल काय? केकेला एक्स्पोज केल्याशिवाय तक्रार दाखल करायला त्या पुढे येणार नाहीत. जरी त्या गोष्टीला अनेक वर्षे लोटली तरी न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ज्यांनी स्वखुशीने केकेला शोषण करू दिले त्यांच्या बद्दल काय बोलणार? पण ज्यांच्या मनाविरुध्द शोषण केले होते त्यांचे काय?"

# प्रकरण 46

माया माथुरचे पती सुशांत माथुर हे एक नावाजलेले डॉक्टर होते आणि त्यांनी स्वत: उभारलेल्या एका मोठ्या हॉस्पिटल मध्ये ते नेहमी बिझी रहात. त्यांनी आजवर अनेक गरीब रुग्णांना मोफत किंवा अगदी कमी खर्चात ऑपरेशन आणि औषधसेवा दिली होती. डॉक्टरी पेशाचा कधीही त्यांनी दुरुपयोग केला नव्हता आणि माया माथुर एक प्रसिद्ध अभिनेत्री असल्याने दोघांच्या आयुष्यात खूप पैसा, प्रसिद्धी आणि नावलौकिक मिळाला होता. सौंदर्य, अभिनय आणि नृत्य या तीन गोष्टींच्या जोरावर तिने चित्रपटसृष्टीची अनेक वर्षे गाजवली होती. सध्या तिच्याकडे चित्रपट नव्हते पण ती डान्स क्लासेस घेत होती.

त्या दिवशी सहावीत शिकत असलेली माया माथूरची जुळी मुले घरी आली. दप्तर बेडवर फेकून ती दोघे ओरडत म्हणाली, “मम्मा, उद्या सुट्टी आहे. टुडे वी फिनिश्ड अवर क्राफ्ट प्रोजेक्ट. वी विल नॉट डू होमवर्क टुडे. वी आर गोइंग तो प्ले इन द गर्दन डाऊन!” असे म्हणून दोघांनी फ्रीजमधून ब्रेड आणि जाम काढले आणि मम्माला म्हणाले, “आम्हाला ब्रेड जाम आणि दूध दे मम्मा, मग आम्ही खेळायला जातो, पटकन दे! भूक लागली आहे!”, असे म्हणून दोघेही टीव्ही लाऊन सोफ्यावर बसले.

दोघांची खाण्यापिण्याची आवड जवळपास सारखीच होती. एकाचे नाव अरुण आणि दुसरा वरूण.

“अरे बाबांनो, खायची घाई, खातांना टीव्ही पण पाहिजे, लगेच खेळायला जायची सुद्धा घाई? अरे दप्तरातून सकाळचा टिफिन आणि पाण्याची बाटली तर काढाल की नाही, की ते पण मीच काढू?” असे म्हणून ती प्रथम त्यांच्या दप्तराकडे गेली तेवढ्यात दोघे पुन्हा ओरडले, “आई प्रथम दूध जाम ब्रेड मग आमचा टिफिन नंतर काढ दप्तरातून!”

शेवटी तिने दप्तराचा नाद सोडला आणि ब्रेड जाम आणि दूध बोर्नव्हीटा करायला घेतले.

"चला, जा बेसिन मध्ये हात धुवून घ्या बरं आधी! चला उठा!" असे म्हणून तिने जबरदस्तीने त्यांना सोफ्यावरून उठवले आणि हात धुवायला पिटाळले.

अर्धा तास डोरेमोन आणि शिनचान बघता बघता दूध ब्रेड जाम खाऊन झाल्यावर मग ते दोघे खाली पळाले. लिफ्टमध्ये लिफ्ट अटेंडंट असल्याने तसे ते दोघे सातव्या मजल्यावरून खाली बागीच्याकडे जाऊ शकत होते. थोड्याच वेळात खिडकीसमोरच्या बगिच्या ते दोघे त्यांच्या मित्रांसोबत लपाछपी पळापळी खेळायला सुद्धा लागले होते. त्या दोघांना मुक्तपणे खेळताना पाहून मायाला इतर कशापेक्षाही जास्त आनंद झाला. त्यांचे टिफिन दप्तरातून काढतांना अचानक एक चिठ्ठी खाली पडली. ती मायाने उचलली! दप्तरात ही कोणती चिठ्ठी असे म्हणून ती चिठ्ठी उलगडतांना विचार करू लागली, "शाळेने एखादी सूचना पालकांसाठी लिहून दिली असावी!"

चिठ्ठी प्रिंटेड होती आणि लाल अक्षरात होती, ज्यामुळे माया जरा घाबरलीच.

"घाबरलात ना? मुलांच्या दप्तरात ही चिठ्ठी अचानक कशी आली ते बघून? तुमची दोन्ही मुले ज्या नावाजलेल्या शाळेत जातात त्यात इतकी सुपर सिक्योरिटी असूनही ही चिठ्ठी आम्ही मुलांच्या दप्तरात टाकू शकलो तेही त्यांच्या नकळत तर आम्ही त्यांना किडनॅप पण सफाईदारपणे करू शकतो! अ अ अ! पूर्ण वाचा आणि पोलिसांना किंवा तुमच्या डॉक्टर पतीला यातले काही एक सांगण्याचा विचार चुकुनसुद्धा मनात आणू नका! आता दुसऱ्या दप्तरातली चिठ्ठी वाचा!"

फुल एसीमध्ये चेहऱ्यावर घाम जमा होऊन माया थरथरायला लागली आणि तिने खिडकीतून खाली पहिले. मुले दृष्टीस पडली नाहीत. ती खूपच घाबरली आणि तिने आणखीन डोकावून पाहिले तेव्हा तिला अरुण घसरगुंडीहून सरकतांना आणि वरूण उंचच उंच झोके घेतांना दिसला. मेन गेट जवळ सिक्योरिटी गार्डस होते, मग तिला हायसे वाटले.

नोबिता घरातून गायब झाल्याने चिंता करत असलेली त्याची आई डोरेमोनला विनंती करते की कोणतेतरी गॅजेट काढ ज्याद्वारे तो नोबिताला शोधू शकेल, असे दृश्य टीव्हीवर सुरु असलेले पाहून तिने पटकन टीव्ही बंद केला आणि दुसरे दप्तर घेऊन त्यात तिने चिठ्ठी शोधली. त्यात लिहिले होते:

“सूरज तुमच्याकडे विनंती करण्याकरिता आला होता, तुम्ही त्याला नाही बोललात. तो तर फक्त आमचा मोहरा आहे. त्याला तुम्ही नाकारलेत, पण आमच्यापासून तुम्ही वाचू शकणार नाहीत. तुमच्या मुलांची सुरक्षितता हवी असेल तर सूरजच्या चित्रपटाला फटक्यात हो म्हणा! आमच्या भाईचा भाई त्यात काम करणार आणि माया माथुर त्याला नाही म्हणणार? भाईला सहन होईल का ते? सांगा बरं? तुमचे खूप भले आहे मॅडम असे करण्यात! काय मग फोन करून सांगता ना आताच सूरजला? दोन्ही चिठ्ठ्या मस्तपैकी जाळून टाका आता. खूप भलं होईल तुमचं असं केल्यावर!!”

घामाने डबडबलेल्या चेहऱ्यासह ती मटकन खुर्चीवर बसली. पाणी पिता पिता ती विचार करू लागली, त्या चिठ्ठ्या जाळून टाकायच्या का? की कुठेतरी लपवून ठेऊ? सुश ला सांगू की नको? तो म्हणेल सोडून दे ही मनोरंजन नगरी! बास आणि बासरी दोन्हीही राहणार नाहीत. पण सोडून दिली समजा ही चित्रपटसृष्टी तरी माझ्यामागचे वलय कायम राहणार! आणि आता सोडण्याचा विचार केला तरी काय होणार? हा चित्रपट करावाच लागणार असं दिसतंय आणि समजा मी चित्रपट केला तरी काय हरकत आहे? प्रथम हो तर म्हणूया, शुटींग सुरु करुया मग बघू काय करायचे ते?

खिडकीतून हाका मारून तिने दोघाना वर बोलाऊन घेतले आणि त्यांच्यावर अनेक प्रश्नांचा भडीमार सुरु केला जसे –

“बेटा, तुला शाळा सुटल्यावर कुणी अंकल भेटले होते का?”

“बसमध्ये चढतांना कुणी भेटलं होतं का?”

“रस्त्यात कुणी..?”

सगळ्या प्रश्नाचे उत्तर “नाही” असे आले.

“का विचारते आहेस मम्मी आम्हाला असे?”

“काही नाही आपलं सहज रे! अनोळखी लोकांना भेटत जाऊ नका रे! चांगले नसतात बरे!” असे सांगून तिने विषय बदलून टाकला.

म्हणजे ज्यांनी दोघांच्या दप्तरात नकळत चिठ्ठ्या ठेवल्या ते सराईत गुन्हेगार असावेत. अशांच्या विरोधात जाण्यापेक्षा सध्या त्यांची मागणी पूर्ण करणे हाच उपाय आहे. चित्रपटात काम करा अशीच अपेक्षा ते करत आहेत दुसरे तर काही ते मागत नाहीएत, बघुया! आता हो म्हणूया मग पाहू! पण तिच्या मनात सूरजला भेटल्यापासूनच शंकेची पाल चुकचुकतच होती. कारण फिल्म इंडस्ट्रीत बऱ्याच जणांना रागिणीची आत्महत्या मान्य नव्हती, त्याना तो खूनच वाटायचा. शंकेला वाव होता. मायाला सुद्धा रागिणीच्या आत्महत्येमागे काहीतरी गौडबंगाल आहे असे वाटत होतेच. पण कुणाजवळ पुरावा नव्हता आणि कोर्ट पुरावा मागतं. जसा एखाद्या माणसाला जिवंत राहण्यासाठी ऑक्सिजन हवा असतो तसा जज्जला न्याय देण्यासाठी पुरावा हवा असतो. काय करणार? जज्ज हा सुद्धा कायद्याच्या चौकटीत राहूनच न्याय देऊ शकतो!

सूरजला मायाकडून फोनवर गुड न्यूज मिळाली की ती त्याच्या कॉमेडी चित्रपटात काम करणार!

सूरज खुश होऊन मनात म्हणाला, “चला बरे झाले! पुन्हा व्हेरोनिकाला भेटायला जायला आता मी मोकळा आणि टेन्शन फ्री!”

कातील खान आणि माया माथूरचा तो विनोदी चित्रपट – “गँगस्टर की दुल्हन!” सुपरहिट झाला. त्यात ओलिव्हियाला त्याने महत्वाची भूमिका देऊ केली होती. त्या चित्रपटानंतर कातील खान भारतात राहायला येऊन त्याने मुंबईतच बांद्रयाला तळ ठोकला, भाईच्या कृपेने कमी किमतीत समुद्रकिनारी फ्लॅट मिळवला. माया माथुरच्या चित्रपटानिमित्त लाभलेल्या सहवासातच तो सध्या खुश होता. दरम्यान सूरजचे ड्रग्ज कनेक्शन वाढत गेले आणि त्याचे विनोदी चित्रपट सुद्धा सुपरहिट होत

गेले. त्याचे ओलोव्हीया आणि व्हेरोनिका सोबत प्रेमसंबंध अव्याहतपणे चालत राहिले. आणि प्रत्येक चित्रपटाच्या सुरुवातीला तो “माझे प्रिय प्रेम रागिणी, तुला हा चित्रपट समर्पित” असे वाक्य टाकायचा!

□□□□

# प्रकरण 47

रिताशा युरोपच्या टूरवर सगळ्या टीम सोबत खूश होती. सोनी भारतात डान्स शोच्या जज्जच्या भूमिकेत खूश होती आणि त्यात ती तिच्या आगामी चित्रपटाचे प्रमोशन पण करत होती. इकडे भूषण ग्रोवर लग्न, हनिमून आणि करीयर मार्गी लागल्या बद्दल खूश होता पण रिताशाच्या मनात काय चालले आहे याची त्याला पुसटशीही कल्पना नव्हती. आता तर अशी स्थिती होती की जवळपास युरोप टूरची अघोषित सिरियल डायरेक्टर तीच झाली होती. डिपी सिंग सुध्दा खूश होते कारण त्यांच्या मागचे काम कमी झाले होते आणि त्यांचे करीयर पुन्हा मार्गी लागले होते.

आयर्लंड सरकारची परवानगी घेऊन त्यांच्या टीमचा मुक्काम सध्या मॉलवरिन या भूत बाधित कॅसलच्या जवळ असलेल्या हॉटेल मध्ये होता. आसपासचे लोकं सांगायचे की या किल्ल्यात एका पहारेकरीला त्याच्या राजाच्या पत्नीसोबत संबंध ठेवल्याच्या खोट्या आरोपाखाली मृत्यूदंड दिला गेला होता पण फाशीच्या शेवटच्या क्षणापर्यंत आणि प्राण जाई जाई पर्यंत तो म्हणे ओरडत होता की तो निर्दोष आहे. त्याची आरोळी त्यावेळेस फाशी देताना ज्या लोकांनी ऐकली होती त्यापैकी काही जण वेडे झाले, काहीजण पाच दिवसात मेले तर काहीजण म्हणे बेपत्ता झाले. आजही म्हणे तेथे तसा त्याच्या ओरडण्याचा आवाज ऐकू येतो की मी निर्दोष आहे.

संध्याकाळी पाच नंतर तेथे जायला बंदी असते. त्यांची टीम सगळी शूटिंग दिवसा करायची आणि नंतर स्पेशल इफेक्ट द्वारे दिवसाचे सिन रात्रीचे वाटतील असे त्यात बदल करायचे.

त्या दिवशी शूटिंग अर्ध्या दिवसात संपली होती. सहज म्हणून जवळपास फिरण्यासाठी रिताशाने भूषणला विनंती केली. तो तयार झाला. थोड्याच वेळात पाऊस येईल अशा प्रकारे मोबाईलवर हवामानाचा अंदाज पाहिल्यावर तिने मुद्दाम त्याला फिरायला चालण्याची विनंती केली. नंतर ती म्हणाली, "चल भूषण, जरा सिटी फिरून येऊ! परवा आपल्याला येथून निघायचे आहे, आज वेळ मिळाला आहे तर जवळपास जाण्यापेक्षा सिटी मध्ये मिड टाऊन मॉलमध्ये फिरून येऊ!"

भूषण हो म्हणाला कारण त्यालाही हॉटेलच्या रूमवर बसून बोअर होणार होते आणि मिड टाऊन मॉल मधून सोनीसाठी काहीतरी विकत घेता येईल असा विचार करून तो तिच्यासोबत निघाला. भूषणने सोनीला कॉल लावला पण ती शूटिंग मध्ये व्यस्त असल्याने फोनवर उपलब्ध नव्हती.

काही अंतर मॉलमध्ये चालल्यानंतर अचानक एक मोठा आवाज आला आणि पळापळ सुरु झाली. त्यामुळे ती संधी साधून दचकल्यासारखे करून रिताशाने भूषणच्या थोडे जवळ सरकत त्याचा तळहात धरला आणि तिची पाचही बोटे त्याच्या हाताच्या बोटात लॉक केली. भूषण थोडा अवघडला पण सोबतच्या एका लेडीची भीतीने अशी होणारी प्रतिक्रिया साहजिक आहे असे समजून त्याने तिला विरोध केला नाही. तसे पाहता सिरियल मध्ये शूटिंगच्या वेळेस तिच्या शरीराचा स्पर्श त्याला कित्येक वेळा झाला पण ते सगळे लोकांसमोर आणि मुद्दाम केले असल्याने त्याची अनुभूती वेगळी आणि आताच्या स्पर्शाची अनुभूती कित्येक पटीने वेगळी होती.

नंतर घोषणा झाली आणि कळाले की ती पळापळी म्हणजे मॉल मधले “मॉक ड्रील” होते म्हणजे एखादा दहशतवादी हल्ला झाला तर काय करायचे याची ती रंगीत तालीम होती.

पण तोपर्यंत त्या गोंधळात मार्ग काढतांना घाबरून रिताशा बराच वेळ भूषणच्या अंगाला अंग घासून चालत होती. आज कोणत्याही परिस्थितीत डाव साधायचा कारण युरोपला येऊन बरेच दिवस झाले होते पण हवी तशी संधी मिळत नव्हती, जी आज नक्की मिळेल असे तिला आज सकाळपासून खूप मनापासून वाटत होते. त्या दृष्टिकोनातून पाहिले पाऊल योग्य संधी साधून तिने टाकले होते.

रिताशाने त्याच्या हातात तिचा हात जेव्हा दिला तेव्हा भूषणला तिच्या हाताची लांबसडक बोटे प्रकर्षाने दिसली. जाणवली! ती बोटे त्याला खूपच आवडली. हातात हात घालून तो अनेकदा सोनीसोबत फिरला होता पण रिताशाच्या बोटांच्या स्पर्शाने त्याला जी अनुभूती मिळाली ती आयुष्यात प्रथमच त्याने अनुभवली होती, अगदी सोनीच्या हातांच्या स्पर्शात सुद्धा ती जादू नव्हती!

नंतर ते दोघे अनेक दुकानं फिरले. सोनीकरता भूषण जी वस्तू खरेदी करण्याचा प्रयत्न करायचा त्याबद्दल तो रिताशाचे मत विचारायचा कारण एक महिला दुसऱ्या महिलेला काय आवडेल हे ठामपणे

सांगू शकते ज्याद्वारे सोनीला त्याने घेतलेले गिफ्ट आवडण्याचे चान्सेस वाढणार होते. पण रिताशा भूषणने निवडलेल्या प्रत्येक आयटेम मध्ये काहीतरी खोट काढून त्याला गोंधळून टाकायला लागली. शेवटी भूषण तिच्या बोलण्यात येऊन कोणतीच वस्तू नीट निवडू शकला नाही.

नाही म्हटले तरी त्या रात्री भूषणच्या मनात तिच्या हाताच्या घट्ट स्पर्शाबद्दल एक वेगळेच आकर्षण घर करून राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी –

सकाळी पाच वाजताच रिताशाने भूषणच्या रुमच्या दरवाज्यावर टक टक केले. रात्रीचा वन पीस गाऊन तसाच अंगावर ठेऊन ती आली होती.

"अरे बापरे, रिताशा एवढ्या सकाळी?"

"सकाळी अकरा वाजता शूटिंग चालू होते आहे. वेळ कमी आहे. म्हणून लवकर उठले आज. म्हटलं रिव्हर साईडला फिरून येऊ. तुझ्या पेक्षा कुणी डीसेंट आणि सिंपल माणूस कंपनी द्यायला मला आपल्या पूर्ण टीम मध्ये दिसत नाही म्हणून तुला विचारले. असा आश्चर्यजनक चेहरा काय केलास? तू म्हणशील तर जाते मी परत...!"

सकाळी सकाळी अचानक उठवल्याने त्याचा चेहरा आश्चर्य दर्शवत होता आणि त्याने काही बोलण्याच्या आतच तिने बडबड चालू केली.

"रिटा, तसे नाही, ये बैस. अचानक पणे तू सकाळी सकाळी आलीस म्हणून बाकी काही नाही", त्याची नजर तिच्या गाऊन मधून दिसणाऱ्या शरीरावरून हट म्हणता हटत नव्हती," बैस! मी पटकन ब्रश करून येतो!"

ती त्याच्या बेडवर बसली आणि तो ब्रश करायला वॉशरूम मधील बेसिनकडे गेला तेव्हा ती त्याच्या बेडवर आडवी झाली. एखाद्या परपुरुषाच्या रुममध्ये आपण सकाळी सकाळी आलो आहोत याची तमा न बाळगता एक आळस देऊन ती बेडवर पहुडली.

दहा मिनिटांनी वॉशरूम मधून ब्रश करून बाहेर आल्यावर बेडवर नजर टाकताच त्याचा अनपेक्षित दृश्याने आ वासला गेला. नजर बेडवर खिळली.

रिताशा बेडवर पूर्ण नग्नावस्थेत होती आणि रूमचा दरवाजा, पडदे, खिडक्या सगळे लावलेले होते. तिच्या नजरेतून आणि शरीरातून एक मादक आव्हान झळकत होते. त्याच्या हातातून रुमाल आणि ब्रश खाली पडला...

मग त्या दिवसानंतर एक दिवसाआड रिताशा त्याला उद्युक्त करायची आणि मग दिवसा किंवा संध्याकाळी किंवा रात्री वेगवेगळया ठिकाणी शूटिंगच्या ब्रेक मध्ये आडोसा शोधत कुठेही ते बिनधास्तपणे प्रेम करायला लागले अर्थात त्यांच्या टीमपासून हे लपवण्याची खबरदारी घेण्यात ते चुकत नव्हते.

खरेतर भूषण हा रिताशा सोबत प्रथम शारीरिक पातळीवर गुंतला होता आणि नंतर रिताशा त्याची आवड निवड छोट्या छोट्या प्रसंगाद्वारे सांभाळायला लागली तेव्हा मात्र तो हळूहळू तिच्यात स्वतःच्या नकळत भावनिक पातळीवर सुध्दा गुंतत गेला.

युरोपमधून परत आल्यानंतर एक वेगळ्या प्रकारचा बदललेला भूषण सोनीला जाणवला. सोनीसोबत प्रेम करतांना त्याला रिताशा आठवायला लागली कारण सोनी भूषण ज्या खेळात अजून नवशिके होते त्यात रिताशा खूप अनुभवी होती आणि तिचा तो वेगवेगळा अनुभव त्याने अनुभवल्यानंतर त्याला साधा मिळमिळीत अनुभव नकोसा वाटायला लागला. सोनीला अजूनही कळत नव्हते नेमके काय झाले ते! आणि भारतात आल्यानंतर फोनवर आणि शूटिंगच्या दरम्यान फ्री वेळ जेव्हा जेव्हा मिळेल तेव्हा तेव्हा भूषण वेड्यासारखा तिच्यात गुंतत चालला होता. सोनीला काही काळानंतर थोडा थोडा संशय आला पण तिला एखादा ठोस पुरावा मिळेल असे काही अजून मिळत नव्हते.

# प्रकरण 48

सुनंदा राजेश सोबत राहायला मुंबईत आपल्या बाळासह आली. राकेशने बाळाचे नाव “अक्षर” ठेवले.

दरम्यान अभिजित श्रीवास्तवसाठी राजेशने लिहिलेल्या स्क्रिप्टमुळे प्रभावित होऊन अमितजींनी राजेशला जो एक गुप्त प्लान सांगितला होता त्याची वेळ येऊन ठेपली होती.

अमित श्रीवास्तव यांचा “मालामाल हो जाओ” या कार्यक्रमाचा नुकताच दहावा सिझन सुरू झालेला होता आणि त्याच्या शुक्रवारच्या खास एपिसोड मध्ये अमितजिंनी सिनेक्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या राजेशला निवडले होते. सिने क्षेत्रातील लेखकांसाठी त्याला काहीतरी कामगिरी करायची आहे हा विचार अमितजींना आवडला. आणि नेहमीप्रमाणे डायरेक्ट दहा हजाराच्या प्रश्नापासून सुरुवात केली गेली.

विशेष म्हणजे अमितजींच्या खास विनंतीवरून हा शो लाईव्ह ठेवण्यात आला होता आणि शोचे सर्वेसर्वा "कमलेन्द्र बोस" यांनी अमिताभच्या विनंतीला मान दिला होता.

गेम शो सुरु होण्याआधी -

"राजेश जी, आम्हाला सांगा, तुम्ही येथून एक करोड जिंकलात तर त्या पैशांचे काय करणार आहात?"

"या सिनेसृष्टीत मी अनेक वर्षांपासून फ्री लान्स फिल्म जर्नालिस्ट आणि एक लेखक आणि समीक्षक म्हणून कार्यरत आहे. येथून मी जी काही रक्कम जिंकेन त्यातील काही रक्कम मी या क्षेत्रातील लेखक आणि पत्रकार यांचेसाठी एक संस्था उघडून त्यांना आर्थिक मदत तसेच योग्य मार्गदर्शन करण्यासाठी वापरेन!"

"धन्यवाद राजेश जी बहोत उमदा विचार ही आपके! तो चलीये खेलते है - मालामाल हो जाओ!"

खेळ सुरु होतो -

"तो राजेश जी, अगला प्रश्न दस हजार रुपये के लिये ये रहा आपके कंप्युटर स्क्रीन के ऊपर!"

इनमेसे कौन "कौन है वह" फिल्म मे भूत नही बना है?

1. राकेश कुमार

2. पवन ममतानी

3. फारुख पटेल

4. अनिता राठी

"सर D अनिता राठी"

"बिलकुल सही जवाब आपका! अगला प्रश्न बिस हजार रुपये के लिये ये रहा!

आपको एक गाना सुनाई देगा आपको बताना है ये किस अभिनेत्री पर चित्रित किया गया है?

"राजाजी का बजा दूंगी मै बाजा, तो फिर नाच नाच, नाच नाच, नाच रे मन मोहना!"

1. शिवानी संध्या

2. मनमित कौर

3. साबरिना सोनाटा

4. मधुमालीनी मेहता

सर "मनमित कौर" पर ठप्पा लगा दो.

मुबारक हो! आप बिस हजार जित गये.

चालीस हजार रुपये के लिये अगला प्रश्न ये रहा!

1983 का वर्ल्ड कप भारत ने जीता तब कप्तान कौन थे?

1. सुनील गावस्कर

2. कपिल देव

3. रवी शास्त्री

4. राणा दुग्गुबाती

सर "कपिल देव" पर ठप्पा लगा दो.

बिलकुल सही जबाब आपका!

अस्सी हजार लिये प्रश्न ये रहा

कौनसे फिल्म मे फिल्म के हिरो राजेंद्र शास्त्री मोबाईल के टॉवर पर चढ जाते है?

1. आग के गोले

2. भोले दोस्त

3. जाली दुश्मन

4. कालिया का बदला

सर "आग के गोले" पर सिक्का मार दो.

अस्सी हजार जित गये आप.

एक लाख साठ हजार के लिये प्रश्न ये रहा.

इनमेसे कौनसी फिल्म पाच साल थिएटर मे चली?

1. भले आदमी दुल्हन चुरा लेंगे

2. हमारी दुल्हनियाँ की मेहंदी

3. मेहंदी वाले हाथो में कंगना खनक खनक जाए

4. चुडियो का चाँद

सर ऑप्शन मेहंदी वाले हाथो पर ठप्पा लगा दो .

आ बिलकुल सही जवाब!

एक लाख साठ हजार जित गये आप.

पुढे आणखी प्रश्न विचारले गेले. तोपर्यंत फक्त एकच चौथी लाईफलाईन उरली होती.

कॉल युवर बडी!

आणि शेवटी एक करोडचा प्रश्न आला.

"किस्मत का खेल" इस फिल्म की कथा किसने लिखी?

1. के. के. सुमन

2. पि. के. सुमन

3. आनंद कुमार

4. संतोष ठाकूर

राजेश मुद्दाम विचारात पडला. त्याला उत्तर माहित नाही असे तो चेहऱ्यावर दाखवू लागला.

"राजेश जी, आप लेखक है और आपको इसका उत्तर मालूम होना चाहिये!"

तरीही राजेश विचारात गढलेला दिसत होता.

"कोई बात नही. अगर उत्तर मालूम नही हो तो अभी भी आपके पास एक लाईफलाईन बची है! कॉल युवर बडी!"

"ठीक है सर! मै लाईफलाईन युज करना चाहूँगा!"

"किसे कॉल लगायेंगे आप?"

"सर मेरा दोस्त! माझे चांगले मित्र आहेत जे आता फिल्म इंडस्ट्री मध्येच कार्यरत आहेत - सारंग सोमैय्या! त्यांना मी कॉल करू इच्छितो!"

"कंप्युटर भैय्या, सारंग जी को फोन लगाया जाय!"

ट्रिंग ट्रिंग ट्रिंग

"सारंग सहाब नमस्ते, मैं अमित श्रीवास्तव बोल रहा हूं, मालामाल गेम शो से!"

"सर, नमस्कार कैसे है आप?"

"मैं बढिया हुं, आप बताईए क्या हालचाल है आपके?"

"बस सर! आपके राज मे सब कुछ ठीक चल रहां हैं!"

"अरे अरे ऐसां मत काहिये. मेरे सामने बैठे है राजेश. वे पचास लाख जित गये है और उन्हे जरुरत हैं आपकी मदद की एक करोड के सवाल के जवाब के लिये. वें अब प्रश्न पढेंगे!"

काउन्ट डाऊन सुरू झाले.

राजेश सारंगशी बोलू लागला, "सारंग, किस्मत का खेल या हिंदी चित्रपटाची कथा कुणी लिहिली, मी ऑप्शन वाचतो..!"

राजेशला मध्येच तोडत सारंग म्हणाला, "राजेश अरे, ऑप्शन वाचायची काय गरज आहे? या चित्रपटाची कथा तूच तर लिहिली आहेस राजेश!"

एव्हाना हा कार्यक्रम बघणाऱ्या कुणीतरी पिके आणि केकेला फोन करून टिव्ही लावायला सांगितले आणि मालामाल कार्यक्रम बघायला सांगितले. आतापर्यंत त्या कार्यक्रमात काय काय झाले हे सांगितले.

पिके आणि केकेला आता काहीतरी मोठा घोळ होणार आणि आपण अडकणार आणि आपले बिंग फुटणार याची चाहूल लागली...

"क्या बात कर रहे हो आप सारंग भाई? कृपया राजेश को चार ऑप्शन में से सही जवाब बताईये, समय बीता जा रहा है."

"सर, अब मैं क्या बताऊ आपको, सच हकीकत तो राजेश ही बतायेगा आपको, राजेश जिस पेन से आप कागज पे लिखते हो उस पेन की कसम और जिस कीबोर्ड से आप कंप्युटर पर टाईप करते हो उस कीबोर्ड की कसम, आपको सच बोलना पडेगा!"

राजेश ने विचार केला आणि सूचक नजरेने अमितजी कडे पाहिले आणि शेवटी बोलायला लागला, "हो, अमितजी! किस्मत का खेल या चित्रपटाची कथा ज्यात तुम्ही काम केले होते आणि तो चित्रपट खूप हीट झाला होता, त्याची कथा मी एका दिवाळी अंकात म्हणजे दिवाळीच्या काळात छापले जाणारे मराठी मॅगझिन यात लिहिली असून ती केके सुमनने चोरली आणि स्वतः च्या नावावर खपवली! इसलिये इस सवाल के चार ऑप्शन गलत हैं अमितजी! सही जवाब हैं राजेश, खुद मैं!"

"आप केके जैसे महान हस्ती पर गलत इलजाम लगा रहे हैं राजेश, क्या सबूत हैं आपके पास?"

"सर, अगर आप आज्ञा दे तो मेरे पास एक व्हिडिओ हैं! मोबाईल में. आप कृपया इस बडे परदे पर दिखाईये."

"ये गेम शो एक अजीब मोड पर आकर रुका हैं. मैं इस गेम शो के मालिक "कमलेन्द्र बोस" से मिलकर पाच मिनट मे आता हूं, तब तक आप हॉट सीट पर बैठे रहे!"

दरम्यान या शोने अतिशय वेगळे वळण घेतल्याने भारतात सगळीकडे अनेक लोकांनी एकमेकांना नातेवाईकांना मित्रांना फोन करून करून टीव्हीवर तो प्रोग्राम लावायला सांगितले.

कमलेंद्रने अमितजींना अर्थातच व्हिडिओ दाखवण्याची परवानगी दिली कारण हे आधीच ठरलेले होते. हे राजेशलाही माहीत होते. प्रेक्षकांना मात्र हा रियालिटी शो रियल वाटावा म्हणून थोडेसे रियल नाटक केले गेले. राजेशने त्या रात्री रेकॉर्ड केलेला तो व्हिडिओ प्ले केला आणि केकेचे सगळे बिंग फुटले.

केके ला अस्वस्थ वाटू लागले. त्याला दवाखान्यात नेण्यात आले. पिकेने कोर्टात मानहानीचा दावा दाखल करायचे मनोमन ठरवले पण वीणा वाटवेने त्याला रोखले.

मग त्या कार्यक्रमात अनेक प्रेक्षकांचे फोन आले. प्रेक्षकांनी राजेशची सहानुभतीपूर्वक चौकशी केली. अनेक प्रश्न विचारले. अनेक लेखकांचे फोन आले. त्यांनी राजेशला या धाडसी कृत्याबद्दल धन्यवाद दिले. अनेक दिवाळी अंकांच्या लेखकांनी, संपादकांनी कार्यक्रमात फोन केले आणि राजेशचे आभार मानले. केकेच्या कास्टिंग काऊचला बळी पडलेल्या काही जणींनी सुध्दा कार्यक्रमात फोन केला. त्या आजही बॉलीवूड मध्ये काही ना काही दुय्यम भूमिका करत होत्या.

राजेशच्या टीम मधील एकाने एकंदर परिस्थिती पाहता ठरल्याप्रमाणे कोर्टात राजेश तर्फे केकें विरुद्ध केस दाखल केली. केके ला हॉस्पिटल मधून बरे वाटल्यावर पोलिस अटक करणार होते. जवळपास आता केके वर आरोप निश्चिती झाली होती. कोर्टात रितसर आरोप निश्चित होऊन जवळपास के के ला अटक होण्यासारखी परिस्थिती निश्चित होती.

कोर्टात केकेच्या वकिलाने असा युक्तीवाद करण्याचा प्रयत्न केला की, राजेशने धोका देऊन केकेच्या असिस्टंटला व्हिडिओ समोर धमकावून खोटे खोटे आणि बळे बळेच केकेला त्याने न केलेला गुन्हा कबूल करायला लावला पण एकंदर कास्टिंग काऊचला बळी पडलेल्या अनेक जणींनी आणि शेवटी मतपरिवर्तन झालेल्या पिकेने केकेच्या विरोधात साक्ष दिल्याने तसेच रत्नाकर रोमदाडेने

प्रतीपक्षाच्या वकिलाने केलेल्या प्रश्नांवर पत्करलेली शरणागती आणि त्याची उडालेली भंबेरी आणि शेवटी त्याने कबूल केलेला गुन्हा यामुळे आरोप निश्चिती झाली.

कोर्टाने दोन गुन्ह्यांखली केकेला एकूण दोन शिक्षा सुनावल्या: चार वर्षांचा तुरुंगवास आणि नुकसान भरपाई म्हणून राजेशला पन्नास लाख रुपये देण्याचा आदेश दिला. मालामाल हो जाओ कार्यक्रमात मिळालेले एक कोटी रुपये राजेशने ठरल्याप्रमाणे संस्थेसाठी वापरण्याचे ठरवले आणि पन्नास लाख रुपये त्याला कोर्टाकडून भरपाई म्हणून मिळाले.

□□□□

# प्रकरण 49

फिल्म इंडस्ट्रतील सर्वात प्रतिष्ठेचा आणि सर्वात जुना अवार्ड "मॅडम फिल्म मॅक्सीमा" (MFM) अवार्ड मिळवणे आजही फिल्म इंडस्ट्रीतील कलाकारांसाठी अतिशय सन्मानाचे वाटत असे. मॅडम अवार्ड हे मॅडम अकादमी तर्फे चालवले जात. पूर्वी "फिल्म मॅक्सीमा" मासिकातर्फे चालवत येणारा हा अवार्ड नंतर मॅडम अकादमीने स्पॉन्सर करायला सुरुवात केली होती. या अवार्डसाठी सगळेच आधीपासून तयारीला लागले होते. गेल्या काही वर्षांपासून या अवार्डमध्ये टेलिव्हिजन अवार्ड सुध्दा सामील करण्यात आल्याने जवळपास सर्वच कलाकार या फंक्शनला यायचे. यात मराठी चित्रपट आणि सिरियलचे पण अवार्ड सामील होते.

हा अवार्ड शो वगळता इतरही अनेक संस्था अवार्ड द्यायच्या. असे एकूण जवळपास सोळा ते सतरा वेगवेगळया प्रकारचे अवार्ड दरवर्षी दिले जायचे. पण कलाकारांसाठी मॅडम फिल्म मॅक्सीमा हा अवार्ड खूप प्रतिष्ठेचा होता. हॉलीवूडच्या “गोल्डन वर्ल्ड अवार्ड”च्या तोडीचा हा अवार्ड मानला जात होता.

माया माथूरला या वर्षी आश्चर्यकाररीत्या “बेस्ट फीमेल लीड इन कॉमिक रोल” साठी नॉमिनेशन मिळाले होते आणि तिला स्पर्धेला फक्त आणखी एक नटी होती पण मायाच जवळपास तो अवार्ड पटकावणार हे जवळपास निश्चित झाले होते. आपले जुळे मुलं आणि डॉक्टर पती यांच्यासमवेत ती अवार्ड फंक्शनला आली होती. अजूनपर्यंत तिने तिला मिळालेल्या धमकीबद्दल नवऱ्याकडे अवाक्षर सुध्दा काढले नव्हते कारण झालाच तर चित्रपट केल्याचा तिला फायदाच झाला होता पण आताशा काही दिवसांपूर्वी कातील खान तिच्याशी अकारण जवळीक करण्याचा प्रयत्न करत होता आणि ते तिला खटकत होते. पण सूरज सोबत चांगले मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाल्याने तिने सूरजला त्याबद्दल तक्रार केली नव्हती. आणि इतक्या उशिरा नवऱ्याला सांगितले तर तो ओरडणार अशा विवंचनेत ती होती. पण चेहऱ्यावर दाखवू शकत नव्हती.

राजेश सुध्दा सुनंदा, त्याची आई आणि त्याच्या मुलासह तेथे उपस्थित होता. सारंग, पिके, वीणा आणि राजेशच्या टीम मधील मंडळी तेथे उपस्थित होती. राजेशचे फिल्मी करियर एकदम

सुरळीत सुरू होते. त्याचा कथाचोर सापडला होता त्याला अमितजींच्या मदतीने अटकही झाली होती, त्यामुळे फिल्म इंडस्ट्रीत राजेशला एक वेगळेच "वलय" प्राप्त झाले होते. त्याचेकडे सगळे लोक आदराने बघत होते. अख्ख्या इंडस्ट्रीतील लेखकांचा त्याला पाठिंबा मिळाला होता. त्याचे पर्सनल लाईफसुध्दा रुळावर आले होते.

पिके आणि वीणा आता रिलेशनशिप मध्ये होते. त्याचे मतपरिवर्तन झाले असले आणि कोर्टात त्याने वडिलांविरोधात साक्ष दिली असल्याने त्याला सगळीकडे सहानुभूती मिळाली असली तरीही मनाच्या कोपऱ्यात एके ठिकाणी त्याला राजेशाबद्दल अढी होतीच. पार्टीत तो जरी सगळयांत मिसळत असल्याचे वाटत होते तरीही ते फक्त वरवरचे होते. मनातून त्याला या पार्टीत बिलकूल स्वारस्य नव्हते. त्याचे वडील तुरुंगात होते आणि आई मुंबईतच वडिलांपासून वेगळी रहात होती. केकेला अटक झाल्यानंतर मात्र तिचा फोन त्याला आला होता. त्याची विचारपूस तिने केली होती. आई वडिलांचे वेगळे राहण्यामागचे कारण होते "मिनालिका रेड्डी" ही नटी! तिचे केके सोबत अफेअर होते.

आता वीणा त्याचसोबत त्याच्या घरी राहायला लागली होती. दोघांनी लग्न करायचे ठरवले होते. पिके बराच वेळ एका खुर्चीवर बसून शून्य मनाने समोर स्टेजवर काय चालले आहे ते बघत होता. त्याच्या मनात काहीतरी वेगळाच प्लॅन आकाराला येत होता. आपल्या त्या प्लॅनवर त्याच्या गालावर हास्याची लहर उमटली.

अमितजी आजच्या अवार्ड फंक्शन मध्ये राजेशची भेट एका व्यक्तीशी घालून देणार होते ज्यामुळे राजेशला हॉलीवूडच्या चित्रपटासाठी लेखनाची संधी मिळणार होती कारण आजच्या फंक्शनला त्या भव्य हॉलीवूड चित्रपटाची टीम येणार होती.

सध्या राजेशच्या मनात अजून एक कथा घोळत होती. फिल्म इंडस्ट्री मध्ये घडणाऱ्या घटनांवर त्याला एक कथा लिहून त्यावर चित्रपट बनवायचा आणि त्याची निर्मिती आणि दिग्दर्शन त्याला स्वतः करायचे होतें. त्यात तो त्याची स्वतःची कथा चोरीची कहाणी आणि इतर काही पात्रांच्या कथा मांडणार होता. थोडे सत्य आणि थोडे काल्पनिक असे मिश्रण त्याच्या कथेत असणार होते. त्याचा प्लॉट त्याच्या मनात तयार होता आणि थोडे थोडे लिखाण त्याने सुरू सुध्दा केले होते पण त्या आधी हॉलीवूडची संधी त्याला घ्यायची होती...

या वर्षी बॉलीवूड मध्ये बॉलीवूडच्याच पार्श्वभूमीवर चित्रपट बनला होता: "रांगिला राजन". त्या अनुषंगाने राजेश आणि त्याच्या टीम मध्ये सहज चर्चा चालली होती.

राजेश म्हणाला, "एक मात्र नक्की! इतर विविध क्षेत्रातील घडामोडींवर काल्पनिक कथा लिहून आपण बॉलीवूडवाले त्यात खूप ड्रामा भरतो. काही वास्तववादी चित्रपट सोडले तर अशा नाट्यपूर्ण चित्रपटात जसे दाखवतात तशा घटना त्या त्या क्षेत्रातील लोकांच्या जीवनात कधी खरोखर घडत नाहीत, पण पडद्यावर ते नाट्य आपल्याला बघायला आवडते, नाही का? आणि कथानक पूर्ण काल्पनिक असेल तर त्या क्षेत्रातील फारसे कुणी ऑब्जेक्शन घेत नाहीत. कारण त्यांनीही तो पडद्यावरचा ड्रामा मनातून आवडत असतोच!"

"बरोबर आहे राजेश, त्यामुळेच तर ते चित्रपट चालतात कारण त्यात मसाला असतो, ड्रामा असतो, सगळं लार्जर दॅन लाईफ असतं. जे खऱ्या जीवनात त्या त्या क्षेत्रात कधी घडू शकत नाही."

"मग फिल्मी क्षेत्रावर जर असे अनेक मसालेदार, नाट्यपूर्ण घडामोडी असलेले चित्रपट बनवले तर काय बिघडले? आणि कुणी लेखकाने चित्रपट सृष्टीवर अशी नाट्यपूर्ण कथा लिहिली तर काय बिघडलं? मी तर लिहिणार आहे! माझ्यासोबत घडलेल्या कथाचोरी बद्दल मी एक चित्रपटाची कथा लिहिणार! स्वत: प्रोड्यूस करणार!!"

ही चर्चा मन लावून आणि कान टवकारून बाजूला गप्पा उभा असलेला संदीप पटेल हा निर्माता बऱ्याच वेळेपासून ऐकत होता. तो “हिरेश रासिलीया” या प्रसिद्ध संगीतकाराशी बोलत होता. हा संगीतकार नंतर गायला सुद्धा लागला होता पण त्याचे “गाणे” फारसे लोकांनी पसंत केले नाही तरीही तो गातच सुटला होता. नंतर त्याही पुढे जाऊन त्याने अक्षरश: अभिनय करायला सुरुवात केली, जे लोकांना त्याच्या आवाजापेक्षाही  जास्त  असह्य होऊ लागले पण त्याने प्रयत्न करणे काही सोडले नव्हते. प्रत्येक अवार्ड शो मध्ये हा संगीतकार आवर्जून डायरेक्टर, प्रोड्युसर तसेच कास्टिंग डायरेक्टर वगैरे मंडळीना भेटत राहायचा जेणेकरून कुणीतरी त्याला “अभिनय” करायला देईल! गाणे आणि अभिनय या हट्टापायी त्याच्यातला संगीतकार मात्र कुठेतरी हरवत चालला होता पण त्याला त्याचेशी काही घेणे देणे नव्हते!

इकडे राजेश आणि टीममध्ये गप्पा चालूच होत्या.

"मुळीच काहीच नाही बिघडलं. लिही बिनधास्त राजेश. लिहित रहा, लिखाण एन्जॉय करत रहा! आम्ही सर्व तुझ्या कायम पाठीशी आहोत."

"धन्यवाद माय डियर टीम!" राजेश म्हणाला.

आणि मग त्यांनी आपापले ग्लास उंचावत चीयर्स केले.

हा चियर्सचा जल्लोष बघून संदीप पटेल हिरेशला एक्स्क्यूज मी करून त्या टीमजवळ आला आणि राजेशला म्हणाला,

“राजेश, आप बडे लेखक हो, पत्रकार हो, बडे बडे लोगों मी उठना बसना है आपका! अच्छी बात है! लेकीन सर जी, फिल्म इंडस्ट्री में रहके फिल्म इंडस्ट्री के ही बारे में या फिर इंडस्ट्री के लोगों के बारे में भला बुरा लिखना नाही चाहिये राजेस बाबू!”

राजेश म्हणाला, “क्यो? आपको ऐसा क्यों लागता है?”

संदीप म्हणाला, “देखो राजेस भाई! ये बात तो ऐसी हो गयी ना की पानी में रहके मछली से बैर! पहले ही आपने केके सुमन जैसी हस्ती से पंगा ले लिया है, तो क्यो बार बार अपनीही घरकी मछली से पंगा लेना? है ना? क्युं भाई सारंग सोमैय्या जी ? सही कहां न मैने?”

सारंग म्हणाला, “छोडो ना मोटा भाई! आप पार्टी एन्जॉय करो! राजेस भाई देख लेंगे क्या करना है! क्युं राजेस?” असे म्हणून सारंगने डोळा मिचकावला आणि सगळी टीम खळाळून हसायला लागली. या प्रकाराने अपमान वाटून संदीपने चिडून तेथून काढता पाय घेतला आणि हिरेश सोबत जॉईन झाला.

भव्य 4K हॉलीवूड चित्रपट निर्माण करणार असलेल्या त्या हॉलीवूड टीमला आजच्या या अवार्ड फंक्शनच्या आधारे एका दगडात अनेक पक्षी मारायचे होते, त्यापैकी महत्त्वाचा पक्षी म्हणजे प्रदर्शनाआधीच त्या चित्रपटाची जबरदस्त हवा आणि पब्लिसिटी भारतात करायची!! भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात चित्रपट हिट झाला तरी निर्मात्याचे अर्धे पैसे वसूल होणार होते.

आता फक्त उत्सुकता होती त्या व्यक्तीला भेटण्याची जी राजेशला हॉलीवूड लेखनासाठी चान्स देण्याची शक्यता होती आणि जिथे अमितजी सारखा कलाकार राजेशची शिफारस करणार तिथे नाही म्हणण्याची कुणाची मजाल? या संधीसाठी राजेशने अनेक हिंदी मराठी चित्रपट निर्मात्यांची ऑफर नाकारली होती. कारण त्याला आता हॉलीवूडसाठी लेखनाचा अनुभव घेऊन बघायची उत्सुकता होती. दरम्यान त्याची फिल्मी पत्रकारिता थोड्या प्रमाणात सुरूच होती.

आजच्या कार्यक्रमातला राजेशच्या जीवनातला विशेष “अवार्ड विनिंग सीन” म्हणजे सुनंदा आणि मोहिनी अवार्डच्या ठिकाणी अगदी हसत खेळत एकमेकांशी बोलत उभ्या होत्या. एकमेकांना काय हवं नको ते विचारत होत्या. पूर्वी मोहिनीमुळे निर्माण झालेल्या गैरसमजामुळे जो गोंधळ उडाला होता ते आठवून आठवून हसत होत्या त्या दोघी!!

राजेशने स्वतःला एक चिमटा काढला आणि हे सगळे सत्य आहे याची खात्री करून घेतलीं. हॉलीवूडची टीम अजून अवार्ड नाईट मध्ये यायची बाकी होती. ते एक सरप्राइज असणार होते. ती टीम अवार्ड नाईटच्या आधी फक्त ठराविक लोकांनाच भेटली होती.

अवार्ड नाईट मध्ये अभिनेत्री रिताशा सुध्दा भूषण ग्रोवर सोबत आनंदाने बागडत असतांना दिसत होती. त्या दोघांनी लग्न केले होते...

सोनी बनकर मात्र कुठेच दिसत नव्हती. सुभाष भट सोबत तिने केलेला एकच सिनेमा बऱ्यापैकी हीट झाला होता पण नंतर भूषण ग्रोवर सोबत तिचे संबंध ताणले गेल्याने आणि नंतर त्याने तिला घटस्फोट दिल्याने ती मनातून पूर्ण कोलमडून गेली होती. नंतर तिने कोणत्याही चित्रपट किंवा टिव्ही निर्मात्याची ऑफर स्वीकारली नाही. घटस्फोटानंतर ती मुंबई शहरातून दिसेनाशी झाली. कुणाच पत्रकाराला किंवा तिच्या ओळखीच्या लोकांना माहिती नव्हतं की सोनी नेमकी गेली कुठे?

आयुष्यात बालपणी अनेक सुख दुःखाचे चढ उतार पाहिल्यानंतर, ती मुंबईत आली आणि होती आणि आईशी खोटे बोलून तिने “मॅडम ॲकॅडमी” जॉईन केली. मग साकेतच्या रूपाने तिला मित्र मिळाला पण तोही सोडून गेला. कालांतराने सेल्फी प्रकरणाचे निमित्त होऊन आईने तिच्याशी संबंध तोडले पण तिच्या शिक्षणावर तिच्या काकांनी केलेल्या खर्चाची भरपाई तिला महिन्याला पैसे गावी पाठवून करावी लागली.

पण जमेची बाजू म्हणजे  तिच्या आवडीच्या क्षेत्रात चांगले काम मिळवून लग्न झाले आणि थोडा सुखी संसार सुरू झाला असतांना आणि नवऱ्याकडून प्रेम मिळू लागले असताना अचानक नवऱ्याकडून अनपेक्षितरित्या दुसऱ्या स्त्रीसाठी घटस्फोटाची नोटीस सोनीला मिळाली आणि तिने ती शेवटी स्वीकारली.

पण या सर्व प्रकारामुळे ती खूप कोलमडून पडली. आई सुद्धा पारखी झाली होती आणि वडील तर नव्हते. साकेत सारखा मित्र पण तिच्या जवळ नव्हता.

फिल्मी जगतात मिळाला तर एकदम वलयांकित झगमगाट मिळतो नाहीतर मग टोकाचे दुःख काहींच्या वाट्याला येतं. तिला हे ब्रेकअप, हे दुःख सहन झाले नाही. अनेक महिने काम न मिळाल्याने आणि जे काही मिळाले ते काम तिने दुःखाच्या भरात न स्वीकारल्याने तिला पैशांची चणचण भासू लागली होती. मग शहरात अक्षरशः ती केस विस्कलेल्या स्थितीत आणि विमनस्क अवस्थेत कुणी ओळखू नये म्हणुन अंगावरून आणि चेहऱ्यावरून शाल पांघरून इकडे तिकडे फिरू लागली.

काही दिवस अक्षरशः फूटपाथवर झोपली आणि मग जे काही थोडे पैसे होते त्याद्वारे ती तिच्या मूळ गावी गेली. तेथे तिला कुणीही ओळखले नाही. पुन्हा आई आणि गाववाले आपल्याला स्वीकारणार नाहीत हे तिला मनोमन पटले होते. आईने स्वीकारले तरी तिचे काका काहीतरी गडबड घोटाळा करणार आणि तिला सुखाने जगू देणार नाही हे तिला कळून चुकले होते.

नेहमी काहीतरी सनसनाटी बातम्या हव्या असणाऱ्या काही ठराविक न्यूज चॅनल्सनी तिच्या गायब होण्यावर अनेक कार्यक्रम बनवले. काही मराठी चॅनल्सनी सुध्दा तसे कार्यक्रम बनवले. सोनी गायब होण्यामागे तिचा घटस्फोट हेच एक प्रबळ कारण असावे असे चॅनलवाले वारंवार ओरडून सांगत होते.

रात्र झालेली होती. सोनीच्या मूळ गावात असाच एक कार्यक्रम सोनीची आई बघत होती आणि तिला सोनीची खूप आठवण आणि दया आली. ती रडू लागली. तिच्या स्वत:च्या घराच्या आसपास फिरत असताना सोनीला खिडकीतून तो टिव्ही आणि तो प्रोग्राम दिसले. आई आणि काका तो प्रोग्राम बघत होते. आईला रडताना बघून तिला वाईट वाटले. त्या गावात सोनीला कोणीही ओळखले नाही. असेल कुणी एक वेडी भिकारीण म्हणून लोकांनी दुर्लक्ष केले.

एक क्षण सोनीला वाटले की पुन्हा आईच्या कुशीत शिरावे, रडावे आणि आईसोबत राहावे..

सोनीच्या वडिलांच्या हार घातलेल्या फोटोखाली असलेल्या पलंगावर बसून टिव्ही बघता बघता डोळे पुसत सोनीची आई तिच्या काकाला म्हणाली, "पोरगी लई वाया गेली! बरं झालं तिला धडा मिळाला! सटवी कुठली! कुठे मरून गेली असेल तर निदान तिच्या जीवाले शांती भेटेन!"

"आन आपल्या बी!" डोळे मिचकावत काका म्हणाला आणि तिच्या आईला त्याने कमरेभोवती हात घालून जवळ ओढून घेतले. सोनीच्या वडलांच्या फोटोला घातलेला हार थोडासा हलल्यासारखा वाटला. जणू काही तिचे वडील तिला आपल्या दु:खाची जाणीव करून देत होते.

हे बघून आणि ऐकुन हुंदका आवरत सोनी तेथून तडक पळतच निघाली आणि गावापासून तीन किलोमीटरवर असलेल्या पुलावर चालत गेली. पुलावरून कठड्याला टेकून खालच्या नदीतल्या अंधाऱ्या पाण्याकडे तिने बघितले.

काळाकुट्ट अंधार! आणि नदीपात्रातले काळेशार भीतीदायक पाणी! त्या पाण्याकडे ती बघत राहिली आणि रडत राहिली.

अचानक त्या पाण्यात तिला उजेड जाणवला आणि त्या उजेडात तिला तिचे वडील दिसले.

या क्षणी तिला वडलांची जास्त आठवण आली. तिचे वडील तिच्या फार लहानपणीच वारले होते, पण थोडी थोडी आठवण तिच्या मनात शिल्लक होती. तिला पुसटसे आठवत होते की वडील तिला मांडीवर घेत, तिचे कौतुक करीत, तिला अंगाखांद्यावर खेळवीत. वडील घरी आले की ती पळत पळत त्यांचेकडे जाऊन त्यांना बिलगत असे...

आताही तिच्या वडिलांनी अंधाऱ्या नदीतल्या पाण्यातून तिला कडेवर घेण्यासाठी हात पुढे केले. सोनीला लहान झाल्यासारखे वाटले. ती लहान मुलीसारखी हसू लागली. पुलावर आता एकही वाहन नव्हते. गावातली पुलावराची वाहतूक रात्री जवळपास बंद व्हायची. एखाद दुसरी बाईक गेली तर गेली! गावाबाहेरच्या अंधाऱ्या जागेतील त्या अंधाऱ्या पुलावर एकटी उभी राहून ती हसत होती. वेड लागल्यासारखी ती मोठमोठ्याने हसायला लागली. बॉलीवूड मधील एक वलय एका वेगळयाच वळणावर पोहोचलं होतं..

तिने हसणं अचानक थांबवलं. पाण्यात दिसणाऱ्या त्या वडिलांना भेटायला ती अधीर आली आणि नदीच्या प्रवाहात तिने उडी टाकली.  तिचे वलय पाण्यात पडताच विझले होते आणि प्रवाहासोबत वाहत गेले...

सोनीने पाण्यात उडी टाकल्यानंतर पाणी वेगाने वर उसळले आणि इकडे रिताशाने भूषणच्या ड्रिंक्सच्या ग्लास मध्ये बर्फ टाकल्याने त्यातील दारू वर उडाली होती. ग्लास रिचवत अवार्ड नाईट मध्ये ती भूषण सोबत एन्जॉय करत होती. तिला अनेक नव्या निर्मात्यांनी पुन्हा ऑफर दिल्या कारण तिचा टिव्ही शो हीट झाल्याने ती पुन्हा फॉर्म मध्ये आली. मात्र एकीचे वलय विझून दुसरीचे विझलेले वलय पुन्हा निर्माण झाले होते.

आजच्या या अवार्ड मध्ये दिनकर सिंग, त्यांची पत्नी हे सुद्धा आलेले होते. पण ते सूरजला भेटले नाहीत आणि सूरज सुद्धा त्यांना भेटला नाही. सिंग यांचेशी नजरानजर झाल्यानंतर सूरजच्या चेहऱ्यावर एक कुत्सित हसू दिसत होते. एकंदरीत रीताशा आणि सिंग यांची सिरीयल हिट झाली होती. मात्र सिंग यांना एक गोष्ट खटकत होती ती म्हणजे रीताशा आणि भूषणचे जमलेले सूत आणि त्यासाठी सोनी बनकरला भूषण ने दिलेला घटस्फोट आणि सोनी मुंबईतून गायब होण्याबाद्दलच्या उलटसुलट अफवा! पण याबद्दल फार काही खोलात रिताशाला विचारणे म्हणजे आपल्याच पायावर धोंडा मारून घेतल्यासारखे आहे हे त्याना माहित होते! म्हणून त्यांनी फार काही त्यात लक्ष घातले नाही.

अवार्ड शो सुरू झाला.

सगळीकडे डिस्को लाईटस चमचमत होते. ते फिल्मी तारे तारकांच्या अंगावरून फिरत होते. आकाशातले तारे सुध्दा त्या दिवशी या जमिनीवरच्या ताऱ्यांचा हेवा करत होते. सुपरस्टार निखिल कुमार, जोरावर खान हे सूत्र संचालन करत होते. त्यांच्या जोडीला काव्या कुमारी पण होती. एकमेकांवर आणि प्रेक्षकांत बसलेल्या बॉलीवूड मधील मंडळींवर ते विविध प्रकारचे जोक्स करत होते. महा सुपरस्टार अमित श्रीवास्तव हे त्यांची पत्नी आणि मुलगा, सून यांचेसह हजर होते.

एक हरहुन्नरी अभिनेता जो एका वर्षी एकाच चित्रपट करायचा तो मात्र नेहमीप्रमाणे अवार्ड शो मध्ये आला नव्हता कारण म्हणे त्याचा अशा अवाड्र्सवर विश्वास नव्हता.

उमंग कुमार या रबरासारखी बॉडी असलेल्या कलाकाराने स्टेजवर जबरदस्त नाच सुरु केला.

"मैं हुं सबसे प्यारा, डिस्को दिवाना...!"

प्रेक्षक टाळयांवर टाळया देत होते. मग बेस्ट स्पेशल इफेक्ट, तसेच बेस्ट गायक, बेस्ट स्टंट वगैरे असे पुरस्कार मराठी आणि हिंदी दोन्ही चित्रपटासाठी क्रमाने दिले गेले.

मग धनिका दास या अभिनेत्रीने एका आयटम साँगवर डान्स चालू केला. तिच्या दिलखेचक नृत्याने प्रेक्षकांत बसलेल्या भल्या भल्या मंडळींचा काळजाचा ठोका चुकला.

स्टार्टर्स आणि काही ड्रिंक्स पोटात गेल्याने बरेच जण आता रिलॅक्स होते.

◸◸◸◸

# प्रकरण 50

माया माथूर आपल्या दोन मुलांना पतीकडे सोपवून वॉशरुमकडे निघाली. वॉशरुममध्ये आरश्यात केस आणि मेकप नीटनेटका करत असताना ती थोडी चिंतेत दिसत होती कारण आताशा कातिल तिच्याशी जास्त सलगी करायला लागला होता. तिला खटकेल अशा रीतीने. तिने बरेचदा हसून वेळ मारून नेलेली होती पण आता थोडे जास्त होते आहे असे तिला वाटायला लागले होते. आरशासमोर विचार करता करता बराच वेळ ती शून्य मनाने मेकप सावरत होती. तिला जास्त चिंता याची होती की तिने आपल्या पती पासून सुरुवातीपासून सगळे लपवले होते आणि आता एकदम अती झाल्यानंतर सांगितल्यावर त्याची काय प्रतिक्रिया असेल?

विचारांत असताना समोरच्या काचेवर वाफ जमा झालेली तिला दिसली आणि त्यावर बोटाने इंग्लिश मधून लिहिले जात होते, "टूडे इज युवर लास्ट डे ऑफ वरी!" (आज तुझ्या काळजीचा शेवटचा दिवस आहे!")

ती अचानक दचकली आणि घाबरून ओरडणार एवढ्यात समोरचे ते लिखाण नष्ट होऊन स्वच्छ आरसा दिसत होता.

आपल्या मनातले विचार कुणाला आणि कसे काय कळले आणि अचानक काचेवर कुणी लिहिले आणि माझ्या चिंतेचा आज शेवटचा दिवस? हे काय होते? मला हे कसले भास होत आहेत? अती काळजीमुळे तर नाही ना असे होत?

ती तडक वॉशरुम मधून घाईघाईने निघून अवार्ड शो सुरू असलेल्या ठिकाणी आपले सीट शोधत आली.

तिचे दोन्ही जुळे मुलं कंटाळल्याचे दिसत होते. कारण मायाला जाऊन बराच वेळ झाला होता.

एव्हाना हॉलीवूडची टीम अवार्ड नाईट मध्ये आलेली होती आणि त्यांची चित्रपटाबद्दल जाहिरात करून झाली होती. मात्र काही जण बाहेर व्हॅनीटी व्हॅन मध्येच थांबले होते. त्यांना अशा नाच गाण्यांत इंटरेस्ट नसावा!

स्टेजवर दोन आघाडीच्या अभिनेत्री ज्यांनी हॉलीवूड मध्ये आपले बस्तान बसवले होते त्या आपल्या एकत्र डान्स परफॉर्मन्सने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत होत्या. आजूबाजूला दहा पुरुष आणि स्त्री नर्तक त्यांच्या स्टेप्स डान्स स्टेप्सला फॉलो करत त्यांना मनापासून साथ देत होते. स्टेजवर कॉन्फेटी म्हणजे रंगीबेरंगी कागदांचे तुकडे इकडे तिकडे उधळले जात होते. शो ऐन रंगात आला होता. मग गाणे संपता संपता प्रेक्षकांत बसलेला हॉलीवूडचा एक आघाडीचा अँक्शन हिरो टॉम टींसेल स्टेज वर आला आणि दोघींना डान्स मध्ये जॉईन झाला. प्रेक्षकांत टाळ्यांचा भरपूर कडकडाट झाला.

गाणे संपल्यावर त्याने जोरावर खान कडून माईक घेतला आणि म्हणाला, "आय जस्ट लव्ह धीस डान्स अँड सॉंग्ज पार्ट इन बॉलीवूड मुव्हीज. सुरुवातीला आम्ही हॉलीवूडवाले तुमच्या या सिनेमात असणाऱ्या डान्स आणि लीप सिंक असणाऱ्या गाण्यांना नावे ठेवायचो, कमी लेखत होतो पण आज? .. आज हॉलीवूड मधील अनेक असे सिनेमे आहेत जे आता चित्रपटांचे थीम सॉंग बनवायला लागले आहेत, काही चित्रपटांमध्ये तर एखाद दुसरे गाणे पण दिसायला लागले आहे. काही चित्रपटात तर तुमच्या बॉलीवूड मूव्ही सारखा ड्रामा सुध्दा आता दिसतो. आम्हाला वाटायचे तुम्ही आमच्या चित्रपटांची कॉपी करता, पण नाही तुम्हीच नाही आम्ही पण तुमच्या चित्रपटांतील अनेक नावीन्यपूर्ण गोष्टींची कॉपी करतच असतो. कुणी आजपर्यंत हे उघडपणे मान्य नव्हतं करत पण हे खरं आहे!"

मग टॉमची फिरकी घेण्यासाठी जोरावर खान म्हणाला, "सो टॉम, व्हॉट डू यू थिंक अबाऊट ॲक्टींग इन लीड रोल इन 'भले आदमी दुल्हन चुरा लेंगे' सिक्वेल? ('भले आदमी दुल्हन चुरा लेंगे' या चित्रपटाच्या पुढच्या भागात हिरो म्हणून काम करशील का?")

यावर हसत टॉम म्हणाला, "अरे यार, तुम्हारी जनता टकलू हिरो को पसंद नही करेंगी!"

जोरावर म्हणाला, "तो विग लगा लेंगे यार, व्हॉट्स द बिग डील?"

यावर टॉम आणि प्रेक्षक हसायला लागले.

स्टेजच्या मागच्या बाजूला सूरज तयारी करत होता. बेस्ट फिल्म अवार्ड त्यालाच मिळणार होता. तयारी करून प्रेक्षकांत पुढच्या रांगेत बसायचे आणि अवार्डची अनाउन्समेंट झाली की तो घ्याला स्टेजवर जायचे असा प्लॅन होता. कपडे बदलून येण्याआधी तो वॉशरुम कडे जायला निघाला. लॉन मधून तो वॉशरुम कडे जात होता. आता हळूहळू स्टेजवरील मोठ्ठा आवाज कमी कमी होत गेला. आता बरीच शांतता होती.

कोण जाणे त्याला मनात एक प्रकारची अस्वस्थता जाणवू लागली. तसं पाहिलं तर त्याच्या मनाप्रमाणे सगळं चाललं होतं. ओलिव्हीया आणि व्हेरिनिका या दोघींनाही तो एकाच वेळेस मॅनेज करत होता. त्याचा फूडचेनचा बिझिनेस आणि त्याच्या आडून चालणारा ड्रगचा बिझिनेस व्यवस्थित चालू होता.

रागिणीला मार्गातून मोकळे करण्यात त्याला यश आलेले होते आणि पोलिस, कोर्ट काहीही सिद्ध करू नव्हती आणि तिची आत्महत्या सिद्ध झाली होती. अनेक फ्लॅट आणि एक बंगला मुंबईसारख्या शहरात त्याच्या मालकीचा होता. करोडो रुपये त्याने कमावले होते. त्याचे चित्रपट हीट होत होते आणि आता तर आज त्याच्या चित्रपटाला अवार्ड मिळणार होता. सुख म्हणतात ते हेच का?

वॉशरुम मध्ये गेल्यावर त्याने आरशात पाहिले. त्याने आपली बॉडी चांगली मेंटेन केली होती. एकदा आरशात आपले सिक्स पॅक एब बघायचा मोह त्याला आवरला नाही. त्याने वरचे कपडे काढले आणि आरशासमोर टॉपलेस झाला.

परदेशात असताना त्याच्या ठराविक गर्लफ्रेंड व्यतिरिक्त ब्राझिलमधील बिझिनेस निमित्ताने त्याच्या संपर्कात येणाऱ्या अनेक श्रीमंत मुलींनी फक्त त्याच्या एकूण व्यक्तिमत्त्वावर आणि विशेष म्हणजे त्याच्या सिक्स पॅकवर फिदा होऊन एका रात्रीसाठी तरी त्यांच्यासोबत त्याने सेक्स करावा अशी विनंती केली होती आणि त्यासाठी त्या पैसे मोजायला सुध्दा तयार होत्या. त्यामुळे सुखावून त्याने चारेक जणींची  ऑफर स्वीकारली सुध्दा होती आणि इच्छा एकेका दिवशी पूर्ण केली होती. मात्र नंतर नंतर त्याने अशा गोष्टी बंद केल्या.

हे सगळे आठवून तो सुखावला आणि एकटक स्वतःकडे आरशात बघत उभा राहिला.

त्याच्या सिक्स पॅकवर केस मोकळे सोडलेल्या रागिनीचा पुसट चेहरा आकार घेऊ लागला आणि तेव्हा मात्र तो दचकला आणि मागे सरकला. सिक्स पॅक वर जणू काही तो चेहरा गोंदला जात होता. हा चेहरा अचानक असा कसा गोंदला गेला? तो चेहरा हसायला लागला. कुत्सितपणे त्यांचेकडे बघायला लागला आणि गायब झाला.

घाबरून पूर्ण चेहरा घामाने भरल्यानंतर त्याने पटापट घाईने कपडे अंगावर चढवले आणि वेगाने तो अवार्ड फंक्शनच्या ठिकाणी जायला निघाला.

"सुबहा दिवानी दिवानी दिवानी

शाम सुहानी सुहानी सुहानी

रात शराबी शराबी शराबी

हो जाती है,

जब तुम

जब तुम

जब तुम

मेरे साथ

होती हो हो हो ss"

या गाण्यावर एक नवी नटवी नटी नाचत होती. तिचा या वर्षी पहिलाच चित्रपट रिलीज झाला होता त्यामुळे ती खूप फॉर्मात होती. इथे चांगला परफॉर्मन्स केला तर आणखी चित्रपट मिळतील हे तिला माहित होते.

डान्स संपल्यानंतर लगेचच सूरजच्या अवार्डची अनाउन्समेंट झाली. थोड्या घाबरलेल्या आणि गोंधळलेल्या स्थितीतच तो स्टेजवर चढला आणि त्याने अवार्ड घेतला.

जोरावर खान म्हणाला, "सर आप रागिणी के बारे मे कुछ कहना चाहेंगे? आज आपके साथ वो होती तो उन्हे कैसा लागता आपके इस अवार्ड के बारें में?"

सूरजचे लक्ष नव्हते. समोर प्रेक्षकांत त्याला प्रत्येक सीटवर रागिणी बसली आहे असे दिसू लागले. जोरावरला उत्तर न देताच तो खाली उतरला आणि आपल्या चेहऱ्यावरील अस्वस्थता लपवण्यासाठी अगदी शेवटी एका रिकाम्या असलेल्या रांगेत रिकाम्या खुर्चीवर घाईघाईने जाऊन बसला.

अवार्डकडे बघत असताना त्याला बाजूला रिकाम्या खुर्चीवर रागिणी बसली असल्याचे दिसले. तिचा चेहरा खूप भेसूर होता. तिने त्याच्या नजरेत नजर धरली. ती नजर खूप जहरी होती. तिच्या अशा अवताराने सूरजला घाम फुटलेला असतांना रागिणीच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद जाणवत होता...

***

अमितजी राजेशला सोबत घेऊन स्टेजजवळ असलेल्या हॉलीवूड अभिनेत्यांच्या व्हॅनीटी व्हॅन मधे घेऊन गेले.

फ्रांको बोनुकीशी राजेशची लेखक म्हणून ओळख करून दिल्यानंतर ते एका लेडीच्या येण्याची वाट बघू लागले कारण या हॉलीवूड चित्रपटाच्या भारतातील विभागाची ती प्रमुख होती.

कोणत्या कामाकरता कुणाकुणाला निवडायचे, कुणाला नाही हे ठरवण्याचे अधिकार तिला होते.

थोड्याच वेळात ती व्हॅनमध्ये आली.

"राजेश, प्लीज मीट मिसेस प्रीसिला बोनुकी! प्रोजेक्ट हेड!"

तिच्याकडे बघताच राजेशच्या अंगात अचानक वीज चमकल्यासारखे झाले. ही नक्की सुप्रिया आहे, मी चुकणार नाही ओळखतांना तिला!! क्षणभर तो अवाक होऊन बघत राहिला. सुप्रिया उर्फ प्रिसिलाच्या डोळयात राजेशबद्दल स्पष्टपणे द्वेष जाणवत होता. अर्थात त्यांच्या या क्षणभराच्या नजरकैदेबद्दल अमितजी आणि फ्रँको याला शंका यायला काही कारण नव्हते, कारण त्यांना काहीही माहिती नव्हते! तिच्या डोळयातील अंगार बघून आणि तिची एकूण नजर पाहून राजेश तेथेच गर्भगळीत झाला...

त्याला आठवले, ब्रेकपच्या वेळेस सुप्रिया म्हणाली होती:

“पण, हे बघ राजेश. आपण एकाच क्षेत्रात आहोत. कामानिमित्त आपली भेट होतच राहाणार. सो लेट्स बी प्रोफेशनल! आपल्या वैयक्तिक गोष्टी कामाच्या आड येऊ द्यायच्या नाहीत. नाहीतर त्यामुळे दोघांचेही नुकसान होईल!”

आणि तिचा हा नियम पहिल्यांदा तिनेच मोडला होता, सिरीयल सोडून देऊन आणि राजेश पासून दूर निघून जाऊन! पण आता त्याने पाहिलेली सुप्रिया काहीतरी वेगळीच होती!!! मध्यंतरी एका स्थानिक वर्तमानपत्रात सुप्रियाच्या नवऱ्याच्या मृत्यूबद्दल त्याने छोटीशी बातमी वाचली होती. हिचे नाव प्रीसिला बोनुकी म्हणजे इटालियन माणसाशी हिने लग्न केले? आणि तेही फ्रांको बोनुकी याचेशी?

अमितजीच्या विनंतीला फ्रँकोने तर लगेच होकार दिला पण प्रिसिला म्हणाली, "मी दोन दिवसात निर्णय कळवते!" तिचा इंग्लिशचा उच्चार पण थोडा थोडा भारतीयच वाटत होता, म्हणजे ही नक्की सुप्रिया आहे, यात वादच नाही! मात्र तिच्या वेशभूषेत आणि केशभूषेत अमुलाग्र बदल झालेला दिसत होता. इतका बदल की जवळचे नातेवाईक किंवा मित्र मैत्रिणी वगळले तर तिला कुणीही युरोपियन समजणार हे नक्की!

उद्यापासून हॉलीवूडच्या त्या भव्य चित्रपटासाठी मॅडम अकादमी मध्ये ऑडिशन सुरू होणार होते आणि त्याची सुध्दा प्रमुख सुप्रियाच होती. असे कसे घडले? नियतीचा हा कसला डाव? राजेश भीतीयुक्त विचारात पडला.

जुजबी बोलून आणि चेहऱ्यावरील अस्वस्थता लपवत अमिताजींसोबत शक्य तितक्या लवकर व्हॅनीटी व्हॅन मधून राजेश बाहेर पडला. तो बाहेर पडेपर्यंत आणि पूर्ण परत जाईपर्यंत प्रिसिला त्याचेकडे एकटक नजरेने बघतच राहिली होती. तिच्या डोळयात एक प्रकारचा अंगार दिसत होता. कसलीतरी गरम ठिणगी दिसत होती.

राजेश परत येऊन नंतर सुनंदाच्या बाजूला येऊन बसला आणि कार्यक्रम पाहू लागला.

काही वेळानंतर कार्यक्रम संपला. सगळे अवार्ड देऊन झाले होते. आयोजक आता पटापट आवरा आवर करुन जाण्याची तयारी करत होते. प्रेक्षक उठून निघून गेले. मात्र शेवटच्या रांगेत प्रेक्षकांत एकजण निश्चल बसूनच आहे असे हिरो उमंग कुमारच्या लक्षात आले. त्या व्यक्तीच्या पेहरावावरून दुरूनच त्याने ओळखले की तो सूरज असावा!

उमंग कुमार त्याचेकडे पोहोचत होता तरीही सूरज खुर्चीवरून अद्याप उठला नव्हता आणि अगदी हालचाल न करता निश्चल पडून होता त्यामुळे उमंग कुमारला कसलीतरी अभद्र शंका आली. त्याला उठवायला म्हणून उमंग कुमार त्याच्या खुर्चीजवळ गेला तेव्हा अवार्ड पायाजवळ खाली पडून त्याचे दोन तुकडे झालेले त्याला दिसले. उमंगला आश्चर्य वाटले!

"ज्या धातूचा हा अवार्ड बनवला आहे तो धातू, अवार्ड नुसता खाली पडल्यावर फुटला कसा? कमाल आहे!"

असे म्हणून त्याने सूरजला हात लावून उठवण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या हाताच्या थोड्याशा धक्क्याने सूरज खुर्ची वरून खाली कोसळला...

ही बातमी कळताच घरी जायला निघालेले अनेकजण परत आले. दिनकर सिंग आणि त्यांची पत्नी यांना हे ऐकून शॉक बसला . ते पळत पळतच तेथे आले. सूरजचा असा अंत झालेला पाहून त्या दोघांना अपार दु:ख झाले. रिताशाला सुद्धा रडू येत होते.

नंतरच्या डॉक्टर आणि पोलिस यांच्या एकूण तपासानंतर सूरज हार्ट अटॅकने मेल्याचे सिद्ध झाले. काहीतरी अनपेक्षित बघून मनावर अचानक सहन न करण्याजोगे प्रचंड दडपण आल्याने मृत्यू झाला असे डॉक्टर म्हणाले. बऱ्याच जणांना वाटले की अवार्ड मिळण्याच्या आनंदामुळे असे झाले तर काहींना एका वाईट माणसाचा अंत झाल्याने आनंद वाटला.

काही दिवसानंतर कातील खान काही काळाकरता तडाफडकी परदेशात निघून गेला त्यामुळे माया माथूरला आनंद झाला. तसेच अवार्डच्या रात्री आरशात तिला मिळालेला मेसेज शेवटी खरा ठरला आणि मायाची धारणा पक्की झाली की सूरजच्या मृत्यूसंदर्भात नक्की मेलेल्या रागीणीच्या आत्म्याचा संबंध असावा!

# प्रकरण 51

काही महिन्यानंतर -

शहरापासून दूर समुद्रकिनारी राजेशने एक बंगला विकत घेतला जेथे वीकेंडला किंवा कामापासून सुटी घेतल्यानंतर येता येईल आणि फॅमिली सह राहता येईल. तसेच निसर्गाच्या सानिध्यात, पक्ष्यांची किलबिल चालू असताना आणि समोर समुद्राचे पाणी असतांना लिखाण करायचे राजेशचे खूप वर्षांपासूनच मनात होते ते आता प्रत्यक्षात अवतरत होते. अधून मधून समुद्रकिनारी येऊन त्याने अनेक कथा लिहिल्या होत्या. अशा नैसर्गिक वातावरणात त्याची प्रतिभाशक्ती आणि कल्पनाशक्ती उफाळून यायची आणि कीबोर्ड द्वारे कॉम्प्युटर मधल्या कागदावर धडाधड उतरायची. त्याचा अगोदरचा फ्लॅट शहरात होताच.

आठ दिवस सुट्टी घेऊन तो येथे आला होता. हा बंगला नुकताच विकत घेतलेला होता. अर्धे पैसे आधीच दिले होते आणि अर्ध्या पैशांचे कर्ज काढले होते. एक दोनदा सुनंदा आणि अक्षर तेथे येऊन गेले होते पण तो बंगला पूर्णपणे राहण्यायोग्य बनला नव्हता. त्यासाठीच राजेश आठ दिवस येथे आलेला होता. एकटा. सुनंदा आणि अक्षर जवळ फ्लॅट मध्ये त्याची आई आलेली होती, काही दिवसांसाठी!

या आठ दिवसात बंगल्यातील फर्निचर तसेच समोरची छोटीशी बाग आणि इतर काही गोष्टी त्याला मार्गी लावायच्या होत्या आणि त्याचबरोबर थोडेसे लिखाणही करायचे होते.

आजूबाजूला दूर दूर अंतरावर छोटे छोटे बंगले होते पण त्यापैकी एखाद दुसऱ्याच बंगल्यात फक्त एक दोन माणसे दिसायची. इतर बंगले बंद राहायचे किंवा कुणीतरी एकटा दुकटा गडी दिवसभर देखभाल करायला तेथे थांबायचा. छोटे बंगले आणि काही मानवी वस्ती आणि तुरळक शेती, दुकाने, छोटी मोठी सरकारी कार्यालये आणि शाळा असे मिळून ते एक छोटेसे गांव होते.

आज सकाळपासूनच तेथे सुतारकाम करणारे, प्लंबर तसेच साफ सफाई करणारे कामगार आलेले होते. राजेशच्या मुंबईतील फ्लॅटमध्ये गेल्या एक महिन्यापासून घरकाम आणि स्वयंपाक करायला कायम गावाकडून आणलेला एक विश्वासू माणूस "गौरव देव" हा राजेश सोबत बंगल्यात आलेला होता आणि एकूणच इथल्या सगळया कामांवर देखरेख ठेवणार होता.

फर्निचरचे काम सुरू झाले.

"गौरव दा, मी सांगितल्याप्रमाणे सगळयांवर देखरेख करा. कामे करवून घ्या. मी तश्या त्यांना तुमच्यासमोर सूचना दिल्या आहेतच, पण तरीही आता तुम्ही जातीने त्यांचेकडून कामे करवून घ्या. मी आता घराजवळच्या बागेत गवतावर बसून लॅपटॉपवर थोडे लिहायला बसतो आहे. काही लागलं तर सांगा मला!"

"हा राज साहेब. नक्की. तुम्ही काय बी काळजी नगा करू. म्या पाहतो सगळं. तुम्ही तुमचं लिव्हा!"

"बरं, गौरव दा आणखी एक करा. दहा मिनिटांत माझ्यासाठी गरमागरम डार्क कॉफी घेऊन या!"

कॉफी पिल्यानंतर राजेश लिहायला बसला. बराच वेळ तो लिहित होता. कामं पटापट आणि व्यवस्थित होत होती. घरातील खिडकीत ठोकठाक चा आवाज येत होता.

खिडकीत उभा राहून इलेक्ट्रिक करवतीने काम करणारा एक कामगार बराच वेळ बागेत बसलेल्या राजेश कडे एकटक बघत होता.

"ए, गड्या, काय बघतूया समोर? काम कर की आपलं!"

"आरं, मी ईचार करतूया की आपलं साह्यब एवढं काय लिवत्यात त्या ल्यापताप वर? नुसती खट खट खट बटण दाबत असत्यात. बोटं लई झर झर चालत्यात त्यांची न्हाई!"

"चालत्यात! आता तू बी आपली बोटं चालव. लेखक आहेत ते साह्येब. लै लोक वाचतात त्यासनी लीवलेलं!"

नंतर तो करवतवाला राजेश साह्यबाकडं एकटक पहात लाकडे कापत राहिला...

"काय गप्पा मारता रे! पटापट उरका तुमची कामं, टाईम पास नगा करू!" असे म्हणत गौरव देव तेथे आला आणि दोघांना तंबी देऊन गेला.

संध्याकाळी बरेच कामगार निघून गेले. रात्री आठ पर्यंत दोन जण होते ते सुध्दा नंतर निघून गेले.

"गौरव दा, माझ्यासाठी गरम फुलके आणि फोडणीचे वरण करा. आणि हो, थोडा भात पण टाका गरमागरम!"

"होय राज साहेब!"

मग राजेशने घरातल्या टेबलावर ठेवलेली त्याची लाल रंगाच्या कव्हरची फाईल उचलली. त्यात त्याची जुनी कादंबरी होती. ती कादंबरी पुढच्या वर्षीच्या दिवाळी अंकात छापण्याची तयारी दहा आघाडीच्या दिवाळी अंकांनी तयारी दर्शवली होती. दहा दिवाळी अंकांत एकच कादंबरी छापली जाण्याची ही पहिलीच वेळ असणार होती. त्या कादंबरीला स्वतः अमितजी प्रस्तावना लिहिणार होते.

फिल्मी क्षेत्रावर आधारित कादंबरी राजेशने आधीच लिहायला सुरू केली होती. हा चित्रपट राजेश मराठीत बनवणार होता आणि स्वतः प्रोड्युस करणार होता आणि समिरण डायरेक्ट करणार होता! तसेच समिरण आणि राजेशने मिळून अनेक मराठी चित्रपट निर्मिती करायचे ठरवले होते. मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय गोल्डन डॉल पुरस्कार मिळवून द्यायचा हेच एकमेव लक्ष्य दोघांनी ठेवले होते. फक्त एकदाच नाही तर पुन्हा पुन्हा! मराठी साहित्यिक आणि चित्रपट टिव्ही क्षेत्रात लिखाण करण्याची इच्छा असलेल्या नवोदित लेखकांना सर्वतोपरी मदत करायचे हे त्याने ठरवून टाकले होते. तसेच दरवर्षी दिवाळी अंकासाठी तो खास एक कादंबरी लिहून देणार होता, एक कृतज्ञता म्हणून!

बॉलीवूड मध्ये तर तो स्थिरावला होताच पण हॉलीवूडच्या टीम सोबत काम करून त्याचा अनुभव घेऊन ते सगळे तंत्र मराठीत वापरायचे हा त्याचा उद्देश होता. मात्र काही महिने उलटल्यानंतरही अजून प्रिसीला कडून हॉलीवूड चित्रपटात राजेशच्या लेखनासाठी होकार आलेला नव्हता. मागील महिन्यापासून प्रिसीला आणि इतर हॉलीवूड टीम "ग्रँड पर्पल" या सेव्हन स्टार हॉटेलमध्ये उतरली होती.

"एकदा मला प्रीसिला म्हणजे सुप्रियाला एकांतात भेटायला बोलवलं पाहिजे म्हणजे तिच्या मनात नेमके काय आहे ते कळेल!" असा विचार राजेश करत होता. पण पुन्हा वैवाहिक जीवनात यामुळे वादळ तर निर्माण होणार नाही ना? तो द्विधा मनस्थितीत सापडला. हॉलीवूडसाठी मिळालेली आयती लेखनाची संधी त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडायची नव्हती.

राजेशने अभिजितसाठी लिहिलेल्या स्क्रिप्टवर चित्रपट शूट करून झाला होता फक्त रिलीज व्हायचा बाकी होता.

मागील काही महिन्यांत राजेशने ऐकले होते की सूरजच्या मृत्यूनंतर त्याची फूड चेन आणि त्याच्या फ्लॅटची जप्ती करण्यात आली कारण त्याचे आंतरराष्ट्रीय ड्रग माफिया आणि टोळीशी संबंध असल्याचे पुरावे पोलिसांना आढळले आणि रागिणीच्या आत्महत्येची फाईल पुन्हा उघडली गेली. पोलिस तपास जोरात सुरू होता. सध्या पत्रकारिता थोडी कमी केली असली तरी त्याची टीम त्याला सगळ्या खबरी देत होतीच.

त्याच्या टीमकडून त्याला आणखी एक गोष्ट कळली होती ती म्हणजे वीणा वाटवे आणि पिके यांच्यात अलीकडे भांडणे वाढली होती. त्यांचा ब्रेकअप होऊ नये यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न सारंग करत होता. त्यांच्या भांडणाचे कारण आणि मूळ हे केके विरूध्द राजेशने आणि एकूण टीमने चालवलेल्या एकूण अभियानात होते.

तसेच सोनी बनकरच्या मुंबईतून अचानक गायब होण्यामागचे गूढ अजून उलगडले नव्हते. राजेश आणि त्याची पत्रकार टीम शोधून थकली पण सोनीचा ठावठीकाणा लागला नाही.

तिने पाण्यात उडी मारल्याचे कुणालाही माहिती नव्हते कारण तिचे प्रेत अजूनही कुणालाच सापडले नव्हते म्हणून गायब झालेले किंवा हरवलेले व्यक्ती यांच्या लिस्टमध्ये तिचे नाव पोलिस स्टेशन मध्ये लिहिलेले होते.

घरी अक्षर हळूहळू मोठा होत चालला होता. कधी कधी तो हवी ती वस्तू मिळवण्यासाठी खोटे खोटे रडण्याची अशी काही ॲक्टिंग करायचा की राजेशला वाटायचे की याचे नांव अक्षर न ठेवता अभिनय ठेवायला हवे होते.

"साहेब, हे घ्या, गरम फुलके आणि वरण. मग भात सुध्दा आणतो!"

गौरव देवच्या या वाक्याने विचार करता करता राजेश भानावर आला. त्याने गरमागरम जेवण करून घेतले. मग सुनंदा आणि आई तसेच अक्षर याचेशी तो फोनवर बोलला.

रात्री -

"साहेब, मी निघतो आता. परवा दुपारी येतो. माझ्या काकांकडे जाऊन येतो. त्यांनी बोलवलं आहे कधीचं! त्यांना थोडं महत्वाचं काम आहे."

"ठीक आहे, गौरव दा. हरकत नाही. या तुम्ही! आता उद्या मला सगळं बघावं लागणार पण हरकत नाही, एकाच दिवसाची तर गोष्ट आहे. मी करून घेऊन अॅडजस्ट!"

गौरव देव निघून गेला.

रात्री राजेशने बरेच लिखाण केले. रोज तो दिवसभरात लिहिलेले सगळे लिखाण ऑनलाइन गुगल ड्राईव्हवर सेव्ह करून ठेवायचा. आज मात्र त्याला कंटाळा आला आणि झोप पण खूप येत होती. लॅपटॉप बंद करून तो जवळच्या बेडवर गेला आणि झोपेच्या अधीन झाला.

&&&&

# प्रकरण 52

"मुंबईतच काय, मी म्हणतो पूर्ण आशिया खंडात कुठेही अशा प्रकारचे लेखकांसाठी असलेले थीम पार्क नसावे!" श्री. वामनराव विभुते म्हणाले.

"खरे आहे तुम्ही म्हणता ते! मुंबईतील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या थीम पार्क मध्ये बसून महिन्याची फक्त माफक नाममात्र फी भरून कुणीही नवोदित लेखक अगदी शांततेत लिखाण करू शकतो. काहींना लिहिण्यासाठी लॅपटॉप सुध्दा मोफत उपलब्ध करून दिले जाईल किंवा ज्यांना कागदावर लिहायचे आहे त्यांना वह्या पेन दिले जातील. विशेषत: फिल्म क्षेत्रात लिहिणाऱ्या लेखकांना प्राधान्य दिले जाईल!" राजेश म्हणाला.

"वा! कल्पना आवडली तुमची. काही आणखी मदत लागली तर सांगा मला!" विभुते.

राजेश पुढे म्हणाला, "धन्यवाद सर! शेजारच्या या दोन मजली बिल्डिंगमध्ये मुंबई बाहेरच्या नवोदित लेखकांना माफक पैशांत राहण्याची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात आली आहे! वरच्या मजल्यावर एक मोफत लायब्ररी आहे! आणि फक्त लेखकच नाही तर ज्यांना शांततेत वाचन करायचे आहे अशा पुस्तक प्रेमी मंडळींसाठी सुद्धा हे थीम पार्क एक पर्वणी आहे."

त्या थीम पार्क मध्ये छोटेसे तळे, छोटी हॉटेल्स, हिरवेगार गवत, हिरवीगार झाडे, फुलझाडे लावलेली होती. तसेच काही ठिकाणी झाडाऐवजी खोडाच्या आकाराएवढ्या उभ्या पेन्सिल्स आणि त्यांच्या अणीच्या टोकांवर फांद्या उगवून पसरलेल्या होत्या पण फांद्यांवर पाने फळे यांच्या ऐवजी कॉम्प्युटरच्या कीबोर्डच्या किज (कीबोर्डची बटणे) जोडलेली होती आणि पारंब्यांच्या ऐवजी फिल्म स्ट्रीपस लटकावलेली होती. ही अशी पेन्सिल झाडे एकत्र ओळीने लावली होती. झाडांच्या बाजूला अनेक खोडरबर ओळीने पेरून त्यांना जाळीने बांधून त्याचे कुंपण केले होते. तसेच रस्त्याने अनेक बाके ठेवलेली होती. खाली हिरवळीवर बसण्याची व्यवस्था होती.

हे बघून विभुते म्हणाले, "राजेश, तुमच्या कल्पनाशक्तीला मनापासून दाद द्यावीशी वाटते!"

"धन्यवाद!" राजेश म्हणाला.

अचानक तेथे अंधार झाल्याचे राजेशला दिसले. विभुते कुठे दिसत नव्हते. आता त्या थीम पार्कमध्ये विभुतेच काय तर इतर दुसरे कुणी चिटपाखरूसुध्दा नव्हते! पक्ष्यांची किलबिल अचानक थांबली. पानांची सळसळ बंद झाली. कुठे गेले सगळे? असा विचार करून राजेश त्याच्या जवळ असलेल्या मोबाईलच्या टॉर्चच्या उजेडात पुढे पुढे सरकू लागला. वर आकाशात चंद्र सुध्दा नव्हता!

दूरच्या एका पेन्सिल झाडाजवळ ठक ठक असा आवाज येत होता. कुणीतरी पाठमोरा माणूस पेंसिलीच्या झाडावर कुऱ्हाडीने घाव घालत होता. राजेशला ते सहन झाले नाही. तो टॉर्चच्या उजेडात त्या माणसाजवळ जाऊ लागला. खाली कीबोर्डचे बटणं इकडे तिकडे विखुरलेले होते.

"ए! कोण आहेस तू?" राजेशने त्याच्या जवळ जात दरडावून विचारले.

तो अद्याप पाठमोराच होता. कुऱ्हाडीचा घाव घालणे त्याने चालूच ठेवले. त्या घावांमुळे पटापट कीबोर्डचे बटन खाली पडत होते. त्या फिल्म स्ट्रीप खाली कोसळत होत्या.

"मी तुला विचारतोय माणसा! कोण आहेस तू? काय करतोयस येथे? कुणाच्या परवानगीने अलास? ही झाडे का तोडतोयस?" राजेश एकामागून एक प्रश्नांची सरबत्ती सुरू केली.

तो माणूस घाव घालायचे थांबवून हसायला लागला. अजून पाठमोरा होता तो!

"मी कोण? हा हा हा हा! मी आहे विमा! विचारांचा मारेकरी!" अजूनही तो पाठमोरा होता.

"विचारांचा मारेकरी? म्हणजे नेमका कोण आहेस तू?"

"एखादा विचार आवडला नाही तर मी त्या विचारांना नष्ट करतो आणि ते विचार निर्माण करणाऱ्या लोकांना सुध्दा!" असे म्हणून त्याने आपली मान 360 डिग्री कोनातून स्वतःच्या पाठीमागे म्हणजे समोर राजेशकडे फिरवली आणि जबरदस्त घाम येऊन राजेश स्वप्नातून जागा झाला..

"बापरे! काय भयंकर स्वप्न!" असे म्हणून बघतो तो काय पूर्ण बंगल्यातील लाईट गेलेले होते. त्याने मोबाईलची बॅटरी लावली आणि तो पाण्याचा ग्लास शोधू लागला. रात्रीचे दोन वाजले होते.

पाण्याचा ग्लास शोधत असताना त्याला त्याचा लॅपटॉप चालू असलेला दिसला पण तो टेबलापासून थोड्या वर उंचीवर होता. पाणी प्यायचे सोडून तो टेबलजवळ गेला तर त्याला एक काळा कोट घातलेला माणूस दिसला ज्याचा चेहरा कोटाच्या टोपीमुळे डोळ्यापर्यंत झाकलेला होता! आणि अंधार सुध्दा असल्याने चेहरा नीट दिसत नव्हता.

त्या माणसाने राजेशचा लॅपटॉप एका हातात धरला होता आणि दुसऱ्या हातात लाकडे कापायची करवत होती. लॅपटॉपला चार्जिंगची वायर तशीच जोडलेली होती.

स्वप्न आठवून राजेशला अजून जास्त भीती वाटली.

"क क कोण आहेस तू?" राजेशने गर्भगळीत होऊन विचारले आणि त्या माणसाकडे जाऊ लागला.

"मी कोण? हा हा हा हा!" असे म्हणून त्याने राजेशच्या लॅपटॉपला हवेत जोराने छताकडे भिरकावले. जोराच्या झटक्याने प्लग सॉकेट मधून निघाला आणि लॅपटॉप छताला वेगाने आपटून फुटला आणि सीलिंग फॅन वर जाऊन अर्धा उलटा हवेत लटकला. वायर एका पात्यात आणि लॅपटॉप एका पात्यामध्ये अडकून हवेत लटकू लागला.

अचानक झालेल्या या विचित्र घटनेने राजेश घाबरला. त्या माणसाने वेगाने राजेशच्या हाताला झटका दिला आणि राजेशच्या हातातला मोबाईल खाली पडला. मग बुटाने तो मोबाईल त्याने तोडला आणि तो माणूस आता ती इलेक्ट्रिक करवत (पण लाईट नसल्याने बंद असलेली) दोन्ही हातात घेऊन राजेशकडे येऊ लागला. राजेश मागे सरकला आणि त्याचा धक्का लागून लटकणारा लॅपटॉप खाली पडून आणखी फुटला आणि राजेश बेडवर पडला. त्या माणसाने वेगाने बेडवर मुसंडी मारली आणि राजेशचा उजवा हात एका हाताने दाबून धरला आणि त्याच्या हाताची बोटे करवतीने कापायला सुरुवात केली. अंगठा जवळपास अर्धा कापला गेल्याने वेदनेने राजेश ओरडला आणि त्याने त्या माणसाच्या पोटात जोराची लाथ हाणली.

तो माणूस भेलकांडून दूर झाला तोपर्यंत राजेश बेडवरून उठला. राजेशने पाण्याचा काचेचा जग उचलला आणि त्या माणसाच्या डोक्यावर भिरकावला. तो त्याच्या टाळक्यावर आदळला आणि थोडेसे रक्त आले आणि खाली पडून काचेचे तुकडे झाले. त्यामुळे तो बावचळला आणि खवळला.

त्याने खालचा लॅपटॉप उचलला आणि राजेशच्या डोक्यावर नेम धरून फेकला पण राजेश बाजूला झाला आणि लॅपटॉप खाली पडला. पण राजेशच्या पायात त्या फुटलेल्या काचेचे तुकडे गेले आणि तो विव्हळू लागला. मात्र त्या माणसाच्या पायात बूट असल्याने त्या काचेच्या तुकड्यांवरून तो पुढे राजेश कडे येऊ लागला.

त्याने राजेशचा उजवा हात एका हाताने पुन्हा दाबून धरला आणि त्याच्या हाताची बोटे करवतीने कापायला सुरुवात केली. अंगठ्या जवळची बोटे कापली जाऊ लागली. राजेश वेदनेने ओरडू लागला आणि डाव्या हाताने राजेशने त्याच्या गळयाला नख लावून कुरताडले. त्या माणसाच्या नरड्यातून रक्त वाहू लागले तसा तो बिथरला आणि करवत फेकून देऊन त्याने राजेशच्या कानाफडात दोन थपडा लगावल्या आणि राजेशला तो एका पाठोपाठ एक तोंडावर बुक्के मारत राहिला आणि म्हणाला, "साल्या, तुझी दहा पैकी दहा बोटे तोडल्याशिवाय मी राहणार नाही!"

मग दोघेही एकमेकांना भिडले. जवळपास कुस्ती खेळतात तसे ते एकमेकांना उचलून हवेत फेकू लागले. तो माणूस करवत पडली होती तिथे जायला निघाला तर जमिनीवर पडलेल्या राजेशने दुखणाऱ्या हातानेच त्याचे पाय जोराने ओढले आणि तो माणूस तोंडावर आपटला. मग तितक्याच त्वेषाने तो उठला आणि त्याने राजेशच्या छातीवर बुटाची लाथ मारली आणि पुन्हा पुन्हा मारू लागला. राजेशने त्याला जोराने ढकलले. तो पडला!!

बराच वेळ त्या अंधाऱ्या एकाकी बंगल्यात हे द्वंद्व सुरू होते. मग काही वेळाने त्या बंगल्यातून एक जोराची किंकाळी ऐकू आली...!!

(समाप्त)

# लेखकाविषयी

लेखक हे पुणे येथील Hewlett Packard Enterprise या कंपनीत Quality And Audits Manager असून लेखन हा त्यांचा आवडता छंद आहे. लेखनाव्यतिरिक्त चित्रकला, व्यंगचित्रे काढणे, वाचन करणे तसेच पौराणिक, ऐतिहासिक आणि प्रवासवर्णने या प्रकारांत लेखकाला विशेष रुची आहे.

लेखक हे पत्नी मंजुषा, दोन मुले- अथर्व, आरोही तसेच आई वडील यांचेसह पुणे येथे रहातात.

लेखकाशी sonar.nimish@gmail.com या इमेल आयडी वर संपर्क करता येऊ शकतो.

तसेच लेखकाला खालील सोशल मीडीया वर फॉलो करू शकता:

https://twitter.com/nimishtics

https://www.facebook.com/nimishtics



लेखकाचे ब्लॉग्स:

https://nimishtics.blogspot.com/

https://vachanastu.blogspot.in/

http://artimidis.blogspot.in/

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी. आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला अर्धाकोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाटत. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटगत सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा. हे सर्व मोफ़त आहे.